# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूर शिक्षण केंद्र

# आधुनिक भाषाविज्ञान

**एम. ए. भाग १ : मराठी**

**सत्र पहिले : अभ्यासपत्रिका क्र. ४.३**

**सत्र दुसरे : अभ्यासपत्रिका क्र. ८.३**

(शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून)

**आधुनिक भाषाविज्ञान**
एम.ए.भाग १: मराठी
अभ्यासपत्रिका क्रमांक ४.३ व ८.३
२०१८ पासून होणाऱ्या परीक्षांसाठी

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१८
एम. ए. भाग-१ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ४००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-695-7

★ दूर शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४. (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## समन्वय समिती : मराठी

अध्यक्ष - **डॉ. आर. जी. गवस**
मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. डी. ए. देसाई**
  विवेकानंद कॉलेज,
  कोल्हापूर
- **प्रा. डॉ. डी. के. वळवी**
  छत्रपती शहाजी कॉलेज,
  दसरा चौक, कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**आधुनिक भाषाविज्ञान**
एम.ए.भाग १: मराठी
अभ्यासपत्रिका क्रमांक ४.३ व ८.३

**अभ्यास घटकांचे लेखक**

| **लेखक** | **घटक क्रमांक आणि शीर्षक** |
|---|---|
| **सत्र पहिले : अभ्यासपत्रिका क्रमांक ४.३ : आधुनिक भाषाविज्ञान** | |
| **डॉ. शिवाजी पाटील**<br>बळवंत कॉलेज, विटा | **१. भाषिक व्यवहाराचे स्वरूप** |
| **डॉ. नंदकुमार मोरे**<br>मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | **२. आधुनिक भाषाविज्ञानाचे स्वरूप** |
| **डॉ. अनिल प्रभाकर उबाळे**<br>प्रा. एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर | **३. भाषेच्या अभ्यासाच्या पद्धती** |
| **डॉ. अनिल पांडुरंग गवळी**<br>यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी,<br>ता. चंदगड, जि. कोल्हापूर | **४. भाषिक परिवर्तन**<br>अ) ध्वनिपरिवर्तन<br>ब) अर्थपरिवर्तन |
| **सत्र दुसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक ८.३ : आधुनिक भाषाविज्ञान** | |
| **डॉ. नंदकुमार मोरे**<br>मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | **१. वाक्यविचार** |
| **डॉ. जयकर दमामे**<br>आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा | **२. भाषाकुलाची संकल्पना व मराठी भाषा** |
| **प्रा. गणपत हराळे**<br>गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली. | **३. मराठी : प्रमाणभाषा आणि बोली** |
| **डॉ. अनिल पांडुरंग गवळी**<br>यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी,<br>**प्रा. शिवाजी पाटील**<br>बळवंत कॉलेज, विटा | **४. अ) मराठीवरील अन्य भाषांचा परिणाम**<br><br>**४. ब) मराठी व्याकरण** |

**■ संपादक ■**

**डॉ. शिवाजी पाटील**
बळवंत कॉलेज, विटा,
जि. सांगली

**डॉ. अनिल पांडुरंग गवळी**
यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी,
ता. चंदगड, जि. कोल्हापूर

## प्रास्ताविक

आधुनिक भाषाविज्ञान ही अभ्यासपत्रिका एम. ए. भाग–१ साठी आहे. या अभ्यासपत्रिकेत भाषिक व्यवहाराचे स्वरूप, आधुनिक भाषाविज्ञानाचे स्वरूप, भाषेच्या अभ्यासाच्या पद्धती, भाषिक परिवर्तनातील ध्वनिपरिवर्तन आणि अर्थपरिवर्तन, वाक्यविचार, भाषाकुलाची संकल्पना आणि मराठी भाषा, प्रमाणभाषा आणि अर्थपरिवर्तन, वाक्यविचार, भाषाकुलाची संकल्पना आणि मराठी भाषा, प्रमाणभाषा आणि बोली यामध्ये अहिराणी, वऱ्हाडी आणि कोकणी या बोलींचा अभ्यास, मराठीवरील अन्य भाषांचा परिणाम, मराठी व्याकरणांतर्गत विभक्ती आणि प्रयोगव्यवस्था असे घटक आहेत. या घटकांवर त्या त्या अभ्यासकांनी सविस्तर लिहिलेले आहे. त्याचा उपयोग आपणाला होईल. प्रत्येक घटकात विषयविवेचन या विभागांतर्गत सविस्तर चर्चा केलेली आहे. उदाहरणे व स्पष्टीकरण देऊन तो घटक दूरशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कसा समजेल याची दक्षता घेतलेली आहे. प्रत्येक घटकावर स्वयंअध्ययन प्रश्न दिलेले आहेत. काही ठिकाणी त्याची उत्तरेही दिलेली आहेत. आपण या सर्वांचा उपयोग करून घेऊन उत्तम अभ्यास करावा. तसेच प्रत्येक घटकाच्या शेवटी क्षेत्रीय कार्य म्हणून विविध उपक्रम दिलेले आहेत. सदर उपक्रम आपण पार पाडावेत, म्हणजे प्रत्यक्षानुभव आपणास येईल. दिलेले संदर्भग्रंथ मिळवून वाचा, त्या त्या घटकानुसार त्यातील नोट्स, टाचणे काढा. या पद्धतीने अभ्यास केल्यास सविस्तर अभ्यास होईल. अर्थात स्वयंअध्ययन साहित्यामुळे आपणास संदर्भग्रंथाप्रमाणे मदत होईल.

**संपादक**

■ अभ्यासमंडळ : मराठी ■

अध्यक्ष : **डॉ. दत्तात्रय मल्लू पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

- **प्रा. डॉ. आर. जी. गवस**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. रणधीर शिंदे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. एस. जी. मेणकुदळे**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. शहाजी जगन्नाथ पाटील**
  पद्मभुषण वसंतरावदादा पाटील कॉलेज, तासगांव,
  जि. सांगली
- **डॉ. सुभाष गणपती जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रभाकर पवार**
  मुधोजी कॉलेज, फलटण, जि. सातारा
- **डॉ. आर. के. शानेदिवाण**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर
- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. उदय रामचंद्र जाधव**
  शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि. सातारा
- **प्रा. डॉ. दासू वैद्य**
  मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
  विद्यापीठ, औरंगाबाद
- **डॉ. नंदकुमार विष्णु मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. गोपाळ ओमाण्णा गावडे**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- **श्री. के. एस. अटकरे**
  कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद

# अनुक्रमणिका

## सत्र पहिले : अभ्यासपत्रिका क्रमांक ४.३
## आधुनिक भाषाविज्ञान


| | | |
|---|---|---|
| घटक १ | भाषिक व्यवहाराचे स्वरूप | १ |
| घटक २ | आधुनिक भाषाविज्ञानाचे स्वरूप | २० |
| घटक ३ | भाषेच्या अभ्यासाच्या पद्धत | ४४ |
| घटक ४ | भाषिक परिवर्तन<br>अ) ध्वनिपरिवर्तन<br>ब) अर्थपरिवर्तन | ६० |


## सत्र दुसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक ८.३
## आधुनिक भाषाविज्ञान


| | | |
|---|---|---|
| घटक १ | वाक्यविचार | ८५ |
| घटक २ | भाषाकुलाची संकल्पना व मराठी भाषा | १०३ |
| घटक ३ | मराठी : प्रमाणभाषा आणि बोली | १२९ |
| घटक ४ | अ) मराठीवरील अन्य भाषांचा परिणाम<br>ब) मराठी व्याकरण | १७९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## सत्र १ : घटक १

### (विभाग १ Module I)

# भाषिक व्यवहाराचे स्वरूप

## १.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचे अध्ययन केल्यानंतर तुम्हांला;

- भाषिक व भाषेतर संप्रेषणाचे स्वरूप माहिती होईल.
- फेर्दिनां-द-सोस्यूर, नोम चॉम्स्की व लेनर्ड ब्लूमफील्ड यांच्या आधुनिक भाषाविज्ञानातील संकल्पना समजून घेता येतील.
- उच्चार व लेखन यातील भेदाचे आकलन होईल.
- लोकसमुहातील भाषिक व्यवहाराचे स्वरूप समजावून घेता येईल.

## १.२ प्रास्ताविक

मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये भाषेचे अस्तित्व जाणवते. मानवी भाषेतील संपर्कप्रक्रियेमध्ये भाषेबरोबरच इतरही माध्यमे असतात. हावभावातून भाषा व्यक्त करता येते. खुणा, चित्रे यांचा भाषा म्हणून वापर करता येतो. पण ध्वनिरूप भाषा अत्यंत प्रभावी ठरते. ज्ञानेश्वरांनी अमूर्ताचे मूर्त रूप केवळ भाषेच्याद्वारा व्यक्त केले आहे. भाषेद्वारे माणसे एकमेकांशी संपर्क साधतात; म्हणजेच माहिती, ज्ञान, विचार, अनुभव, भावना यांची देवाण-घेवाण करतात. हे भाषेचे मूलभूत कार्य आहे. आपण या पहिल्याच प्रकरणात भाषिक व भाषेतर संप्रेषण कसे असते हे समजावून घेऊन आधुनिक भाषाविज्ञानात भाषेच्या संबंधाने नवीन संकल्पना आलेल्या आहेत, त्यांचा विचार करणार आहोत. त्याचबरोबर बोलली जाते ती भाषा हे लक्षात घेता तिचे उच्चारणाचे रूप हे महत्त्वाचे असते. परंतु त्यास लेखनरूप देताना काही मर्यादा पडतात. पण भाषेतील विचार टिकवून ठेवण्यासाठी लेखनही तितकेच महत्त्वाचे ठरते. त्यामुळे उच्चार व लेखन याविषयी येथे जाणून घ्यायचे आहे.

## १.३ विषय विवेचन

आपणास या प्रकरणात भाषिक व्यवहाराचे स्वरूप जाणून घ्यावयाचे आहे. त्यासाठी भाषिक व भाषेतर संप्रेषणाचे स्वरूप प्रथम समजावून घेऊ आणि नंतर आधुनिक भाषाविज्ञानातील काही संकल्पना माहीत करून घेऊ.

## ■ भाषिक व भाषेतर संप्रेषण (Communication)

मानवी समाजाने स्वत:च्या विकासाच्या अवस्थेत भाषा या एका अतिशय महत्त्वाच्या वस्तूची निर्मिती केली. भाषा हा शब्द 'भाष' म्हणजे बोलणे या अर्थाच्या संस्कृत धातूपासून बनलेला आहे. बोलणे, भाषण करणे या अर्थीच भाषा शब्द पूर्वीपासून वापरात आहे. हे बोलणे अर्थातच मुखावाटे निघणाऱ्या ध्वनींच्या समूहांतून आकारास येते. मनातील विचार, कल्पना व्यक्त करण्यासाठी मुखावाटे निघालेल्या ध्वनींचा सार्थ समूह म्हणजे भाषा, अशी साधारण व्याख्या केली जाते. एकमेकांचे एकमेकांस विचार कळविण्याचे शब्दरूप साधन म्हणजे भाषा. हे शब्दरूप साधन प्रामुख्याने मौखिक म्हणजे ध्वनिरूप असते.

भाषा ही एक **सहजक्रिया** आहे. तिचा आपणास इतका परिचय असतो की, भाषेचा स्वतंत्र विचार करण्याचा व अभ्यास करण्याचा विषय आहे याची जाणीव नसते. त्याचबरोबर भाषा ही **अर्जित वस्तू** आहे. काही ध्वनी निर्माण करता येणे ही गोष्ट सहज असली तरी आशय प्रकट करणारे विधान करता येणे म्हणजे बोलता येणे ही माणसाने मिळविलेली म्हणजे अर्जित वस्तू आहे. (अभिनव भाषाविज्ञान : गं. ना. जोगळेकर पृष्ठक्रमांक २-३) त्याचबरोबर भाषा या शब्दास इंग्रजी पर्याय Language असा आहे. या शब्दातील मूळ Lingua (लॅटिन) असून त्याचाही अर्थ Speech, Tongue असाच आहे.

भाषा बोलली जात नसून ती एक संभाव्य अवस्था असते. जेव्हा भाषेचे ध्वनीत रूपांतर होते तेव्हा ती भाषा राहत नाही, तर भाषण होते. भाषण ही व्यक्तिगत क्रिया असते. याउलट भाषा ही व्यक्तिनिरपेक्ष गोष्ट आहे. ती व्यक्तिनिरपेक्ष असली तरी संपूर्ण समाजाची मालमत्ता या अर्थी ती एक समाजसापेक्ष अशी सामाजिक संस्था असते. (डॉ. अनिल गवळी : भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, पृष्ठक्रमांक १६-१७)

### १. भाषिक संप्रेषण

मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये भाषेचे अस्तित्व जाणवते. भाषेच्याद्वारे आपण रागावतो, प्रेम करतो, शिव्या देतो, निर्देश करतो, वर्णन करतो, आज्ञा देतो, खोटे बोलतो, कविता लिहितो. अशी भाषेच्या उपयोगाची ही यादी वाढविता येईल. मानवी समाजातील संपर्क प्रक्रियेमध्ये भाषेबरोबरच इतर माध्यमेही असतात. उदाहरणार्थ, रागावण्यासाठी डोळे वटारता येतील. परंतु भाषा हे माध्यम सर्वस्पर्शी आहे. अशी इतर माध्यमे नाहीत. भाषेद्वारे माणसे एकमेकांशी संपर्क साधतात म्हणजेच माहिती, ज्ञान, विचार, अनुभव, भावना यांची देवाणघेवाण करतात, एकमेकांना समजून घेतात; एकमेकांशी संबंध, नाती, प्रस्थापित करतात. या देवाणघेवाणीच्या प्रक्रियेला संदेश किंवा संप्रेषण (Communication) म्हणतात. तेव्हा भाषेचे मूलभूत कार्य म्हणजे सामाजिक संदेशन होय.

भाषेच्या संस्काराने आजूबाजूची भाषा आपण बोलायला शिकत असतो. त्यास मातृभाषा/स्वभाषा/ जन्मभाषा असे म्हणतो. जगात हजारो भाषा असतात. दुसऱ्याशी संवाद साधण्यासाठी भाषेचा उपयोग करतो. बालणे व ऐकणे ही एकाच क्रियेची दोन अंगे आहेत. दोन्हीत कुठेतरी दोष असले तर संप्रेषणाची क्रिया होऊ शकत नाही. काहींना ऐकू येत नाही तर काहींना बोलता येत नाही, तेव्हा संप्रेषण घडू शकणार नाही. भाषा वेगळी असेल तरीही संप्रेषण घडणार नाही, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे.

**■ भाषा : एक संकेत प्रणाली**

भाषा हा शब्दप्रयोग आपण अनेक अर्थाने वापरतो. तोंडातून 'ब्र' ही न काढता आपण मूक संमती देत असतो. त्यावेळी ती मूकभाषा होते. प्रेमिक नयनभाषा बोलतात. पशुपक्षांची भाषा, वाहतुक नियंत्रण करणाऱ्या लाल-हिरव्या दिव्यांची भाषा, अगदी अलिकडच्या काळात संगणकाची भाषा असे शब्दप्रयोग करीत असतो. भाषा हा शब्द संकेताची पद्धत या अर्थाने वापरलेला आहे. संकेतानुसार व्यवस्था ठेवली जाते. त्यातून विनिमय होत असतो. उदाहरणार्थ, धोका : लाल दिवा, ध्वज : विविध पक्ष, रंग, चित्र, शरीर, कपडे, वस्तू, आवाज अशी विविध माध्यमे संकेतासाठी वापरली जातात.

आचार-विचारांची अभिव्यक्ती करण्यासाठी आपण अनेकदा हावभावांचाही आधार घेतो. अंगठा दाखविणे, पाठ दाखविणे, दात विचकणे, जांभई देणे, पाय आपटणे, टेबलावर मूठ आपटणे, टाळी वाजविणे, शिटी वाजविणे इत्यादी आपले हावभाव म्हणजे भाषाच असते. मात्र ध्वनीने निर्माण झालेली भाषा सर्वांत महत्त्वाची असते.

मानवाने संप्रेषणासाठी ध्वनींची निवड केली. ध्वनी हे समर्थ माध्यम आहे. रात्र असो अगर दिवस, अडथळा असो किंवा व्यक्ती दूर असो ध्वनीमुळे सुलभता येते. म्हणून संप्रेषणासाठी भाषिक ध्वनी माध्यम महत्त्वाचे आहे. हे संप्रेषण साधताना स्पर्श, हावभाव, हातवारे, अभिनय, नेत्रसंकेत इत्यादी माध्यमांची मदत घेता येते. त्यामुळे भाषिक संप्रेषण अधिक स्पष्टपणे साधता येते. हे भाषिक संप्रेषण व भाषेतर संप्रेषण अशा दोन प्रकारचे असते.

**■ भाषिक संप्रेषण प्रक्रियेचे स्वरूप**

मानवाचे सर्वाधिक संप्रेषण भाषेच्या आधाराने सुरू असते. मानवी जीवनाशी भाषा पूर्णत: एकरूप झालेली असते. बोलणे आणि लिहिणे अशा दोन्ही पद्धतीने मानव भाषा वापरून संप्रेषणाची क्रिया पूर्ण करतो. स्वत:ची भावना व्यक्त करणे हा संप्रेषणाचा मुख्य उद्देश असल्यामुळे आपण सुख, दु:ख बोलून व्यक्त करतो. मनामध्ये निर्माण झालेल्या भावना विविध प्रकारच्या असतात. त्या व्यक्त करणे न करणे यावर व्यक्तीची मानसिकता असते. शंकांचे निरसन करणे, मनातील गोष्ट बोलून मन

मोकळे करणे, स्वत:ची भावना व्यक्त करून दिलासा मिळविणे अशा प्रकारचे संप्रेषण मानवी जीवनामध्ये सतत सुरू असते. लेखक, कवी भाषेच्या आधाराने वाचकांशी संप्रेषण करतात. ते वाचकांशी संवाद साधतात. पत्र लिहिणेदेखील भाषेच्या साहाय्याने सुरू असते. अलिकडे संप्रेषणासाठी प्रभावी ठरलेल्या इमेल, एमएमएस, एसएमएस सारखी आधुनिक माध्यमे मानवाच्या संप्रेषणप्रक्रियेची उदाहरणे आहेत.

भाषा ही संकेतावर आधारलेली आहे. कोणताही शब्द उच्चारला तर बोलणाऱ्या आणि ऐकणाऱ्याच्या मनात त्याची एकच प्रतीती आली तर दोघात संवाद होऊ शकतो. आई हा शब्द मराठी भाषकाने उच्चारला तर **माता** किंवा **जननी** असा बोध होईल. कन्नड भाषकाला मात्र **आजी** असा बोध होईल. तर हिंदी भाषकाला **आली** अशी प्रतीती येईल. छे-मराठीत नकार (नाही) तर गुजरातीत होकार (होय). दोन व्यक्तीत संवाद व्हावयाचा असेल तर ध्वनिसंकेताच्या बाबतीत समानता हवी. नाहीतर 'कानडीने केला मराठी भ्रतार। एकाचे उत्तर एका न ये' असे तुकोबांनी म्हटल्याप्रमाणे होईल.

### ■ शारीरिक व मानसिक क्रियांचा संयोग

भाषा ही केवळ बोलणे किंवा ऐकणे अशी शारीरिक क्रिया नसून ती मुख्यत: मानसिक आणि बौद्धिक क्रिया आहे. या दोन्ही क्रियांच्या संयोगातून भाषा सिद्ध होत असते. बोलणे व ऐकणे या प्रकारांनी व्यक्त होणाऱ्या भाषेला **वैखरी** असे म्हणतात. वैखरी भाषिक प्रक्रियेचे अंग आहे. पण त्याआधी मनातल्या मनात जुळवाजुळव करावी लागते. तेव्हा भाषेचे कार्य बोलण्यापूर्वी घडत असते व ऐकल्यानंतरही घडते. संप्रेषण करणे, संदेशाचे वहन हेच भाषेचे मुख्य कार्य आहे; तर संप्रेषण करणे हा मानव आणि मानवेतर जीवांचा एक नैसर्गिक धर्म आहे. संप्रेषण ही मानव व मानवेतर प्राण्यांची गरज आहे. विविध गरजांची पूर्तता, अस्तित्व टिकविणे, विकास साधणे, विचार-भावना व्यक्त करणे अशा अनेक कारणांसाठी संप्रेषण सुरू असते. परंतु मानवेतर जीवांमध्ये संप्रेषणाच्या खूपच मर्यादा दिसतात. संप्रेषण एकट्याने पूर्ण होत नाही. संप्रेषणामध्ये प्रतिसाद महत्त्वाचा आहे. संदेशक, संदेश आणि संदेशग्राहक या तीन गोष्टी संप्रेषणासाठी आवश्यक असतात.

### २. भाषेतर संप्रेषण

भाषेबरोबरच मानव अनेक भाषाबाह्य माध्यमे संप्रेषणासाठी वापरतो. हावभाव, रंग, रेषा, कपडे यांचा वापर, चित्राकृती, यंत्रनिर्मित ध्वनी इत्यादींचा समावेश भाषाबाह्य संप्रेषणामध्ये होतो.

**हावभाव :** भाषेशिवाय देखील मानव संपेषण व्यवहार पार पाडतो. तो स्वत:च्या शरीराचा संप्रेषणासाठी कौशल्याने वापर करून घेतो. आचार-विचारांची अभिव्यक्ती करण्यासाठी आपण अनेकदा हावभावांचाही आधार घेतो. अंगठा दाखविणे, पाठ दाखविणे, दात विचकणे, जांभई देणे, पाय आपटणे, टेबलावर मूठ आपटणे, टाळी वाजविणे, शिटी वाजविणे, कपाळाला आठ्या घालणे,

बोटे मोडणे, विजयी झाल्यानंतर बोटांचा व्ही करणे इत्यादी आपले हावभाव म्हणजे भाषा असते. अशा संकेताना सामाजिक मान्यता असते. त्यामुळेच या हावभावातून मानवाचे संप्रेषण होताना दिसते.

**रंग, रेषा :** मानवी जीवनामध्ये रंग, रेषा, कपडे इत्यादींचा वापर संप्रेषणासाठी होताना दिसतो. लाल, हिरवा, पिवळा, गुलाबी, पांढरा इत्यादी रंगांना विशेष संकेत आहेत. लाल रंग धोक्याची सूचना देतो. हिरवा रंग सकारात्मक संदेश देतो. अलिकडे गुलाबी रंग प्रेमाचे प्रतीक मानले जाते. पिवळा, गुलाबी, पांढरा यांना देखील विशिष्ट अर्थ आहे. काळा रंग अशुभ किंवा नजर लागू नये यासाठी वापरला जातो. हे रंग मानवी जीवनामध्ये एक प्रकारे संप्रेषणाचे कार्य करीत असतात. रेल्वे स्टेशनवर लाल-हिरवा झेंडा, राष्ट्रध्वजावरील रंग; त्यातून दिला जाणारा संदेश, रस्त्यावर रेषांचा उपयोग करून रस्त्याची स्थिती दर्शविणे, समांतर रेषातून आणि एकमेकीला तिरप्या रेषांतून सूचित होणारा आशय ही रेषांतून व्यक्त होणारी भाषा संप्रेषणाचीच उदाहरणे आहेत.

**इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे :** मानवाने भौतिक प्रगती साधताना अनेक वस्तू, उपकरणांचा शोध लावलेला आहे. गाड्यांचे हॉर्न, दरवाजावरील बेल, कारखान्यांचे भोंगे, रस्त्यावरील सिग्नलचे दिवे, रेल्वे व कुकरची शिट्टी इत्यादींचा कौशल्यपूर्वक वापर करून संप्रेषण साधले जाते. दूरदर्शनच्या वाहिन्यांवर अंताक्षरी सारख्या स्पर्धात्मक कार्यक्रमांमध्ये स्पर्धकांमध्ये सर्वात अगोदर कोणी उत्तर द्यावयाचे यासाठी दिवे लावणे किंवा बेल वाजविणे असे पर्याय असतात. त्यातून संप्रेषण साधले जाते.

**इतर माध्यमांचा वापर :** या सर्व माध्यमांव्यतिरिक्त आकाशामध्ये कबुतरे सोडून शांतता प्रदर्शित करणे, फटाके वाजवून आनंद व्यक्त करणे, रणवाद्ये वाजवून युद्धाची सूचना देणे, राखी पाठवून नातेसंबंध जोडणे, फुले देणे, ध्वज फडकवणे इत्यादी उदाहरणे ही मानवाच्या संप्रेषण व्यवहाराचा विचार करताना लक्षात घ्यावी लागतात. मानवाच्या संप्रेषणव्यवहाराचा व्यापक विचार करताना संप्रेषणाची ही उदाहरणे दुर्लक्षित करता येत नाहीत.

रस्त्यावरील धोक्याची सूचना देणारे कंदील, वाहतुक नियंत्रक दिवे, रस्त्यावरील वाहतुक नियंत्रण फलक आणि इतर प्रकारची चिन्हे, ध्वज, यंत्राच्या साहाय्याने मिळणारे संदेश, विविध प्रकारच्या रंगांचा केलेला उपयोग इत्यादी माध्यमामध्ये संदेशन साधण्याची क्षमता असते. सोयीप्रमाणे या माध्यमात बदल केला जातो. पुढे शाळा आहे, पूल अरुंद आहे, रस्ता कच्चा आहे, घाट प्रारंभ इत्यादी सूचना देण्यासाठी रंग आणि रेषा, बाणाची आकृती किंवा प्रत्यक्ष चित्र यांचा वापर केला जातो. त्यातून सूचना मिळतात. सामना चालू असताना वाजविली जाणारी शिट्टी, आगगाडी सुरू होताना वाजणारी शिट्टी, गिरणीचे काम सुरू होताना व संपताना वाजणारे भोंगे यासारखी अनेक साधने वापरली जातात. डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी 'अभिनव भाषाविज्ञान' या ग्रंथात शरीरस्थिती व शरीरबाह्य संज्ञापनाची साधने विस्ताराने दिलेली आहेत.

## ■ मानवेतर संप्रेषण

सृष्टीमध्ये मानवाबरोबर असंख्य मानवेतर प्राणी जीवन जगताना आपण पाहतो. या मानवेतर प्राण्यांचे जीवन अनुभवणे हा मानवाचा आस्थाविषय आहे. काही प्राणी तर मानवी जीवनाशी एकरूप होऊन जीवन जगतात. कुत्रा, मांजर, गाय, म्हैस, बैल, घोडा असे काही प्राणी हे मानवी जीवनामध्ये स्वत:चे योगदान देतात. या प्राण्यांचे जीवन आपण अनुभवतो. हे प्राणी मालकाची आज्ञा पाळताना दिसतात. मालकाने जा म्हटले की कुत्रा बाहेर जातो. पण तोच इतर व्यक्तींचा शब्द तो कुत्रा पाळत नाही. मानवी भाषेचे कार्य संवेदनाचे असेल तर मानवेतर जीवांचीही भाषा असते, असे म्हणता येईल का ? शत्रूला पळवून लावण्यासाठी विशिष्ट संदेश देणे, स्वजातीयांना धोक्याची सूचना देणे, नर-मादी एकत्र येण्यासाठी विशिष्ट संदेश, अन्न मिळण्याच्या ठिकाणाचा निर्देश करणे इत्यादी कार्ये मानवेतर जीवनात घडतात. त्यामागे संरक्षण व संवर्धन या दोन सहज प्रेरणा असतात. पिसारा फुलवून लांडोरीसमोर मोराचे नर्तन हे प्रियाराधन असते. मानवेतर जीवांच्या संप्रेषण व्यवहारासंदर्भातील महत्त्वपूर्ण संशोधन प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ सी. एफ. हॉकेट यांनी केलेले आहे. त्यांच्या A Course in modern Linguistics या १९५८ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकामध्ये हे संशोधन आहे.

### १. मधमाशांचे संदेशन

एका मधमाशीच्या नृत्यावरून इतर मधमाशांना मधाचा ठावठिकाणा लागतो. मधमाशांच्या संदेशनाचा आकृतीद्वारे तपशीलवार विचार डॉ. मिलिंद मालशे यांनी मांडलेला आहे. (आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत व उपयोजन पृष्ठक्रमांक २-३)

मधमाशा पोळ्यामध्ये मधाचे संकलन करतात. एक चिकाटीचे व जिद्दीचे कार्य म्हणून मधमाशांच्या या कार्याचे व्यवहारामध्ये आपण नेहमी उदाहरण देतो. हे कार्य त्या कशा पद्धतीने करतात हे पाहणे तेवढेच मनोरंजकही आहे. मधमाशांच्यामध्ये मध मिळविणे, यासाठी संदेश पाठविणे हे काम नृत्याच्या आधाराने चालते. शेकडो मधमाश्या एकत्र येऊन हे काम पूर्ण करतात. पोळ्यामध्ये मध संकलित करण्यासाठी; मध कोठे आहे, या संदर्भातील संदेश कामकरी मधमाशी तीन प्रकारामध्ये देते. मध सापडलेले ठिकाण पोळ्यापासून किती फूट लांब आहे; हे कामकरी मधमाशी नृत्याच्या साहाय्याने इतर मधमाशांना सांगते. कामकरी मधमाशी मधाचे ठिकाण शोधते आणि पोळ्यात परत येऊन विशिष्ट असे नृत्य करते. या नृत्यावरून मध कोठे आहे, कोणत्या दिशेस आहे, किती लांब आहे, हे समजते. साधारणपणे मधाचे ठिकाण वीस फूटापर्यंत असेल तर मधमाशी पोळ्याच्या आतल्या भिंतीवर वर्तुळाकृती पदन्यास करते. उलट सुलट अशा दोन्ही बाजूंनी ती वर्तुळ पूर्ण करते. मधाचे ठिकाण वीस ते साठ फुटापर्यंत असेल तर मधमाशी अरेबिक आठ अंकाच्या आकाराचे नृत्य करते. मधाचे ठिकाण साठ फुटापेक्षा अधिक अंतरावर असेल तर प्रथम नागमोडी, नंतर अर्धगोल,

पुन्हा नागमोडी व त्यानंतर विरुद्ध बाजूला अर्धगोल अशी आकृतिबंधात अधिक गुंतागुंतीची हालचाल कामकरी मधमाशी करते. नृत्य किती जोमदारपणे होते, यावरून मधाचा दर्जा कळतो. या संदेशनाची मर्यादा म्हणजे हे संदेशन केवळ मध मिळविण्याच्या संदर्भात होताना दिसते. जगभरात सर्वत्र आढळणाऱ्या मधमाशा असेच नृत्य करतात.

**२. स्टिकलबॅक मासा**

जननकाली हा मासा समुद्राच्या किंवा नदीच्या तळाशी एक घरटे बांधतो. ज्या मादीचे पोट आतील अंड्यामुळे पुढे आलेले असेल अशा मादीभोवती येऊन तो नाच करतो. या नाचाचा प्रतिसाद म्हणून ती मादी माशाच्या मागून घरट्यात जाते. घरट्यामध्ये मासा आपल्या चोचीने तिचे पोट घासतो. त्यानंतर ती मादी अंडी टाकते आणि निघून जाते. या अंड्यावर तो नर आपले रेतुक सोडतो. ज्या वेळेस या हालचाली होतात त्यावेळी नरमाशाचे पोट तांबडेलाल झालेले असते व डोळे स्वच्छ निळे असतात. या दोन्ही गोष्टी असल्याशिवाय ही घटना घडत नाही.

**३. हेरिंग गल्स पक्षी व इतर काही प्राणी**

मानवी संदेशन आणि मानवेतर संदेशन यात भेद आहे. पोपट बोलतो म्हणजे तो अनुकरण करतो, त्यास आपण पोपटपंची म्हणतो. मानवाचे मूल ज्या गतीने व विविधतेने भाषा शिकते तसे प्राण्यांबाबत घडत नाही. हेरिंग गल्स पक्षांची पिले अंड्यातून बाहेर आल्यावर आई-बापाच्या चोचीवर चोच मारून अन्न मागतात. या क्रियेला प्रतिसाद म्हणून आई पिलांना अन्न भरवते. मानवेतर संदेशन तीन प्रकारचे असते. **चीत्कार** हा एक प्रकार आहे. जपानमधील डुकरे २३ प्रकारचे ध्वनी काढतात. तर वेर्वेट माकडे ३६ प्रकारचे ध्वनी काढतात. धान्याचा साठा कोणत्या जागी आहे, याचा अंदाज आल्यावर लाल मुंगळ्या विशिष्ट **गंध** असलेला द्रवरूप पदार्थ आपल्या शरीराबाहेर सोडतात, हा गंधावर आधारित दुसरा प्रकार होय. मधमाशांचे संदेशन **स्पर्शाधारित** असते. अर्थात तीव्र संप्रेषण वाहकता केवळ भाषेमध्येच असते.

नेत्रकटाक्ष, डोळे वटारणे, नाक खाजवून खिजवणे, नाक उडवून नापसंती दाखविणे, तोंडाने चक्‌चक् करणे, पाय आपटणे, मूठ आपटणे, टाळी देणे, खाकरणे, लाजणे, खोकणे अशा संदेशनाला देहबोली असेही म्हणता येईल. हे सर्व भाषेतर संप्रेषण असते. निसर्गातील विविध आवाज तसेच घोड्याच्या टापा, आगगाडीची शिटी इत्यादी ध्वनी भाषेतर असले तरी त्यांना संदेशनाची भाषा म्हणता येणार नाही.

## ■ भाषाभ्यासाकडे पाहण्याचा दृष्टिकोण

भाषाभ्यासाची सुरुवात सर्व प्रथम ग्रीकमध्ये झाली. सॉक्रटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी अभिजात ग्रीक भाषेचा उपयोग करून अभ्यास केलेला दिसून येतो. हे सर्व तत्त्वज्ञ असल्यामुळे भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोण तत्त्वज्ञानाचा व काव्यशास्त्राचा होता. अभिजात भाषेकडेच लक्ष पुरविल्यामुळे त्या काळातल्या बोलीकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे व्यवहारभाषांना दुय्यम दर्जा प्राप्त झाला. अशीच अवस्था लॅटिन व संस्कृत भाषेच्या अभ्यासाची झाली. भाषेचा अभ्यास १. मूल्यमापनात्मक आणि आदर्शात्मक २. लिखित साधनांचा सांस्कृतिकदृष्ट्या अभ्यास अशा दोन अंगांनी झालेला दिसून येतो.

भाषाभ्यासकांनी प्रमाणभाषेचे नमुने करण्यावर अधिक भर दिला. भाषिक नमुन्यांना शुद्धाशुद्धतेचे काटेकोर निकष लावले गेले. प्रबळ समाजगटाच्या भाषेचाच व्याकरणात अधिक विचार होऊ लागला. त्याचा परिणाम असा झाला की व्याकरणे आदेशात्मक झाली. ग्रीक, लॅटिन, संस्कृत या भाषेत तयार झालेले व्याकरण आदर्श व्याकरण ठरू लागले. त्यामुळे व्यवहारभाषेतील अनेक वाक्ये चूक ठरविली गेली. आदेशात्मक व्याकरणाच्या चौकटीतून आधुनिक भाषांचाही अभ्यास होऊ लागला. त्यामुळे भाषेत श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद निर्माण होऊ लागला. संस्कृत भाषा श्रेष्ठ, प्राकृत भाषा कनिष्ठ असा दृष्टिकोण वाढीस लागला. आजच्या लोकगीतांतही असे अनेक मराठी शब्द आढळतात, ज्यांची व्युत्पत्ती संस्कृतमध्ये सापडत नाही. संस्कृतपूर्व भाषाही समृद्ध होत्या याचा विचार केला गेला नाही.

अनेक भारतीय भाषा संस्कृतोद्भव आहेत असे मानले गेले आणि असे जरी असले तरी एखादी भाषा आपले स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करते; तेव्हा तिच्या स्वतंत्र अस्तित्वाची दखल घेणे हे भाषाभ्यासकाचे कार्य असते; पण तसे भाषाभ्यासाच्या परंपरेत झालेले नाही. इ. स. पूर्व पाचव्या शतकात पाणिनीने अष्टाध्यायी या ग्रंथात वर्णनात्मक पद्धतीने संस्कृतचा अभ्यास करूनही त्याच्या दृष्टिकोणाकडे कोणाचेही लक्ष गेले नाही. पाणिनीनंतर संस्कृतचे स्वरूप बदलूनही मूळ व्याकरणाच्या चौकटीत अभ्यास होत राहिला. त्यामुळे साहित्याचे आणि व्याकरणाचे खास नमुने तयार झाले.

अगदी अलीकडे दादोबा पांडुरंगांपासून अरविंद मंगळूरकर, लीला गोविलकर यांच्यापर्यंत अनेकांनी मराठी भाषेचा केलेला अभ्यास संस्कृत पारंपरिक व्याकरणावरच आधारित आहे. संस्कृतच्या व्याकरणाचा आदर्श ते टळू शकले नाहीत. एकीकडे संस्कृत भाषेचा आदर्श आणि दुसरीकडे इंग्रजीचा प्रभाव या द्वंद्वातच मराठी व्याकरण आणि व्याकरणकर्ते गुरफटले. संस्कृतमधील कित्येक स्वनिम (ञ, ऋ, लृ) मराठीतून कालबाह्य झालेले असूनही वर्णमालेत त्यांची वर्णी लागतेच.

प्रयोगव्यवस्था, विभक्तीव्यवस्था, आख्यातव्यवस्था ही सुद्धा संस्कृत व इंग्रजी व्याकरणाच्या आदर्शातच अडकलेली दिसते. त्यामुळे आजच्या भाषेचे स्वतंत्र अस्तित्व दुर्लक्षिले गेले आहे.

प्राचीन मराठी साहित्याचा अभ्यास प्राय: तत्त्वज्ञानाच्या व अध्यात्माच्या अंगानेच अधिक झाला. फार झाले तर सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या अंगानेही झाला. परंतु महानुभाव, तुकाराम यांच्या साहित्यातील व्यवहारभाषेचा अभ्यास होऊ शकला नाही. पुढे बखर वाङ्‌मयातही व्यवहारभाषा दिसते. पण त्यांची व्याकरणे आदर्शवत लिहिली गेली.

भाषेचा पारंपरिक अभ्यास हा मोठ्या प्रमाणावर साधनात्मक होतो, असे म्हणता येईल. हस्तलिखित, पोथ्या दुरुस्त करून त्यावर भाष्य करणे, साहित्याचा इतिहास लिहिणे, कोरीव लेखांचे काळ ठरविणे, ताम्रपटांचे अर्थ लावणे, ह्यासाठी भाषेकडे साधन म्हणून पाहिले गेले. तर्कज्ञान, तर्कशास्त्र, साहित्याभ्यास, धर्मशास्त्र, इतिहास यासारख्या क्षेत्रामध्ये उपस्थित झालेल्या समस्या सोडविताना अभ्यासक काहीवेळा भाषिक प्रश्नांशी येऊन ठेपत व त्यातून भाषेचा अभ्यास सुरू होई. त्या समस्येपुरता अभ्यास केला जात असे. भाषेचा अभ्यास भाषेला मध्यवर्ती स्थान देऊन होत नसे. खास भाषेच्याच प्रश्नांना अग्रस्थान होते असेही नाही. बाह्यहेतूसाठी भाषेचा अभ्यास राबवला जाई. त्यामुळे भाषाभ्यासाचे स्वतंत्र क्षेत्र निश्चित होऊ शकले नाही. या तऱ्हेचा साधनात्मक दृष्टिकोणाचा अप्रत्यक्ष परिणाम व्याकरण लेखनावरही झालेला आहे. त्यामुळे अनेक त्रुटी निर्माण झालेल्या होत्या.

थोडक्यात, भाषाभ्यासकांनी भाषेचा अभ्यास तत्त्वज्ञानात्मक अंगानेच केला. भाषा ही समाज आणि संस्कृती यांच्या अभ्यासाचे साधन आहे, हाच दृष्टिकोण बाळगला गेला. भाषेकडे साधनात्मक, आदेशात्मक आणि तत्त्वज्ञानात्मक दृष्टीने पाहिल्याने भाषेची स्वायत्तता संपुष्टात आली.

## ■ ऐतिहासिक भाषाभ्यास

आधुनिक भाषावैज्ञानिकांनी पारंपरिक व्याकरणाबरोबर भाषेच्या ऐतिहासिक अभ्यासपद्धतीसुद्धा आधुनिक वैज्ञानिक पद्धतीपासून वेगळ्या ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पारंपरिक व्याकरणाप्रमाणे ऐतिहासिक भाषाभ्यास हा सुद्धा वैज्ञानिक स्वरूपाचा नाही अशी भूमिका दिसून येते. भाषेचा कालखंड ठरवून दोन कालखंडातील भाषेचा ध्वनी, उच्चार, अर्थ या अंगाने झालेला अभ्यास केवळ पृष्ठस्तरीय राहिला. भाषेच्या मूळ रूपांचा शोध घेऊन उत्पत्ती ठरवणे हाही भाषाभ्यासकांचा दृष्टिकोण होता. यामुळे भाषेचे नेमके स्वरूप कळण्यास मदत होत नाही. वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यास महत्त्व दिले नव्हते.

मध्ययुगीन युरोपीय समाजात **बायबल** च्या प्रभावामुळे भाषाविषयक कल्पना मिथ्यकथांवर आधारलेल्या होत्या. परंतु युरोपियन लोकांचा इतर संस्कृतीशी संबंध आल्याने दृष्टिकोण बदलणे आवश्यक ठरले. १७८६ मध्ये सर विल्यम जोन्सने संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांमधील साम्यस्थळे

यादृच्छिक नसून या भाषामागे एकच जनक भाषा असावी, असा तर्क मांडला. त्यामुळे भाषेचे ऐतिहासिक संशोधन होणे क्रमप्राप्त ठरले.

भिन्न भाषांतील समानार्थी शब्दांमागील ध्वनिसंबंधाचा तुलनात्मक अभ्यास करून ध्वनिपरिवर्तनाचे नियम तयार करता येतात, ही भूमिका स्वीकारली गेली, संस्कृत, ग्रीक व लॅटिन भाषामागे ख्रि. पू. ३००० वर्षापूर्वी 'आदि'म इंडोयुरोपियन ही जनकभाषा असावी, असा निष्कर्ष काढण्यात आला. **भाषाकुल संकल्पना** या अभ्यासात मान्य पावलेली दिसून येते. किंबहुना एकाच कुलातून निर्माण झालेल्या भाषा भाषाभगिनी ठरतात; असे प्रतिपादन करण्यात आले.

ऐतिहासिक भाषाभ्यासामध्ये भाषिक परिवर्तन ही संकल्पना केंद्रवर्ती आहे. भाषिक परिवर्तनाला व्यक्तिलक्ष्यी व जातिलक्ष्यी अशी दोन अंगे असतात. आधुनिक भाषाविज्ञानात ऐतिहासिक भाषाभ्यासातील काही पद्धती उपयोगी पडू शकतात. परंतु जनन, कुल, उत्क्रांती यासारख्या कल्पनांना भाषांच्या संदर्भात वैज्ञानिक मान्यता प्राप्त झालेली नाही.

## ■ आधुनिक भाषाविज्ञान

वरील भाषाभ्यासाची भूमिका नाकारून भाषेचा वस्तुनिष्ठ आणि वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास करण्याच्या भूमिकेतून आधुनिक भाषाविज्ञान जन्माला आले आहे. भाषेला इतर समस्येपासून वेगळे काढून तिच्या अंतर्गत स्वरूपाचा, संरचनेचा अभ्यास करता येतो, त्याविषयी सिद्धांत मांडता येतात व त्यातून भाषेच्या अभ्यासाचे स्वतंत्र, स्वायत्त क्षेत्र निश्चित करता येते; ही आधुनिक भाषाविज्ञानामागची महत्त्वाची जाणीव आहे.

भाषा हा एक प्रकारचा संदेशव्यापार म्हणजेच चिन्हव्यापार आहे. भाषा ही सामाजिक-सांस्कृतिक संस्था आहे. भाषेचा संबंध मनोव्यापाराशी व मानसिक शक्तींशी निगडित आहे. त्यामुळे चिन्हविज्ञान, समाजविज्ञान, मानववंशविज्ञान, मनोविज्ञान यासारख्या क्षेत्राशी भाषाविज्ञानाचा संपर्क येणे व त्यामधून नवीन सीमारेषांवरील अभ्यासक्षेत्रे निर्माण होणे अपरिहार्य आहे. सामाजिक भाषाविज्ञान, मानववंश भाषाविज्ञान, मनोवैज्ञानिक भाषाविज्ञान इत्यादी नवी क्षेत्रे त्यातील साक्ष पटवतील. तरीसुद्धा भाषाविज्ञानाच्या स्वायत्ततेला त्यामुळे बाधा येणार नाही. भाषेची अंतर्गत संरचना हा त्यांचा विषय आहे. या संरचनेचा विविध पातळ्यांवर शोध घेणे, त्याविषयी सिद्धांत मांडणे, हा या अभ्यासाचा मुख्य हेतू आहे. त्यामुळेच या अभ्यासाला 'तात्त्विक वा सैद्धांतिक भाषाविज्ञान' म्हणता येईल. या अभ्यासातील निष्कर्ष व सिद्धांत यांचा उपयोग साहित्याभ्यास, भाषाध्यापन, भाषाविकृती चिकित्सा वगैरे क्षेत्रांमध्ये कसा होऊ शकेल; याचा शोध घेणाऱ्या क्षेत्राला 'उपयोजित भाषाविज्ञान' असे म्हणता येईल.

२० व्या शतकात पारंपरिक भाषाभ्यासाविरुद्ध जे आक्षेप घेतले गेले त्याच्यामागे मुख्यत: **फेर्दिनां द सोस्यूर** या अभ्यासकाने (Course in General Linguistics, 1915) केलेल्या **'एककालिक'** व **'कालक्रमिक'** भाषाभ्यास या भेदाची प्रेरणा आहे. सोस्यूर स्वत: ऐतिहासिक भाषाशास्त्राचा गाढा अभ्यासक होता. परंतु भाषांचा 'विकास', 'उत्क्रांती' इत्यादी विषयीच्या तत्कालिन कल्पनापेक्षा काही वेगळी तत्त्वे त्याने मांडली.

भाषा ही परिवर्तनशील असते असे मान्य केले तरी कोणत्याही एखाद्या कालखंडात तिला अचल स्थिर मानून तिचे विश्लेषण करता येते, हे सोस्यूरच्या सिद्धांतातील मूलभूत तत्त्व क्रांतिकारी होते. भाषिक परिवर्तन म्हणजे एका स्थिर अवस्थेपासून वा स्थितीपासून दुसऱ्या स्थिर अवस्थेकडे वा स्थितीकडे सरकणे, या सोस्यूरच्या विवेचनामुळे एककालिक भाषिक स्थितीचे विश्लेषण आधुनिक भाषाविज्ञानामध्ये महत्त्वाचे ठरले आहे. यासंदर्भात सोस्यूरने भाषा व बुद्धिबळाचा खेळ यांची केलेली तुलना उद्‌बोधक आहे.

आधुनिक भाषाविज्ञानाच पाया सोस्यूरने घातला, असे म्हणण्यात खरोखर काहीच अतिशयोक्ती नाही. वरीलप्रमाणे भाषेच्या एककालिन विश्लेषणाला अग्रक्रम देण्याचे श्रेय सोस्यूरकडे जाते. परंतु केवळ या विश्लेषणाला अग्रक्रम मिळवून देण्यापुरते सोस्यूरचे कार्य मर्यादित नव्हते असे डॉ. मिलिंद मालशे यांनी (आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत व उपयोजन; पृष्ठक्रमांक ४०१) प्रतिपादन केलेले आहे.

एककालिक भाषिक विश्लेणामध्ये पायाभूत ठरणाऱ्या काही संकल्पनादेखील प्रथम सोस्यूरनेच मांडल्या. यापैकी सर्वात महत्त्वाची संकल्पना म्हणजे **भाषिक व्यवस्था** किंवा **संरचना** होय. भाषा ही एक चिन्हव्यवस्था किंवा चिन्हांची संरचना असते. आपण प्रत्यक्ष बोलण्याची वा ऐकण्याची जी क्रिया करतो ती व्यक्तीव्यक्तीनुसार थोडीफार भिन्न असते. प्रत्येक व्यक्तीच्या काही खास लकबी असतात. इतकेच नव्हे तर एकच व्यक्ती वेगवेगळ्या क्षणी भिन्न स्वरूपाच्या वाचिक क्रिया करू शकेल. उदाहरणार्थ 'मला' हा शब्द उच्चारताना एखाद्यावेळी 'म' मधील 'अ' कार अगदी ऱ्हस्व असेल किंवा एखाद्यावेळी घाईत शब्द उच्चारताना तो उच्चारायचा राहून जाऊ शकेल. परंतु तरी सुद्धा व्यक्तीव्यक्तीनुसार बदलणाऱ्या या वर्तनातून संदेशन होते. याचा अर्थ असा की या चल वाटणाऱ्या वर्तनामागे, व्यवहारामागे एक व्यक्तिनिरपेक्ष अशी खूपशी अचल आणि एकजिनसी स्वरूपाची भाषिक व्यवस्था असते. भाषावैज्ञानिकांच्या दृष्टीने ही भाषिक व्यवस्था महत्त्वाची ठरते. सोस्यूरने केलेला **भाषिक वर्तन** (Parole) व **भाषिक व्यवस्था** (Langue) हा भेद किंवा वेगळ्या शब्दात भाषण (Speech) व भाषा (Language) हा भेद आधुनिक भाषाविज्ञानात एक मौलिक भेद मानला जातो.

नोम चॉम्स्की या अलिकडील अभ्यासकाने केलेला **भाषिक प्रयोग** (Performance) व **भाषिक क्षमता** वा प्रभुत्व (Competance) हा भेद सोस्यूरच्या भेदाशी तंतोतंत जुळत नसला तरी त्यांच्याशी नाते सांगणारा आहे, यात शंकाच नाही. सोस्यूर आणि चॉम्स्की यांचे योगदान आधुनिक भाषाविज्ञानात मोलाचे मानले जाते.

भाषाविज्ञान ही संज्ञा वर्णनात्मक आहे. एखादा भाषिक समाज प्रत्यक्ष व्यवहारामध्ये जी भाषा वापरतो तीच भाषा भाषाविज्ञानाच्या अभ्यासासाठी महत्त्वाची मानली जाते. व्यवहारभाषेचा अभ्यास करून भाषाविज्ञान सार्वत्रिक नियम शोधण्याचा प्रयत्न करते. त्यात भाषेच्या पारंपरिक अथवा आदेशात्मक नियमांचा विचार केला जात नाही. भाषेचा अभ्यास करताना भाषेकडे साधन म्हणून न पाहता माध्यम म्हणून पाहिले जाते. शिल्पकाराचे साधन छिन्नी व हातोडा हे आहे, तर दगड हे माध्यम आहे. ब्रश, कॅनव्हास हे चित्रकाराचे साधन मानता येईल, तर रंग हे त्यांचे माध्यम मानता येते. दगडाशिवाय शिल्प व रंगाशिवाय चित्र शक्य नसते म्हणून त्यांना माध्यम म्हणतात. त्याच पद्धतीने भाषेशिवाय जीवन नाही. त्यामुळे भाषा ही स्वतंत्र व स्वायत्त मानून अभ्यासास प्राधान्य दिले जाते.

आधुनिक भाषाविज्ञान वस्तुनिष्ठ व साध्यात्मक दृष्टीने भाषेकडे पाहते. भाषेच्या वर्णनात्मक नियमाला महत्त्व देते. 'नाही मी येणार' यासारखी वाक्ये पारंपरिक व्याकरणाच्या कसोटीवर चुकीची ठरवतात. भाषाविज्ञान अशा रूपांना अधिक महत्त्व देते. प्रत्यक्ष व्यवहारात भाषा कशी वापरली जाते याचा अभ्यास भाषाविज्ञान करते. व्यवहारभाषेतील नमुने घेऊन वस्तुनिष्ठ वर्णन केले जाते. यासाठी वर्णनात्मक भाषाविज्ञान ही स्वतंत्र शाखा आज मानली जाते.

भाषेतील स्वनिम, रूपिम, शब्द, भाषिक रूपे, वाक्यांश, वाक्य, अर्थ आदी घटकांचा अभ्यास भाषाविज्ञानात केला जातो. भाषा ही सामाजिक संज्ञा असल्याने तिच्यातील स्वाभाविकता आणि लवचिकता गृहीत धरलेली असते. भाषेतील शुद्धाशुद्धता पाळली जात नाही. त्यामुळे लिखित भाषेचे प्रमाणरूप भाषावैज्ञानिक नाकारतात.

सारांश, पारंपरिक भाषाभ्यास हा ऐतिहासिक पद्धतीने झाला आहे. भाषेकडे साधन म्हणून पाहिल्याने श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या भूमिकेतून भाषेचे मूल्यमापन झालेले दिसते. मूल्यमापनासाठी वापरली जाणारी भाषा ही अभिजनांची प्रमाणभाषाच होती. त्यातून कृत्रिम नमुने व आदेशात्मक व्याकरण तयार केले. हा अभ्यास नाकारून व्यवहारभाषेचा अभ्यास भाषाविज्ञानात महत्त्वाचा मानला गेला. हा अभ्यास वर्णनात्मक, वस्तुनिष्ठ आणि साध्यात्मक दृष्टीने करण्यावर भर देण्यात येऊ लागला आहे.

■ **फेर्दिनां-द-सोस्यूर : भाषिक व्यवस्था व भाषिक वर्तन** (Langue and parole)

प्रत्यक्ष भाषिक वर्तन आणि त्यामागे अमूर्त स्वरूपात असणारी भाषिक व्यवस्था यामध्ये भेद आहे ही जाणीव खरे म्हणजे चॉम्स्कीच्याही आधी फेर्दिनां द सोस्यूरनेच (१८५७-१९१३)

भाषाविज्ञानामध्ये आणलेली होती. भाषिक व्यवस्था आणि भाषिक वर्तन यातील फरक समजून देताना सोस्यूरने या संदर्भात मांडलेला विचार ध्यानात घ्यावा लागतो. सोस्यूरने भाषेचे दोन स्तर कल्पिले आहेत. १. लांग, २. परोल. '**लांग**' ही अमूर्त स्वरूपाची भाषिक व्यवस्था आहे. '**लांग**' कोणत्याही प्रकारचे शारीर अस्तित्व नाही. अमूर्त अशा स्वरूपाची व्यवस्था म्हणून ओळखली जाणारी '**लांग**' भाषिक समाजातील भाषिक व्यवहारावर उभी आहे. म्हणजेच भाषिक समाजातील सर्व सामाजिक, सांस्कृतिक, व्यक्तिगत बोली या गोष्टी वगळल्यानंतर उरते ती 'लांग'. यालाच हंबोल्ट यांनी भाषेची अंतर्गत संरचना म्हटले आहे. ही सामाजिक अस्मितेमध्ये अस्तित्वात असते. याउलट '**परोल**' ही व्यक्तिगत स्तरावर वापरली जाणारी म्हणजेच बोलली जाणारी भाषा असते. '**परोल**' मध्ये व्यक्तिगत कौशल्ये आणि व्यक्तिगत आवाज यांचा सहभाग असतो. म्हणजेच परोल ही व्यक्तिगत बोली असते. 'परोल' मधील व्यक्तिगत 'लांग' मध्ये नसते. 'लांग' ही अव्यक्त अशा स्वरूपाची भाषिक व्यवस्था असते तर परोल ही प्रत्यक्ष व्यक्त स्वरूपातील वैयक्तिक अशी बोली असते. यामुळे 'लांग' ला भाषा किंवा भाषाव्यवस्था असे म्हणतात; तर 'परोल' ला 'भाषण', 'भाषिक वर्तन' किंवा 'भाषिक व्यवहार' असे म्हणतात.

भाषिक वर्तन ह्या संकल्पनेस 'भाषिक व्यवहार' असाही शब्दप्रयोग आहे. भाषिक व्यवहार ही संज्ञा केवळ व्यक्तिगत भाषणाशी संबंधित नसते. त्यात इतरही काही घटना लक्षात घ्याव्या लागतात. यामध्ये सामाजिक समजुती, रूढी, परंपरा, भाषकाच्या भावना आणि त्याविषयीचा त्याचा दृष्टिकोण, संभाषणाविषयी भाषकाची भूमिका याबरोबरच त्याचा आवाज असे अनेक घटक असतात. त्याच बरोबर कोठे, कसे बोलावे याविषयीची जाण त्यात गृहीत असते. या सर्वांनी मिळून भाषाव्यवहार होत असतो.

भाषिक व्यवस्था आणि भाषिक व्यवहार यात फरक आहे. भाषिक व्यवस्था ही अमूर्त स्वरूपात असते. तर भाषिक व्यवहारात हे भाषाव्यवस्थेचे प्रत्यक्षीकरण असते. आपण बोलू लागलो की, अमूर्त भाषिक व्यवस्थेचे भाषिक व्यवहारात रूपांतर होते. वक्ता आणि श्रोता याशिवाय भाषिक व्यवहार शक्य नाही. लेखनातूनही भाषिक व्यवहार साधला जातो. भाषिक व्यवस्था समाजमनाच्या स्मरणपुटीतील अव्यक्त अशी व्यवस्था असते. तर भाषिक व्यवहार व्यवस्थेचा प्रत्यक्ष उद्गार असतो. स्थल, काल, परिस्थिती यांचेही संदर्भ भाषिक व्यवहारात असतात.

■ **नोम चॉम्स्की : भाषिक क्षमता व भाषिक प्रयोग** (Competance & Performance)

चॉम्स्की लांग ऐवजी क्षमता (Competance) आणि परोल ऐवजी प्रयोग (performance) या संज्ञा वापरतो. अर्थात सोस्यूरच्या आणि चॉम्स्कीच्या संकल्पनेत फरक आहे. लांग ही संज्ञा चॉम्स्कीने सोस्यूरपेक्षा वेगळ्या अर्थाने उपयोजिली आहे. तो लांग मधील अमूर्त भाषिक व्यवस्था

नाकारून व्यक्तिगत क्षमतेवर भर देतो. त्याच्या मते क्षमता ह्या मनाच्या अंतर्गत स्तरांवर असून त्यांना शरीर अस्तित्व नसते. ह्या क्षमता मानवाला जन्मत: प्राप्त झालेल्या असतात. भाषा शिकण्याची जी जैविक स्वरूपाच्या क्षमतेची यंत्रणा मानवी मनात असते त्यास चॉम्स्की **भाषार्जनाची यंत्रणा** मानतो.

भाषा आत्मसात होणे म्हणजे भाषिक संरचनेचे किंवा नियमव्यवस्थेचे सहजज्ञान होणे. असे सहजज्ञान करून घेण्याचे ज्ञानात्मक सामर्थ्य (cognitive capacity) मानवामध्ये असते, असा युक्तिवाद चॉम्स्कीने केलेला आहे. लहान मुले भाषा कशी शिकतात हे पाहिल्यास भाषिक क्षमतेचा तसेच ज्ञानात्मक स्वरूपाचा उलगडा होतो. इतरांचे उद्‌गार ऐकून ऐकून मुले भाषा आत्मसात करतात, हे या प्रक्रियेचे ढोबळ वर्णन झाले. भाषा आत्मसात करण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाची गोष्ट अशी की, अगदी मर्यादित असा भाषिक अनुभव असूनही नवीन वाक्ये तयार करायला मूल शिकते. याचे कारण असे की प्रत्यक्ष उद्‌गारामधील नियमव्यवस्थेचे ज्ञान करून घेण्याची मानवी मनाची उपजत प्रवृत्ती व क्षमता असते. घटितांमागील नियम जाणून घेण्याचे जे सामर्थ्य मानवामध्ये असते त्याचाच भाषिक क्षमता हा महत्त्वाचा भाग आहे. टोकाच्या वर्तनवादापासून ज्ञानात्मकवादी भूमिकेकडे आधुनिक भाषाविज्ञानामधील संकल्पना कशा सरकत आहेत, हे स्पष्ट होते. भाषिक क्षमता या उत्पादनक्षम असल्याने भाषा शिकण्यासाठी, आकलनासाठी आणि भाषिक संरचना समजण्यासाठी उपयोगी ठरतात. भाषा शिकणे म्हणजे संपूर्णत: नवी भाषा शिकणे नसते तर जन्मत: प्राप्त झालेल्या भाषिक क्षमतांच्या आधारे भाषेचे नियम आत्मसात करणे असते. लहान मुलाला सर्वच भाषिक रचना ज्ञात नसूनही ते असंख्य शब्दांची आणि वाक्यांची निर्मिती करू शकते. याचे कारण त्याला जन्मत: प्राप्त होणाऱ्या भाषिक क्षमता हेच आहे. या क्षमता दुहेरी असतात. असंख्य शब्द, वाक्ये निर्माण करण्याच्या उत्पादनक्षमता आणि संरचना समजून घेण्याच्या आकलनक्षमता अशा स्वरूपाचे दुहेरी कार्य क्षमता करीत असतात. यालाच भाषाव्यवस्था असे म्हणतात.

नोम चॉम्स्की (१९६५) या अभ्यासकाने केलेले भाषिक प्रयोग व क्षमता हा भेद सोस्यूरच्या भेदाशी तंतोतंत जुळत नसला तरी त्याच्याशी नाते सांगणारा आहे. आपण प्रत्यक्षात जे उद्‌गार काढतो, उच्चारण करतो ती बहुधा अपूर्ण, अडखळत, मध्ये असंख्य विघ्ने येणारी अशी प्रक्रिया असते. अगदी बिनचूक, अस्खलित, संपूर्ण वाक्ये नेहमीच्या व्यवहारात उच्चारणाऱ्या माणसाचे बोलणे बहुधा पुस्तकी, पंडिती म्हणून ओळखले जाईल. परंतु भाषेच्या प्रत्यक्ष प्रयोगात अशी अपूर्ण, अर्धवट सोडलेली, नीट न घडलेली उच्चारणे सतत येत असली तरी त्यातून संदेशन व्यवस्थित होते याचे कारण ऐकणारा व बोलणारा या दोघांनीही भाषेची नियमव्यवस्था आत्मसात केलेली असते. भाषिक नियमव्यवस्थेचे हे ज्ञान म्हणजेच भाषिक क्षमता होय. आधुनिक भाषाविज्ञानात मानवी मनाच्या या क्षमतेचा म्हणजेच अपूर्ण, मूर्त वर्तनातून पूर्णाकारी, अमूर्त नियम शोधण्याचा सामर्थ्याचा शोध हा महत्त्वाचा ठरला आहे.

## ■ **लेनर्ड ब्ल्यूमफील्ड : वाचिक वर्तन** (Verbal behaviour)

ब्लूमफील्ड याने वाचिक वर्तन ही भाषेविषयी संकल्पना १९३० च्या सुमारास मांडली. ती अत्यंत प्रभावशाली असणाऱ्या मनोवैज्ञानिक सिद्धांताचा आधार घेऊन मांडली. सोस्यूरप्रमाणेच ब्लूमफील्डनेही व्यक्तीव्यक्तीच्या भाषिक प्रयोगभेदापासून अमूर्त अशी भाषिक संरचना वेगळी काढण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्याने वाचिक वर्तन अशी एक संकल्पना मांडली.

ब्लूमफील्डच्या संपूर्ण विवेचनामध्ये वर्तनवाद या मनोविज्ञानातील भूमिकेचा आधार घेतलेला आहे. मन, विचार, भावना वगैरे संकल्पना निरीक्षणयोग्य नसल्याने त्याज्य ठरवून किंवा निरीक्षणयोग्य बनवून वर्तनवादाने मनोविज्ञानाला एक वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला. मनोविज्ञान म्हणजे वर्तनविज्ञान होय. शारीरवर्तन हा या भूमिकेचा केंद्रबिंदू ठरला. मानवी मन म्हणजे एक कोरी पाटी. तिच्यावर बाह्य जगतातील वस्तू, स्थिती, घटना इत्यादी आपापले ठसे उमटवित असतात असे गृहीत धरले जाते. ज्ञान म्हणजे दुसरे तिसरे काही नसून विशिष्ट चेतक व विशिष्ट प्रतिसाद यामध्ये निर्माण होणारा नित्यसंबंध होय. मानवी भाषेच्या संदर्भात वर्तनवादी भूमिका मांडण्याचे काम ब्लूमफील्ड यांनी केले. मानवी भाषेत व इतर प्राण्यांच्या संदेशनपद्धतीमध्ये फरक जरूर असतो परंतु तो गुणात्मक नसून बव्हंशी संख्यात्मक असतो.

कुत्र्यासारख्या प्राण्यांपाशी दोन किंवा तीन प्रकारचेच वेगळे आवाज असतात. उदाहरणार्थ भुंकणे, गुरगुरणे, व कण्हणे. पोपटासारख्या पक्ष्याजवळ आवाज अनेक प्रकारचे असले तरी त्या सर्व आवाजांना वेगवेगळ्या प्रकारे ते प्रतिसाद देत असतात असे म्हणता येत नाही. उलट माणसाकडे आवाज व त्यांना येणारे प्रतिसाद यांची संख्या खूपच मोठी असते. आजुबाजूची माणसे ते आवाज ऐकून प्रतिसाद देत असतात.

## ■ **उच्चार आणि लेखन**

प्रत्येक भाषेचे ध्वनिरूप म्हणजेच उच्चारण असते. पण अशा भाषेला लेखनरूप असणे हे तिच्या विकासावर अवलंबून असते. बोलणे हे प्रत्यक्ष असते. या बोलण्याला लेखनात बंदिस्त केले जाते. ध्वनी बोलणे किंवा उच्चारणे हे नाशवंत आहे. त्याची ही नाशवंतता दूर करण्यासाठी लेखन आले. या लेखनासाठी लिपीची आवश्यकता असते. ध्वनिरूपता हे भाषेचे मूळ रूप आहे. लेखन हे दुय्यम आहे. उच्चारण व लेखन ही भाषेची दोन रूपे आहेत. परंतु बोलण्यातील विविधता सहजतेने लिपिबद्ध करता येत नाही. पु. ल. देशपांडे यांनी एका लेखात एस. टी. स्टॅण्डवर, बाजारात, हॉटेलमध्ये अशा विविध ठिकाणी बोलणाऱ्या लोकांचे उच्चार गंमतीदार मांडले आहेत. 'च्याय्यऽऽरऽम' म्हणजे 'चहा गरम' हा उच्चार आपणास समजतो.

उच्चाराच्या बाबतीत अजून एक गोष्ट होते ती म्हणजे भाषेत नवीन नवीन उच्चारणे सतत येत असतात. त्यांना त्या भाषेत लिखित चिन्हे नसतात. अशावेळी भाषा नवीन चिन्ह स्वीकारते. उदाहरणार्थ, मराठी ॲ आणि ऑ हे दोन स्वर (लेखनचिन्हे) इंग्रजी भाषेकडून घेतलेली आहेत. बॅट, बॉल, रॉय, ऑफिस इत्यादी शब्दलेखनात त्यांचा वापर करतो. लेखन व उच्चारणात आणखी काही अडचणी येतात.

१. लेखन करताना काही अनुस्वारांचा स्पष्ट उच्चार होतो. काहींचा होत नाही.

२. संस्कृतमधील तत्सम शब्दलेखनातील फरक. उदाहरणार्थ, संस्कृति : संस्कृती, गति : गती.

३. काही जोडाक्षरी शब्दलेखनातील फरक. पुणे-पुण्यात, पुण्य-पुण्यात.

अनुस्वार, स्वरान्त लेखन, संस्कृतमधून आलेले ऱ्हस्व-दीर्घ उच्चार, आघातयुक्त शब्दांचे उच्चारण या सर्व प्रकारात भाषकाकडून उच्चार एक व लेखन वेगळेच होण्याची शक्यता असते. संसार-सौंसार, चार-संख्या, मूळ धातू जग-दुनिया जगणे.

उच्चार व लेखन या प्रक्रियांमध्ये वेगवेगळी कौशल्ये आपण वापरत असतो. लेखन व उच्चारण यांच्यातील भाषिक दर्जात फरक असतो. सिद्धहस्त लेखक संभाषणचतुर असतील असे नव्हे. त्याचप्रमाणे ते चांगले वक्ते असतील असेही नाही. त्याचप्रमाणे संभाषणपटुत्व आणि वक्तृत्व गुण असणारा माणूस चांगला लेखक बनेलच असे काही म्हणता येत नाही. लिखित संहितेच्या बाबतीत संदेशनाचा हेतू केवळ संहितेच्या स्वरूपावरून ठरवावा लागतो; तर बोलण्याच्या प्रक्रियेत तो इतर अनेक गोष्टीतून व्यक्त होत असतो.

लिखित अक्षरे आणि उच्चारित ध्वनी यांच्यात प्रचंड दरी निर्माण झाली. तेव्हा अभ्यासकांनी पारंपरिक लिप्यामध्ये बदल घडवून आणण्याचे प्रयत्न केले आहेत. मराठी पारंपरिक वर्णमालेत बरेच बदल झालेले दिसून येतात. ध्वनीच्या उच्चाराला न्याय देईल, अशी शास्त्रशुद्ध लिपी तयार करण्याचे काम प्रथम इंग्लंडमध्ये हेन्री स्वीट यांनी केले होते. त्यांनी रोमन लिपीवर पुष्कळ संस्कार केले.

आज एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर लेखनाशिवाय पर्याय नाही. व्यवहारासाठी भाषिक संदेशन जितके महत्त्वाचे तितकेच जीवन जगण्यासाठी भाषालेखनही आवश्यक बाब झाली आहे.

## १.४ शब्दार्थ व टिपा

**फेर्दिनां-द-सोस्यूर :** (१८५७-१९१३) सोस्यूर यांचा जन्म जिनिव्हा येथे एका बुद्धिमंतांच्या घराण्यात झाला. त्यांचे वडील निसर्गशास्त्रज्ञ होते. १९ व्या वर्षी त्यांनी लाइप्झिग विद्यापीठात पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश केला. एकविसाव्या वर्षी त्यांनी त्याच विद्यापीठात एक वर्ष अभ्यास करून

'इंडो-युरोपीय भाषांतील काही आदिम स्वरप्रणालीवरील प्रबंध' हे पुस्तक लिहिले. १८८० ला त्यांना डॉक्टरेट मिळाली. १८८० ते १८९१ या अकरा वर्षांच्या काळात पॅरिसमध्ये अध्यापनाचे काम केले. पुढची २२ वर्षे जिनिव्हात अध्यापन केले. भाषाविज्ञानाचे अध्यापन त्यांनी १९०६ ते १९१३ अशी सात वर्षे केले. जिनिव्हा विद्यापीठात त्यांनी दिलेल्या व्याख्यानांची टिपणे एकत्र करून त्यांच्या विद्यार्थी सहकाऱ्यांनी त्यांच्या मृत्यूनंतर 'कोर्स द लिंग्विस्टिक जनरल' हे पुस्तक १९१६ मध्ये प्रकाशित केले.

**नोम चॉम्स्की :** ॲव्हरम नोम चॉम्स्कीचा जन्म ७ डिसेंबर १९२८ मध्ये झाला. त्यांनी पेन्सिसिल्वेनिया विद्यापीठाची पीएच.डी. मिळवून १९५५ मध्ये एम.आय.टी. मध्ये अध्यापन व संशोधनास प्रारंभ केला. अजूनही ते तेथेच काम करतात. आतापर्यंत त्यांची ७५ हून अधिक पुस्तके व १००० हून अधिक लेख प्रसिद्ध झाले आहेत. अमेरिकेच्या साम्राज्यवादी परराष्ट्रविषयक धोरणाचे कडवे टीकाकार म्हणून ते ओळखले जातात.

**लेनर्ड ब्लूमफील्ड** (१८८७-१९६९) यांच्यासारख्या अमेरिकन अभ्यासकांनी भाषाभ्यासाच्या पारंपरिक संकल्पना नाकारून भाषेचा अभ्यास वर्णनात्मक व वैज्ञानिक स्वरूपाचा करण्याचा प्रयत्न केला. या अभ्यासाच्या परंपरेला अमेरिकन संरचनावाद असे म्हटले जाते. त्यांनी मनोवैज्ञानिक सिद्धांताचा आधार घेऊन १९१३ च्या सुमारास वाचिक वर्तन ही संकल्पना मांडली. त्यांचा १९३३ मधील 'लँग्विज' हा ग्रंथ फार महत्त्वाचा आहे.

**संप्रेषण :** अनुभव, भावना, विचारांची देवाण-घेवाण करण्याची प्रक्रिया.

**वैखरी :** ध्वनिरूप उच्चारातून प्रकटणारी भाषा.

## १.५ समारोप

सोस्यूरच्या शब्दात समाजातील सर्व व्यक्ती ज्या भाषिक पद्धती आपल्या स्मरणात ठेवून देतात त्या सर्वांची बेरीज म्हणजे भाषा होय. भाषा चिरकाल टिकणारी गोष्ट आहे. भाषण ही क्रिया तात्कालिक व क्षणभंगुर असते. एखादी व्यक्ती फारतर ७-८ तास बोलेल. भाषा मात्र भाषणाच्या मानाने शाश्वत असते. भाषणामुळे व्यवहार चालू ठेवणे एवढेच कार्य घडते.

भाषा ही एक अशी सामाजिक संस्था आहे की जी आपण होऊन कोणताच बदल करू देत नाही. विशिष्ट प्रसंगी, विशिष्ट कार्यासाठी आपण निरनिराळ्या तऱ्हेने बोलतो. डॉक्टर-पेशंट, वैज्ञानिक, वैमानिक, सुतार, लोहार, दोन प्राध्यापक मित्र, कुटुंबातील सदस्य इत्यादींची भाषा वय, लिंग, प्रसंग अशा स्तरभेदानुसार भिन्न भिन्न असेल. कथाकीर्तन, जाहिराती, दुकानांची नावे इथली

भाषाही अशीच वैविध्यपूर्ण असते. भाषण म्हणजे बोलणे हेच भाषेचे खरे रूप असते. ग्रंथांत जी भाषा असते ती घासून पुसून स्वच्छ केलेली भाषा असते. म्हणून भाषाभ्यासात ग्रांथिक भाषेपेक्षा बोलीभाषेला अधिक महत्त्व आहे.

## १.६ सरावासाठी प्रश्न

**योग्य पर्याय निवडा.**

१. Lingua हा शब्द कोणत्या भाषेतून आला आहे ?

(लॅटिन / ग्रीक / जर्मन)

२. आधुनिक भाषाविज्ञानाचा पाया कोणी घातला ?

(होर्न्ले / सोस्यूर / चॉम्स्की)

३. जपानमधील डुकरे किती प्रकारचे ध्वनी काढतात ?

(२३ / २६ / ३६)

४. भाषा ही चिन्हव्यवस्था असते असे मत कोणी मांडले ?

(सोस्यूर / चॉम्स्की / ब्लूमफील्ड)

**(उत्तरे :** १. लॅटिन, २. सोस्यूर, ३. २३, ४. सोस्यूर)

**लघुत्तरी प्रश्न**

१. वाचिक वर्तन ही संकल्पना स्पष्ट करा.

२. भाषेतर संप्रेषणाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. उच्चार आणि लेखन यातील साम्यभेद लिहा.

४. मधमाश्यांचे संदेशन कसे चालते ते लिहा.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. भाषिक व भाषेतर संप्रेषण सोदाहरण स्पष्ट करा.

२. सोस्यूर, चॉम्स्की व ब्लूमफील्ड यांच्या भाषाविज्ञानातील संकल्पनाचे विवेचन करा.

३. भाषा म्हणजे काय ते सांगा तसेच मानवी व मानवेतर संप्रेषण उदाहरणांसह स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचन

१. भाषाविज्ञान आणि मराठी भाषा : डॉ. अनिल गवळी

२. वैखरी : भाषा व भाषाव्यवहार : डॉ. अशोक केळकर

३. भाषाविज्ञान : सामान्य, संरचनावादी व सामाजिक : संपादन : कल्याण काळे

४. भाषा आणि जीवन : मराठी भाषा परिषद, पुणे यांचे निवडक अंक.

## १.८ उपक्रम

१. लहान मुले भाषा कशी बोलतात? याचे निरीक्षण करून वाक्यांचे नमुने गोळा करा.

२. आधुनिक भाषाविज्ञानातील काही महत्त्वाच्या संकल्पनांचा संग्रह करा.

❑❑❑

## सत्र १ : घटक २

### (विभाग २ Module II)

# आधुनिक भाषाविज्ञानाचे स्वरूप

### (वर्णनात्मक किंवा संरचनावादी भाषाविज्ञान)

## २.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, आधुनिक भाषाविज्ञानालाच वर्णनात्मक किंवा संरचनावादी भाषाविज्ञान म्हणून ओळखले जाते. या अभ्यासपद्धतीमध्ये एककालिक आणि कालक्रमिक भाषिक स्थितीचे विश्लेषण केले जाते. या अभ्यासपद्धतीची सुरुवात फेर्दिनां द सोस्यूर यांनी केली. भाषाभ्यासातील संरचनावादी अभ्यासपद्धतीचा परिचय करून घेणे हे प्रस्तुत घटकाचे उद्दिष्ट आहे. हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्हाला;

- स्वनविचाराचा परिचय होईल.
- स्वनिमविचार समजून घेता येईल.
- रूपविचार समजून घेता येईल.
- आधुनिक भाषाविज्ञानाचे स्वरूप ध्यानात येईल.

## २.२ प्रास्ताविक

भाषाभ्यासाच्या वाटचालीमध्ये रविवार २ फेब्रुवारी, १७८६ रोजी सर विल्यम जोन्स यांनी रॉयल एशियाटिक सोसायटीच्या तिसऱ्या वार्षिक अधिवेशनामध्ये दिलेले व्याख्यान भाषाभ्यासाची नवी परंपरा निर्माण करणारे ठरले. जोन्स यांनी या व्याख्यानामध्ये मांडलेल्या विचारातून भाषांच्या ऐतिहासिक अभ्यासाला प्रारंभ झाला. कालांतराने या अभ्यासपद्धतीची निकड म्हणून तौलनिक भाषाभ्यासाची जोड देण्यात आली. १९ व्या शतकामध्ये या अभ्यासपद्धतीला भाषाभ्यासाची मूलभूत पद्धती मानल्या जात होती. फेर्दिनां द सोस्यूर हे या अभ्यासपद्धतीने भाषाभ्यास करणारे व्यासंगी अभ्यासक होते. त्यांना या अभ्यासपद्धतींमधील मर्यादा जाणवायला लागल्या. त्यातून त्यांनी भाषाभ्यासासंदर्भात नवे विचार मांडायला सुरुवात केली. या प्रक्रियेतून त्यांनी मांडलेले नवे विचार आणि भाषांकडे पाहण्याची दिलेली नवी दृष्टी आधुनिक भाषाविज्ञानामध्ये केंद्रवर्ती राहिली.

सोस्यूर यांनी आपल्या विचारांमध्ये 'रूप', 'व्यवस्था' आणि 'संरचना' या अमूर्त संकल्पनांना मध्यवर्ती स्थान दिले. भाषेकडे पाहण्याचा ऐतिहासिक दृष्टिकोण टाळून त्यांनी भाषेच्या एककालिक

स्थितीवर आपले लक्ष केंद्रीत केले आणि या स्थितीत भाषेची संरचना कल्पून; या संरचनेचे विश्लेषण देण्यावर भर दिला. त्यांच्या या नव्या दृष्टीमुळे भाषाभ्यासाची दिशाच बदलून गेली.

आधुनिक भाषाविज्ञानाचा विकास सोस्यूर यांनी घालून दिलेल्या पायावर झाला. त्यांनी भाषाभ्यासात केलेले भाषिक वर्तन (Parole) आणि भाषा व्यवस्था (Langue) किंवा भाषा (Language) आणि भाषण (speech) हे भेद आधुनिक भाषाविज्ञानामध्ये महत्त्वपूर्ण ठरले. इतर कोणत्याही शास्त्राच्या तुलनेत भाषाविज्ञानाने जी प्रगती साधली; त्याच्या मुळाशी सोस्यूर याच्या विचारांचे योगदान आहे. सोस्यूर आणि सोस्यूरच्या प्रभावाने विकसित झालेल्या युरोपियन आणि अमेरिकन संरचनावादी भाषाभ्यासकांच्या दृष्टिकोणातून भाषाभ्यासाच्या विविध शाखा विकसित झाल्या.

सोस्यूर यांनी 'भाषिक वर्तन' हा भेद कल्पिला असला तरी, त्यांनी केवळ 'भाषिक व्यवस्थेला'च आपला अभ्यासविषय केला. सोस्यूर आणि त्यानंतरच्या संरचनावादी भाषाभ्यासकांनीही ज्या भाषिक वर्तनामधून भाषेची व्यवस्था मिळते त्या व्यवस्थेवर आपले लक्ष केंद्रीत केले. कोणत्याही विशिष्ट कालखंडामध्ये भाषा स्थिर मानून तिचे वर्णन करता येते; हा विचार सोस्यूर यांनी रुजविला. पाणिनीने 'अष्टाध्यायी' या आपल्या ग्रंथामध्ये भाषाविश्लेषणासाठी वापरलेल्या पद्धतींचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव आधुनिक संरचनावादी भाषाभ्यासावर पडलेला आढळतो. म्हणूनच पाणिनीच्या भाषाविश्लेषणाशी आजचे संरचनावादी भाषाविज्ञान नाते सांगते. वर्तनवादी मनोविज्ञानाचा अभ्यासक असलेला अमेरिकन भाषावैज्ञानिक लेनर्ड ब्लूमफील्ड याने भाषा हे एक प्रकारचे वर्तन असून तिचा शास्त्रीय अभ्यास करता येतो असे मत मांडले. आपल्या या मतानुसार नैसर्गिक शास्त्रांचा अभ्यास ज्या संरचनावादी पद्धतीने होतो; त्याच पद्धतीने भाषेचाही अभ्यास करता येतो हे त्याने दाखवून दिले.

## २.३ विषय विवेचन

### ■ स्वनविचार

भाषेत वापरल्या जाणाऱ्या ध्वनींना स्वन म्हणतात. म्हणूनच भाषा ही स्वनरूप असते असे म्हटले जाते. मानवी मुखावाटे असंख्य आणि निरनिराळे ध्वनी निर्माण करण्याची क्षमता असते. हे सर्वच ध्वनी भाषेमध्ये वापरले जात नाहीत. मानवी मुखावाटे असे उत्पन्न झालेले आणि भाषेत वापरले जाणारे काही निवडक ध्वनी असतात, हे निवडक ध्वनी म्हणजेच त्या भाषेचे स्वन होय. स्वन हे भाषेचे माध्यम असतात. परंपरेने भाषेत स्वीकारण्यात आलेले स्वन भाषेत कालांतराने बदलू शकतात. काहीवेळा भाषेतील काही स्वन वापरातून जातात; तर काही स्वन नव्याने स्वीकारले जातात. उदाहरणार्थ मराठी भाषेच्या वर्णमालेत 'जागा अडवून' बसलेले दीर्घ 'ॠ', ॡ हे ध्वनी भाषावापरात

नाहीत. म्हणून हे ध्वनी स्वनविज्ञानाच्या दृष्टीने वर्णमालेतून काढून टाकायला हवेत. त्याचबरोबर इंग्रजीच्या संपर्कानंतर अपरिहार्यता म्हणून मराठीच्या वर्णमालेत ॲ, ऑ हे ध्वनी नव्याने समाविष्ट करून घ्यावे लागले आहेत.

स्वनविज्ञानामध्ये भाषेत वापरला जाणारा विशिष्ट स्वन कसा निर्माण झाला याचा अभ्यास केला जातो. हे स्वन निर्माण होताना मानवी वागिंद्रियात कोणकोणत्या हालचाली होतात म्हणजेच तो कसा उच्चारला जातो, तो वातावरणात ध्वनितरंगाच्याआधारे श्रवण करणाऱ्यापर्यंत कसा जातो आणि मानवी मेंदूवर कसा परिणाम करतो अशा पातळ्यांवर स्वनाचा अभ्यास केला जातो. यावरूनच स्वनविज्ञानाच्या तीन शाखा कल्पिन्यात आलेल्या आहेत. १. उच्चारणकेंद्री स्वनविज्ञान, २. संचारणकेंद्री स्वनविज्ञान आणि ३. श्रवणकेंद्री स्वनविज्ञान यापैकी भाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीमध्ये उच्चारणकेंद्री स्वनविज्ञान विशेष महत्त्वाचे मानले जाते. कारण भाषेच्या वर्णनासाठी भाषेतील स्वनांचे वर्णन, विश्लेषण आणि वर्गीकरण आवश्यक असते. हे उच्चारणकेंद्री अभ्यासामध्ये शक्य होते. त्यामुळेच स्वनविज्ञानाची ही शाखा वर्णनात्मक भाषाविज्ञानात उपकारक ठरलेली आहे.

स्वन हे भाषानिरपेक्ष असतात. कारण कोणत्याही भाषेत वापरल्या जाणाऱ्या ध्वनीना स्वन हीच संज्ञा आहे. स्वनांना आकार आणि मूल्य देण्याचे काम भाषा करते. अशा स्वनांचे काही गुणविशेष नोंदविता येतील.

**१. व्यक्तिविशिष्टता :** स्वन मानवीमुखावाटे निर्माण होत असला तरी; स्वनाच्या भाषावापरात व्यक्तिविशिष्टता दिसून येते. व्यक्तीचे वय, लिंग, वर्ग, व्यवसाय इत्यादीनुसार त्याची विशिष्टता बदलताना दिसते.

२. **विभेदकता :** भाषेत वापरल्या जाणाऱ्या ध्वनीच्या अंगी असलेल्या गुणवैशिष्ट्यामध्ये अर्थभेद निर्माण करण्याचे सामर्थ्य असते. यालाच स्वनांची विभेदकता म्हणता येईल. भाषेत सुट्या, स्वतंत्र स्वनाला काही स्थान नाही. परंतु तो स्वन विशिष्ट रचनेमध्ये वापरल्यानंतर त्याला अर्थ प्राप्त होतो. एक स्वन वेगवेगळ्या रचनेमध्ये वेगवेगळे अर्थ प्राप्त करून देत असतो. रचनेमधूनच त्याची विभेदकता सिद्ध होते.

**३. लवचिकता :** लवचिकता हा स्वनाच्या अंगी असलेला आणखी एक महत्त्वाचा गुण होय. स्वन लवचिक आहेत म्हणूनच अर्थनिर्मितीत त्यांचा उपयोग होतो. उच्चारणातील चढ-उतार, बलाघात इत्यादीमुळे अर्थभेद निर्माण करता येतात त्याचे कारण स्वनांच्या अंगी असलेली लवचिकता हे आहे.

स्वन असे विशिष्ट गुणसंपन्न आणि भाषानिरपेक्ष असले तरी; प्रत्येक भाषेत त्यांचा उपयोग एक सारखा होत नसतो. म्हणजेच स्वनाचा वापर भाषाविशिष्ट होताना दिसतो. चाल (च्+आ+ल्+अ)

आणि चाळ (च्+आ+ळ्+अ) येथील 'ल' आणि 'ळ' या दोन स्वनरचनांमुळे मराठी भाषेत अर्थभेद निर्माण होतो. इंग्रजी भाषेत 'ल' आणि 'ळ' या स्वनांना स्वतंत्र स्थान नाही. संरचनावादी भाषाविज्ञानामध्ये अशा भिन्न-स्वतंत्र (व्यवच्छेदक) स्वनांसाठी 'स्वनिम' ही संज्ञा वापरण्यात येते. म्हणूनच एखादा स्वन जेव्हा भाषेत प्रत्यक्ष वापरला जातो तेव्हा तो स्वन न राहाता 'स्वनिम' बनतो. परंतु 'स्वनिम' ही एक कल्पना आहे. कारण प्रत्यक्ष भाषावापरात स्वनिमे वापरली जात नसून त्या स्वनिमांची 'स्वनांतरे' वापरली जातात.

## ■ स्वनिमविचार

भाषानिरपेक्ष 'स्वन' एखाद्या भाषेत प्रत्यक्ष कार्यरत झाले की त्यांना 'स्वनिम' म्हणून ओळखले जाते. वरील विवेचनात स्वनाचा विचार करताना 'ल' आणि 'ळ' या मराठी भाषेत वापरल्या जाणाऱ्या स्वनांचा विचार नोंदविला. मराठीतील 'ल' हा स्वन इंग्रजीमध्ये 'L' या पद्धतीने वापरण्यात येतो. हे स्वन प्रत्यक्ष भाषेत वापरल्यानंतर त्यांना 'स्वनिम' म्हणतात. हा स्वन भाषेत प्रत्यक्ष वापरला जातो तेव्हा त्याच्या उच्चारणात बदल होत जातो. शिवाय त्या भाषेचे संदर्भ त्याला प्राप्त होतात. 'ळ' हा स्वन इंग्रजीत नाही. त्यामुळे त्याच्या उच्चारणाशी साम्य असलेला 'L' हाच स्वन 'ळ' साठीही वापरला जातो. हे स्वन प्रत्यक्ष भाषेत उपयोजिले जातात तेव्हा त्या भाषेतील मूळ उच्चारातही फरक पडत जातो. स्वनांच्या उच्चारात फरक पडत गेला तरी आपण त्याचा अर्थ एकच गृहीत धरतो. कारण उच्चारणातील फरक मूळ स्वनिमाच्या उच्चारण वर्चस्वाखालीच होतात. त्यामुळे भाषेत प्रत्यक्ष 'स्वनिमे' उच्चारली जात नसतात, तर त्यांची विविध उच्चारित रूपे वापरली जातात. एकच अर्थ व्यक्त करणाऱ्या आणि विविध उच्चारित रूपांचा स्वनिम हा प्रतिनिधी असतो. म्हणजेच स्वनिम प्रत्यक्ष वापरात येत नसून तो काल्पनिक असतो.

स्वनिम विविध उच्चारित रूपांमध्ये प्रत्यक्ष भाषेत वापरण्यात येत असतो. त्यामुळे स्वनिमांचा विचार भाषासापेक्षच करावा लागतो. मराठीतील 'प' या स्पर्श अघोष द्वयोष्ठ्य व्यंजनाचे उदाहरण घेऊन आपण हा विचार समजून घेऊ.

**ताप :** येथील 'प' चा उच्चार स्वाभाविक आहे. या उच्चारात आपण दोन्ही ओठ जुळवतो मग एकदम विलग करतो (प-१)

**पेरू :** 'प' वर 'ए' या अग्र अवृत्ताकाराचा प्रभाव (प-२)

**नागपूर :** उ या मध्य उच्चवृत्ताकाराचा प्रभाव (प-३)

वरील 'प्' चे तीन भिन्न प्रकार आहेत. त्याचे पुंगी, पीळ, पुनश्च असे आणखी उच्चार देता येतील. या उच्चारातील प्रत्येक 'प्' च्या उच्चारात भेद आहे. प-१ हा 'प' चा स्वाभाविक उच्चार

आहे. एखाद्या ध्वनीच्या आजूबाजूचे ध्वनी त्या ध्वनीच्या उच्चारणावर परिणाम करतात हे या उदाहरणावरून दिसून येते. येथे उदाहरणार्थ 'प्' चे केवळ तीन उच्चार दिलेले आहेत प् चे यापेक्षा अधिक उच्चार सांगता येतील. येथे प् चे तीन भिन्न उच्चार येत असले तरी यातील प्रत्येक 'प्' ची किंवा 'प्' च्या भिन्न उच्चाराची स्वतंत्र ओळख करून घेण्याची आपल्याला आवश्यकता वाटत नाही. मराठी भाषा येणाऱ्या प्रत्येकाला हे उच्चार अंदाजक्षम असतात. प-१, प-२, प-३ च्या उच्चारणात भिन्नता असली तरी आजूबाजूच्या ध्वनींच्यामुळे हे सर्व उच्चार अंदाजक्षम ठरतात. शिवाय मूळ 'प्' च्या उच्चाराशी संबंधितच ही उच्चारभिन्नता असल्याने हे उच्चार आपण एकच मानतो. प-१, प-२, प-३ ही रूपे प्रत्यक्ष भाषेमध्ये आहेत. म्हणून त्यांना 'सदृश्य स्वनिम' म्हणता येते. 'प्' च्या या तीन भिन्न रूपांचा एक 'सदृश्य गट' कल्पिता येतो. आणि या सदृश्य गटाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या काल्पनिक घटकाला आपण स्वनिम म्हणतो.

**/प/ (स्वनिम) u (प-१, प-२, प-३) सदृश्य गट**

या उदाहरणावरून आपण स्वनिमाची व्याख्या करू शकतो. 'विशिष्ट भाषेतील सदृश्य स्वनांच्या गटाला स्वनिम असे म्हणतात'. किंवा 'ज्यांच्यामध्ये स्वनिक साम्य आहे, ज्या ध्वनीमधील आजूबाजूच्या परिस्थितीमुळे होणारा फरक अंदाजक्षम आहे, अशा ध्वनींच्या समुहाला स्वनिम म्हणतात,

■ **स्वनांतरे**

वरील विवेचनामध्ये स्वनिमाचे उदाहरण पाहाताना आपण 'प्' च्या प-१, प-२, प-३ या तीन भिन्न रूपांना सदृश्य गट असे म्हटले. म्हणजेच 'प्' या स्वनिमाच्या सदृश्य गटात समाविष्ट असलेल्या या तीन ध्वनींनाच 'स्वनांतरे' असे म्हणतात.

**/प/(स्वनिम) u [प-१], [प-२], [प-३] (स्वनांतरे)**

या उदाहरणावरून आपल्याला असे दिसून येते की, स्वनिमाचा भाषेत वापर होताच त्याचे स्वनांतरामध्ये रूपांतर होते. म्हणजे स्वनिम ही एक आदर्श कल्पना आहे; तर स्वनांतर हे त्याचे प्रात्यक्षिक आहे. स्वनाचा विचार भाषानिरपेक्ष करावा लागतो. परंतु स्वनिम आणि स्वनांतरे ही कोणत्यातरी एका भाषेची विशेषके असतात. त्यामुळे त्यांचा विचार भाषासापेक्ष करावा लागतो. स्वनिम आणि स्वनांतरे यांचे लेखन करण्याची विशिष्ट पद्धत भाषाविज्ञानामध्ये रूढ आहे. वरील उदाहरणाप्रमाणे स्वनिम दोन तिरप्या रेषांमध्ये लिहिला जातो आणि स्वनिमाची स्वनांतरे चौकोनी कंसात दर्शविली जातात.

## ■ स्वनिम निश्चितीची तत्त्वे

स्वन, स्वनिम आणि स्वनांतर या संकल्पनाची आपण ओळख करून घेतली. कोणत्याही भाषेचा अभ्यास करताना त्या भाषेतील स्वनिम सर्वप्रथम निश्चित करावे लागतात. हे स्वनिम निश्चित करण्यासाठी समानधर्मी स्वनिमांचे गट बनविणे, स्वन साधर्म्याची मर्यादा निश्चित करून भाषेतील स्वनिमांची निश्चिती करावी लागते. यासाठी स्वनिम निश्चितीची तत्त्वे सांगितलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे ;

१. वैधर्म्ययुक्त विनियोग

२. पूरक विनियोग

३. वैकल्पिक विनियोग

### १. वैधर्म्ययुक्त विनियोग

स्वनिम निश्चितीचे हे पहिले तत्त्व आहे. या तत्त्वाला व्यवच्छेदक विनियोग असेही म्हटले जाते. जेव्हा दोन स्वन नेमके एकाच स्वनिक परिसरात येऊ शकतात तेव्हा त्यांचा विनियोग वैधर्म्ययुक्त अथवा व्यवच्छेदक ठरतो. येथे दोन स्वनातील अंशात्मक साम्यापेक्षा अंशात्मक भेदाकडे किंवा वैधर्म्याकडे लक्ष दिले जाते. एकाच स्वनिक परिसरातील शब्दांमध्ये फक्त एकच स्वन भिन्न असतो. या भिन्न स्वनामुळे दोन शब्द अर्थदृष्ट्या अलग केले जातात. या विनियोगास वैधर्म्ययुक्त विनियोग असे म्हणतात.

उदाहरणार्थ; पळा - मळा, चाल - चाळ, ताल - माल

या उदाहरणामध्ये /प/, /म/, /ल/, ळ/, /त/, /म/ हे स्वनिम आहेत. या तीन उदाहरणांमध्ये प्रत्येकी एक स्वन भिन्न आहे. त्यामुळे दोन शब्द अर्थदृष्ट्या वेगळे होतात.

### २. पूरक विनियोग

स्वनिम निश्चितीच्या या तत्त्वामध्ये उच्चारणसाम्य असणारे दोन भिन्न स्वन भिन्न स्वनिक परिसरात वापरले जातात. या तत्त्वामध्ये अर्थभेदापेक्षा अर्थसाम्याला महत्त्व दिले जाते. एकमेकांच्या जागी उपयोजिता न येणाऱ्या परंतु परस्परपूरक असणाऱ्या उपयोजनास पूरक विनियोग म्हणतात. उदाहरणार्थ 'कहाणी' या शब्दातील 'क' पेक्षा 'कविता' शब्दातील 'क' वेगळा आहे. दोन्ही 'क' मध्ये उच्चारणदृष्ट्या असलेल्या भिन्नतेमुळे हे स्वनिम एकमेकांची जागा घेऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यात पूरक विनियोग आहे. भाषेत वापरली जाणारी स्वनांतरे या स्वरूपाची असतात. उच्चारणदृष्ट्या ती साम्य असणारी असली तरी ती एकमेकांची जागा घेऊ शकत नाहीत. त्यामुळे स्वनांतराचा विनियोग परस्परपूरक असतो.

### ३. वैकल्पिक विनियोग

या तत्त्वाला मुक्त किंवा स्वैर विनियोग असेही म्हटले जाते. दोन स्वन एकाच स्वनिक परिसरात येऊनही दोन शब्द अर्थदृष्ट्या भिन्न न होता ते समानच राहतात त्यास वैकल्पिक विनियोग असे म्हणतात. बोलणारी व्यक्ती बऱ्याचदा एकाच परिसरात भिन्न स्वनांचा उपयोग करते, परंतु त्यात अर्थदृष्ट्या वेगळेपणा निर्माण होत नाही.

**उदाहरणार्थ,** झगा - झकास, ऋषी - ऋशी, नेहमी - नेहेमी. रहातो - राहतो, अगदी- आगदी, अचानक - आचानक. या उदाहरणामध्ये एकाच परिसरात एका स्वनाऐवजी उच्चारदृष्ट्या वेगळा असणारा दुसरा स्वन वापरण्यात आलेला आहे. तसा वेगळा स्वन वापरूनही येथे अर्थभेद होताना दिसत नाही. अर्थभेद होत नसल्यामुळे स्वनांचा विनियोग वैधर्म्ययुक्त ठरत नाही. त्यामुळे या स्वनांना स्वनिमाचा दर्जा मिळत नाही.

### ■ ध्वनिसाम्यता

एकाच स्वनिमाच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या स्वनांतरातील साम्यतेचा विचार करणारे तत्त्व म्हणजे ध्वनिसाम्यतेचे तत्त्व होय. यालाच ध्वनिधर्माची वर्तुळे अशीही संज्ञा आहे. भाषेत वापरल्या जाणाऱ्या मूलध्वनींची संख्या मर्यादित असते. हे मूलध्वनी अद्वितीय असतात. या ध्वनींच्या उच्चारण्यामध्ये व्यक्ती-व्यक्तीचे वय, लिंग, स्थलकालपरत्वे फरक पडत असतो. ध्वनी भाषेत उपयोजितांना त्याच्यावर आजुबाजूच्या इतर ध्वनींचा परिणाम होऊन उच्चारणात फरक पडू शकतो. तथापि अशा ध्वनींच्या उच्चारणाचे निश्चित असे क्षेत्र असते.

उदाहरणार्थ, 'त' या ध्वनीचा उच्चार करताना जीभ दातांना चिकटते. हे दंतमूलीय अघोष स्पर्श व्यंजन आहे. भाषावापरात व्यक्तीकडून हे व्यंजन वेगवेगळ्या शब्दांमध्ये वापरताना त्याच्या उच्चारणाचे तेच निश्चित क्षेत्र असते. हा ध्वनी उच्चारताना आपण जे क्षेत्र निवडतो त्यापेक्षा वेगळे क्षेत्र 'ज' हा ध्वनी उच्चारताना निवडतो. 'ज' हे देखील दंतमूलीय व्यंजन असले तरी ते घोष व्यंजन आहे. जीभ दातांच्या मुळाकडे प्रारंभी चिकटते. अशाप्रकारे विशिष्ट ध्वनी विशिष्ट क्षेत्रातच उत्पन्न होतात. या क्षेत्रालाच ध्वनिधर्माचे वर्तुळ म्हणतात. या क्षेत्रावरून प्रत्येक भाषेत समानतेच्या आधारावर गट कल्पिले जातात. मराठीमध्ये घोषत्व हे स्वनिमिक आहे. त्यात घोष व अघोष या दोन उपभेदानुसार व्यंजनांची स्वनिमिक रचना होते. घोष व अघोष यामध्ये पुन्हा अल्पप्राण व महाप्राण अशी विभागणी होते.

## ■ काटकसरीचे तत्त्व

कोणत्याही भाषेत स्वनिम निश्चितीसाठी काटकसरीचे तत्त्व वापरले जाते. कोणत्याही भाषेत कमीत कमी स्वनिम असणे हे भाषेच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्या भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीनेही ही बाब महत्त्वाची असते. मराठी भाषेतील दीर्घ लृ व ऋ या स्वनिमांचा वापर होत नाही. पर्यायाने या स्वनिमांना मराठीच्या स्वनिम व्यवस्थेत स्थान दिले जात नाही. म्हणूनच भाषेचे स्वनिम निश्चित करताना काटकसरीचे तत्त्व अलंबावे लागते. त्यामुळेच मराठीच्या पारंपरिक वर्णमालेतील काही स्वर व व्यंजने या तत्त्वानुसार वगळून नवी स्वनिम व्यवस्था सांगितली जाते.

## ■ स्वनिमाचे प्रकार

वरील प्रमाणे स्वनिमांची निश्चिती केल्यानंतर त्याचे विशिष्ट असे वर्गीकरण करता येते. कोणत्याही भाषेत दोन प्रकारचे स्वनिम आढळतात. पहिला प्रकार खंडयुक्त स्वनिमाचा. ज्यांना आपण स्वर, अर्धस्वर आणि व्यंजन म्हणून ओळखतो ते खंडयुक्त स्वनिम होय. मराठीतील खंडयुक्त स्वनिमांचा तक्ता पुढीलप्रमाणे;

**खंडयुक्त स्वनिमांचा तक्ता** (मराठी ध्वनिलिपी)

| | **द्व्योष्ठ्य** | **दंत्य** | **दंतमूलीय** | **मूर्धन्य** | **तालव्य** | **मृदु तालव्य** | **कंठ द्वारीय** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्पर्श-अघोष | प | त | | ठ | | क | |
| सघोष | ब | द | | ड | | ग | |
| महाप्राणयुक्त | | | | | | | |
| अघोष | फ | थ | | ठ | | ख | |
| सघोष | भ | ध | | ढ | | घ | |
| घर्षक | | | | | | | |
| अघोष | | स | | ष | श | | क |
| सघोष | | | | | | | क |
| अनुनासिके | म | न | | ण | | ङ् | |
| महाप्राणयुक्त | म्ह | न्ह | | ण्ह | | | |
| पार्श्विक | | ल | | ळ | | | |
| महाप्राणयुक्त | | ल्ह | | ळह | | | |
| कम्पनयुक्त | | | | | | | |
| महाप्राणयुक्त | | | र | १ | | | |

| | द्व्योष्ठ्य | दंत्य | दंतमूलीय | मूर्धन्य | तालव्य | मृदु तालव्य | कंठ द्वारीय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| *ताडित | | | ऱ्ह | डढण | | | |
| अर्धस्वर<br>महाप्राणयुक्त | व<br>व्ह | | | | <br>य | | |
| अर्धस्फोटक<br>अघोष<br>सघोष | | | <br>च<br>ज | | <br>चॅ<br>जॅ | | |
| महाप्राणयुक्त<br>अघोष<br>सघोष | | | छ<br>छ (च-ह)<br>झ् (ज-ह) | छॅ<br>(चॅ-ह)<br>झॅ(जॅ-ह) | | | |

*सडक्, कढई, टणक् या शब्दांमध्ये प्रत्येकी हे तीन ध्वनी आढळतात. याशिवाय माफ, कॉफी, साफ अशा इंग्रजी किंवा पर्शियन भाषेतून आलेल्या शब्दांत दन्त्यौष्ठ्य घर्षक ध्वनी मिळतो (फ़्ह).

(संदर्भ : भाषा आणि भाषाशास्त्र : डॉ. श्री. न. गजेंद्रगडकर)

वरील स्वनिमांचे महत्त्व भाषेत असतेच तथापि भाषाव्यवहारात खंडाधिष्ठित अथवा पराखंडकीय स्वनिमांचे साहाय्य घ्यावे लागते. स्वरांचा चढउतार, एखाद्या घटकावर दिला जाणारा जोर, एखाद्या स्वन उच्चारात नाकावाटे बाहेर जाऊ दिलेली हवा या सर्व क्रियांमुळे बोलणे परिणामकारक, चैतन्यपूर्ण, कलात्मक होत असते. हे स्वनिम पराखंडकीय म्हणजेच परावलंबी असतात. या स्वनिमांना आपल्या लिपीत लेखनचिन्हे नाहीत. अलिकडे हे स्वनिम विरामचिन्हे, संदर्भचिन्हे या स्वरूपात दाखविले जातात. मराठीत पुढील खंडाधिष्ठित स्वनिम आढळतात.

**१. नासिक्यरंजन :** ङ्, ण्, म्, न् ही अनुनासिके मराठीत आहेत. यांचा उच्चार करताना नासिक विवराचा उपयोग होतो. परंतु इतर व्यंजने व स्वर यांचेही स्वानुनासिक उच्चार करता येऊ शकतात, भाषेत तसे ते होताना दिसतात.

उदाहरणार्थ, अ˘ ( ˘ ही नासिक्य व्यंजनाची खूण)

**२. आघात :** एखाद्या शब्दातील एखाद्या अक्षरावर किंवा वाक्यातील एखाद्या शब्दावर दाब, जोर दिला जातो. भाषाव्यवहारात ही अवस्था अनेक वेळा दिसून येते. आघात हा साभिप्राय असतो. वाक्याचे उद्दिष्ट त्यातून साधले जाते.

| | | |
|---|---|---|
| उदाहरणार्थ, | **त्याने** काम केले. | – दुसऱ्या कोणी नाही त्याने. |
| | त्याने **काम** केले. | – दुसरे काही नाही तर काम केले. |
| | त्याने काम **केले.** | – आश्चर्य व्यक्त होते. |

मराठी भाषेत शब्दांतील अक्षरांवरील आघातापेक्षा वाक्यांवरील आघात अधिक निर्णायक ठरतो. त्यातून भाषाव्यवहार अर्थपूर्ण ठरतो.

**३. सुरावली :** स्वरांचा चढउतार म्हणजे सुरावली होय. पद, वाक्य, पदसमूह या सर्व संदर्भात सुरावलीचा उपयोग होतो. प्रश्न, आश्चर्य इत्यादी भाव सुरावलीद्वारे प्रकट होतात. वेगळेपणा, भिन्न अर्थ प्रकट करणे सुरावलीत शक्य होते. परंतु या योजनेत व्यक्तिनुसार विशिष्टता आढळते.

**४. विराम :** विराम यालाच सीमासंधी असेही म्हटले जाते. बोलताना शब्द, वाक्य, विलगतेसाठी आपण अल्प विश्रांती घेतो. यालाच अल्पविराम किंवा गुरूखंड असे म्हणतात. हे विराम लेखनात सुट्या पद्धतीने म्हणजेच स्वतंत्र शब्दांनी दर्शविले जातात. परंतु अशा विरामांमध्ये बदल झाल्यास काही वेळा अर्थनिर्णायक रचना निर्माण होते. यालाच विराम किंवा सीमासंधी असे म्हणतात.

| | | | |
|---|---|---|---|
| उदाहरणार्थ, | सांगितलेले काम करून ये | – | सांगितलेले काम करू नये |
| | ते खाऊन ये | – | ते खाऊ नये |

वरील वाक्यांमधील विरामाची ठिकाणे बदलल्यानंतर वाक्यांचे अर्थ बदलतात म्हणून विराम अर्थनिर्णायक ठरतात.

## ■ मराठीची स्वनिमव्यवस्था

मराठीमध्ये खालील स्वर स्वनिम आहेत. ही मांडणी डॉ. द. दि. पुंडे यांनी केलेली आहे.

इ, ए ॲ, आ, अ, ऑ, ओ, उ.

आपणास येथे पारंपरिक मराठी वर्णमालेतील ई, ऊ, ऋ, लृ, ऐ, औ हे स्वर दिसत नाहीत ॲ आणि ऑ हे नवे स्वर मात्र अंतर्भूत झालेले दिसतात.

ई आणि ऊ हे इ आणि उ यांची दीर्घ उच्चारणे होत. मराठी भाषेत स्वरांचे दीर्घत्व स्वनिमिक नाही असे दिसते. म्हणजे ऱ्हस्व स्वर दीर्घ उच्चारला गेल्यास दोन शब्द अर्थदृष्ट्या वेगळे ठरत नाहीत असे दिसते. शिवाय स्वराचे दीर्घ उच्चारण केव्हा होते हे कळू शकते. म्हणजे मराठीत स्वराचा दीर्घ उच्चार अंदाजक्षम आहे. स्वनिम असा अंदाजक्षम नसतो. त्यामुळे दीर्घ ई व दीर्घ ऊ यांना स्वनिम

मानण्याचे कारण दिसत नाही. (अपवाद : मराठीमध्ये वापरल्या जाणाऱ्या संस्कृत भाषेतील शिल-शीला सारख्या काही शब्दांमध्ये दीर्घत्व स्वनिमिक आहे.)

मराठीत दीर्घ ॠ नाही तसेच दीर्घ ॡ देखील नाही. मराठीमध्ये ऱ्हस्व ऌ फक्त 'क्लृप्ति' ह्या शब्दात आढळतो. त्यामुळे ॠ, ॡ आणि ऌ हे ध्वनी मराठीत नाहीत असेच मानले जाते. त्यामुळे त्यांचा मराठी स्वनिम व्यवस्थेत विचार करण्याचे कारण नाही.

ऱ्हस्व ऋ शब्दारंभी (ऋषी, ऋण) किंवा शब्दाच्या मध्यभागी (कृपा, हृदय) आढळतो. परंपरेने ऋ हा स्वर गणला जातो. तथापि अलिकडे त्याचे उच्चारण ढासळत चालल्यासारखे दिसते. ते इतके ढासळत चालले आहे की, काही लोकांच्या उच्चारणात र् + उ असा व्यंजनस्वर संयोग झाल्यासारखा दिसतो. 'ऋ' च्या उच्चारणात हवेचे किंचित रोधन झाल्यासारखे वाटते. त्यामुळे 'ऋ' ला स्वर मानू नये असेही एक मत पुढे येते. 'ऋ' च्या उच्चारणाने दोन शब्द अर्थदृष्ट्या अलग ठेवले जातात (उदाहरणार्थ, गृह - ग्रह) म्हणून त्यास स्वनिम मानावे असे म्हणता येईल. मात्र ऋ चे उच्चारण र् + उ असे असता कामा नये. असे उच्चारण झाल्यास ऋ हा स्वनिम ठरणार नाही हे उघडच आहे. कारण स्वनिम हा निरवयव ध्वनिघटक असतो.

ए, ऐ, ओ, औ हे चार ध्वनी मराठीत परंपरेने संयुक्त स्वरू मानले जातात. यांच्यापैकी ए आणि ओ याचे उच्चार शुद्ध व स्वतंत्र ठरतात. ऐ आणि औ ही उच्चारणे मात्र सावयव आहेत. हे दोन्ही स्वर निरवयव नसल्याने स्वनिम ठरत नाहीत.

मराठीत महाप्राण हा स्वनिमिक आहे. महाप्राणामुळे दोन शब्द अर्थदृष्ट्या वेगळे ठरतात. (उदाहरणार्थ, पाटा - फाटा) त्यामुळे म्ह्, न्ह्, ऱ्ह्, व्ह्, ळ्ह् यांना सममानतेच्या तत्त्वानुसार स्वनिम मानावे लागते.

ष् ह्या मूर्धन्य सीत्काराचा उच्चार मराठीतून नाहीसा होत चालल्यासारखा दिसतो. ष चा उच्चार अगदी लक्षपूर्वक प्रयत्न केला तरच होतो, असे चित्र आज दिसते.

व्यंजन स्वनिमांच्या तक्त्यात ञ् या अनुनासिकाला स्थान दिले नाही. याउलट म् न् ण् आणि ङ् यांना स्वनिम मानले आहे. यापैकी म् आणि न् हे शब्दारंभी, शब्दामध्ये किंवा शेवटीही येतात. शिवाय ते स्वनिमिक आहेत. ते दोन शब्द अर्थदृष्ट्या वेगवेगळे राखतात. (पाहा मात - नात, माग - नाग, काम - कान) ण् हा स्वन शब्दारंभी येत नसला तरी शब्दामध्ये व शब्दांच्या अन्ती येतो व अर्थदृष्ट्या दोन शब्द वेगळे राखतो (पाहा तान - ताण), ङ् हा स्वन शब्दाच्या मध्यभागी येतो. तो साधारणपणे क् ख् ग् घ् ह्या स्ववर्गीय व्यंजनाबरोबर. तथापि अंत्यस्थानी तो इतर व्यंजनांच्या स्वनिम परिसरात (आणि शब्दात क वर्गीय व्यंजन नसतानाही) येऊ शकतो. उदाहरण पुढील पानावर पहा.

### मराठी व्यंजन स्वनिम

| | | ओष्ठ्य | दन्त्य | मूर्धन्य | दन्त मूलीय | तालव्य | मृदू तालव्य | कण्ठ्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्पर्श अघोष | अल्पप्राण | प् | त् | ट् | च् | चॅ् | क् | |
| | महाप्राण | फ् | थ् | ठ् | छ् | छॅ् | ख् | |
| स्पर्श सघोष | अल्पप्राण | ब् | द् | ड् | ज् | जॅ् | ग् | |
| | महाप्राण | भ् | ध् | ढ् | झ् | झॅ् | घ् | |
| | | | | | | स्पर्शसंघर्षी | | |
| अनुनासिक | अल्पप्राण | म् | न् | ण् | | | ङ् | |
| | महाप्राण | म्ह्✻ | न्ह्● | ♦ण्ह् | | | | |
| कंपित अल्पप्राण सघोष | | | र् | | | | | |
| कंपित महाप्राण सघोष | | | ऱ्ह्[ | | | | | |
| पार्श्विक अल्पप्राण | | | ल् | ळ् | | | | |
| पार्श्विक महाप्राण | | | ल्ह्■ | ळ्ह्★ | | | | |
| अघोष घर्षक | | | स् | (ष्) | श् | | | |
| सघोष घर्षक | | | | | | | | ह् |
| अर्धस्वर- | | व् | | | | य् | | ह् |

✻आम्हाला ● चिन्हात ♦कण्हेर [गोऱ्हे, तऱ्हा

■जिल्हा, कोल्हा ★जांभळा (उच्चार जांबळ्हा)

रांग (उच्चार राङ्) अर्थातच राङ् - रान् अशी अल्पतम ध्वनियुग्मे मिळतात व तो स्वनिम ठरतो. ञ् ह्या स्वनाचे तसे नाही. ञ् हा स्वन कधीही स्वतंत्रपणे येत नाही. शब्दामध्ये तो च् छ् ज् झ् यांच्या बरोबरच येत असल्याने अंदाजक्षम आहे. त्यामुळे त्याला स्वनिम मानता येत नाही. (स्वनिम अंदाजक्षम नसतो.) ञ् ला न चे स्वनांतर मानता येईल. (संदर्भ : द. दि. पुंडे, सुलभ भाषाविज्ञान, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पृष्ठक्रमांक ७० ते ७२)

## ■ रूपिमविचार

स्वन-स्वनिम-स्वनांतर ही संकल्पना समजून घेताना आपण भाषिक ध्वनींचा विस्ताराने विचार केला. भाषा ही ध्वनींनी बनलेली असते. मानवी मुखावाटे असंख्य ध्वनींची निर्मिती करता येते. यापैकी काही निवडक ध्वनीच भाषेमध्ये वापरले जातात. जगभरातील भाषांचे निरीक्षण करता केवळ

तीस ते सत्तर ध्वनीच भाषेत मूलध्वनी म्हणून कार्यरत असल्याचे दिसतात. भाषिक ध्वनीलाच स्वन ही संज्ञा आहे. हे स्वन प्रत्यक्ष भाषेत येतात तेव्हा त्यांना स्वनिम म्हणून ओळखले जाते. स्वनिमांचा विचार भाषासापेक्ष होतो. परंतु स्वनिमांना स्वत:चे अर्थ नसतात. स्वनिमांच्या अंगी दोन उच्चारणे अर्थाच्या दृष्टीने वेगळी ठेवण्याचे सामर्थ्य असते. या सामर्थ्यामुळे स्वनिमांच्या वेगवेगळ्या सानुक्रम रचना करून अनेक उच्चारणे तयार करता येतात. म्हणूनच मानवी भाषा हवे तेवढे अर्थ व्यक्त करू शकते. भाषेत निरनिराळे अर्थ निर्माण करण्याची पद्धत म्हणजे भाषेची दुहेरी संरचना होय.

स्वनिमांच्या अंगी असलेली अर्थविभेदक शक्ती ही भाषेच्या दुहेरी संरचनेतील पहिल्या पातळीवरची रचना असते. स्वनिमांची अर्थविभेदक शक्ती लक्षात घेऊन स्वनिमांचे निरनिराळ्या प्रकारे संयोग करून त्याचे सार्थ गट बनविले जातात. स्वनिमांच्या गटांना दिलेला अर्थ ही दुसऱ्या पातळीवरची रचना होय.

उदाहरणार्थ, म्, क्, आ, अ या स्वनिमांच्या पुढील रचना पाहा.

१. म् + अ + क् + आ = मका

२. क् + आ + म् + अ = काम

३. आ + क् + म् + अ = आक्म

४. आ + म् + क् + अ = आम्क

या उदाहरणातील मका आणि काम या दोन रचना मराठी भाषेतील सार्थ रचना आहेत. तर क्रमांक ३ व ४ ह्या रचना मराठी भाषेतील कोणताही अर्थ व्यक्त करीत नाहीत. कोणतीही भाषा जे स्वनिम स्वीकारते त्यांचे निरनिराळ्या प्रकारचे संयोग करण्याची भाषेची क्षमता अमर्याद असते. यापैकी काही विशिष्ट संयोग भाषेत अर्थधारणेसाठी उपयोजिले जातात. वरील स्वनिमविचारात आपण भाषेच्या अर्थनिरपेक्ष संरचनेचा अभ्यास केला. येथे आपण भाषेतील सार्थ घटकाचा विचार करणार आहोत.

### ■ भाषिक रूप आणि रूपिका

भाषाव्यवहारामध्ये सार्थ (अर्थपूर्ण) घटकाला महत्त्व असते. भाषेतील कोणत्याही सार्थ घटकाला 'भाषिक रूप' (Linguistic form) असे म्हणतात. भाषेतील असे सार्थ घटक लहान-मोठ्या स्वरूपाचे असतात. उदाहरणार्थ,

१. महाविद्यालयाचे दोन खेळाडू राष्ट्रीय पातळीवर चमकले.

२. महाविद्यालयाचे दोन खेळाडू.

३. महाविद्यालयाचे

४. महा + विद्या + लय + आ + चे

या उदाहरणामध्ये क्रमांक १ हे पूर्ण वाक्य, क्रमांक २ हे उपवाक्य, क्रमांक ३ हा शब्द आणि क्रमांक ४ हे शब्दघटक आहेत. क्रमांक १ ते ४ ही सर्वच भाषिक रूपे आहेत. कारण हे सर्वच सार्थ घटक आहेत. क्रमांक ४ मधील महा, विद्या, लय, आ आणि चे ही देखील सर्व भाषिक रूपे आहेत. भाषेतील अशा सर्वात लघुत्तम रूपांनाच रूपिका (Morph) असे म्हणतात.

म्हणजेच भाषेतील रूपांचे अर्थाच्या दृष्टीने विभाजन करीत गेल्यास शेवटी मिळणारे सर्वात लहान सार्थ रूप, ज्याचे पुढे पुन्हा विभाजन शक्य नसते, भाषेतील अशा रूपांना 'रूपिका' म्हणतात. व्यवहारामध्ये आपण सतत 'शब्द' हा शब्द अर्थघटकासाठी उपयोजित असतो. शब्द हे देखील भाषेतील सार्थ घटक आहेत. परंतु शब्द आणि रूपिका यामध्ये एक मूलभूत असा फरक आहे.

वरील उदाहरणामध्ये 'महाविद्यालयाचे' या शब्दात पाच अर्थघटक आहेत. परंतु त्याच्या पुढील 'दोन' या शब्दात एकच अर्थघटक आहे. म्हणजे दोन या शब्दाचे अर्थदृष्ट्या पुन्हा विभाजन शक्य नाही. त्यामुळे 'दोन' हा शब्दही आहे आणि रूपिकाही आहे. एखाद्या शब्दात एकापेक्षा अधिक रूपिका समाविष्ट असतात. परंतु रूपिकेचे असे नसते. रूपिकेचे पुन्हा विभाजन होत नाही. रूपिकांचे पुन्हा दोन प्रकार कल्पिन्यात आलेले आहेत.

१) वाक्यात स्वतंत्रपणे येऊ शकणाऱ्या रूपिका

२) वाक्यात स्वतंत्रपणे न येता दुसऱ्या रूपिकांच्या आश्रयाने येणाऱ्या रूपिका.


ज्या रूपिका वाक्यात स्वतंत्रपणे येऊ शकतात त्यांना मुक्त रूपिका असे म्हणतात. वरील उदाहरणामधील 'महाविद्यालयाचे' ही रूपिका स्वतंत्रपणे येऊ शकते. उदाहरणार्थ, महाविद्यालयाचे शिबिर, महाविद्यालयाचे प्राचार्य / प्राध्यापक इत्यादी. म्हणून ही 'मुक्त रूपिका' होय. तर ज्या रूपिका वाक्यात दुसऱ्या रूपिकांच्या आश्रयाने येतात त्यांना 'बद्ध रूपिका' असे म्हणतात. वरील उदाहरणातील आ, चे, लय या बद्ध रूपिका आहेत. या स्वतंत्रपणे वाक्यात येऊ शकत नाहीत.

## ■ रूपिका – रूपिम – रूपिकांतर

सुरुवातीला आपण स्वन - स्वनिम - स्वनांतर ही संकल्पना समजून घेतलेली आहे. या संकल्पनेला समांतर अशीच ही संकल्पना आहे. रूपिका ही संकल्पनाही आपण मागील मुद्यामध्ये समजून घेतली. रूपिका ह्या भाषेतील अर्थदृष्ट्या लघुत्तम घटक असतात. अशा भाषेतील रूपिका कार्याच्या दृष्टीने येऊ शकतात. समान कार्य करणाऱ्या रूपिकांचा गट करता येतो. रूपिकांच्या अशा गटाला 'रूपिम' म्हणतात. रूपिम हे स्वनिमाप्रमाणे गटवाचक नाम आहे. रूपिम काल्पनिक असतो.

तो अमूर्त असतो. भाषेत प्रत्यक्ष वावरत असतात त्या विशिष्ट रूपिम गटातील रूपिकाच. रूपिम अमूर्त असतो. कारण तो केवळ गटाचे प्रतिनिधित्व करतो. रूपिमाचे मूर्त आविष्करण रूपिका असतात. एका रूपिम गटात समाविष्ट असलेल्या रूपिकांना त्या विशिष्ट रूपिमाची रूपिकान्तरे म्हणतात. रूपिकान्तर ही कल्पना रूपिकांच्या संदर्भातच वापरली जाते. म्हणजे रूपिका व रूपिकांन्तर एकच होय.

उदाहरणार्थ, माणूस या रूपिमाची माणूस, माणस, माणुस, मानस ही वेगवेगळी रूपिकांतरे आहेत. व्यवहारात माणूस, माणसाने, माणुसकी, मानसपुत्र इत्यादी रूपे वापरली जातात. भाषाविषयक लेखनामध्ये रूपिम महिरपी कंसात तर रूपिकान्तरे स्वनिमाप्रमाणे तिरप्या रेषांमध्ये दर्शवितात. उदाहरणार्थ,




## ■ रूपिकान्तरांचे प्रकार

रूपिकान्तराचे तीन प्रकारे वर्गीकरण केले जाते. १. स्वनिमाश्रयी रूपिकांतर २. रूपिमाश्रयी रूपिकांतर ३. शून्य रूपिकांतर

**१. स्वनिमाश्रयी रूपिकांतर :** ज्या रूपिकान्तराचा भाषेतील वावर आजुबाजूची स्वनिमिक परिस्थिती ठरविते, त्या रूपिकान्तरांना 'स्वनिमाश्रयी रूपिकांतरे' असे म्हणतात. येथे रूपिम कोणत्या स्वनिमाच्या सान्निध्यात येते त्यावर त्याचे रूप अवलंबून असते.

उदाहरणार्थ, निषेधार्थी 'बे' या रूपिमाचे भाषेतील उपयोजन स्वनिमाश्रित आहे.

बे = बेशिस्त, बेपर्वाई, बेदिक्त, बेफिकीर, बेभरोशी इत्यादी.

**२. रूपिमाश्रयी रूपिकांतर :** संयोग पावताना स्वनिमांशी संबंध नसलेली, पण विशिष्ट रूपिमांशी संबंध राखून त्यांच्या आश्रयाने संयोग पावणारी रूपिकान्तरे ही रूपिमाश्रयी रूपिकान्तरे होय. भाषेत काही वेळा भाषेने स्वीकारलेल्या संकेतानुसार कोणती रूपिकान्तरे कोणत्या परिसरात यायचे हे ठरते. अशा रूपिकान्तरांनाच रूपिमाश्रयी रूपिकांतरे म्हणतात.

उदाहरणार्थ, मराठीतील अनेक धातू रूपिमाश्रयी आहेत.

{ जा } (धातू) – वर्तमानकाळ /जातो/, भूतकाळ /गेला/

वरील जातो, गेला ही रूपिकान्तरे रूपिमाश्रयी आहेत.

**३. शून्य रूपिकांतर :** भाषेतील काही रूपांचे अनेकवचन होताना मूळ रूप जसेच्या तसे राहते. अनेकवचनी रूपे / प्रत्यय दृश्य स्वरूपात नसतात. तेव्हा त्यांना शून्य रूपिकान्तर असे म्हणतात. हे रूपिकान्तर दृश्य स्वरूपात नसल्यामुळे ही एक वेगळी संकल्पना म्हणून पाहिले जाते.

उदाहरणार्थ,
१. **कवी** कविता लिहितो.
२. **कवी** संमेलनात एकत्र येतात.
३. **मोर** नदीकाठी आहे.
४. **मोर** नदीकाठी आहेत.

या उदाहरणामध्ये अधोरेखित कवी व मोर ही रूपे एकवचनी आणि अनेक वचनी अशा दोन्ही अर्थाने वापरलेली आहेत. येथे अनेकवचनी प्रत्यय अस्तित्वात नसल्याने त्यांना शून्य रूपिकान्तर असे म्हणतात.

{ कवी }/कवी (अनेकवचन) /0/

{ मोर } / मोर (अनेकवचन) /0/

शून्य रूपिकांतर /0/ या चिन्हांने दर्शवितात.

## ■ रूपिमांचे प्रकार

रूपिमांचे चार प्रकार कल्पिन्यात आलेले आहेत.

**१. अनन्यसाधारण रूपिम :** एखाद्याच किंवा अत्यंत मर्यादित रूपिमांना जोडून वापरल्या जाणाऱ्या रूपिमाला अनन्यसाधारण रूपिम असे म्हणतात. त्यांचा पदात होणारा वापर अनन्यसाधारण असतो.

उदाहरणार्थ,
मारझोड = मार + झोड
पिवळाजर्द = पिवळा + जर्द
पांढराफटक = पांढरा + फटक
हातखंडा = हात + खंडा

या उदाहरणांमधील दुसरी पदे सार्थ आहेत असे म्हणता येत नाही. त्याचबरोबर त्यांचे इतरत्र उपयोजन होईल हेही सांगता येत नाही. म्हणजेच या रूपांचा वापर मर्यादित आहे. ही रूपे म्हणजेच अनन्यसाधारण रूपिम आहेत.

**२. आशयबोधक रूपिम :** मूर्त किंवा अमूर्त आशयाचे सूचन करणाऱ्या रूपिमांना आशयबोधक रूपिम असे म्हणतात. त्यांना धातू किंवा मूळ असेही म्हटले जाते.

उदाहरणार्थ, झाड, जमीन, फूल, घर, देव, बस, पळ

कोणत्याही भाषेत या रूपिमांची संख्या सर्वाधिक असते. या रूपिमांच्यामुळे वस्तूंचा, पदार्थाचा, विचारांचा किंवा भावनांचा बोध होतो. हे मुक्त रूपिम असतात.

**३. कार्यसूचक रूपिम :** आशयबोधक रूपिमे मुक्त रूपिमे आहेत. परंतु भाषाव्यवहारात अर्थ पूर्णतेसाठी त्यांचा उपयोग होत नाही. कारण केवळ या रूपिमांनी भाषिक व्यवहार शक्य नसतो. उदाहरणार्थ, 'विहीर गर्दी नाही' हे विधान होऊ शकत नाही. परंतु 'विहिरीवर गर्दी झाली नाही'. हे विधान होते.

**४. मिलन रूपिम :** जेव्हा दोन निरनिराळे अर्थ एकाच रूपिमाने दर्शविले जातात, तेव्हा त्या रूपिमाला मिलन रूपिम म्हणतात. संमिश्र रूपिम असेही म्हटले जाते.

उदाहरणार्थ, 'घोड' या धातू रूपिमाला 'आ' हा प्रत्ययकारी रूपिम लागला की घोडा हा रूपिम मिळतो. किंवा 'गेला' या क्रियापदात गे, ल, आ हे तीन रूपिम आहेत.

रूपिमांच्या विविध प्रकारांचे हे विश्लेषण समजून घेतल्यानंतर आपण रूपिमांची विकारसरणी आणि पदघटना अभ्यासणार आहोत. यासाठी 'भाषाविज्ञान आणि मराठी भाषा' या आपल्या ग्रंथात डॉ. अनिल गवळी यांनी केलेले पुढील विवेचन वाचा.

धातू आणि प्रत्यय यांचे अनुक्रमे आशयबोधक रूपिम आणि कार्यकर रूपिम असे आपण वर्गीकरण अथवा प्रकार केलेले आहेत. धातू म्हणजे शब्दाचे मूळ रूप होय. धातूंना दोन प्रकारचे प्रत्यय लागतात. एक विकारक (विभक्ती) प्रत्यय आणि दुसरे साधक प्रत्यय. धातूच्या मागे अथवा पुढे साधक प्रत्यय लावून नवे साधित शब्द बनतात. जसे; अज्ञान, कमजोर, नामंजूर, चांगलेपणा, स्वस्ताई, शूरत्व इत्यादी. या शब्दांत अ, कम, ना, पणा, ई, त्व हे साधक प्रत्यय लागून नवे साधित शब्द निर्माण झाले आहेत. साधक प्रत्ययामुळे भाषेतील शब्दसंग्रह वाढतो.

विकारक अथवा विभक्ती प्रत्यय धातूंना लागून त्यांचे वाक्यातील व्याकरणिक कार्य स्पष्ट केले जाते. त्यांच्यापासून नवे शब्द बनत नाहीत. हे प्रत्यय संख्येने कमी असले तरी भाषा त्यांच्यावाचून

पावलोपावली अडते. कारण विभक्ती प्रत्यय हे भाषेच्या अंतर्गत संरचनेचे घटकच असतात. साधक व विकारक प्रत्यय पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

लोह + आर = लोहार + की = लोहारकी (साधक प्रत्यय) – की

लोह + आर = लोहार + ने = लोहाराने (विभक्ती प्रत्यय) – ने

## ■ विकारसरणी

धातूंचे तीन प्रकार होतात. १. नाम, २. सर्वनाम, ३. अव्यय. नामाचे नाम, सर्वनाम, विशेषण असे तीन प्रकार होतात. त्यामुळे मराठीत धातूंचे नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद आणि अव्यय असे पाच प्रकार होतात. अव्यये अविकारी असतात. नाम, सर्वनाम आणि विशेषण यांना वचन, लिंग आणि विभक्ती (सामान्यरूप) हे विकार होतात. क्रियापदाला वचन, लिंग, पुरुष, काल आणि अर्थ असे पाच विकार होतात. नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद यांना होणाऱ्या विकारांची एकत्रित माहिती देणे म्हणजेच त्यांची विकारसरणी (Declension) सांगणे होय.

**वचन :** एकवचन आणि अनेकवचन असे वचनाचे दोन प्रकार आहेत. नामाचे अंत्य स्वनिम व लिंग यांना अनुसरून मराठीत /ए/, /आ/, /ई/, /अ/, /या/, /वा/, /6/ ही रूपिकान्तरे होतात. उदाहरणार्थ; राजे, वाटा, लेकरं, नद्या, सासवा, शाळा, गाया, बाया, वासरं, पिसवा, जावा इत्यादी.

**लिंग :** मराठी भाषेत लिंग हा नामांच्या संदर्भात विकारापेक्षा सहजउपाधीच्या स्वरूपाचा प्रकार आहे. 'मी' गणातील सर्वनामांना लिंगविकार होत नाही. नाम ज्या लिंगी असेल तेच लिंग सर्वनामाला स्वीकारावे लागते. उदाहरणार्थ; मी–मला, माझा, आम्ही, आम्हाला, आपण, आमचा इत्यादी. 'तू' गणाच्या सर्वनामांना मात्र नामाच्या लिंगाला अनुसरून लिंगवचनविकार स्वीकारावे लागतात. उदाहरणार्थ; तू–तुम्ही, तुला, त्याला, त्याने, तिला, तिचा, तिने, त्यांनी, त्याचा, तिच्या इत्यादी. विशेषणाच्या बाबतीत 'सुंदर' गणाची विशेषणे अविकारी असतात. उदाहरणार्थ; ती सुंदर आहे, तो सुंदर आहे, हत्ती सुंदर आहे, घोडी सुंदर आहे. मात्र 'पांढर' गणाच्या विशेषणांना विशेष्याच्या लिंगवचनसापेक्षतेने लिंगवचनविकार होतात. उदाहरणार्थ; खडू पांढरा आहे, राख पांढरी आहे, घोडे पांढरे आहेत, इमारत पांढरी आहे, ती बैलजोडी पांढऱ्या रंगाची आहे.

**विभक्ती :** नाम, सर्वनाम, विशेषण हे तिन्ही प्रकार विकाररहीत असतात तेव्हा ते 'सरळ विभक्ती' त असतात. जेव्हा ते विकारासह असतात तेव्हा त्यांना विभक्तिविकार (सामान्यरूप) होतो. संस्कृत परंपरेने मराठीत आठ विभक्ती रूढ आहेत. नामांच्या बाबतीत त्यांचे अंत्याक्षर व लिंग यांना अनुसरून एकवचनी आणि अनेकवचनी असे दोन भिन्न प्रकारचे विभक्तिविकार होतात. सर्वनामाबाबत

'मी' ची /म/, /मा/ इत्यादी, 'तू' ची /त्या/, /ती/ इत्यादी रूपिकान्तरे होतात. विशेषणाबाबत वचननिरपेक्ष सामान्य विभक्तिविकार होतो. विशेषणाची /या/, /आ/, /ए/ अशी रूपिकान्तरे होतात. नाम व सर्वनाम यांच्या सामान्य विभक्तीपुढे अन्य प्रत्यय वा उत्तरयोगी शब्द येतात. उदाहरणार्थ; त्याच्याकडे, रामापुढे. विशेषणाबाबत असे घडत नाही. क्रियापदांना वचन, लिंग, पुरुष, काळ आणि अर्थ असे विकार होतात. उदाहरणार्थ; बस-बसतो, बसतात, बसतोय, बसलो, बसली, बसशील, बसाल, बसायची, बसत, बसावा, बसावी, बसतास, बसा, बसोत, बसू, बसणारा, बसव इत्यादी. इथे 'बस' या क्रियापदाला अनुक्रमे वर्तमानकाळ, भूतकाळ, भविष्यकाळ, रीतिकाळ, इच्छार्थक, संकेतार्थ, आज्ञार्थी, आशीर्वादार्थ, प्रार्थनार्थ, कर्तृवाचक विशेषणानुसार, प्रयोजक धातुनुसार विकार लागलेले दर्शविले आहेत. अव्ययमुळांना विकार होत नाहीत तेव्हा विकारसरणीत त्यांचा विचार करण्याची आवश्यकता नाही. नामिक (नाम, सर्वनाम, विशेषण) आणि धातुमुळांना (क्रियापद) होणाऱ्या वर नमूद केलेल्या विकारांचे स्पष्टीकरण म्हणजेच रूपिमांची विकाससरणी होय.

## ■ पदघटना

पदांची घटना या प्रकारात साधित शब्दांचा विचार येतो. आतापर्यंत आपण विभक्तिप्रत्ययांमुळे होणाऱ्या विकारी घटकांचा विचार केला. आता साधक प्रत्ययापासून निर्माण होणाऱ्या शब्दांचा/पदांचा विचार करू. साधक प्रत्ययामुळे पदांची व्याकरणिक वैशिष्ट्ये कळतात. उदाहरणार्थ; नाम-विशेषण-क्रियापद-अव्यय. प्रत्ययघटित, सामासिक व अभ्यस्त असे साधित शब्दांचे तीन प्रकार होतात. **प्रत्ययघटित शब्द / पदे** पुढीलप्रमाणे ;

| **रूपिम** | **साधित रूप** | **प्रत्यय** | **व्याकरणिक वैशिष्ट्य** |
|---|---|---|---|
| सूर | सुरावट | उत्तर | नाम |
| नाव | नावाडी | उत्तर | नाम |
| हिव | हिवाळा | उत्तर | नाम |
| ताठ | ताठा | उत्तर | विशेषण |
| चतुर | चतुराई | उत्तर | विशेषण |
| सावध | सावधगिरी | उत्तर | विशेषण |
| पूजा | पुजारी | उत्तर | धातू |
| हस | हसू | उत्तर | धातू |
| कर | करणावळ | उत्तर | धातू |
| येथ | येथून | उत्तर | अव्यय |
| जवळ | जवळून | उत्तर | अव्यय |

| | | | |
|---|---|---|---|
| जीभ | पडजीभ | पूर्व | नाम |
| शासन | अनुशासन | पूर्व | नाम |
| जात | सजातीय | पूर्व | विशेषण |
| लायक | नालायक | पूर्व | विशेषण |

■ **समास**

हा साधित शब्दांचा दुसरा प्रकार आहे. प्रत्ययघटित शब्दांत एक रूपिम मुक्त व इतर रूपिम बद्ध असतात. समासात दोन वा अधिक रूपिम एकत्र येतात. ते सर्व मुक्त रूपिम असतात. संयुक्त अर्थ जाणवणे हे समासात महत्त्वाचे मानतात. समासात कितीही रूपिम एकत्र असले तरी प्रत्येकी दोनच संघटक पडतात. त्या संघटकाची रचना सामासिक असेल तर पुन्हा प्रत्येकी दोन संघटक अथवा घटक पडतात. उदाहरणार्थ, मोरोपंताचा कृतान्तकटकामलध्वजजरा हा सामासिक शब्द. दोन रूपिमांचा सामासिक संबंध + चिन्हाने न दर्शविता तो वक्षाकृती असावा.

कृतान्तकटकामलध्वजजरा
कृतान्तकटकामलध्वज — जरा
कृतान्तकटक — अमलध्वज
कृतान्त — कटक — अमल — ध्वज

समासात प्रत्ययांचा व कार्यकार शब्दांचा लोप होत असतो. उदाहरणार्थ, राजवाडा या शब्दात 'चा' या प्रत्ययाचा लोप झाला आहे. रामलक्ष्मण या शब्दांत 'आणि' या कार्यकर शब्दाचा लोप झाला आहे. पुरणपोळी या शब्दांत (पुरण) 'घालून केलेली' या शब्दांचा लोप झालेला आहे. समासाचे दोन प्रकार होतात. अंत:पदप्रधान समासात दोन पदांऐवजी एकच पद वापरात येऊ शकते. उदाहरणार्थ; लग्नपत्रिका ऐवजी पत्रिका, राजवाडा ऐवजी वाडा. अन्यपदप्रधान समासात दोन्ही पदाऐवजी अन्य पद महत्त्वाचे ठरते. उदाहरणार्थ, मी दशाननाची भूमिका पाहिली. या वाक्यात दश आणि आनन या पदाऐवजी रावण हे अन्य पद महत्त्वाचे ठरते. यावरून समासाचे काही उपप्रकार होतात, ते पाहू.

१. अव्ययीभाव समास हा पूर्वपदप्रधान समास असतो.

उदाहरणार्थ : यथाशक्ती, दररोज, प्रतिवर्ष

२. तत्पुरुष समास हा उत्तरपदप्रधान समास असतो.

उदाहरणार्थ : महादेव, खडीसाखर, नवरात्र, मुखकमल

३. द्वंद्व समासात दोन्ही पदे प्रधान असतात.

उदाहरणार्थ : आईबाप, मीठभाकर, पापपुण्य, घरदार

अन्यपदप्रधान बहुव्रीही समासात कोणतेच पद प्रधान नसून त्या व्यतिरिक्त अन्य पदच प्रधान असते. उदाहरणार्थ; नीलकंठ, दशानन, गजानन, चंद्रमौलि, विधवा, मृगनयना, गायतोंडे, रमारमण.

## ■ अभ्यस्त पदे

समासातील दोन पदे म्हणजे दोन भिन्न मुक्त रूपिम (पदे/शब्द) असतात. अभ्यस्तामध्ये दोन रूपिम हे भिन्न नसून ते एकाच रूपिमाच्या पुनरावृत्तीच्या स्वरूपाचे असतात. पहिला शब्द + दुसरा शब्द = तिसरा शब्द (खरेतर रूपिम) असे समासाच्या रचनेचे स्वरूप असते. तर अभ्यस्ताचे पहिला शब्द + पहिलाच शब्द = दुसरा शब्द असे रचनात्मक स्वरूप असते. शब्दांची ही पुनरावृत्ती तीन प्रकारची असते.

### १. पूर्णाभ्यस्त शब्द

| | | |
|---|---|---|
| नाम | : | हळहळ, कळकळ, बडबड, चिवचिव, पळापळ |
| विशेषण | : | मऊमऊ, गारगार, लाललाल, गरमागरम |
| अव्यय | : | तुरूतुरू, पटापट, भडभड, तिळतिळ |

### २. अंशाभ्यस्त शब्द

| | | |
|---|---|---|
| नाम | : | गडबड, शेजारीपाजारी, दगडबिगड |
| विशेषण | : | लेचापेचा, सटरफटर, अर्धामुर्धा, लहानसहान |
| अव्यय | : | आरपार, लगबग, आडवातिडवा. |

### ३. अनुकरणात्मक अभ्यस्त शब्द

: धोधो, फाडफाड, रिपरिप, चकचक, थरथर

पदविचारात आधुनिक भाषाविज्ञानातील वाक्यविचारासारखा टप्पाही येऊ शकतो. याशिवाय, याठिकाणी अशातऱ्हेने, तोपर्यंत, अशाप्रकारे, यानुसार, त्यातून, याबाबत असे शब्द एकत्र लिहावयाचे की स्वतंत्र असा वाद होऊ शकतो. कारण की, पण अशा शब्दाअगोदर की नंतर स्वल्पविराम हा ही वादाचा विषय आहे. स्वल्पविरामास आपण खंडाधिष्ठित स्वनिम म्हणतो मात्र अशा अर्धविराम, स्वल्पविरामाने वाक्याचा अर्थ बदलू शकतो. मराठी भाषिक बोलतात योग्य पण लिहिताना अशा

विरामचिन्हांचा वापर कसा करावयाचा हेच त्या भाषिकाला कळत नाही. (संदर्भ : डॉ. अनिल गवळी, भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक ४० ते ४४)

## २.४ शब्दार्थ व टिपा

- **चिन्ह :** रूप किंवा आकार आणि अर्थ असणारी आणि या दोहोंत तार्किक संबंध नसणारी गोष्ट.
- **चिन्हव्यवस्था :** अनेक चिन्हांचे नियमित असे संबंध राखणारी रचना.
- **संरचना :** घटकांची मांडणी, घटकांमुळे बनणारी एकजीव अशी रचना.
- **निर्देशपर अर्थ :** भाषेद्वारे बाह्य जगाबाबत जे ज्ञान होते ते.
- **ऐतिहासिक भाषाविज्ञान :** भाषांचा इतिहास तपासून काळाच्या ओघात त्यात घडलेले बदल, पूर्वीच्या व आताच्या भाषांमधील संबंध यांची शास्त्रशुद्ध चर्चा करणारे भाषाविज्ञान.
- **भाषिक क्षमता :** कोणतीही भाषा ग्रहण करण्याची जन्मजात अशी क्षमता.
- **अघोष ध्वनी :** वायुप्रवाह बाहेर पडताना कंठामध्ये असलेल्या स्वरयंत्रातील वळी विलग राहून होणारा ध्वनी.
- **सघोष ध्वनी :** स्वरयंत्रातील वळी जवळ येऊन वायुप्रवाहाच्या रेट्याने कंप पावतात त्यामुळे निर्माण होणारे ध्वनी.
- **स्पर्श ध्वनी :** वायुप्रवाहास जीभ किंवा ओठ यांनी प्रथम अटकाव करून मग एकदम त्यास जाऊ दिल्याने निर्माण होणारा ध्वनी.
- **प्रत्यय :** लिंगवचनपुरुष यांचे शब्दाला लागणारे जोड.
- **कर्ता :** क्रियापदाने निर्देश केलेली क्रिया करणारा आणि बहुधा वाक्यारंभी येणारा शब्द.
- **कर्म :** क्रियापदातील कृतीचा ज्यावर परिणाम होतो ती वस्तू किंवा व्यक्ती दाखविणारा आणि बहुधा क्रियापदाच्या लगोलग येणारा शब्द.
- **विकार :** बदल.

## २.५ समारोप

फेर्दिनां द सोस्यूर यांनी भाषाभ्यासामध्ये एककालिक भाषाभ्यास आणि कालक्रमिक भाषाभ्यास असा भेद केला. या भेदाबरोबर सोस्यूर यांनी रूप, व्यवस्था आणि संरचना या संकल्पना मांडून भाषाभ्यासाची दिशाच बदलून टाकली. भाषाभ्यासात त्यांनी केलेला भेद आणि मांडलेल्या नव्या

संकल्पना यामुळे २० व्या शतकात पारंपरिक भाषाभ्यासाविरुद्ध अनेक आक्षेप घेतले गेले. भाषा ही एक सामाजिक संस्था असून परिवर्तनशील असते, हे ग्राह्य धरूनही एका कालखंडात भाषा स्थिर मानून तिचे विश्लेषण करता येते. हे सोस्यूरच्या सिद्धांतातील मूलभूत तत्त्व क्रांतिकारी ठरले. सोस्यूरची ही तत्त्वेच आधुनिक संरचनावादी भाषाविज्ञानाचा पाया घालणारी ठरली. सोस्यूरच्या प्रभावाखाली ब्लूमफील्ड यांनी संरचनावादी अभ्यासपद्धतीचा विकास केला. पारंपरिक भाषाभ्यास अवैज्ञानिक म्हणजेच प्राकृतिक विज्ञानांच्या पद्धतीचा अवलंब न करणारा आहे असा ब्लूमफील्डवादी भाषा अभ्यासकांचा दावा होता. प्राकृतिक विज्ञानांच्या पद्धती पूर्णत: अनुभवनिष्ठ पद्धती आहेत, ऐंद्रीय निरीक्षण हा या पद्धतींचा गाभा आहे.

## २.६ सरावासाठी प्रश्न

**योग्य पर्याय निवडा.**

१. स्वन भाषेत प्रत्यक्ष कार्यरत झाल्यानंतर त्यांना काय म्हणतात ?
(स्वनिम / रूपिम / रूपिकांतरे)

२. 'Language' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?
(हॉकेट / ब्लूमफील्ड / सोस्यूर )

३. रूप, व्यवस्था आणि संरचना या अमूर्त संकल्पना कोणी मांडल्या ?
(ब्लूमफील्ड / नोम चॉम्स्की / सोस्यूर)

४. 'फूल' हा शब्द कोणत्या प्रकारचा रूपिम आहे?
(कार्यसूचक / आशयबोधक / मिलन)

५. पदघटना या संज्ञेत कोणत्या प्रकारच्या शब्दांचा विचार होतो?
(साधित / सिद्ध / कलात्मक)

**उत्तरे :** १. स्वनिम, २. ब्लूमफील्ड, ३. सोस्यूर, ४. आशयबोधक, ५. साधित

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. स्वन - स्वनिम - स्वनांतर या संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

२. रूपिका - रूपिम - रूपिकांतर या संकल्पनांची उदाहरणासह मांडणी करा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. स्वनिम निश्चितीची तत्त्वे सांगा.

२. रूपिमांचे प्रकार उदाहरणासह लिहा.

३. स्वनिमांचे प्रकार उदाहरणासह लिहा.

## २.६ अधिक वाचन

१. भाषाविज्ञान आणि मराठी भाषा : डॉ. अनिल गवळी

२. मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान : डॉ. महेंद्र कदम

३. सुबोध भाषाविज्ञान : प्र. न. जोशी

## २.७ उपक्रम

१. मराठीतील विविध स्वनिमांची मांडणी करा.

२. मराठीतील विविध अभ्यस्त शब्द एकत्रित करा.

❑❑❑

**सत्र १ : घटक ३**

**(विभाग ३ Module III)**

# भाषेच्या अभ्यासाच्या पद्धती

## ३.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

१. एखाद्या भाषेचा अभ्यास कसा करावा हे लक्षात येईल.

२. भाषेच्या अभ्यासाच्या पद्धतींचा मराठी भाषेच्या संदर्भात विचार करता येईल.

३. भाषाभ्यास पद्धतींची विविधता जाणून घेता येईल.

४. भाषाभ्यासाच्या पद्धती एकमेकांना परस्परपूरक आहेत, हे स्पष्ट करता येईल.

५. जुन्या संस्कृतीची ओळख भाषाधारित इतिहासलेखनाच्या पद्धतीनेच झाली, हे सांगता येईल.

## ३.२ प्रास्ताविक

भाषेला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवनिर्मित भाषा ही समाजव्यवहाराचा पायाभूत घटक आहे. भाषा ही परिवर्तनशील असते. तिच्यात सतत बदल होतात, हे बदल मानवसुलभ अशा सुलभीकरणाच्या प्रवृत्तीतून होतात. भाषेतील हे बदल दोन पातळीवर होतात; एक ध्वनिपातळी व दुसरी अर्थपातळी होय. उदा. तृण $\Rightarrow$ तण. जुन्या काळात भाषेचा अभ्यास तत्त्वज्ञानाच्या अंगाने झालेला असल्यामुळे लिखित भाषेला महत्त्व प्राप्त झाले व व्यवहारभाषेकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. साहजिकच व्यवहारभाषांना दुय्यम दर्जा प्राप्त झाला. भाषेकडे दळणवळणाचे, अभिव्यक्तीचे व भावनाभिव्यक्तीचे साधन म्हणून पाहिले जाते. त्यामुळे त्या काळातील प्रबळ असणाऱ्या संस्कृत या भाषेचे व्याकरण आदर्श व्याकरण होऊन बसले व इतर भाषांचा अभ्यास म्हणावा तितका झालेला दिसत नाही.

भाषेच्या अभ्यासात शब्दशास्त्र (Philology), कोश (Dictionary), व्याकरण (Grammer), भाषाविज्ञान (Linguistics) ह्या अंगांचा विचार होतो. तसेच इतर विज्ञानांचाही (भूगोलविज्ञान, शरीरविज्ञान, समाजविज्ञान, मानसशास्त्र, मानववंशविज्ञान) समावेश होतो. भाषेच्या अभ्यासाची वरील अंगे आपण सोयीसाठी वापरली आहेत. खरे म्हणजे भाषा ही समग्रपणे व्यक्त होते. केवळ ध्वनीचे उच्चारण म्हणजे भाषा नव्हे, तर त्याच्या साहाय्याने शब्द बनविणे, त्याचा संबंध

अर्थाच्या दृष्टीने पहाणे, शब्दांचा क्रम व्यवस्थित पहाणे इत्यादी म्हणजे सर्वांचा उचित मेळ निर्माण झाल्याशिवाय भाषा आकाराला येऊ शकत नाही. यासाठीच भाषा ही समग्रपणेच अवतरते.

भाषेचा अभ्यास करणाऱ्या शाखेस सर्वसाधारणपणे 'भाषाविज्ञान' असे म्हणतात. अगोदर भाषाशास्त्र हा शब्दप्रयोग अस्तित्वात होता. परंतु या शब्दातून एकप्रकारची अपरिवर्तनीयता, दृढता दिसते. सध्याच्या काळात सर्वच क्षेत्रात बदल जाणवतो. तसा तो भाषेतही जाणवतो. सर्वत्र ज्ञानाची क्षेत्रे विस्तारलेली दिसतात. म्हणून हे ज्ञान पुस्तकात न राहता जीवनात उतरले पाहिजे असा माणसात सकारात्मक बदल झाल्यामुळे 'शास्त्र' या शब्दाऐवजी 'विज्ञान' हा शब्द वापरणे योग्य ठरते. विज्ञान म्हणजे विशिष्ट ज्ञान. ज्ञान हे अफाट असते. त्यामुळे भाषाविज्ञानातून नेमका कोणता विचार करावयाचा आहे, हे निश्चित करता येते. त्यात भाषेची अंगे, भाषा आणि समाज, भाषेचे जुने व नवे रूप, भाषा आणि व्यक्ती, भाषेचा तात्त्विक विचार, आकलन, लेखन, भाषांतर अशी व्याप्ती सूचित होते. प्रत्येक शाखेच्या अभ्यासाची पद्धत वेगळी असते. कोणत्याही माणसाचे ज्ञान परिपूर्ण असत नाही. त्याला निसर्गत: काही मर्यादा असतात. तरीही त्यावर मात करण्याचा प्रयत्न असतो. हे तत्त्व विज्ञानालाही लागू पडते. तेच भाषाविज्ञानानेही स्वीकारले आहे. ज्ञान ग्रहण करतानाचा दृष्टिकोण पूर्वग्रहविरहीत असावा. ही भूमिका आधुनिक भाषावैज्ञानिकांनी स्वीकारल्यामुळेच ते प्रांजळपणे भाषेच्या अभ्यासाकडे वळल्याचे दिसून येते.

भाषाभ्यासात समाजमनाचा विचार महत्त्वाचा आहे. हा विचार करणारी अनेक क्षेत्रे आहेत. त्यापैकी भाषाविज्ञान हे एक होय. भाषेचा अभ्यास अनेक पद्धतीने करता येतो. वर्णनात्मक, ऐतिहासिक, तौलनिक या पद्धती आपल्या परिचयाच्या आहेत. पण सर्जनशील, रूपविश्लेषण, भौगोलिक किंवा स्थलमूलक, संख्याशास्त्रीय, उपयोजित, संरचनात्मक, समाजभाषाविज्ञान अशा नव्या पद्धतीही अस्तित्वात आहेत. प्रत्येक पद्धतीचे महत्त्व हे असतेच. पण या सर्व पद्धतींच्या मुळाशी असणाऱ्या तीन पद्धती महत्त्वाच्या आहेत. त्यातही वर्णनात्मक पद्धत ही सर्व अभ्यासाच्या मुळाशी असणारी पद्धत असल्याचे दिसून येते.

## ३.३ विषय विवेचन

**भाषाभ्यास** (Philology)

भाषेचा उपयोग मानव फार प्राचीन काळापासून करीत आहे. माणसाचे माणूसपण भाषेत सामावलेले आहे. मानवेतर प्राणिमात्रावरती आज असलेली सत्ता ही भाषेमुळेच निर्माण झाली आहे. प्रारंभीच्या काळात व्याकरण व भाषाशास्त्र हे दोनही विषय एकच मानीत होते. पण व्याकरण हे भाषाशास्त्र नाही हे लक्षात आल्यावर फिलॉलजी (Philology) असे भाषाशास्त्रास म्हटले जाऊ लागले. Philos या ग्रीक शब्दाचा अर्थ आवड, प्रेम असा असून to gos म्हणजे बोलणे, संभाषण,

शब्द, भाषा असा आहे. फिलॉलजी या शब्दात प्राचीन भाषा व लेखनपद्धती यांचा अभ्यास अभिप्रेत आहे. यात लिखित भाषा तपासली जाते.

भाषांचा अभ्यास जगामध्ये गेल्या अनेक शतकांपासून होत आहे. हा भाषाभ्यास भारतातही होत होता. जुन्या काळात वाणीला देवता मानले जात होते. त्यामुळे भाषेचा पारंपरिक अभ्यास पहाणे महत्त्वाचे ठरते. भाषाभ्यासाची सुरुवात ग्रीकमध्ये झाली. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांनी कधी व्याकरणाच्या अंगाने तर कधी काव्यशास्त्राच्या अंगाने हा भाषाभ्यास केल्याचे दिसते. यात फक्त अभिजात भाषांचाच विचार करण्यात आला. हा अभ्यास दोन अंगानी केला जात होता. आदर्शात्मक व्याकरणाचा मूल्यमापनात्मक अभ्यास आणि लिखित साधनांचा सांस्कृतिकदृष्ट्या अभ्यास होय.

भारतात संस्कृत ही देवभाषा समजली जात होती. त्यामुळे संस्कृत ही श्रेष्ठ व इतर भाषा कनिष्ठ मानल्या जाऊ लागल्या. हिंदू समाजातील ब्राह्मणांचे वर्चस्व लक्षात घेतले तर संस्कृत ही भाषा व प्राकृत या बोली ठरणे अपरिहार्यच होते. परंतु आधुनिक भाषाविज्ञानात या दृष्टिकोणाला स्थान नाही. भारतातील अनेक भाषा संस्कृतोद्भव आहेत असे गृहीत धरले तरी एखादी भाषा जेव्हा मोठ्या समूहाकडून बोलली जाते व आपले अस्तित्व सिद्ध करते तेव्हा त्या भाषेची दखल घेण्याचे काम भाषाभ्यासकाचे असते. परंतु या अभ्यासाच्या परंपरेत असे झालेले दिसत नाही. उदा. पाणिनीने 'अष्टाध्यायी' या ग्रंथात वर्णनात्मक पद्धतीने संस्कृतचा अभ्यास करूनही त्याच्या दृष्टिकोणाकडे दुर्लक्ष झाले आणि संस्कृतचे व्याकरणच प्रमाण मानले. तीच परिस्थिती कमी-अधिक प्रमाणात वैदिक काळातील उपनिषदे, अरण्यके यांच्या अभ्यासाबद्दल होती. हा अभ्यास केवळ ध्वनिपरिवर्तन, अर्थपरिवर्तन, उच्चारप्रक्रिया, व्याकरण असा पृष्ठस्तरीयच होत राहिला. तसेच भाषेच्या मूळ रूपाचा शोध घेऊन उत्पत्ती ठरविणे हाही भाषाभ्यासकांचा दृष्टिकोण होता. यामुळे भाषेचे नेमके स्वरूप समजण्यास मदत होत नाही.

मराठी भाषेच्या अभ्यासाबाबतीतही हेच दिसून येते. वारकरी आणि महानुभाव संप्रदायाचे वाङ्मय वगळता बाकी सर्व मराठी रचना संस्कृतच्या प्रभावानेच प्रेरित असल्याचे जाणवते. एकीकडे संस्कृत भाषेचा आदर्श व दुसरीकडे इंग्रजी भाषेचा प्रभाव या द्वंद्वातच मराठी व्याकरणकर्ते अडकलेले दिसतात. संस्कृतमधील प्रयोग, विभक्ती, शब्दांच्या जाती, संधी, समास, आख्यात प्रत्यय यांना प्रमाण मानूनच मराठीचा अभ्यास होताना दिसतो. त्यामुळे आपोआपच व्यवहारभाषेला गौणत्व प्राप्त होते. त्यामुळेच आजही मराठीला संस्कृतची उपभाषा म्हणूनच कनिष्ठत्व दिले जाताना दिसते. थोडक्यात, भाषाभ्यासकांनी भाषेचा अभ्यास तत्त्वज्ञानाच्या अंगाने केल्याचे दिसते. तसेच भाषा ही एक सामाजिक संस्था आहे हे लक्षात न घेताच, त्या काळात भाषेचा अभ्यास झाल्याचे दिसून येते.

एखाद्या भाषेचे विशिष्ट काळातील व्याकरण हेही ऐतिहासिक असते. भाषेचे आपण भूतकालीन वा भविष्यकालीन व्याकरण तयार करू शकत नाही. भाषेचे भूतकालीन व्याकरण म्हणजेच ऐतिहासिक व्याकरण होय. भाषेला इतिहास असतो, त्याचा अभ्यास करताना ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचा वापर करावाच लागतो. म्हणजेच ऐतिहासिक भाषाभ्यास हा ध्वनिपरिवर्तनावर आधारलेला नाही. यात प्रामुख्याने अभ्यासाच्या सोयीसाठी वेगवेगळे घटक पाडण्यात आलेले आहेत.

**ध्वनिविचार :** भाषा ही मुखावाटे उच्चारलेल्या ध्वनींच्या साहाय्याने तयार होते. मानवी ध्वनी भाषेमध्ये रूढ झालेले असतात. ध्वनी म्हणजे वागिन्द्रियांच्या माध्यमातून हवेत निर्माण होणारी कंपने असतात. मानव असंख्य ध्वनी उच्चारतो. परंतु ते ध्वनी जसेच्या तसे लिहून दाखविता येत नाहीत. उदा. खोकला, उचकी, शिंक, जांभई, हसणे, रडणे, ढेकर यांचे ध्वनी या प्रकारचे असतात. त्यामुळे हे ध्वनी म्हणजे भाषा नव्हे तर ध्वनींचा अभ्यास दोन पातळीवर केला जातो.

**अ) स्वनविज्ञान :** यात कोणत्या स्वनाचे उच्चारण कशाप्रकारे होते, त्यावेळेस होणारी वागिन्द्रियाची हालचाल, उच्चारण स्थान व प्रयत्न याचा विचार यामध्ये केला जातो. स्वन हा मानवनिर्मित असला तरी त्यात व्यक्तिविशिष्टता असते.

**ब) स्वनिमविज्ञान :** एखादा भाषानिरपेक्ष स्वन ज्यावेळी विशिष्ट भाषेत वापरला जातो, तेव्हा तो भाषासापेक्ष बनतो. म्हणजे तो विशिष्ट भाषेपुरता मर्यादित बनतो, त्यालाच 'स्वनिमविज्ञान' म्हटले जाते. म्हणजेच स्वनाचे उच्चारण विशिष्ट पद्धतीने होत असते. उदा. ज, च या स्वनांपासून जहाज, चमचा हे विशिष्ट स्वन मराठी भाषेच्या उच्चारणाचे संदर्भ घेऊनच उच्चारले जातात.

**व्याकरण :** आपल्या उच्चारणात संगती, क्रम, हेतू असावा लागतो. मनातील विशिष्ट आशय एक किंवा अनेक शब्दांच्याद्वारा संपूर्णपणे प्रकट केला जातो. त्या रचनेला 'वाक्य' म्हणतात. म्हणजेच एखादी वाक्यरचना नियमानुसार 'विशिष्टत्वाने स्पष्ट करणे' म्हणजे 'व्याकरण' होय.

**अर्थविचार :** भाषिक संदेश अर्थाद्वारेच पूर्ण होत असतो. भाषा ही जितकी शारीरिक तितकीच ती बौद्धिक व मानसिकही असते. कोणतीही भाषिक क्रिया ही एकाचवेळी इंद्रियगोचर म्हणजे शरीराला जाणवणारी आणि मनोज्ञ म्हणजे मनाने जाणता येणारी अशी प्रक्रिया असते. मानवी मन हे गूढ व गुंतागुंतीची प्रक्रिया असल्यामुळे भाषा ऐकणे, त्याचा अर्थ लावणे या बाबींचा विचार अर्थविचारात करावा लागतो.

**शब्दसंग्रह :** भाषा ही ध्वनींनी बनलेली असते. एखादा सुटा ध्वनी उच्चारणे म्हणजे बोलणे नव्हे. तर त्यात शब्दांच्या क्रमाला महत्त्व असते. त्यामुळे अर्थच्छटा बदलते. म्हणूनच शब्दांचे वर्गीकरण विविध प्रकारे केले जाते. त्यात शब्दांच्या जाती, विकारी शब्द, अविकारी शब्द, साधित शब्द, स्वकीय शब्द, परकीय शब्द, समानार्थी शब्द, विरूद्धार्थी शब्द येतात.

शब्दांचे उच्चारण म्हणजे भाषा नव्हे, तर त्या उच्चारणात व्यवस्थित क्रम असावा लागतो, संगती असावी लागते. तसेच वाक्याच्या मुळाशी आशय, हेतू, प्रयोजन असावे लागते. त्यामुळे उचित मेळ निर्माण होतो व भाषा आकाराला येते. यालाच भाषेचा समग्रपणा म्हणता येतो.

भाषेचा अभ्यास जुन्या काळापासून होत आला आहे. भाषा जितकी जुनी असेल तितके त्या भाषेचे अभ्यासक्षेत्र व्यापक असल्याचे दिसून येते. पूर्वी भाषेच्या अभ्यासाला धार्मिकतेचे स्वरूप असल्याचे दिसते. भारतीय परंपरेत आजही अनेक लोक संस्कृतला देववाणी समजतात. यावरून भाषेबद्दलचा धार्मिक दृष्टिकोणच अधोरेखित होतो. हा दृष्टिकोण अभ्यासाअंती जसा बदलत गेला तसे भाषेच्या अभ्यासाचे क्षेत्र अनेक अंगांनी विस्तारलेले दिसते. यामधूनच भाषेच्या अभ्यासपद्धतींचा उदय झाल्याचे दिसते. भाषेबद्दलचे दृष्टिकोण हे चिरंतन स्वरूपाचे नसतात. त्यात सतत बदल होत असतो. म्हणून भाषेच्या अभ्यासाच्या अनेक शाखा उदयाला आलेल्या दिसून येतात. त्यातील काही महत्त्वाच्या अभ्यासपद्धती पुढीलप्रमाणे :

अ. ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती

ब. तौलनिक भाषाभ्यास पद्धती

क. वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती

**अ. ऐतिहासिक भाषाभ्यास पध्दती**

१८ व्या शतकात भाषाभ्यासाला एक नवी दिशा प्राप्त झाली ती विल्यम जोन्स यांनी केलेल्या अभ्यासामुळेच होय. त्यांनी भाषेचा सूक्ष्म अभ्यास करून एक महत्त्वाचे गृहितक मांडले. कलकत्ता येथील रॉयल एशियाटिक सोसायटीच्या वार्षिक अधिवेशनात निबंध वाचताना इ.स.१७९६ मध्ये त्यांनी एक विधान केले. ते असे म्हणाले की, 'संस्कृत, ग्रीक व लॅटीन ह्या भाषांत जे साम्य आढळते ते इतके घनिष्ठ व खोलवर रूजलेले आहे की, या भाषा कोणत्यातरी एका भाषेपासून उद्भवल्या असल्या पाहिजेत असे मानावे लागते'. हे विधान करून सर विल्यम जोन्स यांनी ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचा पाया घालण्याचे काम केलेले दिसते.

ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे क्षेत्र खूप व्यापक आहे. यात वेगवेगळ्या भाषांची तुलना करणे, निष्कर्ष मांडणे ही कामे परिश्रमाची असतात. या काळात अनेक भाषाभ्यासकांनी या पद्धतीने अभ्यास करून या पद्धतीच्या विकासाला हातभार लावल्याचे दिसून येते. त्यात बॉप यांनी इंडो - युरोपियन भाषेचा, कॉल्डवेल यांनी द्रविड भाषेचा, ग्रिअर्सनने भारतीय भाषांचा अभ्यास केला. व्हिटने व ग्रिम यांनी ध्वनीपरिवर्तनाचे नियम मांडून ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीत महत्त्वाची भर घातली. एखाद्या भाषेची वाटचाल चालू असताना त्या भाषेच्या ध्वनिव्यवस्थेत, रूपव्यवस्थेत व शब्दकोशात

फरक पडतो, म्हणजे त्या भाषेला इतिहास असतो याची जाणीव त्या काळातील अभ्यासकांना होती. तरीही सर विल्यम जोन्स यांची कल्पना अगदी नवीन आहे. त्यामुळे जी मूळ भाषा सुरुवातीला मानावी ती कदाचित आज अस्तित्वात नसण्याची शक्यता आहे. आजच्या आधुनिक भाषा कोणत्या ना कोणत्या भाषांमधून विकसित झालेल्या आहेत. त्यामुळे भाषिक परिवर्तनाचे विवेचन करण्यासाठी ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीच वापरावी लागते.

खऱ्या अर्थाने ही पद्धत युरोपमध्ये १९ व्या शतकात उदयाला आली. या पद्धतीत दोन कालखंडातील किंवा त्यापेक्षा जास्त कालखंडातील भाषेच्या स्वरूपात काय बदल झाले याचा अभ्यास होतो, यालाच ऐतिहासिक भाषाभ्यास म्हणतात. यात एखाद्या काळात कोणते स्वन नाहीसे झाले, कोणते स्वन नव्याने आले, वाक्याचे स्वरूप कसे बदलत गेले, अर्थामध्ये कोणते परिवर्तन झाले या सर्व बाबींचा विचार या पद्धतीच्या माध्यमातून केला जातो. यात दोन किंवा दोनपेक्षा जास्त कालखंडाचा अभ्यास होत असल्याने याला **'कालक्रमिक'** अभ्यास पद्धती असेही म्हटले जाते. भाषेतील परिवर्तन हे नियमित व सातत्याने होत असते. याचा विचार करून या पद्धतीत भाषेचा अभ्यास करावा लागतो.

एखाद्या भाषाकुलात आपण ज्या भाषा समाविष्ट करू शकतो त्यांची पूर्वावस्था जर आपणाला माहीत नसेल तर कालदृष्ट्या मिळणाऱ्या पुराव्यांच्या आधारे त्यांची पुनर्रचना करावी लागते. भाषेत जी ध्वनिपरिवर्तने घडतात ती भाषा बोलणाऱ्यांच्या उच्चारविषयक सवयीतील बदलांच्यामुळे होतात. ध्वनिपरिवर्तनातील हे बदल नियमानुसार असतात यावरच ऐतिहासिक भाषाभ्यासपद्धतींची सर्व मदार आहे.

ज्या भाषा आपण एका भाषाकुळातील मानतो त्या सर्व इतिहास काळात कोणत्या तरी एका भाषेपासून निर्माण झालेल्या असतात. म्हणजेच त्या साऱ्या एकभाषोद्भव असतात. ही मूळ भाषा माहिती नसेल तर तिच्या माहितीसाठी प्रयत्न करावे लागतात. यादृष्टिनेही ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती उपयोगी ठरते. कारण ऐतिहासिक पद्धती कालक्रमाने भाषेत घडणाऱ्या परिवर्तनाचा इतिहासच लिहीत असते. दोन भाषिक अवस्थांमधला इतिहास लिहिताना ध्वनी, व्याकरण, शब्दसंग्रह यांचे तपशीलवार वर्णन आवश्यक असते. म्हणजेच या अभ्यासपद्धतीत दोन कालखंडातील दोन वेगवेगळ्या रूपांची तुलना अभिप्रेत असते.

मानवी जीवन हे काळाने बंदिस्त असते. प्राणिमात्राला जन्म आणि मरण चुकत नाही. तसे वस्तुमात्राला उत्पत्ती आणि नाश असतो. मानवी जीवन जन्मापासून ते मृत्यूपर्यत क्षणाक्षणाला बदलते. भाषाही याला अपवाद नाही. भाषेचे स्वरूप या पद्धतीमुळे समजते. माणसाला निसर्गत:च भूतकाळाचे आकर्षण असते. वर्तमानकाळ हा एका क्षणापुरता मर्यादित असतो. भूतकाळाच्या आकर्षणातून

मानवाचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहास सिद्ध होतो. दोन कालबिंदूमधील भाषिक परिवर्तनाचा अभ्यास यात केला जातो. कमीत कमी दोन काळांची पाहणी येथे केली जात असल्यामुळे याला 'द्वैकालिक भाषाभ्यास पद्धती' असेही म्हटले जाते. यात भाषेच्या प्रवाही रूपाकडे लक्ष दिले जाते.

संस्कृतमधून मराठी, हिंदी, गुजराथी, बंगाली; लॅटिनमधून स्पॅनिश, फ्रेंच या भाषा कशा जन्माला आल्या हे भाषिक परिवर्तनाच्या अनुषंगाने सिद्ध करण्याचे काम ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे असते. यासाठी आपणाला लिखित साधनेच प्रमाण मानावी लागतात. कारण त्या काळातील बोलल्या जाणाऱ्या भाषेचे पुरावे गोळा करणे अशक्य असते. परंतु लिखित भाषा ही खरी भाषा नसते यामुळेच ऐतिहासिक भाषाभ्यासाची पीछेहाट सुरू झालेली दिसून येते. मुख्यत्वे भाषिक परिवर्तनाच्या अंगाने हा अभ्यास केला जातो. कोणत्या भाषेतून कोणती भाषा अस्तित्वात आली याचा अभ्यासही यातून केला जातो व त्यातून कुलसंकल्पना अस्तित्वात आल्याचे दिसते. यात मग एकाच भाषेतील बदलाचा शोध घेतला जातो. त्यालाच एकभाषिक पुनर्रचना असेही म्हणतात. यात स्वन, शब्द, अर्थ व व्याकरणिक रूपे यांच्यात कसे बदल झाले, याचा अभ्यास केला जातो.

**स्वन परिवर्तन**

सत्त $\Rightarrow$ सप्त $\Rightarrow$ सात

कर्म $\Rightarrow$ कम्म $\Rightarrow$ काम

तृण $\Rightarrow$ तण

अशा पद्धतीने स्वनपरिवर्तनातून भाषेचे स्वरूप निश्चित करावे लागते.

**शब्द स्तरावरील परिवर्तन**

एखाद्या कालखंडात दुसऱ्या भाषेच्या संपर्काने कोणते शब्द नवीन आले, जुन्या शब्दापैकी कोणते लुप्त झाले याचा विचार यात केला जातो.

फार्शीतून : चादर, सही, शिक्का, सतरंजी, सुभेदार इत्यादी.

इंग्रजीतून : हॉस्पिटल, टेबल, शर्ट, कॉलेज, फाईल इत्यादी.

भारतीय भाषेतून इंग्रजीत : pandit, curry

**अर्थपरिवर्तन**

शब्दांच्या देवाण-घेवाणीमधून अनेक शब्दांचे अर्थही बदलतात. उदा. इरसाल, गोस्वामी, गुरूजी, गोठा, अवजड, गोपाळ इत्यादी शब्दांचे अर्थपरिवर्तन झालेले दिसते. तसेच व्याकरणिक रूपे कशी बदलतात याचाही अभ्यास या अभ्यासपद्धतीतून केला जातो.

ऐतिहासिक भाषाभ्यास करताना तुलनात्मक पद्धतीनेही भाषेचे रूप निश्‍चित करता येते. यात फक्त एकच भाषा तुलनेसाठी न घेता दोन किंवा तीन भाषा घ्याव्या लागतात. त्यामुळे पूर्णपणे भिन्न वाटणाऱ्या भाषांचाही अभ्यास करता येतो. उदा. संस्कृत: शर्कर, हिंदी: शक्कर, मराठी: साखर आणि इंग्रजी: शुगर या शब्दांमध्ये साम्य दिसते. तसेच गुजराथी: दीवो, हिंदी: दिया, मराठी: दिवा, संस्कृत: दीप या शब्दांमध्ये साम्य दिसते. अशा पद्धतीचे शब्द ऐतिहासिक भाषाभ्यासातील पुनर्रचनेसाठी घेता येतात.

भाषेच्या अभ्यासात ऐतिहासिक पद्धतीचे महत्त्व विशेष आहे. इंडो-आर्यन भाषांच्या अभ्यासाच्या बाबतीत ही पद्धत वापरली गेली. त्यातून प्रामुख्याने यातील सर्व भाषा एकाच कुलातील आहेत. तसेच त्या एकाच भाषावंशातील वेगळ्या-वेगळ्या भाषा बोलणारे ग्रीक, फ्रेंच, इंग्रज, रोमन, पारशी, हिंदू इत्यादी समाज एकाच आर्यवंशाचे आहेत हे दिसून आले. त्यामुळे आर्यवंशीय भाषांचा वंश निश्‍चित करण्यात आला. या अभ्यासामुळे 'हिब्रु' ही मानवाची आद्यभाषा आहे या समजालाही तडा गेला. कारण या अभ्यासातूनच अनेक भाषांचे वंश निश्‍चित करण्यात आले. या दृष्टीने ऐतिहासिक भाषाभ्यासाचे महत्त्व निश्‍चित आहे.

**ऐतिहासिक भाषाभ्यासाच्या मर्यादा**

या अभ्यासपद्धतीवर काही आक्षेप घेतले जातात. भाषिक परिवर्तन या संकल्पनेवर आधारित असलेली ही पद्धत मृत झालेल्या भाषिक रूपांच्या आधारे वेगवेगळे निष्कर्ष काढते. त्यामुळे व्यवहार भाषेला यात महत्त्व नसल्यामुळे या अभ्यासाला समग्रता प्राप्त होत नाही. त्यामुळे त्या काळातील बोलींचे व भाषेचे स्तर लक्षात येत नाहीत. तसेच या पद्धतीत शब्दांच्या चिकित्सेवर भर दिला जातो. त्यात शब्दाचा ध्वनी, अर्थ, वाक्यातील त्याचा परस्परसंबंध याची माहिती अभिप्रेत आहे. परंतु प्रत्यक्षात ती भाषा बोलणाऱ्या समाजघटकांचा कसलाही संबंध यात होताना दिसत नाही. भाषा ही सामाजिक असते. त्यामुळे भाषेवर समाजाचे प्रतिबिंब असले तरीही या पद्धतीत सामाजिक घटकांचा विचार केलेला दिसत नाही.

तसेच या अभ्यासपद्धतीत भाषेच्या निरनिराळ्या घटकांपैकी प्रत्येकाचा सांगोपांग अभ्यास होतो. त्यात वर्णप्रक्रिया, शब्दप्रक्रिया, प्रयोगप्रक्रिया इत्यादीचा अभ्यास होतो. परंतु हा अभ्यास एकत्रित न झाल्यामुळे कोणत्याही भाषेची पुनर्रचना करताना अडचणी निर्माण होतात. ऐतिहासिक

भाषाभ्यास पद्धतीने जनकभाषा शोधण्यास अवघड जाते. 'भाषिक परिवर्तन' या संकल्पनेवर ही पद्धत अवलंबून असली तरी परिवर्तन बिंदू निश्चित करता येत नाही. एकंदरीत, भाषेच्या कालिक टप्प्यांचा एककालिक वर्णनात्मक अभ्यास केल्याशिवाय ऐतिहासिक अभ्यासाला पुढे जाता येत नाही, हे सोस्यूरने सांगितलेले मतच शेवटी ग्राह्य मानावे लागते.

**ब. तुलनात्मक भाषाभ्यास पद्धती**

सर विल्यम जोन्स यांनी संस्कृत, ग्रीक, लॅटीन, केल्टिक या भाषांमधील साम्य प्रथम मांडले आणि हा भाषापरिवार एकाच भाषेपासून उत्पन्न झाला असावा असा विचार मांडला. यातूनच तौलनिक अभ्यास पद्धतीचा उगम झालेला आहे. तुलना करण्यासाठी दोन किंवा त्यापेक्षा अधिक भाषा घ्याव्या लागतात. भाषेच्या भूतकालीन अवस्थेवर प्रकाश टाकण्याचे काम तौलनिक भाषाभ्यास करतो. यातील सादृश्य वरवरचे किंवा योगायोगावर आधारलेले नसते, तर ते व्यापक, पद्धतशीर व नियमबद्ध असते. प्रामुख्याने यात भिन्न भाषांच्या समकालीन रूपांची तुलना केली जाते. तसेच परस्पर साम्य असणाऱ्या एकवंशीय भाषांचीही तुलना अभिप्रेत नाही. वर्णनात्मक दृष्टीनेही परस्परभिन्न भाषांचीही तुलना करता येते. भाषां-भाषांमधील साम्य, वैधर्म्य व कार्यपद्धती यावर तौलनिक अभ्यास पद्धतीतून प्रकाश टाकता येतो.

रॉयल एशियाटिक सोसायटी कलकत्ता येथे १७९६ साली सर विल्यम जोन्स यांनी या पद्धतीचा प्रथम अवलंब केला. या अभ्यासातून अनेक भाषांचे मूळ शोधता येते. त्यातील ध्वनीचे मूळ कोणते हे समजते. तसेच एकाच मूळ भाषेपासून अनेक भाषांची उत्क्रांती कशी झाली याचीही कल्पना येते. इ.स.१८२०-१८७० या कालखंडात ही पद्धत रूजली. या अभ्यासपद्धतीत भाषापरिवर्तन ही बाब महत्त्वाची आहे. भाषेतील परिवर्तन हे सार्वत्रिक मूलतत्त्वांच्या चौकटीतच होत असल्याने भाषांचा तुलनात्मक अभ्यास शक्य होतो.

पृथ्वीतलावर अनेक देश आहेत. त्यात असंख्य समाजगट आणि वेगवेगळ्या भाषा कार्यरत आहेत. त्यातील काही प्रगत तर काही अप्रगत आहेत; काही प्राचीन तर काही अर्वाचीन आहेत. जगात आज सुमारे तीन हजार भाषा बोलल्या जातात. ज्या पद्धतीने माणसांची विभागणी ही त्यांच्या रंगरूपावरून होते. तशी भाषांचीही विभागणी केली जाते. कोणत्याही गोष्टीची तुलना करून त्यातून ज्ञान मिळविणे माहिती जाणून घेणे ही माणसाची उपजत वृत्ती आहे. आपण कोणताही नवीन अनुभव घेताना त्या प्रकारच्या जुन्या अनुभवाशी त्याची तुलना करतो. दोन समाज, दोन राष्ट्रे, संस्कृती, कालखंड अशा स्तरावर भाषांचीही तुलना करण्याची क्रिया सुरू झालेली दिसते.

'एकाच भाषेच्या हयातीतील निरनिराळ्या कालखंडातील स्वरूपे व भिन्न भाषांची स्वरूपे ह्यांची तुलना हिच्यात होते, म्हणून हिला तौलनिक पद्धत असे म्हणतात.' संस्कृतच्या अभ्यासामुळे

ह्या पद्धतीला चालना मिळाली. ह्या पद्धतीने जे भाषाशास्त्र विकसित झाले त्याला 'तुलनात्मक भाषाशास्त्र' असे म्हणतात. तुलना दोनच गोष्टीत होते असे नाही तर किमान त्यासाठी दोन घटक आवश्यक असतात, आणि त्यात तुलना करण्यास योग्य अशी तत्वे असावी लागतात. भाषेत वांशिक सारखेपणा असावा लागतो. उदा. गुजराथी आणि हिंदी एकाच वंशातील भाषा आहेत. त्यांची तुलना करताना तुलना करणाऱ्याला दोन्हीही भाषांचे ज्ञान असावे लागते. तेव्हाच एका भाषेतून दुसरी भाषा कशी उत्क्रांत झाली हे या अभ्यासामुळे समजण्यास मदत होते. उदा. संस्कृतमधील 'अहम्' या सर्वनामापासून बनलेली वेगवेगळी रूपे वेगवेगळ्या भाषांमध्ये पुढीलप्रमाणे आहेत. अहम्मि – प्राकृत, आमी –बंगाली, मैं – हिंदी, मी – मराठी, हूॅ – गुजराथी, हॉव – कोकणी अशाप्रकारे तुलना करता येते.' दोन किंवा अनेक कालखंडातील भाषेच्या स्वरूपाचा विचार ह्या पद्धतीत येतो म्हणून हिला द्विकालिक पद्धत असेही म्हणतात.'

तुलनात्मक भाषाभ्यास पद्धती ही वर्णनात्मक पद्धतीशी संबंधित आहे. भाषेचा वस्तुनिष्ठ अभ्यास करून निष्कर्ष मांडले जातात. तसेच याच पद्धतीने मराठी, इंग्रजी इ. सर्वस्वी भिन्न वंशाच्या भाषांचा अभ्यास करून त्यातील साम्य भेद तपासता येतात. ही तुलना श्रेष्ठ–कनिष्ठत्वाच्या पातळीवरची नसते तर साम्य–भेद यावर अवलंबून असते. या पद्धतीने बोलींचाही अभ्यास करता येतो. सार्वत्रिकता आणि समूहमानस या अनुषंगाने होणाऱ्या जागतिक परिवर्तनात अनेकदा साम्य असते. भाषेतही असेच साम्य आढळते, म्हणूनच तुलनात्मक अभ्यास शक्य होतो. स्वनिम, रूपिम, वाक्य आणि अर्थ या घटकांच्या अनुषंगानेच भाषेचा अभ्यास केला जातो. सुरुवातीला हा अभ्यास शब्दस्तरावर होता. उदा :

| संस्कृत | लॅटिन | इंग्रजी |
|---|---|---|
| त्रय: | tres | three |
| पितृ | pater | father |
| मातृ | mater | mother |

यामध्ये स्वनपरिवर्तन होऊन जे साम्य आढळते, त्यातूनच पुढे इतर भाषिक घटकांचा अभ्यास सुरू झालेला दिसतो. भाषेच्या तुलनेमुळे कौटुंबिक जीवनावर आणि संस्कृतीवरही प्रकाश पडतो. उदा. Uncle, Cousine, Aunt असे इंग्रजीत मोजकेच नातेवाचक शब्द आहेत. आपल्याकडे मात्र चुलतभाऊ, चुलतबहीण, मावसभाऊ, मावसबहीण, आते–मामे भावंडे, काका, मामा, काकू, मावशी, आत्या असे कितीतरी नातेवाचक शब्द आहेत. कारण आपली कुटुंबव्यवस्था आणि पाश्चात्त्यांची कुटुंबव्यवस्था ही वेगळी आहे, हे आपणाला तुलनात्मक अभ्यासावरूनच समजते. त्यामुळे या पद्धतीचा निश्चित लाभ होतो.

तुलनात्मक अभ्यास पद्धतीत सर्व संकल्पनांचा पायाभूत विचार करता इतर सर्व भाषिक एकत्र आणण्याचे काम या अभ्यासामुळे शक्य झाले. या पद्धतीतून भाषेचा अभ्यास हा अंतिमत: परिपक्व होतो. तुलनात्मक पद्धत ही ऐतिहासिक व वर्णनात्मक या पद्धतीवर अवलंबून आहे. ग्रीम बंधू, व्हर्नर, श्लेगेल यांनी या पद्धतीने भाषेचा अभ्यास केला. तरीही भाषिक परिवर्तन अभ्यासणे म्हणजे भाषेचा परिपूर्ण अभ्यास नसतो. या गरजेतून वर्णनात्मक पद्धत जन्माला आली व ऐतिहासिक व तुलनात्मक पद्धती मागे पडत गेल्या.

**क. वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती**

कोणत्याही एका कालखंडातील भाषिक स्वरूपाचा अभ्यास यात केला जातो. एकाच काळातील ते भाषेचे स्वरूप असल्यामुळे ह्या पद्धतीला '**एककालिक पद्धत**' असे म्हणतात. यात एकाच काळातील भाषेचे स्वरूप पाहात असल्यामुळे ते स्थिर आहे असे मानावे लागते. यातून व्याकरणाच्या नियमांना अनुसरून शब्दांची रूपे होवोत अगर ती स्वतंत्ररित्या सिद्ध होवोत; सर्व भाषेचे जसेच्या तसे वर्णन या पद्धतीत केले जाते, म्हणून तिला 'वर्णनात्मक पद्धती' असे म्हणतात. सोस्यूरने प्रथम याचा अभ्यास करून यातील भाषिक भेद दाखवून दिले. त्यातूनच आधुनिक भाषाविज्ञानाचा पाया घातला गेला. सर्व अभ्यास पद्धतीच्या मुळाशी असणारी ही पायाभूत पद्धत आहे.

ध्वनींचा मुलभूत घटक स्वनिम असतो, हे आपणाला समजल्याशिवाय भाषेचे वर्णनच करता येणार नाही. या पद्धतीने भाषेचे वर्णन करणे म्हणजे विश्लेषण करणे होय. भाषा ही कालसापेक्ष असते. परिवर्तनशीलता हा भाषेचा गुण आहे. या पद्धतीने अभ्यास करताना भाषेची पूर्वोत्तर अवस्था (इतिहास) लक्षात घ्यावयाची नसते किंवा एका भाषेचा अभ्यास चालू असताना या भाषेची दुसऱ्या भाषेशी तुलना करू नये. म्हणजे आजच्या वर्तमान मराठीचा अभ्यास करीत असताना त्यावर संस्कृत भाषेची छाप पडू नये. भिन्न वंशीय भाषांमध्ये अनेक प्रकारचे साम्य असू शकते, पण वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास करताना दुसऱ्या भाषेच्या प्रकृतीशी तुलना केल्यास ते अप्रस्तुत ठरेल. कारण या अभ्यासात विशिष्ट भाषेचे विशिष्ट काळातील वर्णन देणे एवढाच हेतू असतो.

विशिष्ट काळात भाषेचे रूप कसे होते, याचे विश्लेषण या पद्धतीतून केले जाते. यात प्रामुख्याने व्यवहार भाषेचा विचार केला जातो, लिखित भाषेचा नाही. त्यात ध्वनिविचार, वर्णविचार, रूपविचार, वाक्यविचार, अर्थविचार, व्युत्पत्तिविचार, शब्दसंग्रहविचार यांचे विश्लेषण करायचे असते. भाषेचे यथातथ्य अचूक तपशिलवार परिपूर्ण वर्णन करणे हे वर्णनात्मक अभ्यास पद्धतीचे उद्दिष्ट असते. यातील वास्तव वर्णनामुळे परंपरागत मते बदलावी लागतात. उदा. १) स, ला, ते हे एकवचन; स, ला, ना, ते हे अनेकवचनी विभक्तीचे प्रत्यय आहेत. परंतु यातील 'ते' हा प्रत्यय बोलण्यात येत नाही. २) द्वितीया व चतुर्थीचा 'स' हा प्रत्यय बोलण्यात क्वचित येतो. लेखनात जास्त येतो. ३) च,

ज या व्यंजनाचे उच्चारण दोन प्रकारे होते. ४) तृतीयेचा 'ने' हा बोलताना 'नं, नी' असा उच्चारला जातो. ५) 'ऋ' ची जागा 'रू' या प्रत्ययाने घेतली. म्हणजे भाषा ही कालसापेक्ष असते. उदा. यादवकाळात आपल्याला जंबिया, फिरंगी हे शब्द आढळत नाहीत, तर ते फार्सीतून मराठीत आलेले दिसतात. कोणत्याही काळाचा परिणाम हा त्या भाषेच्या स्वनिमांवर परिणाम करतो, हे या पद्धतीतूनच समजते. तसेच मराठीतील 'ळ' हा ध्वनी विशिष्ट स्थानीच उच्चारला जातो. मराठीत तो शब्दाच्या सुरुवातीला कधीच येत नाही. तर काही भाषेतील मोजकेच ध्वनी असे असतात की, त्यामुळे अर्थभिन्नता निर्माण होते. दोन वस्तू भिन्न आहेत हे आपणाला ध्वनीमुळेच समजते. उदा. नळ – नल, फळ – फल इ. म्हणजेच येथे 'ल' आणि 'ळ' हे भाषेतील स्वनिम ठरतात. अशा पद्धतीने सर्व स्तरांचा अभ्यास करून त्याचे पद्धतशीर व शास्त्रशुद्ध वर्णन देणे, हे वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीचे कार्य आहे.

वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती ही भाषाशास्त्रीय अभ्यासाचा पाया समजली जाते. दोन काळातील भाषांचा ऐतिहासिक किंवा तौलनिक अभ्यास करावयाचा असेल तर सुरुवातीला वर्णनात्मक पद्धतीने भाषेची चिकित्सा करावीच लागते. भाषा ही मानवी संकेतावर अवलंबून असते. त्यामुळे ती भाषा लोक बोलतात तेव्हा काय काय घडते याची नोंद घ्यावी लागते. प्रत्येक भाषेचे उच्चार, व्याकरण, शब्दसंग्रह स्वतंत्र असतात. त्यामुळे एखाद्या प्रमाणभूत भाषेला गृहीत धरून वर्तमान भाषेचे स्वरूप पाहता येत नाही. प्रत्यक्ष वापरात भाषेचे जे रूप असते, त्याच रूपाला शुद्ध समजावे लागते. कारण भाषा ही व्यक्तिसापेक्ष असते.

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. त्यामुळे भाषेच्या अभ्यासात समाजवास्तव दुर्लक्षित करून चालत नाही. परंतु ऐतिहासिक अभ्यासात ही समाजघटना बाजूला रहात होती. वर्णनात्मक पद्धतीतून समाजवास्तवाची भाषाच अभ्यासली जात असल्यामुळे ह्या पद्धतीला महत्त्व प्राप्त झाले. कोणत्याही समाजातील सामाजिक घटना ह्या ज्या त्या समाजाशी निगडीत असतात आणि ह्या घटनाच त्या विशिष्ट भाषिक घटनांच्या मुळाशी असतात. या अभ्यासात भाषेतील ध्वनी, शब्द, प्रयोग, व्याकरण, कोश, अर्थविकास, भाषिक समाज यांचा अभ्यास येतो, पण व्यक्तीलाही भाषेत महत्त्व असते पण ते केव्हा तर ती व्यक्ती व तिच्या भोवतालचे वातावरण लक्षात घेतले तरच. त्यामुळे वर्णनात्मक पद्धतीत व्यक्ती व समाज हेही अभिप्रेत आहेत.

वर्णनात्मक पद्धतीने भाषेचा अभ्यास करताना काही गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. त्यात प्रत्येक भाषेची संरचना अनन्य असते. परंतु त्या संरचनेचा शोध घेणाऱ्या अभ्यास पद्धती मात्र समान असतात. त्यावरून भाषेचे सहज निरीक्षणासाठी उपलब्ध असणारे अंग म्हणजे ध्वनी होय. भाषेचा अभ्यास हा ध्वनीपासून करायला हवा; म्हणून भाषिक अभ्यासात 'अर्थ' हा निरीक्षणसुलभ

नसल्यामुळे वर्णनात्मक अभ्यास पद्धतीत अर्थविचार अमान्य आहे. त्यामुळे ध्वनी, स्वन, पद, वाक्य या क्रमाने जावे लागते. म्हणजेच या पद्धतीत वाक्यरचनेला महत्त्वाचे स्थान आहे.

**वर्णनात्मक अभ्यास पद्धतीच्या मर्यादा**

वर्णनात्मक अभ्यास पद्धतीत एकाच काळातील भाषेचा अभ्यास केला जातो. त्यासाठी लागणारी साधनेही अपरंपार असतात. ती सर्व गोळा झालीत असे कधीही म्हणता येणार नाही. कारण ज्या भाषेचा अभ्यास करावयाचा आहे ती भाषा एका काळातील असल्याने साधने बदलत जातात. त्यामुळे बदलत जाणरी सर्व साधने गोळा झाली असे कसे म्हणता येईल? आणि साधने अपुरी असली म्हणजे अभ्यास व्यवस्थित होणार नाही. या अभ्यास पद्धतीने एका काळातील भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास होतो. त्यामुळे भाषेच्या एका विशिष्ट अंगावरच प्रकाश पडेल, परंतु तिचे समग्र स्वरूप आपणाला समजणार नाही, ह्या मर्यादा जाणवतात. तरीही वर्णनात्मक पद्धती ही सर्व पद्धतीच्या मुळाशी असणारी पद्धत आहे, असेच मान्य करावे लागते.

**भाषाभ्यास पद्धतींची परस्परपूरकता**

भाषाभ्यास पद्धतीत ऐतिहासिक तुलनात्मक आणि वर्णनात्मक या तीन प्रमुख पद्धती आहेत. यातील वर्णनात्मक पद्धत ही पायाभूत मानली जाते. विशिष्ट काळातील भाषेचे यथार्थ वर्णन करता आले तरच त्यातील परिवर्तनाचा किंवा दोन कालखंडातील भाषेच्या भिन्न रूपांचा अभ्यास करणे, परस्पर संबंध ठरविणे शक्य होते. उदा. पाणिनीने रचलेले संस्कृत भाषेचे व्याकरण म्हणजे त्याच्या काळातील संस्कृत भाषेचा वर्णनात्मक अभ्यास होता. कालांतराने व्युत्पतिशास्त्राकडे भाषा अभ्यासकांचे लक्ष गेल्यानंतर ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती उदयास आली.

गेल्या दशकात गणिती, संरचनात्मक, उपयोजित, तात्त्विक अशा अनेक पद्धती अस्तित्वात आल्या. भाषेचे वर्णन जास्तीत जास्त अचूक करता यावे हाच नव्या पद्धतींचा हेतू आहे. भाषाविज्ञान हे समाजशास्त्रीय अभ्यासाचे एक क्षेत्र आहे. सर्व ज्ञानशाखांशी भाषाविज्ञानाचा जवळचा संबंध येतो. साहित्य आणि भाषाविज्ञान याचे अत्यंत जवळचे नाते आहे. समाजशास्त्रात प्रयोग करता येतात. पण त्यात शंभर टक्के वस्तुनिष्ठता असत नाही. व्यक्तिसापेक्ष अनेक रंग तेथे मिसळलेले असतात. तसेच त्या अभ्यासाची साधनसामुग्री मिळण्यावर अनेक बंधने येतात. त्यामुळेच अनेक प्रश्न अनुत्तरीत राहतात. भाषेत अमूक एक स्थिती आहे एवढेच सांगता येते. तशी स्थिती का आहे याचे उत्तर देता येत नाही. भाषेत सार्वकालिक नियमव्यवस्था नाही. उदा. संस्कृतमध्ये एकवचन, द्विवचन आणि बहुवचन असे तीन प्रकार आहेत. मराठी आणि गुजराथी भाषेत पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग अशी व्यवस्था आहे; तर हिंदीत पुल्लिंग आणि स्त्रीलिंग अशी दोनच लिंगे आहेत. याचे निश्चित उत्तर देता येत नाही. फक्त भाषिकांनी असे संकेत स्वीकारले आहेत, एवढेच देता येते किंवा व्याकरणकारांनी

एखादा नियम प्रस्थापित केला तर तो टिकतोच असे नाही. उदा. दगड, बैल यासारख्या अकारान्त पुल्लिंगी शब्दांची अनेक वचनी रूपे दगड, बैल अशीच होतात असे व्याकरणकार सांगतात. पण प्रत्यक्षात अनेक लोक दगडं, बैलं अशी अनेकवचनी रूपे वापरतात. त्यामुळे भाषाभ्यासाला पुष्कळ मर्यादा पडतात म्हणून या अभ्यासात सर्व पद्धती एकमेकींना पोषक आहेत, या अभ्यासात सर्वांची मदत घ्यावी लागते.

## ३.४ समारोप

भाषेला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. केवळ ध्वनींचे उच्चारण म्हणजे भाषा नाही तर त्या ध्वनींच्या साहाय्याने शब्द बनविणे, त्याचा अर्थ व्यवस्थित व्यक्त होतो की नाही हे पहाणे इ. गोष्टींचा उचित मेळ निर्माण झाल्याशिवाय भाषा आकाराला येऊ शकत नाही. भाषाभ्यासात समाजमनाचा विचार महत्त्वाचा आहे. मानव भाषेचा उपयोग फार प्राचीन काळापासून करीत आहे. त्याचप्रमाणे भाषेचा अभ्यासही अनेक शतकांपासून होत आहे. एखादी भाषा मोठ्या जनसमूहाकडून बोलली जात असेल तर तिची दखल घेण्याचे काम भाषाभ्यासकांचे असते.

भाषा जितकी जुनी असेल तितके त्या भाषेचे अभ्यास क्षेत्र व्यापक असल्याचे दिसून येते. पूर्वी भाषेच्या अभ्यासाला धार्मिकतेचे स्वरूप होते. हा दृष्टिकोण जसजसा बदलत गेला तसे भाषेच्या अभ्यासाचे क्षेत्र अनेक अंगांनी विस्तारलेले दिसते. भाषेबद्दलचे दृष्टिकोण चिरंतन स्वरूपाचे नसतात. म्हणून भाषेच्या अभ्यासाच्या अनेक शाखा उदयाला आलेल्या दिसून येतात. यात ऐतिहासिक तुलनात्मक व वर्णनात्मक या पद्धती महत्त्वाच्या आहेत.

१८व्या शतकात पाश्चात्त्य भाषाभ्यासाला एक नवी दिशा प्राप्त झाली ती विल्यम जोन्स यांनी केलेल्या भाषेच्या अभ्यासामुळेच होय. संस्कृत, ग्रीक व लॅटीन या भाषात जे साम्य आढळते ते इतके खोलवर रूजलेले आहे की या भाषा कोणत्या तरी एका भाषेपासून उद्भवल्या असल्या पाहिजेत असे मानावे लागते. या विधानातूनच ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचा पाया घालण्याचे काम केल्याचे दिसून येते. यात दोन कालखंडातील किंवा त्यापेक्षा जास्त कालखंडातील भाषेच्या स्वरूपात काय बदल झाले याचा अभ्यास होतो. यात स्वन, शब्द, अर्थ व व्याकरणिक रूपे यांच्यातील बदलांचा अभ्यास केला जातो. भाषेच्या भूतकालीन अवस्थेवर प्रकाश टाकण्याचे काम तौलनिक भाषाभ्यास करतो. यातील सादृश्य योगायोगावर आधारलेले नसते. एकाच भाषेच्या निरनिराळ्या कालखंडातील स्वरूपे व भिन्न भाषांची स्वरूपे ह्यांची तुलना या भाषाभ्यासात केली जाते. तसेच कोणत्याही भाषिक स्वरूपाचा अभ्यास वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीत केला जातो. सर्व अभ्यास पद्धतीच्या मुळाशी असणारी ही पायाभूत अभ्यास पद्धती आहे. यात भाषेची पूर्वोत्तर अवस्था लक्षात घ्यावयाची नसते तर विशिष्ट भाषेचे विशिष्ट काळातील वर्णन देणे एवढाच हेतू असतो.

भाषाभ्यासाच्या ह्या पद्धती एकमेकांना परस्परपूरक आहेत. भाषाविज्ञान हे समाजशास्त्रीय अभ्यासाचे एक क्षेत्र आहे. समाजशास्त्रात प्रयोग करता येतात पण त्यात शंभर टक्के वस्तुनिष्ठता असत नाही. म्हणजेच भाषेत सार्वकालिक नियमव्यवस्था नाही. त्यामुळे भाषाभ्यासाला पुष्कळ मर्यादा पडतात म्हणूनच या अभ्यासात सर्व पद्धतींची मदत घ्यावी लागते.

## ३.५ प्रश्नोत्तरे

**वस्तुनिष्ठ प्रश्न**

**योग्य पर्याय निवडा.**

१. भारतात संस्कृत भाषेला कोणत्या नावाने ओळखले जाते ?

( देवभाषा / मूळभाषा / वैदिकभाषा )

२. भाषाभ्यासाची सुरूवात कोठे झाली ?

( अमेरिका / ग्रीक / रशिया )

३. ऐतिहासिक भाषाभ्यासाचा पाया घालण्याचे काम कोणी केले ?

( सोस्यूर / सर विल्यम जोन्स / जॉर्ज ग्रिअर्सन )

४. एका कालखंडातील भाषिक स्वरूपाचा अभ्यास कोणत्या पद्धतीत केला जातो ?

( वर्णनात्मक / तुलनात्मक / संख्याशास्त्रीय )

**उत्तर :** १. देवभाषा २. ग्रीक ३. सर विल्यम जोन्स ४. वर्णनात्मक

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. 'फिलॉलजी' हा शब्द कोणत्या भाषेपासून आला ?

२. पाणिनीने लिहिलेल्या ग्रंथाचे नाव काय आहे ?

३. भाषेचा अभ्यास करणाऱ्या शाखेस काय म्हणतात?

४. वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती म्हणजे काय ?

**उत्तरे:** १. 'फिलॉलजी' हा शब्द फ्रेंच भाषेतून आलेला आहे.

२. पाणिनीने लिहिलेल्या ग्रंथाचे नाव 'अष्टाध्यायी' असे आहे.

३. भाषेचा अभ्यास करणाऱ्या शाखेस 'भाषाविज्ञान' असे म्हणतात.

४. कोणत्याही एखाद्या विशिष्ट कालखंडातील भाषेचा वस्तुनिष्ठ पध्दतीने अभ्यास करणे म्हणजे वर्णनात्मक भाषाभ्यास होय.

## ३.६ सरावासाठी प्रश्न

### दीर्घोत्तरी प्रश्न

१. भाषाविज्ञान म्हणजे काय ते सांगून भाषाभ्यासाच्या वर्णनात्मक पद्धतीचे स्वरूप व विशेष सविस्तर स्पष्ट करा.

२. भाषाभ्यासाच्या विविध पद्धती स्पष्ट करून त्या एकमेकींना कशा पूरक आहेत ते स्पष्ट करा.

३. भाषाभ्यास म्हणजे काय ते सांगून ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे विशेष लिहा.

### लघुत्तरी प्रश्न

१. वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीचे स्वरूप व मर्यादा स्पष्ट करा.

२. भाषाभ्यासाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. तौलनिक भाषाभ्यासाचे स्वरूप स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचन

१. मराठी भाषा: उद्गम आणि विकास : कृ. पां. कुलकर्णी

२. भाषाविज्ञान आणि मराठी भाषा : डॉ. अनिल गवळी

३. भाषाविज्ञान: वर्णनात्मक आणि ऐतिहासिक : संपा स. ग. मालशे, अंजली सोमण

४. मराठीचा भाषिक अभ्यास : मु. श्री. कानडे

५. सुलभ भाषाविज्ञान : द. दि. पुंडे

❑❑❑

## सत्र १ : घटक ४

### (विभाग ४ Module IV)

# भाषिक परिवर्तन

**(४.१ ध्वनिपरिवर्तन : ध्वनिपरिवर्तनाची कारणे व प्रकार)**

**(४.२ अर्थपरिवर्तन : अर्थपरिवर्तनाची कारणे व प्रकार)**

## ४.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचे अध्ययन केल्यानंतर तुम्हाला;

- ध्वनी व अर्थपरिवर्तनाचे स्वरूप समजावून घेता येईल.
- ध्वनी व अर्थ या संज्ञेबद्दलच्या विविध संकल्पना समजावून घेता येतील.
- ध्वनी व अर्थपरिवर्तनाची कारणे माहिती करून घेता येतील.
- ध्वनी व अर्थपरिवर्तनाचे प्रकार समजावून घेता येतील.
- मराठी भाषेतील ध्वनिपरिवर्तनाची प्रक्रिया समजेल.
- मराठी भाषेतील अर्थपरिवर्तनाची प्रक्रिया समजेल.

## ४.२ प्रास्ताविक

भाषा ही एक समाजव्यवहार साधणारी सामाजिक संस्था आहे. समाजसंस्था जशी गतिशील असते त्याचप्रमाणे समाजसंस्था असणाऱ्या भाषेला अपरिहार्यपणे गतिशीलता प्राप्त झालेली असते. विशिष्ट स्वनव्यवस्थेचा उपयोग भाषा करीत असल्याने ती सुनिश्चित आणि सुसंवादी असते. असे असूनही आज जी भाषा आपणाला समजते ती भाषा उद्या समजेलच असे नाही. भाषेचे काही काळापूर्वीचे अथवा जुने रूप तर बरेच वेळा आपणाला उलगडता येत नाही. भाषेचे हे परिवर्तन अतिशय मंद गतीने होत असते. भाषिकांच्या ते लक्षात येत नाही. याकरिताच 'जिवंत' भाषेच्या अस्तित्वात तिची परिवर्तनशीलता गृहीत धरलेली असते. भाषिक परिवर्तन लक्षात न घेण्याचे अथवा भाषेचे जुने रूप न उलगडण्याचे कारण म्हणजे भाषेतील स्वन एकसारखे बदलत असतात. ते कधीही स्थिर नसतात. ज्या स्वनांचा उपयोग करून आपण एखादी कल्पना सूचित करतो, त्यातला उच्चार हळूहळू बदलतो. नवीन स्वन उच्चारात येतात. सप्त या शब्दाचा स्वनसमुच्चय बदलत जाऊन त्याचे सत्त हे रूप निर्माण होते. ही प्रक्रिया सुरूच असते. कालांतराने त्याचे पुन्हा सात असे उच्चारण होते. अर्थात ही प्रक्रियाही एका विशिष्ट काळात व स्थळात घडत असते. संस्कृत दीपक हा उच्चार मराठीत दिवा असा झाला. दीपकचा दिवा होईपर्यंतचा काळ आणि मराठी भाषेची भौगोलिकता हे स्थळ या

दोन गोष्टी परिवर्तनाच्या संदर्भात महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे या काळानंतर मराठीत आलेला सापळा हा शब्द सावळा हाईल असे अनुमान करता येणार नाही.

भाषा ही केवळ स्वनिमांचीच संघटना असते असे म्हणून चालणार नाही, तर ज्याला निश्चित अर्थवत्ता आहे, अशा प्रकारच्या स्वनिमांची ती संरचना असते. भाषेच्या या अर्थवाहकतेमुळे भाषिक एकमेकांच्या विचारांची, भावनांची देवघेव करू शकतात. स्वरयंत्रामुळे आपणास अनेक ध्वनी निर्माण करता येतात, मात्र ते सगळेच ध्वनी आपण भाषा म्हणून स्वीकारत नाही. सार्थ असलेले ध्वनी आपण स्वीकारतो. 'लमक' हे मराठी भाषिक समाजाने मान्य केलेले मराठी भाषेतील स्वनिम असले तरी त्यांची 'कमल' अशा क्रमाने संरचना केली तरच त्यास अर्थ प्राप्त होतो. त्याची 'मकल' अशी संरचनाही अर्थहीन आहे. अर्थात त्या त्या भाषिक समाजाने मान्य केलेली व अक्षरांची विशिष्ट क्रमाने केलेली रचनाच सार्थ असते. सृष्टीच्या उत्पत्तीच्या क्रमाने पाहता वस्तू अगोदर, नंतर नामकरण म्हणजे अर्थ अगोदर व शब्द नंतर असा क्रम दिसतो. बोलणारा याच क्रमाने बोलतो. ऐकणारा मात्र शब्द अगोदर व अर्थ नंतर असा क्रम ठेवतो. त्यामुळे शब्दाला अर्थ कसा प्राप्त झाला, यापेक्षा वस्तूचा अन्वयर्थक शब्द कसा निर्माण झाला हे महत्त्वाचे आहे. शब्दांच्या द्वारा जी वास्तविक अथवा काल्पनिक प्रतीती येते तीस अर्थ म्हणावयास हरकत नाही. ही प्रतीती कधी आत्मप्रत्ययाद्वारे येते तर कधी परप्रत्ययाद्वारे येते. चीनची भिंत, नायगारा धबधबा या गोष्टी आपण पाहिल्या नसल्या तरी त्याची प्रतीती वर्णनातून म्हणजे परप्रत्ययाद्वारे येऊ शकते. नाक, डोळे, जीभ, कान यांची प्रतीती ही आत्मप्रत्ययाची असते. ही प्रक्रियासुद्धा बोलणारा व ऐकणारा यांच्यात सुलट-उलट क्रमाने घडते. बोलणाऱ्याचा भाषिक व्यवहार हा वस्तू → संकेत वा कल्पना → प्रतीक अथवा चिन्हात्मक शब्द असतो. तर ऐकणाऱ्याचा भाषिक व्यवहार अगदी उलट म्हणजे, प्रतीक अथवा चिन्हात्मक शब्द → संकेत वा कल्पना → वस्तू असा असतो. एंकदरीत अर्थबोधाच्या या क्रियेत संकेतांना फार महत्त्व असते. हा व्यवहार मानवाच्या सांस्कृतिक ठेव्यातून साधला जातो.

## ४.३ विषय विवेचन

काही वेळेला पुणे-मुंबई शहरातील एखादा अव्वल दर्जाचा मराठी भाषिक वक्ता आणि दूर खेड्यातील अशिक्षित वृद्ध स्त्री यांच्या मराठी भाषेच्या उच्चारणात लक्षात येईल इतका फरक पडलेला असतो. भाषेच्या बाबतीत 'व्यक्ती तितक्या प्रकृती' हे विधान सत्य ठरते. एका विशिष्ट काळी, एका विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या एका विशिष्ट समाजाच्या भाषेतील स्वन अथवा ध्वनी कालांतराने बदलतात यालाच ध्वनिपरिवर्तन अथवा स्वनपरिवर्तन असे म्हणतात.

Phonetic laws are regular, they have no exceptions असे एक विधान लेनर्ड ब्लूमफील्ड याने आपल्या Language या ग्रंथात केलेले आहे. भाषेच्या इतिहासात जी ध्वनिपरिवर्तने घडून येतात ती नियमानुसार असतात, त्यांना अपवाद नसतात; हा त्याचा अर्थ आहे. मात्र भाषिकाची सुलभीकरणाची प्रवृत्ती पाहता तसेच त्यांनी केलेले नियमोल्लंघन पाहता अपवाद असतात असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. लेनर्ड ब्लूमफील्डचे हे विधान १९३३ चे आहे. शाळा हा एकच शब्द

शा ळा (प्रत्येक अक्षरावर जोर देऊन), श्याळा (श्या या उच्चारावर अधिक जोर), साऽळा (शा चा उच्चार सा आणि लांबवलेला), श ऽ ळा (शा चा उच्चार श आणि उच्चार लांबवलेला) असा व्यक्तिगणिक बदलत जाईल. गार, घार, दार, धार, कांब, खांब, काना, खाना, काक, खाक, काप, खाप, साप, मैना, म्हैना, ताना, तान्हा, कान, खान, कान्हा असे साम्य असणारे शब्द म्हणजे आपण शब्दातील ध्वनीवर दिलेल्या आघातामुळे बदलणारे शब्द आहेत असे लक्षात येईल. त्यामुळे स्वन व ध्वनी यातील नेमकी कोणती संज्ञा महत्त्वाची आहे, या बाबत गोंधळ होऊ शकेल. स्वन हा घटक भाषेच्या संरचनेतील पुन्हा विघटन न होणारा अंतिम ध्वनी असतो. त्यामुळे ध्वनीचे सूक्ष्मतम विश्लेषण स्वन देऊ शकतो. अर्थातच उच्चारप्रक्रियेच्या कारणांमध्ये आणि प्रकारांमध्ये काही वेळा स्वन तर काही वेळा ध्वनी यांच्या बाजूने विभागणी करावी लागेल.

मराठी भाषेत भाषाविज्ञानावर मूलगामी, विचारप्रवर्तक लेखन करणारे डॉ. ना. गो. कालेलकर यांच्या 'ध्वनिविचार' (प्रथमावृत्ती १९५५) या पुस्तकात अनपेक्षित ध्वनिपरिवर्तन ही संकल्पना मांडली आहे. ध्वनिविचारावरील मराठीतील महत्त्वाचे पहिले पुस्तक म्हणून डॉ. ना. गो. कालेलकरांच्या या पुस्तकाचा उल्लेख करावयास हवा. मात्र मराठीमध्ये यावेळी ध्वनी या शब्दासाठी स्वन ही संज्ञा रूढ झाली नव्हती. डॉ. ना. गो. कालेलकर यांनी मांडलेला विचार थोडक्यात असा की, भाषेतील ध्वनिपरिवर्तन हे सामान्यपणे निश्चित दिशेने व नियमित स्वरूपात होत असते. नवीन स्वनिक रूपामागे ध्वनिविषयक काही तत्त्वे, नियम असतात मात्र कधी कधी भाषेच्या ध्वनिपरिवर्तनाच्या प्रक्रियेत अनियमित वाटणारी रूपेदेखील निष्पन्न होताना आढळतात. असे ध्वनिपरिवर्तन अपेक्षित नसल्यामुळे त्यास 'अनपेक्षित ध्वनिपरिवर्तन' असे म्हटले जाते. उदाहरणार्थ, संस्कृत भाषेतील 'श्वशुर' हा शब्द ध्वनिपरिवर्तनाच्या नियमाप्रमाणे मराठीत येत असताना खरे तर ते श्वशुर > ससुरा > ससरा असे ध्वनिपरिवर्तन व्हावयास हवे होते. मराठीत 'ससरा' हा शब्द रूढ व्हावयास हवा होता. परंतु त्याऐवजी 'सासरा' हा शब्द रूढ झाला. त्याचप्रमाणे पितामह-प्रपितामह या नियमाने आर्य या शब्दाला प्र हा उपसर्ग लागून प्रार्य या रूपाचे ध्वनिपरिवर्तन मराठीत पज्ज > पाजा असे व्हावयास हवे. पण ते 'पणजा' असे अनपेक्षित रूपात येते. कारण आर्य > अज्ज > आजा हा नियम 'पणजा' या शब्दांत नाही. येथे समतोलपणाचे तत्त्व अथवा नियम पाळला जात नाही. गुजराथी भाषेत 'ससरा' हे रूप न येता तेथे 'ससरो' हे रूप येते. या सर्व ठिकाणी ध्वनिपरिवर्तनाच्या नियमानुसार ध्वनिपरिवर्तन निष्पन्न झाले नसल्याने ते अनपेक्षित ठरते. अशा प्रकारच्या ध्वनिपरिवर्तनाची कारणे भाषिक समाजाच्या बौद्धिक व मानसिक घडणीत असतात, असे डॉ. ना. गो. कालेलकर म्हणतात.

**ध्वनिपरिवर्तन : प्रमुख कारणे**

भाषिक परिवर्तनाची कारणमीमांसा करण्याचा प्रथम प्रयत्न जे. एच. ब्रेड्सडोर्फ या डॅनिश भाषावैज्ञानिकाने इ. स. १८२१ मध्ये केला आहे. परिवर्तनाच्या मुळाशी शारीरिक आणि मानसिक अशी आठ कारणे त्याने प्रतिपादली आहेत.

१. श्रवण आणि आकलन यामध्ये घडणारी चूक

२. विस्मृती

३. वागिंद्रियातील दोष

४. आळस वा स्तुती

५. सदृश्यतेकडील प्रवृत्ती

६. आपण इतरांहून वेगळे आहोत हे दर्शविण्याची इच्छा

७. नवीन कल्पना व्यक्त करण्याची आवश्यकता

८. परभाषा वा परसमाज यांचा प्रभाव

यातील आठ क्रमांकाचे कारण वगळता भाषेतील नव्वद टक्के परिवर्तन आळसामुळे वा भाषिकाच्या सुलभतेकडील प्रवृत्तीमुळे होत असते. आपण प्रमुख कारणांचा आढावा घेऊ.

**वर्गसिद्धांत**

प्रारंभी लॅटिनचे विदग्ध वा नागर लॅटिन असे दोन प्रभेद होते. विदग्ध भाषा ही समाजातील उच्च वर्गाची बोली होती, तर खेडवळ ही दुय्यम दर्जाची बोली होती. उच्च वर्गाच्या बोली ह्या कमी परिवर्तनशील असतात तर निम्नस्तरावरील वर्गाच्या बोली परिवर्तनशील असतात. या सिद्धांताचा प्रत्ययच आपणास संस्कृत व प्राकृत भाषांच्या संदर्भात येतो. तसेच शहरी व ग्रामीण मराठी भाषा या अर्थाने प्रमाण भाषा व प्रादेशिक बोलीभाषा या स्वरूपात विखुरली गेली आहे. आपण शहरी व्यक्ती म्हणून सूत्र, यंत्रमंत्र, शुक्रवार असा प्रमाण उल्लेख करू मात्र खेड्यातील व्यक्ती सुतर, जंतरमंतर, शुक्कुरवार असा प्रादेशिक बोलीत उल्लेख करतील. वर्ग सिद्धांताने भाषिक परिवर्तनाची फलश्रुती स्पष्ट होत असली तरी त्यामागील प्रेरणा किंवा प्रक्रिया यावर फारसा प्रकाश पडत नाही, असे दिसते.

**जित–जेते संबंध**

परकीय आक्रमणातील जित लोक जेत्यांची भाषा तर जेते लोक जितांची भाषा शिकू पाहतात. जेते जेव्हा जितांची भाषा शिकू लागतात, तेव्हा आपल्या भाषेतील काही वैशिष्ट्ये जितांच्या भाषांत संक्रमित करतात. अशा भाषिक परिणामास 'उच्चस्तर प्रभाव' अथवा 'उच्चतर सिद्धांत' अशी संज्ञा आहे. इंग्रजी राज्याचा भारतात अंमल बसल्यावर येथे सनदी नोकर निर्माण करण्यासाठी इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शाळा निघाल्या. त्यामुळे भाषासंकरातून स्वनपरिवर्तन घडत गेले. फादर स्टीफनने Puspa Muzea Puspa Mogare अशी उच्चारसरणी मराठी तर अक्षरे इंग्रजी असणारे 'ख्रिस्तपुराण' लिहिले. या प्रकाराचा प्रभाव भारतीय ग्रामनामांमध्ये अधिक आढळतो. उदाहरणार्थ; मुंबई > बॉम्बे, पणजी > पंजीम, वेरूळ > एलोरा, बडोदरा > बरोडा, पुणे > पूना, मथुरा > मटुरा, बेळगाव > बेलगाम्, पंचगणी > पाचगणी. बंगाली आडनावातील ठाकुर > टागोर, चाटुर्ज्या > चटर्जी हे परिवर्तनही याच प्रकारचे आहे.

**भिन्न भाषिक संबंध**

अनेक कारणांमुळे एका भाषिक समाजाचा संबंध दुसऱ्या भाषिक समाजाशी येतो. व्यापार, प्रवास वगैरे निमित्ताने हे दोन भाषिक समाज परस्परांशी भाषिक व्यवहार करतात. या दोहोंच्या भाषांवर एकमेकांच्या भाषांचा संस्कार व परिणाम होत असतो. तसेच भौगोलिकदृष्ट्या निकटवर्ती असलेल्या भाषा अगर बोली यांचाही परस्परांवर परिणाम होतो. याला 'अधिस्तर प्रभाव' अथवा 'अधिस्तर सिद्धांत' म्हणून ओळखले जाते. हा प्रभाव काही शब्दांच्या आदानप्रदानाइतकाच मर्यादित राहतो. द्राविड भाषेच्या संपर्काने मराठीने अण्णा, अप्पा, चिरगूट, गोंधळ, इडली, उपमा इत्यादी शेकडो शब्द आदान केले. गुजराथीमधून मराठीने तकली, चोपडी, गरबा, खेडूत, अगाशी (गच्ची), दादर (जिना) इत्यादी शब्द आपलेसे केले. वसई, दादर येथील भाषिकांना पोर्तुगीजांनी पाव, बिस्कुट, साबण, तंबाकू, अननस, पगार, घमेले, टिकाव इत्यादी शब्दांची भेट दिली. खिचडी, जिलेबी, कचोरी, परोठा यासारखे खाद्यवाचक शब्द हिंदीच्या सहवासाने मराठीत स्थिर झाले. उच्चस्तर, अधिस्तर प्रभावाचे चित्र स्पष्ट असले तरी भाषेतून काही शब्द नाहीसे होतात व काही शब्द प्रचारात राहतात, असे का व्हावे याचे गूढ अद्याप तसेच आहे. या सिद्धांतांनी भाषेच्या संरचनेतील परिवर्तनावर फारसा प्रकाश पडत नाही.

**आळस**

ऐदी समाजात आळसाची प्रवृत्ती अधिक असल्याने उच्चारणात ढिलाई होते. विलासी लोकांच्या जीवनात स्वास्थ्य अधिक असल्याने साहित्य, संगीत आदी कलांची आवड जोपासली जाऊन अर्थाधिष्ठित परिवर्तन झाले असावे. आळसामुळे त्याचप्रमाणे कष्टकरी माणसांच्या उच्चार सुलभतेच्या प्रवृत्तीमुळे स्वनलोप, शब्दलोप, स्वनविपर्यय, समानस्वनलोप यासारख्या परिवर्तनाच्या प्रक्रिया घडत असाव्यात. प्रयत्नलाघव अथवा प्रयत्नात कसूर केल्यामुळे उच्चारणात फरक पडतो. कृष्ण या शब्दाची कन्हैया, कान्हा, किशन, क्रिष्ण ही रूपे याच प्रवृत्तीतून येतात. भाषेतील नव्वद टक्के परिवर्तन आळसामुळे घडते, असे ब्रेड्सडोर्फ याने म्हटलेले आहे. उदाहरणार्थ, भक्त > भगत, know > नो, Talk > टॉक, Knife > नाइफ, ग्रहण > गिराण, गुरुवार > भिस्तरवार, हॉस्पिटल > इस्पितळ. आळसावलेल्या प्रवृत्तीने श्रम व वेळ वाचविण्यापोटी, उच्चारसुलभतेच्या हव्यासापोटी घडलेल्या परिवर्तनाची उदाहरणे पुढीलप्रमाणे सांगता येतील. रेल्वेट्रेन > रेल्वे अथवा ट्रेन, पोस्टकार्ड > कार्ड, एरोप्लेन > प्लेन, चतुर्वेदी > चौबे, द्विवेदी > दुबे, कमलाकांत > कमल किंवा कांता, रमाकांत > रमा, न्यूजपेपर > पेपर, वसुंधरा > वसु, आदित्यवार > ऐतवार ही उदाहरणे सुलभीकरणाची आहेत.

**अनुकरणाची अपूर्णता**

आळस, प्रयत्नलाघव, उच्चारसुकरता, वैचित्र्याची आवड तसेच अनुकरणाची अपूर्णता ही कारणे मानसिक प्रवृत्तीवर आधारलेल्या स्वनपरिवर्तनाची आहेत. प्रत्येकाची उच्चार करण्याची लकब

भिन्न असते. दुसऱ्याचे अनुकरण करण्यामुळे, नक्कल करण्याच्या प्रवृत्तीमुळे उच्चारात फरक पडतो. दरवेळेला अनुकरण वा नक्कल साधतेच असे नाही. कठीण गोष्ट सोपी करणे हा मनुष्यस्वभाव आहे; त्यामुळे मनुष्य उच्चारसौकर्याकडेही लक्ष देणे स्वाभाविक आहे. संयुक्त व्यंजने, संयुक्त स्वर यांच्या उच्चारणाला परिश्रमाची आवश्यकता असते. त्यामुळे अनुकरण करताना लहान मुले अथवा मोठी माणसेही त्यात अपूर्णता आणतात. शब्दाचे व भाषेचे बिनचूक श्रवण केले असेल तरच अनुकरण पूर्णत्वास पोचते, नाही तर ते पुढील उदाहरणाप्रमाणे अपूर्ण ठरते. रामपरसाद, वागीण (वॅगन), हाइस्कूल, मास्तर, वंगाळ (अमंगल), धरम, बिस्कूट, जाज (जहाज), आशा (अशा), व्यक्तीमहत्व (व्यक्तिमत्त्व).

**आनुवंशिक गुण**

ज्या लोकांची मुखरचना आपल्यापेक्षा ठळकपणे भिन्न असते त्यांच्या उच्चारात काही फरक येणे क्रमप्राप्त आहे. काही वंशातील लोकांची जीभ जाड व बोथट असते. काहींच्या टाळूचा वरचा भाग कमी अधिक प्रमाणात खोल असतो. काही लोक नरमाईने व अस्पष्टपणे बोलतात; तर काही ठासून उच्चार करतात. एकच परकीय भाषा दोन भिन्न मानववंशाच्या भाषिकांनी स्वीकारली आणि त्यांच्या मुखरचनेत भेद असले तर तेथे निश्चित भिन्न-भिन्न उच्चार होतात. वंश, वर्ण, जाती, धर्म यावर आधारलेले सामाजिक गट कधीच स्थिर नसतात. परस्पर संकराने त्यांच्यात नेहमी आनुवंशिक शरीरवैशिष्ट्ये बदलत असतात. साहजिकच आनुवंशिकता, लिंग, वय, विकृती या शारीरिक प्रवृत्तीनेही स्वनपरिवर्तन होते. अर्थातच उच्चार निर्माण करणाऱ्या स्वरयंत्राला (ओठ, दात, जीभ पडजीभ, टाळू, घसा, श्वासनलिका इत्यादी) अतिशय महत्त्व असते. विशिष्ट वंशाच्या लोकांना दुसऱ्या भिन्न वंशाची प्रथमभाषा (मातृभाषा) जशीच्या तशी उच्चारता येईलच, असे नाही. फ्रेंच भाषिकांना मराठी भाषा जशीच्या तशी उच्चारता येणार नाही. भारतवर्षातील मूळचे आर्य नसलेले रहिवाशी व नंतर आलेले संस्कृत भाषिक आर्य लोक यांचा संकर आणि त्यातून निष्पन्न झालेला भाषिक व्यवहार आपणास संस्कृत > प्राकृत > अपभ्रंश असा क्रमाने बदललेला दिसतो. अर्थात भिन्न शरीरवैशिष्ट्ये असूनही जगातील भाषांच्या स्वनपरिवर्तनात काही समान प्रक्रिया कार्यरत असतातच, असे का असावे? याचे उत्तर या कारणाद्वारे मिळत नाही. कारण महाराष्ट्रीय आणि गुजराथी भाषिक एकमेकांच्या संगतीत आल्यावर एकमेकांची भाषा सफाईने बोलू शकतात.

**वागिंद्रियातील दोष**

काही वेळेला जन्मतः, अपघाताने, विशिष्ट सवयीने वागिंद्रियात फरक पडतो. जन्मतःच जीभ किंवा पडजीभ नसणे, जीभेची वाढ नीट झालेली नसणे, आजारपणामुळे जीभेवरून वारे जाणे, अपघातात समोरचे दात पडणे, पानतंबाखू व विशिष्ट प्रकारचे अन्न सतत सेवन केल्याने जीभ जड होणे इत्यादी कारणामुळे उच्चार अनेकदा बदलतात. त्यामुळे एकाच भाषिक समाजातील लोकांना /प्/, /फ्/ आणि /ब्/, /भ्/ तसेच त्/ व /थ्/, /स्/ व /श्/ अशा उच्चारातील फरक नीट बोलून दाखविता येत नाहीत. पभाकर, पल्हाद, शोमवार, शहामाही, शुरू, पिसवी असे उच्चार अनेकदा

होतात. नाकात दागिने घातल्याने, सर्दी-पडसे झाल्यास, घसा बसल्यास उच्चारात फरक पडतो. याओ जातीच्या बायका ओठाआड जाड लाकडाचा तुकडा ठेवीत असल्याने त्यांच्या बोलण्यात /फ्/ चा लोप जाणवतो. हिरोशिमा, भोपाळ अथवा गुजराथ भूकंपासारख्या दुर्घटनांच्यामुळेही अशा प्रकारची सदोषता संपूर्ण भाषिक समाजात येऊ शकते.

**श्रवणेंद्रियातील दोष**

भाषेचा उच्चार करताना कानाने श्रवण करून प्राप्त झालेला उच्चार भाषिक करीत असतो. अपघात, आजार अथवा जन्मतः एखाद्या भाषिकाच्या कानामध्ये ऐकण्याच्या बाबत सदोषता निर्माण होते. सदोषपणे असा भाषिक भाषेतील उच्चार ऐकतो आणि त्याच पद्धतीने त्याचे उच्चार करीत असतो. ऐकलेल्या उच्चाराप्रमाणेच भाषा कमवून तो तिचे उच्चार करीत असतो. इंग्रजी ही प्रथमभाषा नसलेल्या गुजराथी भाषिकाच्या कर्णेंद्रियातील सदोषतेमुळे Sure सारख्या इंग्रजी शब्दाचा उच्चार सुव्वर असा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे परकीय भाषा अशा कर्णेंद्रियातील सदोषतेने ऐकून उच्चारल्यास त्यात परिवर्तन घडते.

**उच्चारशीघ्रता**

अनेक वेळा घाईच्या प्रसंगी, गडबड-गोंधळलेल्या मन:स्थितीत किंवा भावनेच्या भरात आपण शब्दाचा उच्चार शीघ्रतेने करतो. त्यामुळे त्या शब्दांतील एखादा स्वनिम त्याच्याही नकळत उच्चारावयाचा राहून जातो. उदाहरणार्थ; महाराज > म्हाराज. विशेषत: औषध विक्रेते, वृत्तपत्र विक्रेते, भटजी, लहान मूल, बसस्टेशनवरील उद्घोषक यांच्या भाषिक उच्चारणात अशी शीघ्रता असते. मासे विकणाऱ्या कोळिणी, चार पैसे अधिक मिळावे म्हणून हुज्जत घालणारे हमाल, लग्नघटकेची वेळ सांभाळण्याचा प्रयत्न करणारा पुरोहित, बस कंडेक्टर इत्यादी व्यवसाय करणारे भाषिक अतिशय घाईत असतात. त्यामुळे अशा व्यवसायानुसारही त्या त्या भाषिकांकडून नकळत काही शब्दोच्चारांची सरमिसळ होऊन त्यांचे उच्चार भिन्न होतात.

**लोकभ्रम**

सांस्कृतिक-सामाजिक दृष्टीने भाषिकाच्या बुद्धीला न पटणाऱ्या काही कल्पना, समज असतात. त्यांना तडा जाईल अशा प्रकारचे उच्चार न करण्याची भाषिकांच्या समूहमनाची इच्छा असते. त्यामुळे भाषिक समूह अशा शब्दाच्या मूळ उच्चारात फरक करतात. त्यातून देखील स्वनपरिवर्तन घडत असते. उदाहरणार्थ; गोबीचे कोबी असे परिवर्तन गोबीतील 'गो' शब्द देवतादर्शक, गायदर्शक आहे म्हणून घडले.

**अज्ञान**

भाषिकांपैकी बहुसंख्य वर्ग अशिक्षित असतो. अनुकरणातून प्राप्त झालेल्या त्याच्या प्रथम भाषेबद्दल त्याला प्रशिक्षण दिलेले नसते. तो अज्ञानी असतो. केवळ अज्ञानामुळे काही शब्दांचे

उच्चार मुळात आहेत तसे त्याला चोखपणे उच्चारता येत नाहीत. त्यामुळे शब्दांतील काही उच्चाराचे-स्वनांचे त्याच्याकडून परिवर्तन होते. उदाहरणार्थ; धर्म > धम्म, कर्म > काम, हस्त > हात, कर्ण > कान

**सादृश्यता**

भाषिकाला भाषा प्राप्त झाली की, त्या भाषेचे शिक्षण घेण्यापूर्वी किंवा शिक्षण मिळाल्यावर चुकून अनवधानाने तो एखाद्या शब्दाचा उच्चार, त्याला ज्ञात असलेल्या दुसऱ्या शब्दांप्रमाणे करतो. त्यातून भाषिक परिवर्तन घडत जाते. उदाहरणार्थ; गाई > गाया हे रूप बाई > बाया याप्रमाणे बनलेले आहे.

**भावुकता**

अनेकदा तीव्र भावनेच्या भरामध्ये उत्कटतेने बोलताना, विशेषतः खाजगी नात्यागोत्यामध्ये काही शब्दांचे उच्चार मुळातील उच्चारापेक्षा भाषिक वेगळे करीत असतो. त्यामुळे असे स्वनपरिवर्तन संभवते. उदाहरणार्थ; सोना > सोन्या > शोन्या > शोनुल्या, लबाड > लब्बाड इत्यादी. इश्श्य, इश्श, अय्या हे प्रकार त्यातीलच !

**उच्चारसौकर्य**

भाषेकडे परिवर्तनाचे तत्त्व असते, तर भाषिकाकडे सुलभीकरणाचे तत्त्व असते. परिपूर्ण उच्चार करण्याची माणसाची स्वाभाविक प्रवृत्ती नाही. कधी कधी त्याला तितकासा वेळही नसतो. भाषेकडे तो केवळ साधन म्हणून पाहत असतो. कमीत कमी श्रम व वेळ घेऊन शब्दांचा उच्चार करून आपले काम साधण्याचा तो प्रयत्न करतो. मरणसापेक्षतेमुळे त्यांच्या जगण्याला गतिमानता आलेली असते. मनःस्थिती, व्यवसाय, कार्य, अनुकरण यामुळे तो घाईगर्दीत असतो. त्यामुळे तो भाषेचा वापर अजाणतेपणी करतो. या त्याच्या उच्चारसौकर्याच्या गुणामुळे अनेक शब्दाचे मूळ उच्चार त्याच्याही नकळत बदलत जातात. भाषेच्या स्वनपरिवर्तनाच्या बाबत उच्चारकसौकर्य किंवा उच्चाराचे सुलभीकरण हे कारण अतिशय महत्त्वाचे, केंद्रवर्ती ठरते. नेफा, नॅक, एड्स, नाटो, आय. टी. आय., एस. टी. या सारखी संक्षिप्त रूपे उच्चारसौकर्यांतूनच येतात. त्याचबरोबर बरवे > बर्वे, खुरपे > खुर्पे, वारकरी > वार्करी, व्याकरण > व्याक्रण, भरती > भर्ती, वापरून > वाप्रून, उष्टा > उशिटा, भ्रातृ > भाऊ, भाई इत्यादी शब्द असेच आहेत.

**आघात**

भाषा वाक्यांची बनलेली असते. वाक्य शब्दांचे आणि शब्द अथवा पदिम हे स्वनांचे बनलेले असतात. संरचनेच्या या तिन्ही पातळ्यांवर विशिष्ट ठिकाणी आघात (accent) अपेक्षित असतो. परंतु हा आघात अनेकदा सोयीनुसार दिला जातो. आघाताचे ठिकाण बदलते. त्यामुळे मुळातील काही उच्चार कमी अथवा जास्त होऊन बदलतात. त्यांच्यात स्वनिक परिवर्तन घडते. उदाहरणार्थ;

औषधोपचार > औशदोपचार, इचलकरंजी > इच लक रंजी. काही भाषांत उपांत्य अवयवावर आघात असल्याने अंत्य अवयव दुर्बल बनून तो आघातमुक्त होतो. उदाहरणार्थ, कलिका या शब्दांत 'लि' हा अवयव उपांत्य व आघातयुक्त असल्याने त्याचे परिवर्तन पुढीलप्रमाणे होते. कलिका > कलिआ > कली > कळी. हरीण चे सामान्यरूप हरिणा असे होताच अंत्य 'णा' वर आघात येऊन त्याचे रूप हऱ्णा असे होईल.

**लेखनपद्धती**

काही वेळेला भाषेतील एखादा शब्द विशेषतः संयुक्त स्वनिमांनी बनलेला शब्द व त्याचे लेखन विवक्षित (Particular) पद्धतीने केले जाते. ही पद्धती लेखनात रूढ होऊन बसते. त्यामुळे शब्दाच्या मूळ उच्चारात स्वनपरिवर्तन घडून येते. उदाहरणार्थ; ब्राह्मण > ब्राम्हण, बुद्ध > Budha > बुद्धा, प्रसिद्ध > प्रसिद्ध, भगवद्गीतानुवाद > भगवद्गीतानुवाद, युध्द > युद्ध, विद्वान > विव्दान

**भौगोलिक परिस्थिती व हवामान**

स्वनपरिवर्तनाचे हे पारिसरिक वैशिष्ट्य ऑस्टॉफने मांडले. सागरकिनारी राहणाऱ्या लोकांची भाषा अधिक सानुनासिक असते. कोकण किनारपट्टीवरील मुंबई, रत्नागिरी, सावंतवाडी येथील लोकांचे उच्चार सानुनासिक आहेत. उष्ण हवामानाच्या प्रदेशातील लोक ठसठशीत बोलतात. समशीतोष्ण कटिबंधातील लोकांचे उच्चार हळुवार व लाघवी असतात. स्तब्ध वातावरणातील लोकांपेक्षा वाहत्या हवेत जीवन कंठणारे मच्छिमार, खलाशी लोक जास्त उंच आवाजात बोलतात. केवळ बोलण्याच्या ढबीवरून मनुष्य कोणत्या प्रदेशातील आहे हे सांगता येते. कोल्हापूर, कोकण, खानदेश, मुंबई, वऱ्हाड, गोवा इत्यादी प्रांतातील उच्चाराची काही एक वैशिष्ट्ये असतात. थंड हवामानात राहणारे लोक अस्पष्ट व जलद बोलतात. पर्वतमय प्रदेशातील लोक कठोर वाटण्यासारखे बोलतात. हेल काढून बोलणे हा यातीलच एक प्रकार आहे. इंग्लंडमधील लोक 'प' चा 'फ' आणि 'ट' चे 'ठ' करतात. जसे पिकॅडली > फिकॅडली, टेबल > ठेबल

**आहार व अन्नप्रकार**

आहारशुद्धीवर उच्चारशुद्धी असते, असा एक समज आहे. ब्राह्मणांचा आहार सात्त्विक असल्याने त्यांचे उच्चार स्पष्ट व कमी परिवर्तनशील असे यथामूल असतात, असे म्हटले जाते. तामस आहाराच्या, मद्यपी लोकांच्या भाषा अस्फुटोच्चारित व अधिक परिवर्तनशील असतात. आहार हे सुद्धा स्वनपरिवर्तनाचे पारिसरिक वैशिष्ट्य आहे. मद्यपी लोक कंदील हा शब्द खंदील असा उच्चारतील.

**ध्वनिपरिवर्तन : प्रमुख प्रकार**

उपरोक्त विवेचनानुसार स्वनपरिवर्तनाच्या कारणांची निश्चिती चटकन होतेच असे नाही. काही वेळेला स्पष्टीकरण देता येते तर काही वेळेला स्पष्टीकरण देता येत नाही. यासाठीच आपण

स्वनपरिवर्तनाचे स्वयंभू (निरपेक्ष) आणि संयोगजन्य (सापेक्ष) असे एक वर्गीकरण केले होते. उपरोक्त कारणे, वर्गीकरण यांच्या आधारे ध्वनिपरिवर्तनाचे अथवा स्वनपरिवर्तनाचे काही प्रमुख प्रकार आपणास पुढीलप्रमाणे पाहता येतील.

**गुण :** इ, उ, ऋ, लृ यांच्या ऐवजी जेव्हा ऐ, ओ, अर्, अल् असा बदल होतो, तेव्हा अशा स्वनपरिवर्तनाच्या प्रकारास गुण असे म्हणतात. उदाहरणार्थ; तुण्ड > तोंड, मिथुन > मेहुण, सिंदुर > शेंदूर, शुंड > सोंड, पुस्तक > पोथी

**वृद्धी :** अ, इ, उ, ऋ , लृ यांच्याऐवजी आ, ऐ, औ, आर्, आल् असे स्वनपरिवर्तन होते तेव्हा त्यास वृद्धी असे म्हणतात. उदाहरणार्थ; मलिन > मैल, बलीवर्द > बैल, महिषी > म्हैस इत्यादी. वृद्धी म्हणजे वाढ होणे, विकास होणे.

**संप्रसारण :** य्, व्, र्, ल् यांच्याऐवजी जेव्हा इ, उ, ऋ, लृ असे स्वनपरिवर्तन होते तेव्हा त्यास संप्रसारण असे म्हणतात. उदाहरणार्थ; द्विगुणा > दुणा, व्यंग > बिंग, द्विपहर > दुपार

**समानस्वनलोप :** शब्दामध्ये एकच स्वन दोनदा आला तर भाषिकांच्या सुलभीकरणाच्या सहजप्रवृत्तीमुळे त्या दोन स्वनांचा उच्चार दोनदा न करता एकदाच करण्याची प्रवृत्ती दिसून येते. या प्रकारच्या परिवर्तनास समानस्वनलोप म्हणतात. उदाहरणार्थ; नववर > नवरा, सुके केळे > सुकेळे, अपररात्र > अपरात्र, गुरे राखी > गुराखी, नववरदेव > नवरदेव, नाककटा > नकटा, स्वर्ग गंगा > स्वर्गंगा.

**घोषीकरण :** या प्रकारात अघोष स्वन घोषयुक्तरितीने उच्चारले जाऊन स्वनपरिवर्तन होते. उदाहरणार्थ; सकल > सगळे, प्रकट > प्रगट, मकर > मगर, शाक > साग, काक > काग, कंकण > कंगण

**अघोषीकरण :** या प्रकारात स्वन अघोषयुक्तरितीने उच्चारले जातात. उदाहरणार्थ; मदद > मदत, मगर > मकर, मेघ > मेख

**महाप्राणीकरण :** या प्रकारात अल्पप्राण स्वन महाप्राण होतात. उच्चाराच्या दीर्घीकरणाने स्वनांची प्राणशक्ती वाढते. उदाहरणार्थ; गृह > घर, बाष्प > वाफ, वृश्चिक > विंचू, हस्त > हात-हाथ, शुष्क > सुका

**अल्पप्राणीकरण :** या प्रकारात महाप्राण स्वन अल्पप्राण होतात. उदाहरणार्थ; सिंधू > हिंदू, स्वादिष्ठ > स्वादिष्ट, दधी > दही

**मात्राभेद :** या प्रकारात ऱ्हस्व स्वराचा कधी दीर्घ तर दीर्घाचा कधी ऱ्हस्व स्वर उच्चारला जातो. त्यामुळे स्वनाच्या मात्रा कमी-जास्त होतात. ऱ्हस्वचा दीर्घ : लज्जा > लाज, पुत्र > पूत,

अद्य > आज, जिव्हा > जीभ, दीर्घाचा ऱ्हस्व : नारंगी > नवरंगी, शून्य > सुन्न, वानर > बंदर, आभीर > आहिर

**सान्निध्य परिणाम :** शब्दातील निरनिराळे स्वन एकमेकांच्या सान्निध्यातच उच्चारले जातात. त्याचा परिणाम शेजारच्या स्वनावर होतो. असे स्वन एकमेकांच्या सान्निध्यात असल्यामुळे मूळ शब्दाच्या उच्चारात फरक पडतो. यास सदृशीकरण असेही म्हणतात. उदाहरणार्थ; पक्व-पक्क-पक्का, रात्री-रत्ती-रात, दुग्ध-दुध्ध-दूध, कार्य-कग्ज-काज, चक्र-चक्क-चाक, व्याघ्र-वघ्घ-वाघ इत्यादी. सदृशीकरणाच्या प्रक्रियेवर आधारित स्वनपरिवर्तन ही भाषेच्या उच्चारप्रक्रियेत वारंवार घडणारी घटना असते.

**विसदृशीकरण :** ही प्रक्रिया भाषा उच्चारात फार तुरळक प्रमाणात व काही शब्दांतच कार्यरत आहे. उदाहरणार्थ; मुकुंद > मकुंद, नूपुर > नेपूर, मृत्यू > म्रृत्यू > मृत्य, मुकुट > मकुट इत्यादी. या परिवर्तनास त्याच्या तुरळक प्रमाणामुळे नियमातीत स्वनपरिवर्तन असेही म्हणतात.

**स्वनव्यत्यास वा स्वनविपर्यय :** स्वनशृंखलेतील लगतचे स्वन परस्परांची जागा घेतात तेव्हा स्वनव्यत्यास अथवा स्वनविपर्यय होतो. म्हणजे स्वनांच्चाराची अदलाबदल होते. लहान मुले 'काळे राळे गोरे राळे', 'काळा राम गोरा राम' या शब्दपंक्ती घाईने उच्चारताना स्वनाची अदलाबदल करतात. काही उदाहरणे; नुकसान > लुस्कान, डोकसे > डोसके, चिकटणे > चिटकणे, फलाहार > फराळ, तिलक > टिकला, नवनीत > लोणी, कवडसा > कडवसा, खाक > काख, मशहूर > महशूर, कुऱ्हाड > कुढार, बादली > बालदी, वाराणशी > बनारस, हळू > लघू

**आद्यस्वनागम :** संयुक्त स्वनिमांच्या कठीण उच्चारात मूळ शब्दात नसलेला स्वर आद्यस्थानी आणला जाऊन उच्चार सुलभ होतो. उदाहरणार्थ; स्थिती > इस्थिती, स्त्री > इस्त्री, स्क्रू > इस्क्रू, स्कूल > इस्कूल, स्टोव्ह > इस्टोव्ह

**मध्यस्वनागम वा स्वरभक्ती :** काही वेळेला संयुक्त स्वनिमांचा उच्चार सुलभ करण्यासाठी मूळ शब्दात नसलेला स्वर मध्ये येतो. उदाहरणार्थ; स्वर्ण > सुवर्ण, धर्म > धरम, रक्त > रगत, मंत्र > मंतर, भ्रम > भरम, आम्र > आम्ब्र > अम्ब > आंबा, ताम्र > ताम्ब्र > तम्ब > तांबे, , मयूर > मोर, प्रतिज्ञा > पैज, शिथिल > सैल

**अंत्यस्वनागम :** इंग्रजीतून मराठीत आलेल्या आणि रूळलेल्या शब्दांच्या शेवटी /र्/ **+** स्पर्श व्यंजन असल्यास त्यानंतर /अ/ या स्वराचा आगम होतो. उदाहरणार्थ; शर्ट् > शर्ट, फार्स् > फार्स, कोर्ट् > कोर्ट, मार्क् > मार्क

**अंत्यस्वनालोप :** शब्दातील आघातामुळे अथवा अन्त्य उच्चाराकडे नीट लक्ष न दिल्यामुळे काही शब्दातील शेवटचे स्वनिम उच्चारले जात नाही. उदाहरणार्थ; जगत् > जग, पंजरक > पिंजरा, कीटक > किडा, मूलक > मुळा, मनस् > मन, आत्मन् > आत्मा

**एकस्वनीकरण :** या प्रकारामध्ये व्यंजनयुग्माचे केवल व्यजनात वा संयुक्त स्वराचे केवल स्वरात परिवर्तन होते. यास एकस्वनीकरण अशी संज्ञा आहे. संस्कृत ऐ, औ या संयुक्त स्वरांचे पालीमध्ये अनुक्रमे ए, ओ असे परिवर्तन झाले. उदाहरणार्थ; ऐरावण > एरावण, कैलास > केलास, वैदेह > वेहेद, गौर > गोर, मौन > मोन, औरस > ओरस.

**द्विस्वनीकरण :** या प्रकारात केवल स्वनिमाचे स्वनपरिवर्तनामुळे स्वनयुग्मात परिवर्तन होते. हिंदीत इंग्रजीतून आदान केलेल्या शब्दांतील ॲ या स्वराचे लेखन ऐ असे होते. उदाहरणार्थ; बॅग > बैग, बँक > बैंक. येथे ॲ या केवल स्वनिमाचे ऐ या संयुक्त स्वनिमात परिवर्तन झालेले दिसते.

**सदृशता :** भाषिक परिवर्तनामध्ये सदृशता वा साम्य हे कारण सर्वच भाषांमध्ये जाणवते. स्वनपरिवर्तन स्वनिमव्यवस्थेशी निगडित असते, तर सृदशता भाषेच्या सर्वच पातळ्यावर कार्यरत असते. मराठीत स्त्रीलिंगी व्यंजनान्त शब्दांचे अनेकवचन आकारान्त किंवा ईकारान्त होत असते. चिंचा, गुंजा, तारा असा एक गट विहिरी, खाणी, गाठी असा दुसरा गट होय. म्हणजे मोटार, सायकल यासारखे शब्द सदृशतेने दुसऱ्या गटात जाऊन त्यांचे अनेकवचन मोटारी, सायकली असे होते. मारणे, करणे या क्रियांच्या आधारे अनेक सदृश वाक्प्रचार मराठीत रूढ झाले.

उदाहरणार्थ; दांडी, डोळा, लाईन, झटका, इंप्रेशन, बकरा.... मारणे.

रिझर्व्ह, ट्राय, सेलेब्रेट, सिलेक्ट, ऑफर, दंगा .... करणे.

गडगडाट, घणघणाट, जळफळाट यासारख्या शब्दांत ध्वनिसादृश्य आहे. पर्यवेक्षक, संघटक, निदेशक, अधीक्षक, वाहक यासारख्या शब्दांत रूपगणसादृश्य आहे. सप्टेंबर, नोव्हेंबर, डिसेंबर यातील अनुनासिक्य साम्य ऑक्टोबर या शब्दात येऊन 'ऑक्टोंबर' असे रूप बनते.

**अतिशुद्धी :** आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत, श्रेष्ठ आहोत हे दर्शविण्यासाठी प्रौढांकडून जाणीवपूर्वक काही उच्चारणाच्या लकबी जोपासल्या जातात. या प्रकारच्या परिवर्तनास अतिशुद्धी म्हणतात. या प्रक्रियेत मूळ शब्दात एखाद्या ध्वनीची वृद्धी केली जाते. उदाहरणार्थ; ऑफीस > हॉपीस, बॅरिस्टर > बॅलिष्टर, मोठेपणा > महत्तता, मॅक्समूलर > मोक्षमुल्लर, अलेक्झांडर > अलक्षेन्द्र, अध्यक्षीय > अध्यक्षणीय

**दुष्प्रयोग :** अतिशुद्धी सुशिक्षितांकडून होते तर दुष्प्रयोगाची निर्मिती अशिक्षित लोकांकडून अजाणतेपणे होते. हेटाळणीतून बामण, येडपट असे शब्द येतात. इंग्रजी शब्द उच्चारताना पुढील दुष्प्रयोग होतात. इलेक्ट्रिक > विलेक्टरी, इलेक्शन > विलीक्शन, इंजेक्शन > विंजिक्शन, टाइम > टायिम, कंडक्टर > कंड्याक्टर

**ध्वनिपरिवर्तनाचा भाषेवर परिणाम**

भाषेतील स्वनपरिवर्तन नैसर्गिक व अपरिहार्य असल्याने ते कधीही नष्ट होत नाही. त्यामुळे भाषेत नकळत घडणारी उत्क्रांती सुरू असते. यामुळे भाषा दुर्बोध न बनता सुलभ बनत जाते. मात्र या

परिवर्तनामुळे भाषेची व्याकरणपद्धती विस्कळीत होते. कोणत्याही भाषिक समाजात होणारे स्वनपरिवर्तन निरपवाद, अमर्याद, अज्ञेय व नियमित असते. ते सूक्ष्मपणे, मंदगतीने, नकळत घडत असते. ध्वनींची अथवा स्वनांची उत्क्रांती होऊन शब्द (पदिम) नवीन रूपे धारण करतो. उदाहरणार्थ, हरिद्रा > हलिद्दा > हळीद्दा > हळद > हलद > हळध > हाळद > हळद. एकाच भाषेच्या इतिहासात अनेक घडामोडी घडत असल्याने शब्दाची अनेक नवीन रूपे, साम्यरूपे, नवे वाक्प्रयोग आपल्या दृष्टोत्पत्तीस येतात. एकूण सातत्याने भाषेची पुनर्घटना होत असते. सर्वात शेवटी समाजाने मान्यता दिलेले, पात्र ठरलेले, रूढ झालेले शब्दच भाषेत राहतात. आज मराठीत 'हळद' हा शब्द बोलला जातो, 'हरिद्रा' हा शब्द नाही. भाषेतील हे परिवर्तन जरी भाषेच्या आंतरिक संरचेनवर (व्याकरण नियमांवर) परिणाम करीत नसले तरी अप्रत्यक्षपणे, मंदपणे भाषेची व्याकरण संरचना ते डळमळीत करीत असते. उदाहरणार्थ 'वत्स' या मूळ संस्कृत शब्दापासून मराठीत 'वासरू' शब्द आला. संस्कृत भाषेत पुल्लिंगी असणारा 'वत्स' शब्द मराठीत 'वासरू' असा नपुसकलिंगी बनला. पुस्तक (नपुसकलिंगी), पोथी (स्त्रीलिंगी), ग्रंथ (पुल्लिंगी). भाषापरिवर्तनाच्या आधारे आपण भाषेचे विशिष्ट कालखंड पाडतो. अनेक शतकांची परंपरा असणारी भाषा एकाच प्रकारच्या व्याकरणनियमांनी लिहिली-बोलली जात नाही, ही गोष्ट लक्षात घेऊन ऐतिहासिक व्याकरणाची (Historical Grammar) आवश्यकता आपणास पटू लागते. ध्वनिपरिवर्तनाने भाषा बदलत असली तरी ती सुलभ ठरते. हे परिवर्तन भाषेच्या आकलनक्षमतेची मर्यादा ओलांडत नाही. उदाहरणार्थ, हिंदी भाषेत कालेज म्हणजे कॉलेज हे आपणास समजते.

**अर्थपरिवर्तन**

अर्थविज्ञानाचा उद्गाता मायकेल ब्रेआल यांनी १८९७ मध्ये Semantics ही संज्ञा प्रथम वापरली. Semantique या मूळ फ्रेंच शब्दावरून आलेली ही संज्ञा अनेकवचनी आहे. डॉ. अशोक केळकर यांनी त्यास 'अर्थविन्यास' हा मराठी पर्याय सुचविला आहे. अर्थविचार, अर्थप्रक्रिया, अर्थविज्ञान, शब्दार्थशास्त्र असेही पर्याय मराठीत वापरलेले दिसतात. 'मराठीचा अर्थविचार' या ग्रंथात डॉ. अनुराधा पोतदार यांनी असे मत मांडले आहे की, ''भाषेतील शब्दांचे अर्थ का व कसे बदलतात हा अर्थविज्ञानाचा विषय असून शब्दांच्या अर्थामध्ये घडून येणारी परिवर्तने काही नियमांनुसार घडून येतात किंवा योगायोगाने व अकारण घडतात, या प्रश्नांची मीमांसा अर्थविज्ञानाच्या कक्षेत येते.''

१९५७ मध्ये नोम चॉम्स्की या अमेरिकन भाषावैज्ञानिकाने संरचनावादी भाषाविज्ञानातील अर्थविचाराची उणीव दर्शविली. अर्थातच त्यानंतर रचनान्तरणवादी भाषाविज्ञानात वाक्य, रूपिम व स्वनिम यांचा विचार केल्याने अर्थविचाराचे वेगळे महत्त्व जाणवू लागले. या अर्थविचाराच्या कक्षेत पुढील गोष्टी विचारात घेतलेल्या असतात.

आई, माय, माता, मातु:श्री, जननी हे शब्द समानार्थकता व्यक्त करतात. तो हुशार आहे, म्हणजे 'ढ' नाही, हा अन्वयार्थ आहे. कोल्हा, कुत्रा, मांजर, हत्ती येथे सर्व प्राणी असल्याने अर्थसाधर्म्य आहे, पण प्राणी गटाशी पोथी, पुस्तक, पाटी, कागद, वही या गटाचा अर्थभेद दिसतो.

काळोख-प्रकाश यात अर्थविरोध तर सोने, पितळ, चांदी या शब्दांत केवळ अर्थबहिष्कृती आहे. 'पुस्तक' या शब्दात खरे तर 'कागद' हा अर्थसमावेश असतो. 'गाय गवत खाते' या वाक्यात सार्थता आहे, तर 'गाय गवत पिते' या वाक्यात अर्थहीनता आहे. कागदपत्र, स्त्रीलेखिका, गायीचे गोमूत्र या शब्दात अर्थपुनरुक्ती आहे. 'हा चित्रपट मला आवडला' या वाक्यात चित्रपट पाहण्याचा अर्थ गृहीत आहे. तसेच अर्थविपरीतता, अर्थसूचन, अर्थविस्तार या प्रक्रियाही अर्थविचारात समाविष्ट होतात. अर्थविचाराची ही कक्षा व्यापक आहे. या कक्षेद्वारेच आपणास अर्थाची वर्गवारी, अर्थपरिवर्तनाची कारणे व त्याचे प्रकार यांचे स्पष्टीकरण करावयाचे आहे. यावरून आपणास अर्थप्रक्रियेचा सामाजिक, सांस्कृतिक, संदर्भही लक्षात येईल.

**अर्थपरिवर्तनाची कारणे**

भाषेचा अर्थदृष्ट्या विचार करताना शब्दाला असलेला अर्थ-एखाद्या विशिष्ट शब्दासाठी संपूर्ण भाषिक समाजाने मान्यता दिलेला अर्थ-का बदलतो, कोणत्या कारणांमुळे बदलतो, याचा अभ्यास करावा लागतो. अर्थपरिवर्तनाची काही निश्चित कारणे आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**साहचर्य** : दोन वेगवेगळ्या अर्थाचे शब्द एकमेकांच्या बरोबरीने वापरले जातात, त्यामुळे मूळ शब्दाच्या अर्थात परिवर्तन घडते. लगीनघाई या शब्दात धांदलीची-गडबडीची कल्पना असल्याने त्यास कल्पना साहचर्य म्हणतात. गोडगळा या शब्दात निकटत्वजन्य साहचर्य आहे. देवळातील पाण्याच्या वाहणीस तिच्या आकारावरून गायमुख म्हटले जाते. तेथे सादृश्यजन्य साहचर्य घडून येते.

**साम्यतत्त्व** : दोन भिन्न गोष्टींमधील सादृश्य किंवा विरोध विशेषत्वाने सूचित करण्याच्या प्रयत्नात साम्यतत्त्वामुळे अर्थपरिवर्तन होऊ शकते. घिसाड्याला लोखंड तापलेले आहे तोवरच घाई करून घाव घालावे लागतात; यावरून 'घिसाडघाई' म्हणजे घाई-गर्दी असा वाक्प्रचार रूढ झाला. कित्येकदा ऐतिहासिक व पौराणिक व्यक्तिनामे सर्वसामान्य रूप धारण करतात. त्यामुळे दोन वेगवेगळ्या गोष्टीतील साम्य व्यक्त होते. उदाहरणार्थ; सुंदोपसुंदी, महाबळभटी ढोंग, मायाबाजार, भगीरथ प्रयत्न, भीष्मप्रतिज्ञा, लक्ष्मणरेषा, तांडवनृत्य, गांधर्वविवाह, शरपंजरी पडणे, कुंभकर्ण, वामनमूर्ती, बकासूर, जमदग्नी, पूतनामावशी, हरिश्चंद्र, कर्ण, म्हाळसा इत्यादी पौराणिक शब्द अथवा भाऊगर्दी, तुकोबाची मेख, अटकेपार झेंडे रोवणे, ढालगज-भवानी, शिराळशेट, गड आला पण सिंह गेला, आधी लगीन कोंडाण्याचे, गनिमी कावा, बाजीरावी थाट, औरंगजेबी कारभार इत्यादी ऐतिहासिक शब्द सामतत्त्व दर्शवितात.

**रूपकजन्य शब्द** : काही वेळा आपण विशेषणांचा रूपक अर्थाने आलंकारिक उपयोग करीत असतो. त्यामुळे त्या शब्दाचा मूळ कोशगत अर्थ बदलतो. उदाहरणार्थ; पांढरा हत्ती, काळा पैसा, वाहता रस्ता, काटेरी मुकुट, हस्तिदंती मनोरा, चहाच्या पेल्यातील वादळ, आंधळा न्याय, अनागोंदी कारभार, इंगा फिरणे, आयुष्य ही पुष्पशय्या नव्हे.

**लक्षणाजन्य शब्द** : शब्दाचा मूळ अभिधार्थ अथवा वाच्यार्थ बदलून त्याऐवजी त्या शब्दांतून सूचित होणारा लक्षणेचा अर्थ स्वीकारला जातो, त्यावेळी लक्षणाजन्य अर्थपरिवर्तन होते. या प्रकारात मुख्यार्थबाधा हा महत्त्वाचा धागा असतो. 'मी तुकाराम वाचला' येथे गाथा हा लाक्षणिक अर्थ बोलण्याचे प्रयोजन दर्शवितो. त्यामुळे ही प्रयोजनवती लक्षणा होय. कुशल या शब्दाचा कुश=दर्भ+ल म्हणजे दर्भ तोडणारा हा अर्थ आता नाहीसा झाला. तेथे रूढी-प्रयोजनच उरले नाही, म्हणून ती निरूढा लक्षणा होय. लक्षणेमुळे काही वेळा वाईट अर्थही प्राप्त होतो, जसे : चर्पटपंजरी, चतुर्भुज, चर्वितचर्वण; तर काही वेळा उपरोधिक अर्थ प्राप्त होतो, जसे : दुढ्ढाचार्य, चंडिका, शूर्पणखा, झारीतील शुक्राचार्य इत्यादी.

**बदलते समाजजीवन** : समाजाची चालरीत बदलली, काही नवीन वस्तू निर्माण झाल्या की त्याचे प्रतिबिंब भाषेत उमटते. आचारविचारात परिवर्तन होऊन अनेक शब्द भिन्न अर्थांनी वापरले जातात. रामदासांनी चळवळ हा शब्द शारीरिक हालचाल या अर्थी वापरला, कार्यकर्ता हा शब्द भक्त अर्थाने वापरला. मात्र आज या शब्दांचे मूळ अर्थ पार बदलून गेलेत. कॅथॉलिक धर्मपरंपरेत फादर, मदर, ब्रदर यांचे अर्थ वेगळे आहेत. सिस्टर आता नर्स होते. लाल झेंडा, गांधी टोपी, गुरू शर्ट, नेहरू शर्ट, साम्यवाद, साथी, भाई या शब्दांना नवे अर्थ प्राप्त झाले आहेत.

**अशुभता परिहार** : कोणत्याही मानवी समाजाला काही अशुभ, अटळ गोष्टी टाळता येत नाहीत. अशा गोष्टींचा उच्चार सूज्ञ भाषिक समाज करीत नाही. मृत्यूसारख्या अशुभ गोष्टीचा उल्लेख आपण; देवाज्ञा होणे, देहावसान, कालवश, पंचत्त्वात विलीन, कैलासवासी, वैकुंठवासी, बांगडी वाढविणे, कुंकू वाढविणे अशा शब्दांत करतो. पैगंबरवासी, ख्रिस्तवासी, मंगळसूत्र वाढविणे हे शब्दही अशुभ गोष्टींचा परिहार करीत असतात. अशुभ बोलू नये हा यातला हेतू असतो.

**ग्राम्यता परिहार** : मानवी जीवनात काही गोष्टी ग्राम्य, अशिष्ट, अशुचित असतात. त्या चारचौघात बोलू नयेत. पण मानवी जीवनाचाच तो भाग असल्याने टाळता येत नाहीत. अशावेळी सभ्यपणे, सूज्ञपणे मनुष्य या गोष्टी शक्यतो सुसंस्कृत शब्दांत व्यक्त करतो. त्यातील वाच्यार्थ नष्ट होऊन लक्षणार्थ, व्यंजनार्थ स्पष्ट होतो. उदाहरणार्थ, तुळस कधी वाळून जात नाही तर ती द्वारकेला गेली असे म्हणण्याची प्रथा आहे. प्रातर्विधीस आपण परसाकडे जाणे, शौच्यास जाणे असे म्हणतो. बाथरूमला जाणे, गंगा भागीरथी (विधवा स्त्री) असे शब्द ग्राम्यता परिहार करतात. मुलगी वयात येण्याच्या मासिक धर्माला कावळा शिवणे, पदर येणे, नहाण येणे, बाहेरची होणे, शहाणी होणे इत्यादी शब्दांनी उल्लेखिले जाते.

**अतिशयोक्ती** : अनेकदा मनुष्य भावनावेगात, भावविवशतेने अतिशयोक्तीपूर्ण बोलतो. त्यातील अत्युक्ती शब्दाच्या मूलार्थास मारक बनून अर्थपरिवर्तन होते. उदाहरणार्थ; गजान्त लक्ष्मी, मरणप्राय दुःख, मुसळधार पाऊस, क्षणाची उसंत, जमीन अस्मानाचे अंतर, स्वर्गीय आनंद, नरकमय जीवन, राजमान्य राजश्री, प्राणांतिक वेदना, आसुरी आनंद, भयानक आनंद, मस्त गप्पा, झक्कास वारा इत्यादी.

**शब्दसिद्धी** : भाषिक समाज भाषेकडे साधन म्हणून पाहत असतो. कमीत कमी श्रम व वेळेत भाषेचा वापर करण्याची त्याची प्रवृत्ती असते. त्यामुळे भाषेत उपलब्ध असणाऱ्या शब्दांनाच प्रत्यय, उपसर्ग लावून शब्दसिद्धीद्वारे नवीन अर्थपरिवर्तन साधण्याची क्रिया भाषिक करीत असतात. उदाहरणार्थ, मूळ शब्दास 'रू' हा प्रत्यय लागून लेकरू, पाखरू असे अर्थ बदलले. उपसर्ग लागूनही नवीन शब्द बनले जसे, उप : उपनगर, उपनाव, उपचार, उपकरण; आड : आडनाव, आडरान, आडरस्ता; गैर : गैरमर्जी, गैरवर्तन, गैरहजेरी, गैरसमज इत्यादी. बहुव्रीही समासात असणाऱ्या पदांपेक्षा वेगळाच अर्थ दर्शविला जातो. उदाहरणार्थ; घरकोंबडा, लंगोटीमित्र, नीलकंठ, नाकतोडा, चटकचांदणी, चंबूगबाळे, श्रीधर, रमारमण, श्रीदेवी, गोपाळ इत्यादी.

**लेखक-वाचक विसंवाद** : वक्त्याने अथवा लेखकाने विशिष्ट अर्थाने वापरलेला एखादा शब्द जेव्हा श्रोता अथवा वाचक त्याच अर्थाने न घेता वेगळ्या अर्थाने घेतो-स्वीकारतो, तेव्हा अर्थातच मूळ शब्दाच्या अर्थात परिवर्तन घडून येते. उदाहरणार्थ, .... गृहस्थ नुकतेच गेले. (वारले). 'हंसगमना ते पहिलीच आहे' या रघुनाथ पंडिताच्या काव्यपंक्तीतील पहिली म्हणजे प्रथम नसून मूळची, जुनी असा त्याचा अर्थ आहे.

**अतिपरिचयातून सभ्यता** : जे अशुभ व गलिच्छ आहे, त्याला सूज्ञपणे सभ्यतेचा वेश देऊन व्यक्त केले जाते. मात्र भाषेमध्ये काही शब्द असे असतात की, त्यांच्या अतिपरिचयामुळे त्यातील ग्राम्यता, अश्लीलता गुळगुळीत होते. सभ्य माणसेही असे अश्लील शब्द निसंकोचपणे उच्चारताना दिसतात. त्यातला घाणेरडा अर्थ सभ्य रूप धारण करतो. दोन मित्र भेटले की च्यायला, साला हे शब्द सहज उच्चारतात. रांड, रांडीचा, रांडेच्या अशा शिव्या सहज बोलल्या जातात. जणू अशा सर्व शब्दांना अतिपरिचयामुळे, वापरामुळे सभ्यता प्राप्त झाली आहे. भडवा, भाडखाऊ, अंगवस्त्र, रिकामचोट, भानचोद, भोसडीचा, खाजगुळा, शिंचा असे शब्द या तऱ्हेचे आहेत. लोणी लावणे, मस्का लावणे, गेला उडत या शब्दप्रयोगातील अश्लील क्रिया माहीत नसल्यामुळे त्याचा वापर मुलीही करतात. कंड सुटणे, खाज सुटणे, गांड फाटणे, गांडीत शेपूट घालणे, मढे जाणे, मायझवा यासारखे वाक्प्रचार नित्य वापराने सभ्य बनले.

**अत्यादरदर्शन** : ज्या व्यक्तीबद्दल आदर वाटतो तिचा नावाने उल्लेख न करता सर्वनामाने उल्लेख केला जात असे. गुरूचे, पतीचे नाव जुन्या काळी मनुस्मृतीच्या दंडकामुळे उच्चारले जात नसे. त्यामुळे पत्नी पतीला हे, ते, इकडून, इकडची स्वारी अशा शब्दांनी संबोधित असे. रमाबाई रानडे यांच्या आत्मचरित्रात त्यांनी आपले पती न्या. रानडे यांचा उल्लेख 'स्वतः' या सर्वनामाने केला आहे. जुन्या बखरीत शिवाजीराजे यांचे नाव आले की तेवढीच जागा मोकळी सोडण्याची पद्धत होती. नाव न घेण्याप्रमाणेच गौरवयुक्त, विशेषणयुक्त नामावली नावामागे जोडण्याची पद्धती अत्यादरदर्शनातूनच आली आहे. उदाहरणार्थ; कर्मवीर, महर्षी, महात्मा, हरिभक्तपरायण, वज्रचुडेमंडित, सकलगुणसंपन्न, चिरंजीव सौभाग्यकांक्षिणी, श्रीमान श्रीमती, महोदय इत्यादी.

**प्रादेशिकता** : दक्षिणेतील महाराज हा राजा अर्थी शब्द उत्तरेत आचारी अर्थाने वापरतात. डेरा हा शब्द काही ठिकाणी राहुटी, घर तर काही ठिकाणी रांजण या अर्थी वापरतात. कॉर्न हा शब्द इंग्लंडमध्ये गहू, स्कॉटलंडमध्ये बाजरी व अमेरिकेत मका या अर्थी प्रसिद्ध आहे. अशा शब्दांतील प्रांतीय भेद लक्षणीय आहे. उत्तर प्रदेशात ठाकुर हे क्षत्रियाचे नाव आहे, तर बिहारमध्ये ठाकुर म्हणजे आचारी हा अर्थ प्रचलित आहे.

**सांस्कृतिक आदान** : लेनर्ड ब्लूमफील्ड याने दोन भाषिक समाजातील संबंधाचे स्वरूप व आदानाची दिशा यावर आधारित आदानप्रक्रिया ही अर्थपरिवर्तनाचे कारण मानले आहे. आदान-प्रदान दोन्ही दिशांनी होत असते. कडबूसारखा पदार्थ आपण कानडी समाजाकडून घेतला. मात्र दोन शेजारी राहणाऱ्या भाषिक समाजांपैकी एकाची भौतिक प्रगती अधिक झाली असेल तर तो समाज आदानापेक्षा प्रदान अधिक करतो. अरबी, तुर्की व फार्सी भाषेतील अनेक शब्द मराठीने स्वीकारले. फार्सी + मराठी (कागदपत्र, शेतजमीन) असेही सामासिक शब्द तयार झाले. प्रतिष्ठा प्राप्त करून घेणाऱ्या इच्छेने जित समाजातील लोक जेत्यांच्या भाषेतील अधिकाधिक शब्दांचा वापर स्वभाषेत करतात. प्रतिष्ठेपोटी आज आई-बाबाचे मम्मी-डॅडी झाले. वाढदिवस हा आज बर्थडे झाला. घरी पाहुण्याऐवजी गेस्ट येऊ लागले. इंग्रजी, पोर्तुगीजसारख्या भाषांतून असंख्य शब्द आले. Sonnet या इंग्रजी शब्दाला प्रतिशब्द म्हणून नादसदृश्य असणारा 'सुनीत' शब्द घडविण्यात आला. साखरपुडा शब्द जाऊन आता Engagement शब्द आला. भाषांतरातूनही आपण अनेक शब्द आदान केले. जसे दूरध्वनी (telephone), धावचीत (runout), ओष्ठशलाका (lipstick), मधुचंद्र (honeymoon), इंग्रजीतील able हा प्रत्यय मराठीत आपण जसाचा तसा घेतला आहे. खाणेबल, वाचणेबल याचप्रमाणे मोटारगाडी (motorcar), टाइमशीर (वक्तशीर), पॉवरबाज या सारख्या शब्दांत संमिश्रादान आहे.

**अर्थपरिवर्तनाचे प्रकार**

फेर्दिनां द सोस्यूर या भाषावैज्ञानिकाने अर्थपरिवर्तनाचे दोन मुख्य प्रकार मानले आहेत. भाषा सातत्याने बदलते. भाषेबाबतचे नियम किंवा सिद्धांत हे सापेक्ष असतात. ते कालांतराने बदलत असतात. त्यामुळे काही अर्थप्रक्रिया या स्थलकालसापेक्ष असतात. इश्श या खास मराठी शब्दातील मुग्ध शृंगार इतर भाषेत व्यक्त करता येत नाही. तसेच 'मेर' शब्दाचा अर्थ संस्कृतमध्ये सीमा, कोकणीमध्ये शेताची हद्द, मराठीत डोंगराची कडा, वऱ्हाडीत लागण असा स्थलपरत्वे बदलतो. या अर्थप्रक्रिया स्थलकालसापेक्ष असतात. शब्दांची उत्पत्ती, लय आणि अनेकार्थता या गोष्टी सर्व भाषेत आढळतात. तसेच मनुष्य स्वभाव सर्वत्र, सर्वकाल सारखाच असतो. त्यामुळे या अर्थप्रक्रियांना सार्वकालीन अर्थप्रक्रिया म्हणतात. अर्थपरिवर्तनाचे बहुतेक सर्व प्रकार सार्वकालीन असल्याचे आपल्या लक्षात येते.

**अर्थविस्तार** : भाषिकाच्या दैनंदिन भाषा वापरातून एखाद्या शब्दाचा मूळ कोशगत अर्थ-जो मर्यादित असतो-अधिक व्यापक अथवा विस्तृत अर्थाने वापरला जातो. त्यामुळे त्या शब्दाचा मूळ

अर्थ बदलून त्याचा विस्तार होतो. या प्रक्रियेला अर्थविस्तार म्हणतात. ब्रेआल आणि पामर या दोन भाषाशास्त्रज्ञांनी या प्रक्रियेला महत्त्वाचे मानले आहे. अर्थविस्तारात अर्थाचे सामान्यीकरण होते. उदाहरणार्थ; गोस्वामी म्हणजे ज्याने आपली इंद्रिये ताब्यात आणली तो (श्रीकृष्ण) असा अर्थ, पण आता राख फासणारा व व्यसनात राहणाराही गोसावी झाला. मृगया म्हणजे हरिणाची शिकार होय. आता कोणत्याही प्राण्याच्या शिकारीला मृगया म्हणतात. असे काही शब्द : गोठा, व्यासपीठ, पेशवाई, कुशल, कादंबरी (बाणाच्या एका दीर्घ कथानकाची नायिका), निष्णात (स्नान केलेला), रजक (रंगविणारा, पण आता तो धुणारा धोबी झाला.), प्रवीण (वीणा उत्तम वाजविणारा) इत्यादी. सामासिक शब्दांतही व्यापक अर्थ असतो. वेणीफेणी, काजळकुंकू, पीकपाणी, कपडालत्ता ही उदाहरणे समाहरद्वंद्वाची आहेत. सभेत बसण्यास योग्य तो सभ्य हा अर्थ आता मागे पडून सभ्यतेचा अर्थ वाढला.

**अर्थसंकोच** : अर्थाचे सामान्यीकरण म्हणजे अर्थविस्तार तर त्याच्या उलट अर्थाचे विशेषीकरण म्हणजे अर्थसंकोच होय. शब्दाचा मूळचा विस्तृत अर्थ संकुचित केला जातो. चिखलात जे जे जन्मते त्यास पंकज म्हणावयास हरकत नाही. पण येथे पंकज म्हणजे कमळच. ज्या पर्वतावर हिम पडते तो हिमालय, पण भारताच्या उत्तरेकडील पर्वतासच हिमालय म्हणतात. जनावर हा शब्द पुष्कळ प्राण्यांना लावता येईल, पण कोकणात सापाला उद्देशून हा शब्द वापरतात. जिचे भरणपोषण करावयाचे ती भार्या आज केवळ पत्नी या अर्थाने संकुचित बनली आहे. इंग्रजीतील हाउण्ड शब्द कुत्रादर्शक आहे. आज तो केवळ शिकारी कुत्र्यासाठी वापरतात. म्हणजेच येथे जुन्या अर्थापेक्षा नव्या अर्थाची व्याप्ती सीमित झाली आहे. वेणा म्हणजे वेदना, आता केवळ प्रसूतिवेदना बनल्या. सरपटणारा प्राणी तो सर्प, आता फक्त सापासाठी सर्प शब्द येतो. साहचर्यामुळेही अर्थसंकोच होतो. जसे कुंकमपत्रिका आता फक्त पत्रिका बनली.

**अर्थभ्रंश** : कोणतीही अर्थप्रक्रिया घेतली तरी तिच्यामध्ये शब्दार्थाच्या मूळात थोड्याफार प्रमाणात भ्रंश हा होतच असतो. मूळ अर्थ भ्रंशित होतो. मराठीत अवजड या शब्दाचा अर्थ जड असा आहे. खरे तर 'अव' म्हणजे 'नाही' या अर्थाने जे जड नाही ते अवजड म्हणजे हलके असा अर्थ आहे. स्फुटपणे या शब्दाचा अर्थ तुटकपणे असा आहे. पण मराठीत तुटकपणे या शब्दासाठी अस्फुटपणे असा चुकीच्या अर्थाचा शब्द वापरतात. अस्फुटपणे म्हणजे सलगतेने, भरीवपणे होय. डोक्यावर बसणे, फैलावर घेणे, नाकी नऊ येणे, काटा ढिला होणे इत्यादी वाक्प्रचारात अतिशयोक्तीने अर्थभ्रंश झालेला आहे. अपरोक्ष, अचपळ, आजन्म हे शब्द असेच अर्थभ्रंश झालेले आहेत.

**अर्थापकर्ष** : बोलण्याच्या ओघात अथवा अज्ञानामुळे काही शब्दांचा चांगला अर्थ निघून जातो. आपण ते शब्द वाईट अर्थाने वापरत असतो. अशा वेळी होणाऱ्या अर्थप्रक्रियेला अर्थापकर्ष म्हणतात. दारू म्हणजे औषध असे असूनही आज या शब्दाचा अर्थ घाणेरडे – वर्ज्य पेय म्हणून घेतो. मूळ उत्तम अर्थ असणारे आणि आता त्यास वाईट अर्थ आलेले शब्द पुढे दिलेले आहेत.

कलावती > कलावंतीण, श्यालक (मेहुणा) > साला, अवतार > गबाळा, भद्रीकरण (चांगले करणे) > भादरणे, वल्लद (मुलगा) > अवलाद हे अनेकवचन, महाराज > आचारी. गुलजार म्हणजे फुलांचा ताटवा होय. आज त्याचा आपण भलताच अर्थ घेतो. असुर हा देवतावाचक शब्द पुढे दैत्यवाचक बनला. अकलमंद म्हणजे खरे तर ज्ञानी पण आज आपण हा शब्द मंद अकलेच्या माणसास वापरतो. भट म्हणजे योद्धा या शब्दाचे आज भलतेच अर्थपरिवर्तन झाले आहे. येथे मूळ अर्थापेक्षा नव्या अर्थात अवमूल्यन व्यक्त होते.

**अर्थप्रशस्ती** : शब्दाच्या मूलार्थामधील हीनत्व जेव्हा नष्ट होते किंवा मूळातच चांगला असणारा अर्थ जेव्हा अधिक चांगला होतो, तेव्हा अर्थप्रशस्ती ही प्रक्रिया होते. येथे अर्थाचा उत्कर्ष होतो म्हणून त्यास अर्थोत्कर्ष असेही म्हटले जाते. फार्सीमध्ये असामी या शब्दाचा अर्थ माणूस असा आहे; मराठीत तो बडा माणूस या अर्थी योजिला जातो. असे काही शब्द पुढीलप्रमाणे मांडता येतील.

चीज (फार्सी) = वस्तू > उत्कृष्ट वस्तू (मराठी)

घरीब (फार्सी) = लाचार > गरीब (मराठी) = सहनशील

मुग्ध (संस्कृत) = मूर्ख > मुग्धा (मराठी) = निष्पाप, निरागस

अल्लड़ु (कानडी) = दंगेखोर > अल्लड (मराठी) = निष्पाप, खेळकर

प्रेम, कौतुक यांच्या अतिरेकाने गाढवा, लबाडा, चावट, लुच्या या शब्दांना प्रशस्ती मिळाली. अजगर, अगत्य, अनर्थ ही अतिशयोक्त अर्थप्रशस्तीची उदाहरणे आहेत.

**अर्थच्युती** : अर्थप्रशस्तीच्या विरोधी असा हा अर्थपरिवर्तनाचा प्रकार आहे. मूळ शब्दाचा अर्थ वरच्या दर्जाचा असला तरी भाषिक असे शब्द; अनिष्ट प्रकारावर पांघरूण घालण्याच्या सवयीने, काहीशा दर्जाहीन अर्थाच्या स्वरूपात वापरू लागतो. अशा अर्थपरिवर्तनात त्या अर्थाची घसरण, च्युती होते. उदाहरणार्थ, भवानी शब्दाचा मूळ अर्थ लोकरक्षण करणारी देवता (पार्वती) असा आहे मात्र लोकभाषेत भटकणारी स्त्री म्हणजे भवानी असा अर्थबदल होतो. चंडिका म्हणजे उग्रस्वरूप धारण करणारी देवता पण लोकभाषेत भांडकुदळ, रागावणारी स्त्री हा अर्थ. याचप्रमाणे अंबाबाई, शिपाई (सैनिक-सेवक) यांचे अर्थपरिवर्तन झालेले आढळते.

**अर्थादेश** : जेव्हा शब्दाचा मूळ कोशगत अर्थ पूर्णपणे बदलून एकदम नवीन अर्थ भाषिकाकडून स्वीकारला जातो तेव्हा होणाऱ्या अर्थपरिवर्तनाच्या प्रकारास अर्थादेश असे म्हणतात. उदाहरणार्थ, हिंदीतील गँवार किंवा मराठीतील गावठी हा शब्द याची उत्तम उदाहरणे आहेत. गाँव वरून गँवार म्हणजे गावात राहणारा हा अर्थ तसेच गाव वरून गावठी म्हणजेच ग्रामीण मनुष्य असा अर्थ होतो. पण दोन्ही शब्द आपण 'अडाणी' या अर्थी स्वीकारलेले आहे.

**अर्थान्तर** : एखादा शब्द जेव्हा आपल्या जुन्या भाषिक संदर्भाचा त्याग करून संपूर्णपणे नव्या भाषिक संदर्भात वापरला जाऊ लागतो, तेव्हा अर्थान्तराची प्रक्रिया घडते. अर्थादेश व अर्थान्तर यात

एक सूक्ष्म भेद आहे. अर्थादेशात जुना भाषिक संदर्भ सुटत नाही. उपरोक्त गावठी व गँवार शब्दांतून हे स्पष्ट होते. अर्थान्तरात मात्र हा संदर्भ पूर्णपणे नष्ट होतो. लेनर्ड ब्लूमफील्डच्या मते ही प्रक्रिया दोन टप्प्यात घडते. प्रथम अर्थविस्तार होतो व नंतर संकोच होताना जुना संदर्भ वगळला जातो. त्याने Meat या शब्दाचे उदाहरण दिले आहे. पूर्वी त्याचा अर्थ खाद्यपदार्थ होता. अर्थविस्तारात तो प्राण्याच्या शरीरातील खाण्यासारखा भाग या अर्थीही वापरला गेला. पण नंतरच्या अर्थसंकोचात तो केवळ प्राण्यांचे मांस या अर्थीच वापरला जाऊ लागला. मराठीत सुतक हा शब्द नवीन बालकाच्या जन्मामुळे येणारे अशौच (अशुद्धी) या अर्थी वापरला जात असे. अर्थविस्ताराने तो कुटुंबियांचे जन्म-मृत्यू या दोहोने येणारे अशौच या अर्थी वापरला गेला. पण कालांतराने अर्थसंकोच होऊन तो केवळ मृत्यूमुळे येणाऱ्या अशौच्यासाठी वापरात येऊ लागला. मृग हा प्राणी या अर्थाचा शब्द हरीण या अर्थी वापरला जाऊ लागला. घृणा म्हणजे दया पण याचा अर्थ झाला किळस !

**अर्थभेद** : प्रत्येक भाषेत हा अर्थपरिवर्तनाचा प्रकार आहेच. प्रचलित भाषेमध्ये दोन निरनिराळ्या कल्पना एकच शब्द व्यक्त करतात तेव्हा त्या शब्दांत अर्थभेद असतो. लीला म्हणजे भगवंताची व लीळा म्हणजे महानुभावीय चक्रधराची असते. निर्वाण, मोक्ष, स्वर्ग एकाच अर्थाचे असणारे हे शब्द अनुक्रमे बुद्धी, ज्ञान, सामान्यजन यांच्या संदर्भात अर्थभेदाने वापरले जातात. वस्तुस्थितीदर्शक अर्थभेद; झोपाळा-हिंदोळा, कांबळे-घोंगडी, लुगडे-पातळ, वायू-हवा अशा शब्दांत येतो. घर-बंगला, खानावळ-हॉटेल, पंतोजी-मास्तर, बाथरूम-न्हाणीघर, पाठशाळा-कॉलेज, वैद्य-डॉक्टर या शब्दांत परभाषेच्या संपर्काने अर्थभेद आलेला आहे. कधीकधी व्यावहारिक सोयीसाठी दोन शब्दांत अर्थभेद मानावा लागतो. उदाहरणार्थ; फुलपात्र व पुष्पपात्र, Semantics म्हणजे अर्थशास्त्र असे असले तरी त्यामुळे Economics निर्देशित होत असल्याने तेथे आपणास अर्थविचार हा अर्थभेद स्वीकारावा लागतो.

**अर्थसार** : काही शब्दांचा वापर त्यात समाविष्ट होणाऱ्या सर्व शब्दांसह केला जातो. म्हणजेच हे घटकशब्द स्वतंत्रपणे व्यक्त होणाऱ्या अर्थाहून कितीतरी व्यापक अर्थ व्यक्त करतात. अशा शब्दातून मुळातील विस्तृत अर्थ साररूपाने सांगितला जातो. उदाहरणार्थ; अठरा विश्वे दारिद्र्य, नरो वा कुंजरो वा, ग्यानबाची मेख, कालाये तस्मै नमः कर्तासवरता पुरुष, देवधर्म, शांतं पापम् इत्यादी. काही वेळा ही प्रक्रिया अत्यंत संक्षिप्त होते. उजाडणे (सूर्योदय होणे), मावळणे (सूर्यास्त होणे), पचणे (अन्नपचन होणे), वाचणे (बहुश्रुत होणे) या क्रियापदात आणि यात्रा (प्रेतयात्रा), वारी (पंढरीची) या सारख्या नामाबाबतही अर्थसाराची प्रक्रिया घडते. ज्ञानमेवामृतम, बहुजन सुखाय बहुजन हिताय यासारखी घोषवाक्ये वा ध्येयवाक्ये ही अर्थसाराचीच उदाहरणे आहेत.

**अर्थपरिवर्तनाचा भाषेवर परिणाम**

अर्थपरिवर्तनाचा परिणाम भाषेच्या संरचनेला फारसा धक्का लावत नाही. संपूर्ण भाषिक समाजाची मान्यता प्राप्त झाल्याखेरीज अर्थातील कोणताही बदल त्या समाजाची भाषा स्वीकारत नाही. ध्वनिपरिवर्तनापेक्षा अर्थपरिवर्तनाचा वेग व उदाहरणे कमी असतात. कारण समाजाच्या

परंपराप्रियतेमुळे शब्दाच्या अर्थाबाबत समाज परंपरानिष्ठ असतो. तो आपल्या भाषेला स्थिर ठेवणारे संकेत बदलण्यास तयार नसतो. यामुळे एखाद्या विस्तृत प्रदेशातील प्रमाणभाषा व बोली यांच्यातील शब्दांच्या अर्थामध्ये फारसा फरक पडत नाही. उच्चारामध्ये फरक पडण्याची मात्र शक्यता असते. उदाहरणार्थ, प्रमाण मराठी भाषेतील /ळ्/ या स्वनाचे अहिराणी भाषेत-बोलीत /य्/ असे रूपांतर होते. त्यामुळे तेथे डोळा, शाळा या शब्दांचे डोया, शाया असे शब्दरूपांतर होते. मात्र अर्थपरिवर्तन सहसा होत नाही. स्थल आणि काल अशा उभ्या आडव्या धाग्यांनी भाषेचा इतिहास विणला जातो. मराठीबाबत उगमकाळ, यादवकाळ, बहामनीकाळ, शिवकाळ, पेशवेकाळ, आंग्लकाळ, वर्तमान या क्रमाने भाषेचा कालसापेक्ष अभ्यास करता येतो. तर खानदेशी, वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी, डांगी या मराठीच्या प्रांतिक बोलीद्वारे हा भाषिक अभ्यास स्थलसापेक्ष होतो.

## ४.४ शब्दार्थ व टिपा

- **स्वर :** वर्णमालेतील अ, आ पासून ओ, औ पर्यंतच्या वर्णांना 'स्वर' असे म्हणतात. स्वरांचा उच्चार होत असताना ओठांच्या किंवा जिभेच्या विविध हालचाली होतात पण ओठांचा किंवा जिभेच्या कोणत्याही भागाचा मुखातील कोणत्याही अवयवाशी स्पर्श न होता मुखावाटे जो ध्वनी बाहेर पडतो त्यांना स्वर असे म्हणतात. स्वरोच्चाराचे वेळी हवेचा मार्ग अडविलेला नसतो. स्वर म्हणजे नुसते सूर.
- **व्यंजन :** मराठी वर्णमालेतील क्, ख्, ग् पासून ह्, ळ् पर्यंतचे वर्ण असे आहेत की त्यांचा उच्चार स्वतंत्रपणे करता येत नाही. या वर्णांचा उच्चार पूर्ण करण्यासाठी शेवटी 'अ' या स्वराचे साहाय्य घ्यावे लागते. अशा वर्णांना 'व्यंजने' असे म्हणतात. व्यंजने अपूर्ण उच्चारांची आहेत. ती पूर्ण होण्यास स्वराची मदत घ्यावी लागते. व्यंजनाचा उच्चार करताना हवेचा मार्ग वागिंद्रियांच्या साहाय्याने अडविला जातो.
- **ऱ्हस्व स्वर :** यांचा उच्चार करायला वेळ कमी लागतो म्हणून त्यांना ऱ्हस्व स्वर म्हणतात.
- **दीर्घ स्वर :** यांचा उच्चार करायला वेळ अधिक लागतो. म्हणजेच यांचा उच्चार लांबट असतो म्हणून त्यांना दीर्घ स्वर म्हणतात.
- **मात्रा :** ऱ्हस्व व दीर्घ हे स्वरांचे प्रकार उच्चार करावयास लागणाऱ्या कालावधीवरून ठरवितात. त्यांनाच 'मात्रा' असे म्हणतात. ऱ्हस्व स्वर उच्चारण्यास जो वेळ लागतो त्याची एक मात्र व दीर्घ वा संयुक्त स्वरांच्या दोन मात्रा मानतात.
- **अनुनासिक :** ज्या वर्णांचा उच्चार नासिकेतून म्हणजेच नाकातून होतो, त्यांना अनुनासिक वर्ण म्हणतात उदाहरणार्थ, ङ्, ञ, ण्, न्, म् इत्यादी.

- **महाप्राण व्यंजन :** 'ह' या वर्णाचा उच्चार करताना फुफ्फुसातील हवा तोंडावाटे जोराने फेकली जाते. म्हणून याला महाप्राण असे म्हणतात. ख्, घ्, छ्, झ्, ठ्, ढ्, थ्, ध्, फ्, भ्, श्, ष्, स् या वर्णात ह् या उच्चाराची छटा असल्यामुळे या व्यंजनांना महाप्राण व्यंजने म्हणतात.
- **अल्पप्राण व्यंजन :** वरील महाप्राण व्यंजने सोडून इतर व्यंजनांना अल्पप्राण व्यंजने म्हणतात मात्र 'ळ्' हा स्वतंत्र वर्ण मानला जातो. अल्पप्राण व्यंजने उच्चारताना महाप्राण व्यंजनाप्रमाणे हवा जोरात बाहेर फेकली जात नाही.
- **घोष वर्ण :** सर्व स्वर व क् च् ट् त् प् वर्गातील शेवटची तीन व्यंजने आणि य् र् ल् व् ह् ळ् यांना नाद किंवा घोष वर्ण असे म्हणतात. हे मृदू वर्ण असतात.
- **अघोष वर्ण :** क् च् ट् त् प् या वर्गांतील पहिली दोन व्यंजने म्हणजेच श्वास किंवा अघोष वर्ण होय. हे कठोर वर्ण असतात.
- **परिवर्तन :** प्रक्रिया बदल
- **Semantics :** अर्थविज्ञान; ही संज्ञा प्रथम १८९७ मध्ये मायकेल ब्रेआल याने वापरली. Semantique या फ्रेंच शब्दावरून आलेली ही संज्ञा अनेकवचनी आहे.
- **चिन्ह :** वर्ण अथवा शब्द यासाठी वापरले जाणारे मूलध्वनी
- **संकेत :** ज्याच्या मदतीने आशय व्यक्त होतो ती भाषा
- **सांस्कृतिक आदान :** एका संस्कृतीकडून दुसऱ्या संस्कृतीने घेतलेल्या सवयी, लकबी, शब्द. परभाषेतून ध्वनी, शब्द, वाक्यरचना इत्यादी भाषिक वैशिष्ट्ये स्वभाषेत घेणे.
- **वज्रचुडेमंडित :** जिच्या हातातील लग्नात घातलेला बांगड्यांचा चुडा वज्रासारखा पक्का आहे, अशा चुड्याने सुशोभित सौभाग्यवती स्त्री.
- **सीमित :** मर्यादित, संकुचित, कमीतकमी

## ४.५ समारोप

भाषा ही सामाजिक संस्था असल्याने ती जिवंत व परिवर्तनशील आहे. त्यामुळे भाषेत सातत्याने बदल होत असतात. भाषिकाच्या सुलभीकरणाच्या सवयीमुळे भाषेतील ध्वनी व अर्थ बदलत राहतात. त्यामुळे कालच्यासारखी आजची भाषा नसते. ध्वनी व वर्ण हे भाषेचे बाह्यांग असले तरी ध्वनिपरिवर्तनाचा भाषेवर परिणाम होतोच. त्यामुळे एक ध्वनी व उच्चार अनेक असा प्रकार होतो तर वर्णांची संख्या कमी जास्त होऊ शकते.

अर्थपरिवर्तनाने भाषेच्या शब्दभांडारात नवीन शब्दाची भर पडते. त्याचप्रमाणे स्वभाषेत नसणारे स्वन आपल्या भाषेत प्रवेश करतात. इंग्रजी भाषेच्या संपर्काने (बॅट, बॉल) ॲ, ऑ हे दोन नवीन

स्वन मराठीत आले. 'स्ट' हा ध्वनिसमूह मराठीत शब्दारंभी तरी अपरिचितच होता. त्यामुळे स्टेशन, स्टाईल, स्टॅण्डर्ड असे शब्द मराठीत आले. असे शब्द व त्यांचे अर्थ भाषेचे अविभाज्य घटक बनतात. परभाषेतील शब्द वा स्वन आपल्या भाषेत आल्यावर त्यांचे आपल्या भाषेतील व्याकरणिक स्थान पटकन निश्चित होत नाही. 'दर्जी' हा शब्द पुल्लिंगी आहे. मग 'एनर्जी' हा ईकारान्तच असणारा शब्द स्त्रीलिंगी का ? एनर्जी म्हणजे शक्ती की उत्साह, कळत नाही. तसेच 'बस' चे अनेकवचन मराठी भाषिक 'बशी' (म्हैस : म्हशी) असे करेल. त्याप्रमाणे 'बशीला उशीर झाला' असे म्हणेल. पण द्वैभाषिक मराठी माणूस मात्र 'बसेस्' हे अनेकवचन लक्षात ठेवून 'बसला उशीर झाला' असे म्हणेल. एकंदरीत स्वनपरिवर्तन व अर्थपरिवर्तन यांच्या सीमारेषा आपणास ठळकपणे आखता येणार नाहीत.

## ४.६ सरावासाठी प्रश्न

**योग्य पर्याय निवडा.**

१. भाषेतील नव्वद टक्के परिवर्तन कोणत्या कारणाने होते?
   (आळस / अज्ञान / आघात)

२. लगतचे स्वन परस्परांची जागा घेतात, त्या ध्वनिपरिवर्तनाच्या प्रक्रियेस काय म्हणतात?
   (आद्यस्वनागम / द्विस्वनीकरण / स्वनविपर्यय)

३. ज्यांचा आहार सात्त्विक त्यांचे उच्चार कसे असतात?
   (उत्तम / यथामूल / खणखणीत)

४. घरीब (फार्सी) चे गरीब (मराठी) असे अर्थपरिवर्तन कोणत्या प्रकारात येते?
   (अर्थविस्तार / अर्थप्रशस्ती / अर्थादेश)

५. 'गोडगळा' हा शब्द अर्थपरिवर्तनाच्या कोणत्या कारणाने घडला आहे?
   (साम्यतत्त्व / साहचर्य / लक्षणाजन्यता)

६. शाळा या शब्दाचे परिवर्तन शाया असे कोणत्या बोलीत होते?
   (अहिराणी / डांगी / वऱ्हाडी)

**उत्तरे :** १. आळस    २. स्वनविपर्यय    ३. यथामूल
४. अर्थप्रशस्ती    ५. साहचर्य    ६ अहिराणी

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. ध्वनिपरिवर्तन म्हणजे काय ते सांगून त्याची सोदाहरण कारणे लिहा.

२. ध्वनिपरिवर्तन म्हणजे काय ते सांगून त्याचे प्रकार सोदाहरण लिहा.

३. अर्थपरिवर्तन म्हणजे काय? त्याची कारणे सोदाहरण लिहा.

४. अर्थपरिवर्तन म्हणजे काय? त्याचे प्रकार सोदाहरण लिहा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. अनुकरणाच्या अपूर्णतेमुळे होणारे ध्वनिपरिवर्तन सोदाहरण लिहा.

२. भिन्नभाषिक संबंधामुळे होणारे ध्वनिपरिवर्तन स्पष्ट करा.

३. गुण, वृद्धी व संप्रसारण हे ध्वनिपरिवर्तनाचे तीन प्रकार स्पष्ट करा.

४. अर्थविस्तार व अर्थसंकोच कसा होतो ते उदाहरणे देऊन सांगा.

५. सांस्कृतिक आदानाचे स्वरूप स्पष्ट करून मराठीत अर्थदृष्ट्या झालेले सांस्कृतिक आदान उदाहरणासह लिहा.

६. समाज अर्थान्तर कसा करतो ते सोदाहरण सांगा.

**४.७ अधिक वाचन**

१. भाषाविज्ञान आणि मराठी भाषा : डॉ. अनिल गवळी

२. ध्वनिविचार : डॉ. ना. गो. कालेलकर

३. मराठीचा अर्थविचार : डॉ. अनुराधा पोतदार

**४.८ उपक्रम**

१. सोशल मिडियाच्या वापरामुळे काही नवीन उच्चार रूढ झाले का याचा शोध घ्या. या उच्चारांची यादी करा.

२. स्वयंपाकघरात पूर्वीपेक्षा कोणते नवे शब्द समाविष्ट झाले व जुने शब्द वापरून नाहीसे झाले याची वर्गवारी करा.

❑❑❑

**सत्र २ : घटक १**

**(विभाग १ Module I)**

# वाक्यविचार

## १.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, आधुनिक भाषाविज्ञानातील संरचना आपण समजावून घेत आहोत. गेल्या सत्रात दुसऱ्या घटकात आपण वर्णनात्मक अथवा संरचनावादी भाषाविज्ञानातील स्वन, स्वनिम आणि रूप, रूपिम हे टप्पे पाहिले. या घटकात वाक्यविन्यास (वाक्यविचार) आणि अर्थविन्यास (अर्थविचार) हे घटक पाहणार आहोत. हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला;

- वाक्यविन्यासाचे स्वरूप समजावून घेता येईल.
- अर्थविन्यासाचे स्वरूप समजावून घेता येईल.
- आधुनिक अथवा संरचनावादी भाषाविज्ञानातील वाक्य व अर्थ या घटकांची सविस्तर ओळख होईल.

## १.२ प्रास्ताविक

साधारणत: १९३० ते १९५५ हा काळ संरचनावादी भाषाभ्यासाचा काळ म्हणून ओळखला जातो. अमेरिकन भाषावैज्ञानिक ब्लूमफील्ड हाच या अभ्यासपद्धतीचा प्रणेता आहे. वर्ण्यविषयाचे विविध स्तर उलगडून दाखविणे, प्रत्येक स्तरावरील घटक स्पष्ट करणे, त्या घटकांचे अंत:संबध स्पष्ट करून; या संबंधावर आधारलेली व्यवस्था स्पष्ट करणे अशा प्रकारच्या अभ्यासाला संरचनात्मक अभ्यास म्हणतात. भाषेच्या अभ्यासात ही पद्धती ब्लूमफील्ड आणि त्यानंतर बर्नाड ब्लॉक, जॉर्ज ट्रेगर, झीलिग हेरिस, युजिन नायडा, मार्टिन जूस, सलॉन बेल्झ, चार्लझ् हॉकेट या अभ्यासकांनी वापरली. अमेरिकेमध्ये विस्तार पावलेली ही भाषाभ्यासाची पद्धत असल्याने या अभ्यासाला संरचनावादी किंवा अमेरिकन संरचनावादी अभ्यासाची पद्धत म्हणून ओळखले जाते. स्वनविज्ञान, स्वनिमव्यवस्था, रूपिमव्यवस्था, वाक्यव्यवस्था आणि अर्थविन्यास असे पाच स्तर कल्पून ब्लूमफील्डने भाषाभ्यास केला. तथापि अर्थाचे क्षेत्र व्यामिश्र आणि गुंतागुंतीचे असल्याने या क्षेत्राचा शास्त्रीय अभ्यास अशक्य आहे हे लक्षात आल्यानंतर आपल्या भाषाविचारातून त्याने 'अर्थ' स्तराला बाजूला ठेवले.

ब्लूमफील्डने आपल्या भाषाविचारात अर्थविचार बाजूला ठेवला. त्यामुळे त्याच्या प्रभावाखाली भाषाभ्यास करणाऱ्या अभ्यासकांनीही या भाषिक पैलूची धास्ती घेतली होती. भाषेच्या इतर चार स्तरापेक्षा अर्थाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करण्यात काही अडचणी होत्या. कारण भाषेतील अर्थाविषयी काही सिद्धांत इतक्या व्यापक स्वरूपात मांडले गेले होते की; या सिद्धांतांची व्यवस्था भाषाविज्ञानाच्या संकल्पनात्मक चौकटीमध्ये लावणे गुंतागुंतीचे होते. अमेरिकन संरचनावादी अभ्यासामध्ये अर्थाचा विचार क्षीण असला तरी पुढे हा विचार विकसित झाल्याचे दिसते. त्यातूनच भाषेतील शब्दसंग्रहाच्या अर्थरचनेविषयी थोडीफार मर्मदृष्टी युरोपियन अभ्यासकांना प्राप्त झाली.

## १.३ विषय विवेचन

### ■ वाक्यविन्यास

भाषेत निवडक मानवी ध्वनी वापरले जातात. हे ध्वनी भाषेत कसे कार्य करतात, या संदर्भातील विचार रूपिका-रूपिम-रूपिकान्तरांच्या अभ्यासात होतो. रूपिम हा भाषेतील सर्वात लहान सार्थ घटक असतो. तत्पूर्वी आपण स्वनांचा विचार करताना भाषाध्वनी असलेल्या ध्वनींची क्षमता आणि कार्य पाहिले. भाषाविचारात 'अर्थ' ही गोष्ट सर्वात महत्त्वाची आहे. कारण भाषेचा जन्मच अर्थनिर्मितीसाठी, आशयाच्या वहनासाठी झालेला आहे. भाषेच्या संरचनात्मक अभ्यासात 'अर्थविचाराकडे' दुर्लक्ष झाल्याचे दिसते. तथापि रूपिम विचारापासून अर्थाचा विचार सुरू होतो. कारण रूपिका ही सार्थ आहे. रूपिकाचे वैशिष्ट्य म्हणजे अर्थाच्या दृष्टीने तिचे पुन्हा विभाजन होत नाही. म्हणून तिला रचना म्हणता येत नाही. रूपिमानंतरची सर्व भाषिक रूपे मात्र रचनाच असतात. रूपिकांच्या नंतर भाषेत शब्द, पदबंध, उपवाक्य आणि वाक्य अशा रचना पाहावयास मिळतात. रूपिकांचा विचार नोंदवितांना शब्द या संकल्पनेचा विचार केलेला आहे. तो पुन्हा वाक्याचा विचार करतानाही करावा लागतो.

### ■ पदबंधाचे स्वरूप

शब्दाच्या पुढची रचना म्हणजे पदबंध होय. भाषाव्यवहारात शब्द विशिष्ट अर्थाने आणि रचनातत्त्वाने एकमेकांशी जुळतात तेव्हा पदबंध तयार होतो. उदाहरणार्थ, शेतामधील हिरवी पिके, महाविद्यालयाचे दोन खेळाडू, पूर्वेकडील डोंगर ही भाषिक रूपे पदबंध आहेत. पदबंध तयार होण्यासाठी दोन गोष्टी महत्त्वाच्या मानल्या जातात. १) आंतरिक स्थैर्य आणि २) बाह्य स्वातंत्र्य ही बाब आपण उदाहरणाच्या आधारे समजून घेऊ. पदबंधातील शब्दांचा क्रम आणि जुळणी यांत फरक किंवा बदल न होणे याला आंतरिक स्थैर्य म्हणता येते. उदाहरणार्थ, महाविद्यालयाचे दोन खेळाडू हा पदबंध दोन खेळाडू महाविद्यालयाचे किंवा शेतामधील हिरवी पिके, ऐवजी पिके हिरवी शेतामधील

अशा रचना भाषाव्यवहारात केल्यास आंतरिक स्थैर्य नाहीसे होते. परंतु पदबंधाच्या बाह्यस्वातंत्र्यामध्ये समग्र पदबंधच आपली जागा बदलू शकतो.

उदाहरणार्थ, दिवस मावळायच्या अगोदर आपल्याला घरी गेले पाहिजे. हेच वाक्य आपण 'आपल्याला घरी दिवस मावळायच्या अगोदर गेले पाहिजे' असे बोलू शकतो. अधोरेखित पदबंध वाक्यात शब्दासारखा वापरला गेला आहे. त्याची जागा बदलूनही वाक्यातील अर्थ तोच राहतो. म्हणजेच पदबंध वाक्यात शब्दासारखे वापरत असतात. ज्याप्रमाणे शब्दांचे विविध प्रकार पडतात तसेच प्रकार पदबंधाचेही पडतात. पदबंधाचे नामपदबंध, विशेषण पदबंध, क्रियाविशेषण पदबंध, क्रियापद पदबंध असे प्रकार पडतात. पदबंध ही रचना केवळ शब्दांनीच घडते असे नाही तर काही वेळा ती दोन किंवा अधिक पदबंधाचीही असते.


## ■ वाक्याचे स्वरूप


पदबंध म्हणजे काय ही गोष्ट आपल्याला समजली असेल. पदबंधाच्या विचारानंतर आता आपण वाक्याचा विचार करू. वाक्य ही भाषेतील सर्वात मोठी रचना असते. वाक्याचे उद्देश्य आणि विधेय असे दोन भाग पडतात. म्हणजेच उद्देश्य आणि विधेय हे वाक्याचे प्रथमोपस्थित संघटक असतात. उद्देश्य या संघटकामध्ये कर्ता आणि त्याची विशेषणे यांचा अंतर्भाव होतो. तर विधेय या संघटकामध्ये कर्म, पुरके, क्रियाविशेषणे व क्रियापदे यांचा अंतर्भाव होतो. वाक्याचा विचार करताना आणखी एक गोष्ट समजून घेतली पाहिजे. भाषाव्यवहारातील विविध वाक्यांचे निरीक्षण केल्यानंतर बऱ्याचदा वाक्ये आणि, पण, परंतु, म्हणून, जेव्हा-तेव्हा, जर-तर इत्यादी संबंधवाचक शब्दांनी जोडलेली दिसतात. येथे दोन वाक्ये एकत्र येऊन वाक्यरचना होते. उदाहरणार्थ,

१. वीज गेली आणि कारखाना बंद झाला.


२. वीज गेल्याने कारखाना बंद झाला म्हणून कामगार घरी गेले.

येथे दोन वाक्ये एकत्र येऊन वाक्यरचना झालेली आहे. अशावेळी रचनेत आलेल्या वाक्यांना उपवाक्य म्हणतात. उपवाक्य हे खरेतर वाक्यच असते. कारण वाक्याची आणि उपवाक्याची रचना सारखीच असते. भाषिक रचनेत एखादे वाक्यच संघटक म्हणून येते तेव्हा त्या वाक्याला उपवाक्य म्हणतात. वाक्यविचारात वाक्याच्या संपूर्ण रचनेच्या विश्लेषणाला महत्त्व असते. वाक्याची रचना रूपिम→शब्द→पदबंध→वाक्य अशी घडलेली दिसते. संपूर्ण वाक्याचे निरीक्षण केल्यानंतर आपल्याला असे दिसते की, रूपिम हे वाक्याचे प्रथमोपस्थित संघटक असतात, शब्द हे पदबंधाचे प्रथामोपस्थित संघटक असतात तर पदबंध हे वाक्याचे प्रथमोपस्थित संघटक असतात. वाक्यविचाराच्या अभ्यासक्षेत्राची या संदर्भाने पुढील आकृती देता येते.




जेव्हा पदबंधाचा प्रथमोपस्थित संघटक शब्द न मिळता पदबंधच मिळत असेल तेव्हा पदबंध व शब्द या पायऱ्यांच्यामध्ये पुन्हा पदबंध अशीच आणखी एक पायरी मिळेल. जसे;




प्रथमोपस्थित संघटक मिळवण्याची ही पद्धत उदाहरणाने अधिक स्पष्ट होईल. पुढे 'गुरुजींनी आणलेली गणपतीची मूर्ती मनाला प्रसन्नता देते' हे वाक्य उदाहरणादाखल घेतले आहे, ते नीट पाहा :

गुरुजींनी आणलेली गणपतीची मूर्ती मनाला प्रसन्नता देते

टप्पा ‘अ’ गुरुजींनी आणलेली गणपतीची मूर्ती | मनाला प्रसन्नता देते

टप्पा ‘ब’ गुरुजींनी आणलेली | गणपतीची मूर्ती

शब्द गुरुजींनी | आणलेली | गणपतीची | मूर्ती

वरील उदाहरणातील टप्पा ‘अ’ येथील रचना पदबंध असून त्या संपूर्ण वाक्याच्या प्रथमोपस्थित संघटक आहेत, तर टप्पा ‘ब’ येथील (१) गुरुजींनी आणलेली व (२) गणपतीची मूर्ती या रचनाही पदबंध असून त्या टप्पा ‘अ’ च्या (‘गुरुजींनी आणलेली गणपतीची मूर्ती’ या पदबंधाच्या) प्रथमोपस्थित संघटक आहेत. वाक्याचे प्रथमोपस्थित संघटक म्हणजे उद्देश्य व विधेय ही दोन्ही होत. उद्देश्याचे प्रथमोस्थित संघटक म्हणजे मूळ उद्देश्य आणि उद्देश्यविस्तार हे होत. त्याचप्रमाणे विधेयाचे प्रथमोपस्थित संघटक म्हणजे मूळ विधेय आणि विधेयविस्तार हे होत. जुन्या व्याकरणाच्या परिभाषेत बोलायचे झाले तर मूळ उद्देश्य म्हणजे कर्ता आणि मूळ विधेय म्हणजे क्रियापद होय.


भाषेतील सर्व वाक्ये संरचनायुक्त असतातच असे नाही. भाषेत काही तयार वाक्ये असतात. उदाहरणार्थ; अर्थात, खरंच, अस्सं का, कोण जाणे, काय एकेक नवल, चावट कुठचा, इत्यादी. या तयार वाक्यांचे निरीक्षण केले तर आपल्या असे लक्षात येईल की, ती बहुतांशी उद्‌गारवाचक आहेत. या वाक्यांमध्ये उद्देश्य व विधेय हे प्रथमोपस्थित घटक मिळावेत अशी संरचना नसते. याखेरीज भाषेतील काही वाक्यांमध्ये उद्देश्य हा प्रथमोपस्थित घटकच अनुपस्थित असतो. उदा. उजाडले, सांजावलेले इत्यादी. काही वाक्यांत उद्देश्य हा प्रथमोपस्थित घटक अध्याहृत असतो. उदाहरणार्थ; इथून ऊठ, पटकन घे इत्यादी. भाषेतील तयार रचना, उद्देश्य हा संघटक अनुपस्थित असणाऱ्या रचना आणि उद्देश्य अध्याहृत असणाऱ्या रचना यांचा विचार प्रथमोपस्थित संघटक विश्लेषण पद्धतीने करता येणार नाही. मुख्य म्हणजे अशा रचना ह्या ती ती भाषा बोलणाऱ्याच्या खास लकबा असतात आणि त्या परिचयाने किंवा प्रत्यक्ष वापरानेच आत्मसात करता येतात. (संदर्भ : सुलभ भाषाविज्ञान, द. दि. पुंडे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पृष्ठक्रमांक १०२-१०३)

## ■ प्रथमोपस्थित संघटक


संरचनावादी भाषाभ्यासात वाक्याचे विश्लेषण देणे म्हणजे त्या वाक्यातील संघटक स्पष्ट करणे होय. वाक्याचे विश्लेषण पदबंध, शब्द आणि रूपिमांच्या स्तरावर करता येते. रूपिम आणि पदबंधाची चर्चा आपण वरील मुद्यांमध्ये केलेली आहेच. येथे आपण वाक्याचे प्रथमोपस्थित संघटक

पाहाणार आहोत. रूपिम हे वाक्यातील अंतिम संघटक असतात. रूपिमांच्या नंतर मात्र विश्लेषण करता येत नाही. म्हणूनच त्याला वाक्यातील अंतिम संघटक असे म्हणतात. वाक्याचे विश्लेषण करताना अंतिम संघटकापासून विश्लेषण करता येत नाही. ज्यावेळी रचना केवळ दोन घटकांची बनलेली असते त्यावेळी त्या वाक्याचे विश्लेषण अंतिम संघटकांत देणे शक्य असते. परंतु अनेकअवयवी रचनेत तसे करता येत नाही. उदाहरणार्थ, 'माझ्या वर्गातील मुलगी' या रचनेत शब्दस्तरावर माझ्या, वर्गातील, मुलगी असे तीन संघटक दिसतात. ही रचना हे तीन संघटक एकदम एकत्र येऊन मिळत नाही. येथे प्रथमोपस्थित संघटक महत्त्वाचा असतो. येथे प्रथम 'माझा वर्ग' असा पदबंध मिळतो. नंतर 'माझ्या वर्गातील मुलगी' असा पदबंध बनतो. म्हणजेच ही रचना टप्प्याटप्प्याने घडते. यासाठी आणखी एक उदाहरण पाहा. (प्रथमोपस्थित संघटक ही संकल्पना प्रथम लेनर्ड ब्लूमफील्ड यांनी मांडली आहे.)

**१) पदबंध**





**२) पदबंध**





अंतिम रचना ज्या नजीकच्या संघटकांनी सिद्ध होते, त्या संघटकांना त्या रचनेचे प्रथमोपस्थित संघटक असे म्हणतात. वाक्यविश्लेषणामध्ये अंतिम संघटकापर्यंत पोहोचताना वरील उदाहरणातील संघटकांपैकी जे संघटक रचनास्वरूप असतील, त्यांचेही प्रथमोपस्थित संघटकांमध्ये विश्लेषण केले जाते. अशा पद्धतीने टप्प्याटप्प्याने विश्लेषण करीत अंतिम संघटकांपर्यंत पोहोचता येते.

उदाहरणार्थ,

१.




२.




या विश्लेषणालाच प्रथमोपस्थित संघटक पद्धतीचे विश्लेषण म्हणतात. या विश्लेषणाचे निरीक्षण केल्यानंतर आपल्याला एक गोष्ट लक्षात आली असेल की, प्रत्येक टप्प्यात दोन दोन संघटकातच हे विश्लेषण होत असते. याचे कारण आपल्या भाषाव्यवहारात आहे. आपण बोलताना कोणाबद्दल तरी आणि काहीतरी बोलत असतो. त्यामुळे उद्देश्य आणि विधेय (याची चर्चा वाक्याचे स्वरूप समजून घेताना केलेली आहे) असे आपल्या बोलण्यातच दोन घटक असतात. म्हणून प्रथमोपस्थित संघटक नेहमी दोनच आढळतात.

## ■ कार्यात्मक प्रवर्ग : कर्ता – कर्म – क्रियापद

वाक्यातील संघटकांचे कार्यात्मक प्रवर्ग अनेक उदाहणांसह डॉ. द. दि. पुंडे यांनी आपल्या सुलभ भाषाविज्ञान या पुस्तकात स्पष्ट केलेले आहेत. यासंदर्भातील त्यांचे पुढील विवेचन वाचा.


प्रथमोपस्थित संघटक पद्धतीने केले जाणारे वाक्याचे पृथक्करण पारंपरिक व्याकरणातील वाक्यपृथक्करणासारखेच आहे. कारण उद्देश्य व विधेय असेच वाक्याचे आपण प्रथमोपस्थित संघटक मानलेले आहेत. इतकेच नव्हे तर उद्देश्याचे मूळ उद्देश व उद्देश्यविस्तार आणि विधेयाचे मूळ विधेय व विधेयविस्तार असेही घटक पुढच्या पायरीवर उपलब्ध होऊ शकतात, हेही आपण मानलेले आहे.


मूळ उद्देश्यास पारंपरिक व्याकरणात कर्ता म्हटलेले आहे. कर्ता हा क्रियेस प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार असतो. ज्या कर्त्यामुळे साक्षात क्रिया घडते त्यास प्रत्यक्ष कर्ता म्हणतात. उदाहरणार्थ; राम पुस्तक वाचतो, मुलगा कैऱ्या पाडतो. येथे 'राम', 'मुलगा' ही पदे प्रत्यक्ष कर्ता आहेत. जेव्हा एखादी क्रिया कर्त्याच्या ठिकाणी घडत असते, तेव्हा त्या कर्त्याला अप्रत्यक्ष कर्ता म्हणतात. उदाहरणार्थ; तिला चहा हवा. सारांश, वाक्यात दर्शविलेल्या क्रियेला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार असणाऱ्या नामपदबंधास मूळ उद्देश्य किंवा कर्ता म्हणता येईल.

'मूळ उद्देश्य' वाक्यात नेहमीच एकेरी येईल असे नाही. अनेकदा त्याच्या जोडीला विस्तारक पदबंध असतात. उदाहरणार्थ; 'पांढरी टोपी घातलेला मुलगा खोड्या करतो' या वाक्यात 'मुलगा' हे मूळ उद्देश्य आहे आणि 'पांढरी टोपी घातलेला' हे त्या उद्देश्याचे विस्तारक आहे. उद्देश्यविस्तारक पदबंध हा मूळ उद्देश्याचे विशेषण असतो किंवा विशेषणाचे कार्य करणारा पदबंध असतो. उद्देश्यविस्तारक पदबंध पुन्हा एकेरी असेलच असे नाही. त्याचेही कदाचित प्रथमोपस्थित घटक पडू शकतील. उदाहरणार्थ; 'पांढरी टोपी घातलेला' या विशेषणपदबंधाचे 'पांढरी टोपी' व 'घातलेला' असे प्रथमोपस्थित संघटक होतील. 'विधेय' भागातील केंद्रवर्ती संघटक म्हणजे क्रियापद. मराठी क्रियापदाचे एकेरी क्रियापद (उदा. तो **हसतो**) आणि संयुक्त क्रियापद (उदा. तो **हसतो आहे**) असे दोन प्रकार दिसतात. संयुक्त क्रियापदामध्ये एक क्रियापद प्रत्यक्ष क्रियेचे वाचक किंवा निदर्शक असते, तर दुसरे त्याला साहाय्य करणारे असते. प्रत्यक्ष क्रियेचे वाचक असलेल्या क्रियापदास मुख्य **क्रियापद** म्हणतात व साहाय्य करणाऱ्या कियापदाला **साहाय्यक क्रियापद** म्हणतात. 'तो हसतो आहे' या वाक्यातील 'हसतो' हे मुख्य क्रियापद असून 'आहे' हे साहाय्यक क्रियापद आहे. विधेयविस्तारक म्हणजे क्रियाविशेषण होय. 'कासव **हळूहळू** चालते', 'मुले **वर्गाबाहेर मोठमोठ्याने गप्पा मारीत** उभी होती' या वाक्यात '**हळूहळू**' आणि '**वर्गाबाहेर मोठमोठ्याने गप्पा मारीत**' हे घटक क्रियाविशेषणाचे कार्य करतात. 'हळूहळू' हे क्रियाविशेषणच आहे आणि '**वर्गाबाहेर मोठमोठ्याने गप्पा मारीत**' हा क्रियाविशेषण पदबंध आहे.

केवळ उद्देश्यविस्तारक + उद्देश्य + विधेयविस्तारक + विधेय अशा रचनेने वाक्यातून व्यक्त करावयाचा अर्थ प्रत्येक वेळी पूर्ण होईलच असे नाही. अनेकदा विधेयविस्तारकांबरोबरच विधेयाला अर्थपूरक ठरणारे असेही घटक वाक्यात येतात. या घटकांना **विधेयपूरके** म्हणतात. विधेयपूरके तीन प्रकारची असतात. १) आधारपूरक, २) कर्मपूरक, व ३) विधिपूरक. क्रियेला आधार देणाऱ्या घटकाला आधारपूरक म्हणतात. 'सूर्य **डोंगराआड गेला**', **'रामाने पुस्तकावर** नाव घातले', या वाक्यांमध्ये 'डोंगराआड' व 'पुस्तकावर' ही रूपे आधारपूरके होत. कारण सूर्याचे जाणे व रामाचे नाव घालणे या क्रियांची ती रूपे आधार होत.

कर्मपूरक म्हणजे पारंपरिक व्याकरणातील कर्मपदच होय. क्रियापदांचे सकर्मक क्रियापदे व अकर्मक क्रियापदे असे दोन प्रकार पडतात. कर्मपूरक या प्रकाराची अपेक्षा फक्त सकर्मक क्रियापदांच्या बाबतीतच असते. ज्या वाक्याच्या भूतकाळी रूपात कर्त्याला नी/ने/नं प्रत्यय लागतात, त्या वाक्यात येणारे क्रियापद सकर्मक असते. या आडाख्याने मराठीतील कोणती क्रियापदे सकर्मक व कोणती अकर्मक हे चटकन ओळखता येते. सकर्मक क्रियापदाला 'काय' किंवा 'कोणास' हे प्रश्न विचारले असता येणारे उत्तर कर्मपद दर्शविते. कधीकधी वाक्यात दोन कर्मपदे असतात. अशा वेळेस त्यांपैकी एक प्रत्यक्ष कर्म असते व दुसरे अप्रत्यक्ष कर्म असते. 'काय' या प्रश्नाने ठरणारे हे प्रत्यक्ष कर्म व 'कोणास' या प्रश्नाने ठरणारे ते अप्रत्यक्ष कर्म असे म्हणता येते. उदाहरणार्थ; 'श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितली' या वाक्यात 'गीता' हे प्रत्यक्ष कर्म आणि 'अर्जुनाला' हे अप्रत्यक्ष कर्म होय. विधिपूरक म्हणजे वाक्यातील कर्त्याचेच स्तित्यंतर किंवा भिन्न रूप दर्शविणारा घटक असतो. उदाहरणार्थ; 'त्याचा पुरता **मामा** झाला' या वाक्यातील **'मामा'** हा घटक 'त्याचा' या घटकाचेच भिन्न रूप होय. साधारणत: अस्तित्ववाचक (आहे, असतो) आणि स्थित्यंतरवाचक (हो, बन) अशा क्रियापदांच्या अर्थपूर्तीसाठी येतात ते वाक्यघटक विधिपूरक ठरतात. तिन्ही विधेयपूरकांना विस्तारके असू शकतात. त्यांचाही वाक्यविचारासाठी पृथक्करण करून विचार करायचा असतो. वरील विवेचनाच्या आधारे वाक्य विचारासाठी करावयाच्या वाक्यपृथक्करणाचा आराखडा पुढीलप्रमाणे होईल;






(संदर्भ : द. दि. पुंडे, सुलभ भाषाविज्ञान, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्रमांक १०४-१०६)

## ■ अर्थविन्यास

भाषा ही मानवी संप्रेषणासाठी अस्तित्वात आलेली व्यवस्था आहे. भाषेचा जन्म हा अर्थअभिव्यक्तीसाठी झालेला असून भाषिक संदेश हे अर्थच असतात. संरचनावादी भाषा अभ्यासात अर्थाचा विचार दुर्लक्षित राहिलेला आहे.याची कारणे 'अर्थ' या संकल्पनेतच दडलेली आहेत. ब्लूमफील्डनी आपल्या 'Language' या ग्रंथामध्ये अर्थाचा विचार केलेला आहे. ''त्यातील अर्थविचार हा पूर्णपणे वर्तनवादी भूमिकेवर, विशेषत: ''चेतक-प्रतिसाद'' या संकल्पनांच्या जोडीवर आधारलेला आहे. बोलणाऱ्याची परिस्थिती → बोलणे → ऐकणाऱ्याचा प्रतिसाद ही साखळी कार्यकारणसंबंधांवर आधारलेली असते, आणि भाषिक अर्थाची चर्चा ''बोलण्याच्या परिस्थितीतील चेतक'' या संकल्पनेच्या संदर्भातच करता येते, असे ब्लूमफील्डचे म्हणणे आहे. ''बोलणाऱ्याची परिस्थिती'' या संकल्पनेत संपूर्ण विश्वासाचाच समावेश होतो, आणि त्यामुळे अर्थाचा विचार करायचा तर विश्वालाच गवसणी घालणारे वैज्ञानिक वर्णन उपलब्ध हवे'' (आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, डॉ. मिलिंद मालशे, पृष्ठ ७३) हे ब्लूमफील्डचे अर्थासंदर्भातील विचार पाहता अर्थाची व्याप्ती कळते. अर्थ या भाषिक पैलूची अनेक भाषाभ्यासकानी धास्ती घेतलेली आहे. कारण त्यांनी भाषाविचार हा पैलू हेतूपुरस्सर टाळलेला दिसतो. तथापि अर्थाचा विचार केल्याखेरीज भाषेचा अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही. ब्लूमफील्डने रूपिमांच्या विश्लेषणासाठी अर्थाची चर्चा केली. अमेरिकन संरचनावादी भाषाभ्यास अर्थाचे १) शब्दलक्ष्यी/पदलक्ष्यी अर्थ आणि २) रचनालक्ष्यी अर्थ असे दोन प्रकार मानतात. अर्थविन्यासाच्या संदर्भात डॉ. अनिल गवळी यांनी आपल्या 'भाषाविज्ञान आणि मराठी भाषा' या ग्रंथामध्ये विस्ताराने विवेचन दिलेले आहे. हे विवेचन तुम्ही वाचा. विवेचन वाचल्यानंतर तुम्हाला अर्थविचाराची कक्षा समजेल.

अर्थविज्ञानाचा उद्‌गाता मायकेल ब्रेआल यांनी १८९७ मध्ये Semantics ही संज्ञा प्रथम वापरली. Semantique या मूळ फ्रेंच शब्दावरून आलेली ही संज्ञा अनेकवचनी आहे. डॉ. अशोक केळकर यांनी त्यास 'अर्थविन्यास' हा मराठी पर्याय सुचविला आहे. अर्थविचार, अर्थप्रक्रिया, अर्थविज्ञान, शब्दार्थशास्त्र असेही पर्याय मराठीत वापरलेले दिसतात. 'मराठीचा अर्थविचार' या ग्रंथात डॉ. अनुराधा पोतदार यांनी असे मत मांडले आहे की, ''भाषेतील शब्दांचे अर्थ का व कसे बदलतात हा अर्थविज्ञानाचा विषय असून शब्दांच्या अर्थामध्ये घडून येणारी परिवर्तने काही नियमांनुसार घडून येतात किंवा योगायोगाने व अकारण घडतात, या प्रश्नांची मीमांसा अर्थविज्ञानाच्या कक्षेत येते.''

१९५७ मध्ये नोम चॉम्स्की या अमेरिकन भाषावैज्ञानिकाने संरचनावादी भाषाविज्ञानातील अर्थविचाराची उणीव दर्शविली. अर्थातच त्यानंतर रचनान्तरवादी भाषाविज्ञानात वाक्य, रूपिम व स्वनिम यांचा विचार केल्याने अर्थविचाराचे वेगळे महत्त्व जाणवू लागले. या अर्थाविचाराच्या कक्षेत पुढील गोष्टी विचारात घेतलेल्या असतात.

आई, माय, माता, मातु:श्री, जननी हे शब्द समानार्थकता व्यक्त करतात. तो हुशार आहे, म्हणजे 'ढ' नाही, हा अन्वयार्थ आहे. कोल्हा, कुत्रा, मांजर, हत्ती येथे सर्व पाणी असल्याने अर्थसाधर्म्य आहे, पण प्राणी गटाशी पोथी, पुस्तक, पाटी, कागद, वही या गटाचा अर्थभेद दिसतो. काळोख-प्रकाश यात अर्थविरोध तर सोने, पितळ, चांदी या शब्दांत केवळ अर्थबहिष्कृती आहे. 'पुस्तक' या शब्दात खरे तर 'कागद' हा अर्थसमावेश असतो. 'गाय गवत खाते' या वाक्यात सार्थता आहे, तर 'गाय गवत पिते' या वाक्यात अर्थहीनता आहे. कागदपत्र, स्त्रीलेखिका, गायीचे गोमूत्र या शब्दात अर्थपुनरुक्ती आहे. 'हा चित्रपट मला आवडला' या वाक्यात चित्रपट पाहण्याचा अर्थ गृहीत आहे. तसेच अर्थविपरीतता, अर्थसूचन, अर्थविस्तार या प्रक्रियाही अर्थविचारात समाविष्ट होतात. अर्थविचाराची ही कक्षा व्यापक आहे.

## ■ अर्थाचे स्वरूप व व्याख्या

अर्थाची एकच एक अशी व्याख्या करता येत नाही किंवा कोणत्याही एका व्याख्येने अर्थाचे संपूर्ण असे स्पष्टीकरण मिळत नाही. **अर्थ म्हणजे निर्देश** असे म्हटले जाते. हत्ती हा शब्द एक विशिष्ट प्राण्याचा निर्देश करतो. मात्र चांगुलपणा, साहस, हुशारी अशा शब्दांचा अर्थ ऐंद्रीय अनुभूतीशी जोडणे अशक्य होते. घरे व रस्ते मिळून एक समूह मुंबई तर एक समूह पुणे होत असेल तर पुणे व मुंबई यासाठी जी ऐंद्रीय अनुभूती वापरली त्याचा अर्थाशी काही संबंध नसतो. त्यामुळे अर्थ म्हणजे निर्देश ही व्याख्या अथवा अर्थाचे स्वरूप आपणास मान्य होत नाही.

**अर्थ म्हणजे प्रतिमा** असेही सांगितले जाते. शब्द ही प्रतिमा उभी करतात. 'गाय' शब्द म्हणताक्षणीच ऐकणाऱ्याच्या नजरेसमोर गाईची प्रतिमा उभी राहते. सोस्यूर यांच्या विवेचनानुसार

शब्दाचे मिळणारे मानसिक चित्र (प्रतिमा) खरे तर अपुरेच असते. गायीची प्रतिमा कोणती ? पांढरी, काळी, तांबूस, भलीमोठी, आखूड शिंगाची का आणखी काही ? वशिंड नाही म्हणून तो प्राणी गाय आहे असेही म्हणता येत नाही. 'गरीब' या शब्दाची प्रतिमा कोणती ? स्वभावाने गरीब मनुष्य की पैशाने गरीब असलेला मनुष्य? शिवाय व, जर, तर अशा शब्दांतून कोणत्याच प्रतिमा उभ्या राहत नाही.

**अर्थ म्हणजे संकल्पना** ही व्याख्या वरील दोन व्याख्यांतील अपुरेपणा टाळण्यासाठी आली. ही व्याख्या सोस्यूर यांच्या विवेचनावर आधारलेली आहे. शब्द किंवा ध्वनी याला त्यानी चिन्हक (Signifier), शब्दांशी निगडित असणाऱ्या मानसिक प्रतिमेला चिन्हित (Signified) आणि चिन्हित व चिन्हक यांच्या संयोगाने तयार होणाऱ्या शब्दाला चिन्ह (Sign) असे म्हटले आहे. संकल्पना ही वस्तू नसते तशीच ती दृश्यही नसते. 'घर' हा शब्द अनेक अनुभवांचा समुच्चय दर्शवितो. थोडक्यात वस्तुस्थितीमध्ये असणारी प्रत्यक्ष परिस्थिती आपल्या मनात अनुभवाने एक मानसिक प्रतिमा, कल्पना उभी करते. त्याकरिता आपण शब्द हे एकक वापरतो. वाघ हा शब्द उच्चारताच पांढरा वाघ ही संकल्पना समोर उभी राहील असे नाही. वाघासंबंधी एक समान संकल्पना भाषिकांच्या मनात असते. त्याच अर्थाने पुणे, मुंबई, शहाणपणा अशा शब्दांबाबतच्या संकल्पना त्यांच्या मनात असतात. या अर्थाने ही व्याख्या तशी परिपूर्ण वाटते.

१९३३ मध्ये लेनर्ड ब्लूमफील्ड यांचे 'लॅंग्विज' हे पुस्तक प्रकाशित झाले. त्याच्या म्हणण्यानुसार अर्थ म्हणजे काय, याचे उत्तर भाषिकांच्या वर्तनात शोधले पाहिजे. शब्द हा संचेतक म्हणून कार्य करतो. हा शब्द ऐकून ऐकणारा जे उत्तर देईल, ती प्रतिक्रिया असते. ती प्रतिक्रिया म्हणजे त्या शब्दाचा अर्थ असतो. इथे प्रतिक्रियेतील अर्थ अगोदरच गृहीत धरलेला आहे. यामुळे हा सिद्धांत हास्यास्पद ठरतो. उदाहरणार्थ, मला थोडेसे पाणी देतोस का ? या संचेतकावर किमान आठ-नऊ उत्तरे (प्रतिक्रिया) देता येतील. त्यामुळे अशा उत्तरातून 'पाणी' या शब्दाच्या अर्थाचे निर्धारण होत नाही. उदाहरणार्थ, वरील प्रश्नाला 'साखर हवी का?' ही प्रतिक्रिया व्यक्त केल्यास 'पाणी' हा शब्द कसा निर्धारित होईल ?

**अर्थ म्हणजे विचार** असेही म्हणतात. मात्र विचार म्हणजे काय, हे स्पष्ट होत नाही. गांधीवाद हा विचार आहे, मनात चांगले विचार येणे, हिवाळ्यात गरम चहा घेणे हा उत्तम विचार आहे. या तीन वाक्यातील विचार हा शब्दाचे स्वरूप वेगळे आहे. विचार हे नाम आणि विचार करणे ही क्रिया या दोन गोष्टी भिन्न आहेत. यामुळे अर्थाचे हे स्वरूप अथवा व्याख्या संदिग्ध आहे. **अर्थ म्हणजे सत्य** या व्याख्येचे असेच आहे. उदाहरणार्थ, समोरची भिंत दगडी आहे, असे एखाद्याने म्हटले आणि दुसऱ्याने जर तेथीलच शेजारच्या मातीच्या भिंतीकडे निर्देश केला तर पहिले विधान असत्य व निरर्थक ठरते. वास्तविक ते निरर्थक होत नाही. म्हणजेच विचार ही मानसशास्त्रीय संज्ञा आहे तर सत्य-असत्य ही

तात्त्वज्ञानिक संज्ञा आहे. त्यामुळे अर्थ म्हणजे सत्य हे विधानही संदिग्ध आहे. एकूण भाषेतील शब्द व अर्थ यांचा संबंध पूर्णपणे परंपरानुसारी, मानवारोपित, यादृच्छिक स्वरूपाचा असून त्यात कार्यकारणभाव कुठेही आढळत नाही.

## ■ अर्थाचे प्रकार

शब्दार्थ स्तरावर अर्थाची वर्गवारी अथवा अर्थाचे प्रकार करणे शक्य आहे. शब्दांना एकूण सात अर्थ असतात. **सांकल्पनिक अर्थ** वा संबोधपर हा शब्दाचा मुख्य अर्थ होय. शब्दाचा तो स्वत:चा, अंगभूत अर्थ असतो. संस्कृतमध्ये त्यास अभिधा असे म्हणतात. पुढील काही शब्द; अर्थ-घटक गोल कंसात मांडून आणि +, - चिन्हे अनुक्रमे घटकाची उपस्थिती व अभाव यासाठी वापरून दाखविलेले आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बाई | (+मानुष) | (+प्रौढ) | (-नर) | (+सजिव) | (-तरुण) |
| युवती | (+मानुष) | (+प्रौढ) | (-नर) | (+सजिव) | (+तरुण) |
| बैल | (-मानुष) | (+प्रौढ) | (+नर) | (+सजिव) | (-तरुण) |

काही शब्दांना रूढीने, अनुभवाने **गुणव्यंजक अर्थ** वा सहचारी अर्थ प्राप्त होतात. उदाहरणार्थ, मोठी बहीण सर्व घरचे करते पण धाकटी राणीसारखी बसते. या वाक्यातील 'राणी' शब्दाचा सांकल्पनिक अर्थ (+मानुष) (-नर) (+राजाशी विवाहित) असा आहे. पण वरील वाक्यात एवढाच अर्थ अभिप्रेत नाही. इथे काहीही काम न करता, आरामात बसून आयते खाणारी स्त्री असा अर्थ अभिप्रेत आहे. संस्कृत काव्यशास्त्रातील गौणी लक्षणा हा गुणव्यंजक अर्थ दर्शवितात. इथला अर्थ हा असा लक्षणेतून आला आहे.

शब्दांना **शैलीगत अर्थ** असतो. बोलणारा, ऐकणारा, त्यांचे परस्पर संबंध, बोलण्याचा विषय, बोली, माध्यम, काळ, व्यक्तीचा दर्जा अशा संप्रेषणाच्या विविध घटकाद्वारे शैलीगत अर्थ प्राप्त होतो. मरणे, वारणे, कामी येणे, उलथणे हे समानार्थी शब्द आहेत. मात्र जनावर वारत नाहीत, तर ते मरते. परवा त्याची काकू मेली, हे वाक्य बरोबर आहे. युद्धात सैनिक मरत नाहीत तर कामी येतात. तो जेवताना कामी आला, हे वाक्य खटकते. कारटं, म्हातारडं, वैरी, बया या व्यक्ती उलथतात, मरत नाहीत. शिक्षकाची बुद्धी, विद्यार्थ्याची अक्कल, कवितेत मती गुंग होणे, भेजा फिरणे अशा वाक्यांना शैलीगत अर्थ प्राप्त झालेले आहेत.

अनेकदा बोलणाऱ्या व्यक्तीचे भाव केवळ त्याच्या शब्दांतून व्यक्त न होता बोलण्याच्या पद्धतीतून व्यक्त होतात. आवाजाचा चढउतार, सूरयोजन, शब्दांवरील आघात इत्यादी गोष्टी शब्दांना भावपर अर्थ प्राप्त करून देतात. उदाहरणार्थ, 'शहाणा' या शब्दाचा मूर्ख, आगाऊ असे **भावपर अर्थ**

होऊ शकतात. जसे, शहाणा असशील तर तुझ्या घरात ! (आगाऊ), फार शहाणा आहेस्, माहिती आहे ! (मूर्ख).

कधी कधी बोलणाऱ्याला अपेक्षित नसणारा अर्थ काही कारणांनी ऐकणाऱ्याला भावतो. असा **अनपेक्षित अर्थ** म्हणजे परावर्तित अर्थ होय. तू भूतदया दाखव; या वाक्यात प्राणिमात्रावर दया करणे, हा अर्थ अपेक्षित आहे. पण भूत म्हणजे भटकणारा आत्मा असा अनपेक्षित अर्थ घेतल्यास अर्थाचे परिवर्तन होते. संस्कृतमध्ये 'अपरोक्ष' म्हणजे 'नजरेसमोर' तर मराठीत 'नजरेआड' असा अर्थ होतो. वरच्या मजल्यावरील खोली खाली आहे, या वाक्यात 'खाली असणे' म्हणजे भाड्याने द्यावयाची खोली रिकामी आहे, असा अर्थ घ्यावा लागतो.

काही शब्दांची जोडगोळी पक्की असते. दूरदर्शनवरील बातम्या ठळक असतात. कामगार संपाचा इशारा देतात. पत्रात सप्रेम नमस्कार असतो. साहित्यिक ख्यातनाम व अध्यक्ष माननीय असतो. बांधिलकी सामाजिक असते. कार्यसिद्धीसाठी श्री समर्थ असतात. समारंभ संपन्न होतो. ना खंत ना खेद; ना खंत ना दुःख असे होत नाही. अशा शब्दांत **साहचर्यपर अर्थ** वा प्रतिसादित / सहसंबंधित अर्थ असतो.

एखाद्याला विशिष्ट संदेश द्यावयाचा असतो तेव्हा एक विशिष्ट क्रमाने, योग्य ठिकाणी आघात देऊन, महत्त्वाचा भाग केंद्रस्थानी कल्पून संदेश दिला जातो. सुरावली, बलाघात, व्याकरण रचना याद्वारे असा विषय-अर्थ अथवा **विचारवस्तुपर अर्थ** व्यक्त होतो. काल मी अभ्यास केला, मी काल अभ्यास केला. या दोन्ही वाक्यातील विषय व अर्थ वेगवेगळा आहे. (संदर्भ : डॉ. अनिल गवळी, भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठक्रमांक ६३ ते ६६)

## ■ अर्थक्षेत्र संकल्पना

'अर्थक्षेत्र' ही संकल्पना जोस्ट ट्रायर आणि जोहान वाइझ्गर्बग या जर्मन अभ्यासकांनी १९३० च्या सुमारास विकसित केली. या संकल्पनेच्या आधारानेच पुढे भाषिक अर्थरचनेचा विचार सुरू झाला. भाषेच्या शब्दसंग्रहाच्या रचनेचा शोध घेतला असता; या रचनांमध्ये आशयाची आणि अर्थाची काही 'क्षेत्रे' निश्चित झालेली दिसतात. त्या क्षेत्रातील शब्द परस्परांशी विशिष्ट संबंधांनी बांधलेले असतात. ही संपूर्ण संकल्पना डॉ. मिलिंद मालशे यांनी अनेक भाषावैज्ञानिकांच्या मतांचा आणि उदाहरणांचा आधार घेऊन आपल्या 'आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन' या ग्रंथामध्ये विस्ताराने मांडली आहे. त्यांच्या या ग्रंथातील विवेचनाचा आधार घेऊन आपण प्रस्तुत संकल्पना समजून घेऊ.

प्रत्येक भाषेचा शब्दसंग्रह भिन्न-भिन्न स्वरूपाचा असतो. विविध भाषांच्या शब्दसंग्रहाच्या रचनेचा शोध या क्षेत्रामध्ये घेतला जातो. भाषेतील शब्दांना प्राप्त झालेला अर्थ हा पूर्णतः ती भाषा

बोलणाऱ्या समाजावर निर्धारित राहतो. प्रत्येक भाषेतील अर्थाची आणि आशयाची क्षेत्रे निश्चित अशी यथायोग्य पद्धतीने निर्माण झालेली दिसतात. उदाहरणादाखल आपल्याला येथे नातेवाचक शब्दांची चर्चा करता येईल. मराठी भाषेमध्ये आजी-आजोबा, मामा-मामी, काका-काकी अशी शब्दांची जोडी आढळते. इंग्रजीमध्ये grandfather - grandmother अशी जोडी आहे. त्याचबरोबर grandparent असा आईचे आई-वडील व वडिलांचे आई-वडील असा नातेसंबंधवाचक एकच शब्द आहे. हे अर्थाचे एक क्षेत्र कल्पिता येते. तसे हे अर्थाचे विशिष्ट असे एक क्षेत्रच आहे.

अर्थक्षेत्र या संकल्पनेला साहाय्यभूत ठरणारी '**अर्थघटक**' ही एक कल्पना सांगितली गेली आहे. अमेरिकन मानववंशवैज्ञानिकांच्या संशोधनातून १९५० च्या सुमारास ही संकल्पना विकसित झालेली आहे. ही संकल्पना भिन्न-भिन्न संस्कृतीमधील नातेसंबंधवाचक शब्दांच्या विश्लेषणातून विकसित झालेली आहे. अर्थ-घटकांचा निर्देश करण्याची एक पद्धती या संकल्पनेत सांगितलेली आहे. अधिक (+) आणि उणे (-) या चिन्हांच्या साहाय्याने अर्थघटकांचा निर्देश करता येतो. अर्थक्षेत्र या संकल्पनेला अर्थघटक या संकल्पनेची जोड दिल्यानंतर संरचनावादी अर्थविचार उभा राहतो.

मराठीतील वरील नातेसंबंधवाचक शब्दांच्या जोडीच्या आधारे ही संकल्पना आपण समजून घेऊ. या शब्दांमध्ये लिंगवाचक अर्थघटक कशा प्रकारे येतात हे विचारात घेतल्यानंतर अर्थक्षेत्राची रचना लक्षात येते. उदाहरणार्थ, मामा-मामी

'मामा' या शब्दामध्ये उणे स्त्री (-स्त्री) हा घटक आहे.

'मामी' या शब्दामध्ये उणे पुरुष (+ स्त्री) हा घटक आहे.

या बरोबरच अर्थक्षेत्राच्या संकल्पनेमध्ये शब्दांच्या पातळीवर विविध प्रकारच्या **अर्थ-संबंधां**चाही अंतर्भाव होतो. समानार्थता, विरुद्धार्थता, अनेकार्थता, अर्थसमावेश या संबंधाचा येथे उल्लेख करता येतो. समानार्थी शब्दासंदर्भात पारंपरिक विचारपेक्षा वेगळा विचार आधुनिक भाषाविज्ञानात सांगितला जातो. कोणत्याही शब्दाला समानार्थी शब्द नसतो. जो अर्थ समानार्थी म्हणून सांगितला जातो, तो अर्थ त्या शब्दाच्या जवळ जाणारा अर्थ सूचित करतो. कारण प्रत्येक शब्दाला स्वत:चा असा स्वतंत्र अर्थ असतो. म्हणूनच समानार्थी म्हणून सांगितले जाणारे शब्द वाक्यात परस्परांची जागा घेऊ शकत नाहीत. अर्थक्षेत्र या संकल्पनेमध्येही हीच बाब सांगितलेली आहे. उदाहरणार्थ; जन्मदाता, पिता, वडील, बाप या शब्दांचे सांकल्पनिक अर्थघटक सारखे आहेत. म्हणून त्यांना आपण समानार्थी शब्द असे म्हणतो. तथापि या प्रत्येक शब्दातून व्यक्त होणारे आदरसूचक, भाववाचक अर्थ भिन्न आहेत. म्हणजेच कोणत्याही शब्दाच्या अर्थामध्ये पूर्ण एकरूपता असत नाही असे म्हणावे लागते. याप्रमाणेच विरोधी अर्थाचेही सांगता येते. विरोधी अर्थामध्ये तर खूप मोठी गुंतागुंत असते. म्हणून विरोधी अर्थसंबंधाचे तीन उपप्रकार सांगितलेले आहेत.

१. व्यत्यासात्मक विरोधाचा संबंध

उदाहरणार्थ; विवाहित - ब्रह्मचारी, जिवंत - मृत, (येथे व्यत्यासाचे नाते आहे.)

२. तुलनात्मक किंवा सापेक्ष विरोधाचा संबंध

उदाहरणार्थ; छोटा-मोठा या जोडीमध्ये व्यत्यासात्मक विरोध नाही. येथे नामावर अवलंबून एखादा विशिष्ट निकष अध्याहृत धरलेला असतो. आणि त्याच्या तुलनेने विधान केलेले असते. उदाहरणार्थ; छोटा देवमासा, छोटा उंदीर इत्यादी. या शब्दांचा अर्थ वेगवेगळ्या निकषांच्या साहाय्याने निर्धारित होत असतो.

३. बहुविध विरोधाचा संबंध

उदाहरणार्थ; लाल-निळा-पिवळा-हिरवा

एकच वस्तू एकाच वेळी पूर्णपणे लाल किंवा पूर्णपणे पिवळी असू शकणार नाही. परंतु एखादी वस्तू लाल नसली तर ती निळीच असायला हवी असे नव्हे, तर ती पिवळी-हिरवी इत्यादी असू शकते. या शब्दांमध्ये व्यत्यासात्मक विरोध नसतो वा सापेक्ष विरोधही नसतो.

'अर्थक्षेत्र' या संकल्पनेचा विचार करताना अनेकार्थता ही भाषेत नेहमी आढळणारी गोष्ट विचारात घ्यावी लागते. अनेकार्थतेचे दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार सरूपता. केवळ योगायोगाने एकाच रूपाला अनेक अर्थ मिळालेले असतात. या अनेक अर्थांमध्ये साम्य नसते. उदाहरणार्थ; 'सांड' या शब्दाचे मोकळा सोडलेला बैल, उंटीण, जास्त झालेले पाणी निघून जावे म्हणून केलेली वाट, उपेक्षा, कोपरा, टाकलेली बायको इत्यादी अर्थ आहेत. परंतु या अर्थांमध्ये नाते दिसत नाही.

अनेकार्थतेचा दुसरा प्रकार आहे नानार्थकता. या प्रकारामध्ये एकाच रूपाला अनेक अर्थ असतात. उदाहरणार्थ, गोटा-चमन गोटा, नदीतला गोटा, गोटा नारळ इत्यादी. या सर्व शब्दांमध्ये आकारसदृश्यतेचे नाते आहे. ही बाब योगायोगाची आहे असे म्हणता येणार नाही. तथापि अनेकार्थतेच्या या दोन्ही प्रकारामध्ये फरक वाटतो तेवढा सुटसुटीत नाही. 'अर्थ परस्परांशी संबंधित असणे' आणि 'व्युत्पत्तीच्या दृष्टीने नाते असणे' हे दोन्ही निकष संदिग्ध आहेत.

अर्थक्षेत्र या संकल्पनेमध्ये अनेकार्थतेबरोबरच 'अर्थसमावेश' हा एक महत्त्वाचा पैलू आहे. ''लाल-हिरवा-निळा-पांढरा'' हे रंगवाचक शब्द आपण रंग या शब्दाच्या अर्थामध्ये समाविष्ट करतो. याप्रमाणेच कोबी, पालक, मेथी हे शब्द भाजीवाचक आहेत. म्हणून यांना आपण 'भाजी' या शब्दाच्या अर्थामध्ये समाविष्ट करतो. तथापि येथे आपण भाषिक वर्गीकरण आणि बाह्य विश्वाचे तार्किक वर्गीकरण यात गफलत करता कामा नये. संरचनावादी अर्थविचारात अर्थक्षेत्र ही संकल्पना शब्दसंग्रहाच्या अर्थरचनेविषयी वापरली जाते. या अभ्यासातून शब्दसंग्रहाच्या अर्थरचनेविषयी थोडीफार मर्मदृष्टी प्राप्त झालेली असली तरी, शब्दसंग्रहासंदर्भातील अनेक मूलभूत प्रश्नांना या विश्लेषणातून उत्तरे मिळत नाहीत.

## १.४ शब्दार्थ व टिपा

- **वाक्यव्यवस्था :** वाक्यरचना.
- **पदबंध :** एक प्रधान किंवा गाभ्याचा शब्द किंवा रूपिम आणि इतर पूरके यांची क्रमानुवर्ती गुंफण.
- **अर्थ :** विचार निर्माण करणारी भाषिताची दुसरी बाजू.
- **शब्दार्थ :** केवळ शब्दावरून मनात निर्माण होणारी संकल्पना.
- **वाक्यार्थ :** भाषितातील अनेक शब्दांच्या अर्थांच्या समुच्चयाने मनामध्ये निर्माण होणारा विचार.
- **अनेकार्थता :** एकाच शब्दाचा परस्पर संबंध असणारे एकापेक्षा जास्त अर्थ असल्यामुळे वाक्य किंवा भाषिताच्या आधारे प्राप्त होणारे अनेक अर्थ.
- **अर्थघटक :** एखाद्या भाषेमधल्या शब्दातील त्या शब्दांना इतर शब्दांपासून वेगळेपण देणारे अर्थाचे घटक.
- **अर्थबोध :** अर्थ समजणे.

## १.५ समारोप

कोणत्याही घटिताचा वैज्ञानिक पद्धतीचा अभ्यास करायचा असेल तर प्रथम घटितांचे ऐंद्रीय निरीक्षण करायचे, त्यासाठी प्रयोग करायचे आणि या विशिष्ट घटितांच्या निरीक्षणाच्या म्हणजेच पुराव्याच्या आधारे सर्वमान्य निष्कर्ष काढायचा, अधिक निरीक्षण करून हा निष्कर्ष पडताळून पाहायचा. येथे प्रत्यक्ष निरीक्षणालाच महत्त्व असल्याने निरीक्षणाला ज्या गोष्टी उपलब्ध नाहीत त्याची या अभ्यासपद्धतीत दखल घेतली जात नाही. या पद्धतीने संरचनावादी भाषाभ्यासकांनी भाषांकडे पाहण्याचा दृष्टिकोण विकसित केला. यातूनच भाषेचे ध्वनी, शब्द, वाक्य आणि अर्थ हे घटक निश्चित करून त्यांचे विश्लेषण देण्याची पद्धत म्हणजेच भाषेच्या संरचनेच्या विविध पातळ्यावरील विश्लेषणाची पद्धती विकसित झाली. 'अर्थ' हा घटक गुंतागुंतीचा, व्यामिश्र आणि व्यापक असल्यामुळे सोस्यूर, ब्लूमफील्ड आणि त्यांच्या प्रभावातील अनेक भाषाभ्यासकांनी तो आपल्या विश्लेषणातून बाजूला ठेवला. हे अभ्यासक अर्थ या घटकाला रचनात्मक मूलघटक व्यवच्छेदक आहेत वा नाहीत एवढे ठरवण्यापुरतेच स्थान देताना दिसतात. आपल्या प्रस्तुत विवेचनामध्ये भाषेच्या संरचनेतील सर्वच घटकांचे विश्लेषण आलेले आहे. अर्थाच्या बाबतीतली अभ्यासकांची संदिग्धता येथेही व्यक्त झालेली आहेच. तथापि या संपूर्ण विश्लेषणाच्या आधाराने संरचनावादी भाषाविज्ञानाचे स्वरूप आपल्याला समजून घेता येते.

## १.६ सरावासाठी प्रश्न

**योग्य पर्याय निवडा.**

१. अर्थविज्ञानाचा उद्‌गाता कोण?
(मायकेल ब्रेआल / सोस्यूर / जोस्ट ट्रायर)

२. 'सैनिक कामी आला' या वाक्यात कोणता अर्थ दडला आहे?
(शैलीगत अर्थ / अनपेक्षित अर्थ / गुणव्यंजक अर्थ)

३. 'प्रथमोपस्थित संघटक' ही संकल्पना प्रथम कोणी मांडली?
(लेनर्ड ब्लूमफील्ड / सोस्यूर / चॉम्स्की)

४. भाषेतील सर्वात मोठी रचना कोणती असते ?
(पदबंध / वाक्य / विधेय)

**उत्तरे :** १. मायकेल ब्रेआल, २. शैलीगत अर्थ, ३. लेनर्ड ब्लूमफील्ड, ४. वाक्य.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. वाक्यविन्यासाचे स्वरूप विस्ताराने लिहा.
२. अर्थविन्यासाचे स्वरूप सविस्तर लिहा.
३. प्रथमोपस्थित संघटक ही संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. अर्थक्षेत्र ही संकल्पना थोडक्यात लिहा.
२. वाक्याच्या उद्देश्य व विधेय या संज्ञा समजावून द्या.
३. अर्थाचे विविध प्रकार सोदाहरण लिहा.

## १.७ अधिक वाचन

१. डॉ. मिलिंद मालशे : आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन.
२. डॉ. रमेश धोंगडे : भाषा आणि भाषाविज्ञान.
३. डॉ. अनिल गवळी : भाषाविज्ञान आणि मराठी भाषा.
४. डॉ. द. दि. पुंडे : सुलभ भाषाविज्ञान.

## १.८ उपक्रम

१. मराठी बोलीतील, व्यवहारातील विविध प्रसंगांची वाक्ये गोळा करा. त्या वाक्यांचे आधुनिक भाषाविज्ञानातील वाक्यविन्यासाप्रमाणे विश्लेषण, वर्गीकरण करा.

२. विविध व्यवहारातील एकसारखे वाटणारे पण अर्थ भिन्न असणारे शब्द एकत्र करून त्याचे अर्थ लिहा.

❑❑❑

## सत्र २ : घटक २

### (विभाग २ Module II)

# भाषाकुलाची संकल्पना आणि मराठी भाषा

## २.१ उद्दिष्टे

- या घटकाच्या अभ्यासानंतर 'भाषाकुल' संकल्पना कशी अस्तित्वात आली हे सांगता येईल.
- या संकल्पनेचे उपयोजन करून भाषिक वर्गीकरणाची तत्त्वे, भाषांचे वर्गीकरण आणि जगातील प्रमुख भाषाकुले कोणती, हे लक्षात घेता येईल.
- इंडो-युरोपिअन भाषाकुलाची ओळख करून घेता येईल.
- आर्यभारतीय भाषाकुलाचा परिचय होईल.
- तसेच अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत समजावून घेऊन मराठीची उत्पत्ती कशी झाली हे सांगता येईल.

## २.२ प्रास्ताविक

भाषा म्हणजे मानवी जीवनव्याप्त संकल्पनांचे विश्व साकार करणाऱ्या संज्ञापन व्यवहाराचे सर्वश्रेष्ठ व सर्वस्पर्शी साधन व माध्यम. समाजव्यवहार शक्य व सुलभ होते तो या माध्यमामुळेच. मानवाच्या जीवन विकासक्रमात भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. जगाच्या पाठीवरील माणसं जैविकदृष्ट्या सारखी असली तरी, त्यांच्या भाषा वेगळ्या का? या प्रश्नातून भाषाभ्यासास सुरुवात होते व त्या सारख्या का? या प्रश्नाच्या शोधात 'भाषाकुला'ची संकल्पना अस्तित्वात येते. या संकल्पनेचा आधार घेऊनच जागतिक भाषाकुले एकमेकांशी संबंधित होतात आणि जैविकदृष्ट्या सारखा असलेला माणूस भाषिकदृष्ट्याही एकच असला पाहिजे; त्याची भाषा, तिचे मूळ कुठल्यातरी एका भाषेत असावे असे अनुमान या अभ्यासाने करता येते. 'भाषाकुला'ची संकल्पना मानवी 'कुळा'चीही कहाणी सांगून जाते. यातूनच प्रचलित भाषांच्या इतिहासाचा, इतिहासक्रमाचा अभ्यास सुरू होता. भाषेची पूर्वावस्था, मध्यावस्था पाहता येते. तिचे उत्तरकालीन ऐतिहासिक भाषाविज्ञानाची उद्दिष्टे भाषाभ्यासात कार्यप्रवण होतात. दोन किंवा अधिक भाषांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांचा 'वंशवृक्ष' मांडून दाखविणे, त्यातूनच शास्त्रशुद्ध भाषाभ्यासाची बीजे रुजली जातात आणि 'भाषाकुला'ची संकल्पना अस्तित्वात येते.

## २.३ विषय विवेचन

भाषांच्या तौलनिक अभ्यासातून त्यांच्या इतिहासाचा मागोवा घेता येतो. तसा मागोवा घेण्याचा प्रयत्न करणारी भाषाविज्ञानाची ज्ञानशाखा म्हणजे ऐतिहासिक भाषाविज्ञान होय. १७६७ मध्ये सर्वप्रथम कुर्डो या फ्रेंच मिशनऱ्याने एका निबंधातून लॅटिन भाषेशी संस्कृतचे साम्य स्पष्ट केले. त्यानंतर १७८६

साली सर विल्यम जोन्स यांनी ग्रीक, लॅटिन, संस्कृत इत्यादी भाषांच्या साम्यावरून त्या एकाच पूर्वज भाषेपासून निर्माण झालेल्या असाव्यात असे अनुमान व्यक्त केले. या अनुमानित उद्गारातून तत्कालीन भाषाभ्यासकांना एक नवी दिशा मिळाली आणि अनेक अभ्यासकांनी अथक परिश्रम करून भाषांचा तौलनिक अभ्यास करण्यास सुरुवात केली व त्यातूनच 'भाषाकूल' संकल्पना अस्तित्वात आली.

जगभर पसरलेल्या भाषांचे वर्गीकरणाच्या तत्त्वाधारे वर्गीकरण केले. त्या वर्गीकरणांपैकीच 'कुलनिष्ठ' वर्गीकरण हे महत्त्वाचे वर्गीकरण 'तत्त्व' आहे. या तत्त्वाच्या आधारेच भाषांचे वर्गीकरण आणि जगातील प्रमुख भाषाकुले, इंडो-युरोपियन भाषाकुल, आर्यभारतीय भाषाकुल, अंतर्वर्तुळ, बहिर्वर्तुळ सिद्धांत आणि मराठी भाषा या विषयाचे विवेचन करावयाचे आहे.

## २.३.१ भाषाकुल संकल्पना

भाषाकुल संकल्पना लक्षात घ्यावयाची असेल तर आपणाला सर विल्यम जोन्स यांचे प्रसिद्ध विधानही लक्षात घ्यावयास हवे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात भाषाभ्यासाला एक नवी दिशा मिळाली ती या विधानामुळे, ते विधान म्हणजे ''संस्कृत, ग्रीक व लॅटिन ह्या भाषांत जे साम्य आढळते ते इतके घनिष्ठ आणि खोलवर रुजलेले आहे की, त्या साम्याचा खुलासा ते केवळ यदृच्छेने घडून आलेले आहे; असे म्हणून भागण्यासारखे नाही; तर त्या साम्याचा खुलासा करण्यासाठी ही साम्यस्थळे आढळणाऱ्या भाषा कोणत्या तरी एका भाषेपासून उद्भूत झाल्या असाव्यात व आज ती भाषा उपलब्ध नाही असे मानावे लागते''.

सर विल्यम जोन्स यांच्या या विधानाने ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा पाया घातला हे तर खरेच. परंतु या विधानाने दोन नवीन कल्पनाही भाषाभ्यासकांना दिल्या. त्या कल्पना म्हणजे संस्कृत, ग्रीक, लॅटिन या भाषांची जी 'जननी' मानायची ती बहुधा अस्तित्त्वात नाही. याचा अर्थ आज मूलभाषेचे नमुने उपलब्ध नाहीत एवढाच मानायचा. अशा या दोन कल्पनांना या विधानाने जन्म दिला व पुढील अभ्यासकांना प्रेरणा दिली. फ्रांझ बॉप, ग्रिम, रास्क, पॉट, श्लाइशर यांचे कार्य या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. या अभ्यासकांच्या अभ्यासातूनच तौलनिक किंवा बहुभाषिक आणि अंतर्गत किंवा एकभाषिक अशा दोन पुनर्रचना करण्याच्या पद्धती अस्तित्वात आल्या. 'परिवर्तन' आणि 'भाषाकुल' या दोन मध्यवर्ती संकल्पना केंद्रवर्ती मानून ऐतिहासिक भाषाविज्ञान ही ज्ञानशाखा विकसित झाली. या ज्ञानशाखेत भाषेच्या इतिहासात होत जाणाऱ्या परिवर्तनाची, या परिवर्तनाचे, नियम शोधून काढण्याची, भाषांच्या तौलनिक अभ्यासातून त्यांचे परस्परसंबंध ठरविण्याची आणि अशा स्वरूपाच्या अभ्यासातून भाषाकुलांची प्रतिष्ठापना करण्याची, अशा भाषाकुलांचे वंशवृक्ष बनविण्याची अणि भाषापरिवर्तनाच्या निश्चित स्वरूपाच्या आधारे उपलब्ध भाषिक पुराव्याचा तौलनिक अभ्यास करून अनुपलब्ध अशा पूर्वभाषेची निर्मिती करणे इत्यादी अंगानी संशोधन होऊ लागले. यातूनच ध्वनिपरिवर्तनाचे नियम निरपवाद, सार्वत्रिक असतात, हे सिद्ध करण्यात भाषावैज्ञानिकांना यश प्राप्त झाले. अनुपलब्ध पूर्वभाषांची पुनर्निर्मिती करण्याची तंत्र विकसित झाले. 'भाषाकुल' ही संकल्पना अस्तित्वात आली आणि जगातील भाषांचे कुलनिष्ठ वर्गीकरण करण्यात येऊन त्यांचे वंशवृक्ष तयार झाले.

## २.३.२ 'भाषाकुल' संकल्पनेमागील अभ्युपगम: अर्थ आणि अन्वयार्थ

भाषाकुल संकल्पना विस्ताराने समजून घ्यावयाची असेल तर, या संकल्पनेमागील अभ्युपगम त्याचा अर्थ आणि अन्वयार्थ आपण समजून घेतला पाहिजे. आज प्रचलित असलेल्या किंवा प्राचीन काळाच्या दोन किंवा त्यातून अधिक भाषांत तर त्यांचे मूलभूत शब्दकोश आणि रूपव्यवस्था या दोन्हीही दृष्टिने विविध प्रकारचे साम्य आढळले आणि ते साम्य यदृच्छेने आढळू शकणाऱ्या साम्यापेक्षा संख्येच्या व गुणवत्तेच्या दृष्टीने डोळ्यात भरण्यासारखे असेल, तसेच ते साम्य भाषिक उसनवारीमुळे ज्या प्रकारचे साम्य त्या दोन किंवा त्यातून अधिक भाषांत निर्माण होऊ शकते त्या प्रकारचे नसेल तर त्या दोन किंवा अधिक भाषा एका भाषाकुलातल्या आहेत असे गृहीत धरले जाते. अर्थात 'एक भाषाकुल' हया संकल्पनेत अपेक्षित असलेल्या अभ्युपगमाचा नेमका अर्थ आणि अन्वयार्थ काय? हे ही येथे लक्षात घेणे गरजेचे आहे.

'एक भाषाकुल' या अभ्युपगमाचा एक तात्त्विक अर्थ असा की, ज्या प्रकारची साम्यस्थळे दोन किंवा अधिक भाषांत आढळतात; त्या साम्यस्थळांचा ह्या अभ्युपगमामुळे उलगडा होऊ शकतो. याशिवाय या अभ्युपगमाचा दुसरा निर्मितीक्षम अर्थ असा की, ज्या भाषा आपण एका भाषाकुलातील मानतो; त्या सर्व ऐतिहासिक काळी कोणत्यातरी एका भाषेपासून हळूहळू निर्माण झाल्या; म्हणजेच त्या साऱ्या भाषा एकभाषोद्‌भव आहेत आणि ही मूळ भाषा जर माहीत नसेल, तर ती माहीत करून घेण्याचे प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी पुनर्रचन करावे लागते. या दृष्टीने हे अभ्युपगम निर्मितीक्षम आहे; असे मानले जाते. त्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे तौलनिक किंवा बहुभाषिक आणि अंतर्गत किंवा एक भाषिक अशा दोन पुनर्रचन पद्धतीचा अवलंब केला जातो. त्यासाठी एखाद्या भाषाकुलात ज्या भाषा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्या भाषांत ध्वनिसाम्य व अर्थसाम्य या दोन कसोट्यांना उतरणाऱ्या शब्दांच्या जोडया जमविणे व त्यांच्या आधारे पुनर्रचन करणे. उदा. इंडोयुरेपियन भाषाकुलात ज्या संस्कृत, अवेस्ता, ग्रीक, लॅटिन इत्यादी भाषा समाविष्ट केल्या आहेत त्यांच्या आढळणाऱ्या शब्दांच्या जोड्यावरून त्या सर्व भाषांच्या मुळाशी जी एक इंडो-युरेपिअन भाषा असल्याची कल्पना करता येते; तसेच अत्यंत ध्वनिसाम्य नसतानाही पुनर्रचन करता येते. किंवा तिसऱ्या भाषाभगिनीचा पुरावा वापरून अथवा ध्वनिविषयक पुरकांची संभाव्यता लक्षात घेऊन व ध्वनिसंवादविषयक तपशील लक्षात घेऊन असे पुनर्रचन करता येते. तसेच व्याकरण व्यवस्थेचे पुनर्रचनही त्यासाठी लक्षात घेता येते. याशिवाय अंतर्गत किंवा एकभाषिक पुनर्रचनाचे गृहीत तत्त्व लक्षात घेऊनही भाषाकुलांचे वंशवृक्ष ठरविता येतात. यात कुठल्याही भाषेचा आधार न घेता एकाच भाषेतील पुराव्यांच्या आधारे पूर्वावस्थेविषयी अनुमाने करण्यात येतात. कारण भाषेच्या इतिहासात अनेक प्रकारची ध्वनिपरिवर्तने घडून येतात. यापैकी काही ध्वनिपरिवर्तने संदर्भसापेक्ष असतात. एकंदरीत भाषाकुल संकल्पनेमागील अशा स्वरूपाचा अर्थ आणि अन्वयार्थ लक्षात घेऊनच ही संकल्पना भाषांच्या अभ्यासासाठी लक्षात घ्यावी लागते.

## २.३.३ भाषिक वर्गीकरणाची तत्वे: भाषांचे वर्गीकरण आणि जगातील भाषाकुले

भाषाकुल संकल्पना कशी अस्तित्वात आली, या संकल्पनेमागील अभ्युपगम व त्याचा अर्थ आणि अन्वयार्थ आपण लक्षात घेतला. या ठिकाणी आपणाला भाषिक वर्गीकरणाची तत्त्वे थोडक्यात लक्षात घ्यावयाची आहेत.

जगातील भाषांची संख्या निश्चित करणे तसे कठीण आहे. हिंदीतील एक भाषाभ्यासक डॉ.भोलानाथ तिवारी यांनी ही संख्या २७९६ अशी सांगितली आहे. तर हिंदीतीलच एक दुसरे अभ्यासक देवेंद्रनाथ शर्मा ही संख्या ३००० असल्याचे नमूद करतात. तेव्हा जागतिक भाषांची ही प्रचंड संख्या लक्षात घेतल्यास या भाषांचे वर्गीकरण केल्याशिवाय त्यांचा अभ्यास करता येणार नाही. संख्येने प्रचंड असलेल्या भाषांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यासाठी वर्गीकरण तत्त्वांचा आधार घ्यावाच लागतो. त्यासाठी अभ्यासकांनी काही तत्त्वे निश्चित केली. ती म्हणजे खंड, देश, धर्म, काल, प्रभाव, भाषेची रचना किंवा आकृतिवैशिष्ट्यांनुसार वर्गीकरण होऊ लागले. या विविध तत्त्वांच्या आधारे जरी भाषांचे वर्गीकरण करता येत असले तरी भाषावैज्ञानिक अभ्यासाच्या दृष्टीने भाषांतील रचना वा आकृतिवैशिष्ट्यांचे साम्य लक्षात घेऊन केलेले आकृतिमूलक वर्गीकरण, तसेच शब्दांतील अर्थ आणि ध्वनी यांचे साम्य लक्षात घेऊन केलेले वांशिक किंवा पारिवारिक वर्गीकरण विविध भाषावैज्ञानिकांनी विशेषत्वाने लक्षात घेऊन भाषाभ्यास केला. या दोन वर्गीकरण तत्त्वांचीही विशेष माहिती येथे आपणास घ्यावयाची आहेत.

### आकृतिमूलक वर्गीकरण

या वर्गीकरणाला प्रकृतिप्रत्यान्वित वर्गीकरण असेही म्हटले जाते. हे वर्गीकरण भाषेतील शब्दांची मूळ प्रकृती व त्यांना लागणारे प्रत्यय यांच्या परस्पर संबधांवर आधारलेले आहे. कारण प्रत्येक भाषेतील शब्दांचे मूळ वैशिष्टये व त्यांना लागणारे लिंग, वचन,काळ, विभक्ती यांचे प्रत्यय व उपसर्ग यांचे परस्पर संबंध विशिष्ट नियम आणि पद्धतीवर आधारित असतात. शब्द वा पद हा वाक्यातील सार्थ घटक असल्यामुळे वाक्यामध्ये शब्दांची योजना विशिष्ट नियमांना अनुसरून विशिष्ट पद्धतीने होत असते. कर्ता, कर्म, क्रियापदांची वाक्यातील स्थाने प्रत्येक भाषेत ठरलेली असतात. प्रत्येक भाषेची आकृती किंवा प्रकृती, तिचे स्वरूप लक्षात घेऊन हे वर्गीकरण केले जाते. याला रूपात्मक, रचनात्मक, पदाश्रित, व्याकरणिक अशाही नावांनी ओळखले जाते. प्रसिद्ध जर्मन भाषावैज्ञानिक श्लेगेल याने या पद्धतीने वर्गीकरण करून भाषांचे सहा प्रकार केल्याचे कृ. पां. कुलकर्णी यांनी आपल्या 'मराठी भाषा : उद्गम व विकास' या ग्रंथात अभ्यासपूर्ण नमूद केले आहे. या वर्गीकरणाची परंपरा तशी जुनी आहे. बॉप, ग्रिम, श्लायशन, पॉट यांनी या वर्गीकरणाचा आधार घेऊनच भाषांचे वर्गीकरण केले व या तत्त्वाचा आधार घेऊन भाषांचे भाषावैज्ञानिक दृष्टीने अयोगात्मक व योगात्मक या दोन गटात वर्गीकरण केले. अयोगात्मक व योगात्मक या संज्ञाही आपण येथे थोडक्यात समजून घेऊ या.

**१) अयोगात्मक भाषा :** ज्या भाषांत प्रकृती व प्रत्यय यांचा योग म्हणजेच जुळणी होत नाही त्यांना अयोगात्मक भाषा असे म्हणतात. या भाषांमध्ये शब्द त्यांच्या मूळ स्थित रूपात अविकृत राहतात. प्रत्यय लागून त्यांच्यात परिवर्तन होत नाही. पदांना लिंग, वचन, काळ, अर्थ इत्यादीसाठी प्रत्यय न लागता स्वतंत्र शब्दच लावून ते काम केले जाते. प्रकृती-प्रत्यय असे विभाजन करण्याची येथे गरजच भासत नाही. म्हणूनच या गटातील भाषांना निरवयवी भाषा असे म्हणतात. चिनी, सयामी, सुदानी, तिबेटी, ब्रम्हदेशी इत्यादी भाषा या गटात येतात.

**२) योगात्मक भाषा :** जगातील बहुतेक भाषा या गटात मोडतात. शब्दाची मूळ स्थिती म्हणजेच प्रकृती व त्याला लागणारे प्रत्यय यांच्या जुळणीस म्हणजे योगास या भाषांत महत्त्व असते. अशा भाषांचे तीन गटात विभाजन केले गेले आहे. १) अश्लिष्ट योगात्मक भाषा, २) श्लिष्ट योगात्मक भाषा आणि ३) प्रश्लिष्ट योगात्मक भाषा. या तिन्ही संज्ञा प्रवाहाची आपण येथे ओळख करून घेऊ या.

**अश्लिष्ट योगात्मक भाषा (Agglutinative)** : या प्रकारच्या भाषांसाठी शब्दनिगडीत किंवा चिकट्या भाषा अशीही संज्ञा वापरली जाते. निरनिराळे अर्थपूर्ण शब्द एकमेकांपुढे चिकटविल्यासारखे ठेवून वाक्य तयार करण्याची पद्धती अशा भाषांमध्ये आहे. अश्लिष्ट योगात्मक भाषांचे पाच वर्गात विभाजन केले जाते . १) अश्लिष्ट पूर्व-योगात्मक, २) अश्लिष्ट मध्य योगात्मक, ३) अश्लिष्ट पूर्वान्त योगात्मक, ४) अश्लिष्ट अन्तयोगात्मक, ५) अश्लिष्ट आंशिक योगात्मक.

अश्लिष्ट पूर्व-योगात्मक या वर्गातील भाषेतील वाक्यात शब्द, अलग अलग दिसले तरी प्रकृती आणि प्रत्यय यांच्या योगास येथे वाव असतो. या भाषांत प्रत्यय शब्दांच्या आरंभी लागतो. म्हणूनच त्यांना पूर्वयोगात्मक म्हटले आहे. अफ्रिकेतील बान्टु, झुले या भाषात ही प्रवृत्ती दिसून येते. तर अश्लिष्ट मध्ययोगात्मक भाषा या वर्गातील भाषांत द्वयक्षरी शब्द असतात. शब्दांच्या मध्येच प्रत्यय लागलेले असतात. आफ्रिकेजवळील मादागास्कर बेटे व हिंदी महासागरातील द्वीपे या प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या भाषात ही प्रवृत्ती दिसते. संथाली भाषा ही याच प्रवर्गातील आहे. भाषांत शब्दाच्या मूळ प्रकृतीच्या कधी मागे (पूर्व) तर कधी पुढे (अन्त) प्रत्यय जोडले जातात. न्यूगिनीमधील 'मकोर' भाषा याचे उदाहरण आहे. अशा भाषांना अश्लिष्ट पूर्वान्त योगात्मक भाषा म्हणतात. अश्लिष्ट अन्त योगात्मक भाषा या वर्गातील भाषांत शब्दाच्या मूळ प्रकृतीच्या शेवटी संबंधदर्शक योजले जातात. द्राविडी परिवारातील भाषा व युरल अल्टाइक भाषा यामध्ये ही प्रवृत्ती दिसून येते. तर अश्लिष्ट आंशिक योगात्मक भाषा या वर्गातील भाषांत प्रकृतिप्रत्यय - योगाची प्रक्रिया पूर्ण नसते. तेव्हा या भाषा योगात्मक व अयोगात्मक या दोन्हीमध्येही मोडतात. म्हणून त्यांना आंशिक योगात्मक भाषा म्हणून संबोधले गेले आहे. जपानी, न्यूझीलंड व इवाई बेटे यामध्ये बोलल्या जाणाऱ्या भाषा या गटात मोडतात.

**श्लिष्ट योगात्मक भाषा (Inflectional) :** या प्रकारच्या भाषावर्गात मोडणाऱ्या भाषांत प्रकृति प्रत्यय-योग होऊन शब्दांच्या मूळ प्रकृतीचे रूपपरिवर्तन होते. म्हणून या भाषांना विकारी किंवा

विभक्तिप्रधान भाषा असेही म्हटले जाते. सिमेटिक हेमिटीक व इंडोयुरोपिय वंशातील प्रमुख भाषा या गटात येतात. या भाषांचे दोन प्रमुख गट केले जातात. १) अंतर्मुखी श्लिष्ट भाषागट व २) बहिर्मुखी श्लिष्ट भाषा गट. या दोन्ही गटांचे पुन्हा प्रत्येकी दोन उपगट आहेत. १) संयोगात्मक व २) वियोगात्मक. पैकी अंतर्मुखी श्लिष्ट योगात्मक भाषा या गटातील भाषांत प्रकृति-प्रत्यय यांचे तादात्म झालेले दिसते. सेमिटिक-हेमिटिक व अरबी भाषा या गटात मोडतात. तर बहिर्मुखी श्लिष्ट योगात्मक भाषा गटातील भाषांत शब्दांच्या मूलप्रकृतीनंतर प्रत्यय जोडले जातात. संस्कृत, ग्रीक, लॅटिन, अवेस्ता इत्यादी इंडोयुरोपीय परिवारातील प्राचीन भाषा संयोगात्मक आहेत. या भाषांगटातील अर्वाचीन रूपे ही वियोगात्मक आहेत.

**प्रश्लिष्ट योगात्मक भाषा (Incorporating) :** अशा प्रकारच्या भाषांगटातील भाषांत प्रकृति प्रत्यय इतके एकजीवित्त्वाने युक्त होतात की, त्यांचे वेगळेपण जाणवतच नाही. ते एकमेकांपासून वेगळेही करता येत नाही. या भाषागटाचे १) पूर्व प्रश्लिष्ट व  २) आंशिक प्रश्लिष्ट असे दोन उपप्रकार केले गेले आहेत. पैकी पहिल्या उपगटातील भाषांमध्ये प्रकृति-प्रत्यययोग अतिशय पूर्णावस्थेत असतो. वाक्यच्या वाक्य पूर्ण शब्दासारखे होते. दक्षिण अमेरिकेतील चेरोकी, ग्रीनलँडची भाषा याचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. तर दुसऱ्या उपगटातील भाषांत सर्वनाम व क्रियापद यांचा योग होताना क्रिया ही अस्तित्वशून्य होऊन ती सर्वनामाची पूरक होते. पेरिलिज पर्वताच्या पश्चिम भागात बोलली जाणारी बास्क भाषा फ्रेंच, बंगाली, इंग्रजी, भोजपुरी या भाषा या गटात मोडतात.

आकृतिमूलक किंवा प्रकृतिप्रत्ययान्वित वर्गीकरण आपल्या ज्ञानात भर टाकण्याच्या दृष्टीने आपण समजावून घेतले.परंतु या वर्गीकरणाचा तात्त्विक आणि व्यावहारिक उपयोग फारसा न केल्यामुळे या वर्गीकरणाचा फारसा विकास होऊ शकला नाही. परंतु वर्णनात्मक भाषाविज्ञानाच्या उदयानंतर 'भाषा' ही एक संरचना आहे,' 'तो एक चिन्ह चिन्ह-चिन्हीत संबंध आहे' या तत्वांना अनुसरून भाषाभ्यास होऊ लागला आहे. तेव्हा भाषाभ्यासकांनी या वर्गीकरणाचा आधार घेऊन जागतिक भाषांच्या वर्गीकरणाचा नव्याने विचार करायला हरकत नाही असे वाटते. असे असले तरी ज्या वर्गीकरण संकल्पनेच्या आधाराने ऐतिहासिक भाषाविज्ञान या ज्ञानशाखेचा विकास झाला त्या भाषाकुल संकल्पनेतील मुख्य संकल्पना म्हणून वांशिक किंवा कुलनिष्ठ वर्गीकरण ही संकल्पना ऐतिहासिक भाषाविज्ञानात महत्त्वाची मानली गेलेली संकल्पना आहे. या वांशिक किंवा कुलनिष्ठ वर्गीकरणाची तात्त्विक मीमांसा आपणाला या ठिकाणी करावयाची आहे.

## वांशिक किंवा कुलनिष्ठ वर्गीकरण

ऐतिहासिक भाषाविज्ञानातील 'भाषाकुल' संकल्पनेत वांशिक किंवा कुलनिष्ठ वर्गीकरण अतिशय महत्त्वाचे मानले गेलेले वर्गीकरण आहे. जगातील प्रमुख भाषांची निर्मिती किंवा त्या भाषांचे मूळ एकाच भाषेत असल्याचे भाषावैज्ञानिकांना जाणवते ते याच वर्गीकरणामुळे, श्लेगेल, रास्क, ग्रिम बंधू, बॉप्प, विल्यम जोन्स अशा पाश्चात्त्य भाषासंशोधकांनी लॅटिन, ग्रीक या भाषातील शब्दांच्या व्युत्पतीचा शोध घेताना संस्कृत भाषेशी तुलना करताना शब्दांच्या व्युत्पत्ती संदर्भात त्यांना लक्षणीय

साम्य आढळून आले. नातेदर्शक शब्द, सर्वनामे, संख्यावाचक नामे, वार, महिने यांची नावे यांच्यातील साम्य केवळ योगायोगाने आलेले नाही. याची खात्री पटताच त्यांनी या भाषांचा तौलनिक आणि ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास करून या सर्व भाषांचे कुल समान असले पाहिजे असे सिद्ध केले. एकाच मूळ भाषेतून या भाषांची निर्मिती झाली असल्याचे पुरावेही उपलब्ध केले. त्यासाठी त्यांनी भाषांचे वंश निश्चित करून त्यांचे वर्गीकरण केले.

वांशिक किंवा कुलनिष्ठ वर्गीकरणाची दृष्टी संस्कृत भाषेच्या अभ्यासानेच भाषासंशोधकांना मिळाली. १७६७ साली सर्वप्रथम कुर्डो या फ्रेंच मिशनऱ्याने एका निबंधातून लॅटिन भाषेशी असलेले संस्कृतचे साम्य विशद केले. त्यानंतर १७८६ मध्ये विल्यम जोन्सने लॅटिन आणि संस्कृत बरोबर ग्रीक भाषेचे साम्य उलगडून दाखविले. यानंतर श्लेगेल, रास्क, फ्रॉन्झ बॉप्प सारख्या अनेक भाषावैज्ञानिकांनी संस्कृतचे सखोल अध्ययन करुन विविध युरोपिय भाषांशी संस्कृतीशी असलेले नाते स्पष्ट केले. त्यांनी वांशिक किंवा कुलनिष्ठ वर्गीकरणाला शास्त्रीय मान्यता मिळवून दिली. या अभ्यासापूर्वी लॅटिन लॅटिन आणि ग्रीक भाषांतील शब्दांचा हिब्रु भाषेतील शब्दाशी संबंध जोडला जायचा. परंतु नंतर ही अभ्यास करण्याची पद्धती मागे पडली. मॅक्समूलर सारख्या विद्वान अभ्यासकाने तर संस्कृलाच भाषाभ्यासाचा पाया मानल्यामुळे संस्कृत व तिच्या कुलातील भाषांना महत्त्व प्राप्त झाले.

**जगातील प्रमुख भाषाकुले**

**१. इंडो-युरोपिअन किंवा आर्यभाषाकुल :** भाषाविज्ञानात पहिल्यांदा अस्तित्वात आलेले 'कुल' म्हणून या भाषाकुलाचा उल्लेख केला जातो. या कुलाच्या संशोधनामुळेच 'भाषाकुल' ही संकल्पना अस्तित्वात आली. युरोपातील व उत्तर भारतातील भाषांचा समावेश या कुलात प्रामुख्याने केला जातो. या भाषाकुलाला भारत युरोपीय (Indo European), आर्यभाषाकुल (Aryan), भारत जर्मानिक (Indo-Germanic), कॉकेशिय, भारत हित्ती (Indo-Hittite) अशी ही नावे दिली गेलेली आहेत. 'संस्कृत' ही या कुलातील महत्त्वाची भाषा मानली गेली आहे. याच भाषाकुलाचा सविस्तर विचार आपणाला पुढे करावयाचा आहे.

**२. हेमिटो-सेमिटिक भाषाकुल :** या कुलातील हेमिटिक गटात प्राचीन इजिप्शियन, कॉप्टिक भाषा तसेच बार्बार व चाड या अर्वाचीन भाषा येतात तर सेमिटिक गटात अक्काडिअन व फिनिशिअन या प्राचीन हिब्रु व अरबी या अर्वाचीन भाषा मोडतात. ग्रीनबर्ग या अभ्यासकाने हेमिटो-सेमिटिक भाषाकुलाला ॲफ्रो-ऐशियायी भाषाकुल असे नाव दिले आहे. या नावावरूनच गटाचा भौगोलिक विस्तार स्पष्ट झालेला आहे.

**३. सिनो-तिबेटिअन भाषाकुल :** या भाषाकुलाला 'इंडो-चायनीज' भाषाकुल असेही नाव आहे. आशिया खंडात या कुलातील भाषा बोलल्या जातात. बर्मी, तिबेट, थायी आणि चीनमध्ये बोलल्या जाणाऱ्या भाषांचा समावेशही याच भाषाकुलात केला गेला आहे.

४. **द्राविडी भाषाकुल :** १८ व्या शतकापर्यंत हे भाषाकुल संस्कृतोद्भव भाषाकुल मानले जात होते. रास्क व कॉल्डवेल या अभ्यासकांनी द्राविडी भाषा या इंडो-युरोपियन भाषाकुलातील नसून त्यांचे वेगळे कुल आहे असा विचार मांडला. इंडो-युरोपियन भाषा बोलणारे लोक भारतात येण्यापूर्वी या कुलातील भाषा भारतभर पसरल्या होत्या. दक्षिण भारतातील तामिळ, तेलुगु, कानडी, मल्याळम या द्राविडी भाषाकुलातील भाषा होत. तसेच पूर्व बलुचिस्तानातील ब्राहुई याच कुलातील आहे.

५. **ऑस्ट्रो-ऐशियायी भाषाकुल :** भारताच्या पूर्व भागात बोलल्या जाणाऱ्या मुंडा शाखेतील भाषा, ब्रम्हदेशातील मॉन-ख्मेर शाखा आणि अनाम-मुआंग शाखा यांचा या भाषाकुलात समावेश होतो. परंतु या शाखांचे कुलनिष्ठ संबंध निश्चित झालेले नाही.

६. **फिनो -उग्रिक भाषाकुल :** या भाषाकुलाला उरालिक भाषाकुल असेही नाव आहे. फिनी, हंगेरियन, लपिश व सॅमोपेड या भाषा या कुलातील आहेत.

७. **अल्ताईक भाषाकुल :** या भाषाकुलाचा फिनो-उग्रिक भाषाकुलांशी संबंध दाखवून काही भाषावैज्ञानिक या दोन कुलांचे 'उरल-अल्ताईक' भाषाकुल असेही नामकरण करतात. तुर्की, मंगोल, मांचू या भाषा या कुलातील आहेत.

८. **कॉकेशस भाषाकुल :** कास्पियन समुद्र, काळा समुद्र, कॉकेशस पर्वत या प्रदेशात या कुलातील भाषा बोलल्या जातात. चेचयन लेनी, सरकशी (उत्तर कॉकेशस), स्वानी, मिंगरेली, जॉर्जी (दक्षिण कॉकेशस) या भाषा या कुलातील प्रमुख भाषा होत.

९. **मलायो- पॉलिनिशियन :** इंडोनेशियन व पॉलिनिशियन ह्या प्रमुख भाषा या कुलातील भाषा आहेत. जावा, सुमात्रा, बोर्निया, सिलबिज, फिलिपिन्स, बाली, न्यूझीलंड, सॅमोआ, हवाई, ताहिनी, मादागास्कर, मलायद्वीप आणि प्रशांत महासागरातील अनेक बेटे या परिवाराशी निगडीत आहेत.या परिवारातील भाषा अश्लिष्ट योगात्मक आहेत.

**१०. जपानी कोरियन भाषाकुल :** जपानी भाषा ही या कुलातील मुख्य भाषा आहे. जपान, कोरिया, फार्मोसा, मंचुको, केरोलीन आणि मार्शल बेटे इत्यादी ठिकाणी या कुलातील भाषा बोलल्या जातात. या भाषादेखील अश्लिष्ट योगात्मक भाषा मानल्या जातात.

जागतिक भाषाकुलांचा विचार अगदी थोडक्यात लक्षात घेतला परंतु आपणाला इंडो-युरोपिअन भाषाकुल आणि त्यातील आर्यभारतीय भाषाकुलातील आपली मातृभाषा मराठीचा जन्म कसा झाला हे लक्षात घ्यावयाचे आहे. तेव्हा आपण इंडो-युरोपिअन भाषा कुलाचा व त्यानंतर आर्य भाषाकुलाचा सविस्तर विचार करणात आहोत.

**इंडो युरोपिअन भाषाकुल**

इंडो-युरोपिअन भाषाकुल भाषाविज्ञानात अतिशय महत्त्वाचे मानलेले भाषाकुल आहे. या 'कुल' संकल्पनेनेच 'भाषाकुल' संकल्पना अस्तित्वात आली. तसेच ऐतिहासिक भाषाविज्ञानाला व

ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीला शास्त्रशुद्ध अभ्यासाची एक निश्चित दिशा याच कुलाने प्राप्त करून दिली. तसेच जगातील भाषांच्या वर्गीकरणाला चालनाही याच भाषांकुलांमुळे मिळाली.

या भाषाकुलातील सर्व शाखांचा भाषावैज्ञानिक अभ्यास झालेला आहे. बऱ्याचशा शाखांमधील प्राचीन भाषिक नमुने उपलब्ध आहेत. या कुलातील भाषांचे कुलदृष्ट्या परस्परांशी असलेले संबंध निश्चित झालेले आहेत. इतर भाषाकुलांच्या संदर्भात असणारे मतभेद या कुलांच्या भाषांच्या संदर्भात मात्र नाहीत. या कुलाला भारत युरोपीय, आर्यभाषासंघ, भारतजर्मानिक, कॉकेशियन, भारत-हित्ती भाषाकुल असेही संबोधण्यात आले आहे. 'संस्कृत' ही या कुलाची केंद्रवर्ती भाषा असल्यामुळे 'संस्कृत भाषा कुल' म्हणूनही या कुलाचा निर्देश केला जातो. भारत युरोपीय भाषांच्या मुळाशी ही एकच भाषा असल्याचे भाषाभ्यासंकानी सप्रमाण सिद्ध केल्यामुळे बाकीची नावे मागे पडून 'भारत - युरोपीय भाषाकुल' हेच नाव सर्वमान्य झाले आहे. अर्थात हे नावदेखील सदोष अशा स्वरूपाचे नाव आहे. कारण भारत आणि युरोपात फक्त याच भाषाकुलातील भाषा बोलल्या जातात असे नाही. तर दक्षिण भारतात द्राविडी कुलातील भाषा बोलल्या जातात. शिवाय या कुलातील भाषा इतर काही देशातही बोलल्या जातात. परंतु हे नाव सदोष असूनही आज ते प्रचलित झाले आहे. या भाषाकुलातील 'संस्कृत' या मुख्य भाषेच्या अभ्यासानंतर मॅक्समूलर सारख्या अभ्यासकांनी 'आर्यभाषाकुल' या नावाचाही वापर केला. परंतु  हे नाव प्रचलित न होता इंडो-युरोपिअन भाषाकुल या नामाभिधानानेच हे भाषाकुल प्रसिद्ध झालेले आहे.

या भाषाकुलात युरोप आणि आशिया खंडातील बहुतेक प्रमुख अशा अनेक भाषांचा समावेश होतो. या भाषांचे प्रामख्याने दोन वर्गात विभाजन होते. हे विभाजन अस्कोली या भाषावैज्ञानिकाने १८७० मध्ये भाषांच्या मूलध्वनींची तुलना करून केलेले आहे. या कुलातील भाषांमधील मूल कंठ्यध्वनी काही भाषाशाखांत कायम राहतात. तर काही शाखांत मात्र ते श, स, ज असे स्पर्श-संघर्षी होऊन उच्चारले जातात. 'क' या मूळ इंडो-युरोपिअन स्वनाचा अवेस्ता भाषेत 'स' आणि लॅटिन भाषेत 'क' होतो. हा फरक लक्षात घेऊन 'सतम' (सेन्तुम) आणि 'कन्तुम' या दोन वर्गात या कुलातील भाषा विभागल्या गेल्या आहेत. सतम् वर्गात अवेस्ता, फारशी, संस्कृत, हिंदी, लिथुआनियम, बल्गेरियन, रशियन इत्यादी पूर्वेकडील भाषांचा तर केन्तुम वर्गात लॅटिन, ग्रीक, इटालियन, फ्रेंच, बिटन गोलिक, तोखारी इत्यादी पश्चिमेकडील भाषांचा समावेश होतो. परंतु पूर्व व पश्चिम दिशांना अनुसरुन केलेले हे वर्गीकरण नव्या संशोधनाने रद्दबातल ठरविले आहे. कारण तुखारी आणि हिटाईट या शाखा भौगोलिक परिसरानुसार पूर्वेकडील असूनही त्यांच्या उच्चारणात बदल झालेला नसल्यामुळे त्यांचा समावेश 'केन्तुम' म्हणजे पश्चिम गटात करावा लागतो. हे वास्तव संशोधकाच्या समोर आल्यामुळे ही वर्गसंकल्पना कालबाह्य ठरली.

या भाषाकुलाचा विचार करताना या कुलातील भाषा बोलणारे भाषिक समाज गट प्रारंभी एकत्र राहात असावेत आणि नंतर ते टोळ्याटोळ्यांनी अन्यत्र गेल्यामुळेच त्यांच्या मूळ भाषेत फरक पडत गेला असावा. ही शक्यता सर्वच अभ्यासकांनी मान्य केली व ही मूळ भाषा इ.स.पूर्व ३००० वर्षे

इतकी प्राचीन असून सुमारे इ.स. पूर्व २०० वर्षानी या भाषाकुलाच्या विविध शाखा झाल्या असाव्यात. या भाषाकुलाचा अभ्यास करणाऱ्या भाषावैज्ञानिकांनी ग्रीक, लॅटिन, जर्मन, रशियन अशा अनेक भाषांची तुलना संस्कृत भाषेशी करून या भाषांचे उगमस्थान एकच असण्याच्या अनुमानाला प्रमाणित्व प्राप्त करुन दिले आहे.

- **इंडो–युरोपिअन भाषाकुल : शाखा** : या भाषाकुलाच्या एकूण दहा शाखा आहेत.

**१. भारत–इराणी शाखा (इंडो–इरानिअन) :** इंडो–युरोपिअन भाषाकुलातील ही प्रमुख शाखा असून मराठी भाषा याच शाखेतील भाषा मानली गेली आहे. कारण वैदिक भाषा आणि प्राचीन इराणी भाषा यांच्यातील साम्य लक्षात घेतल्यास पूर्वी एकत्र राहिलेले लोक याच शाखेतून भारतात आले. आणि प्रमुख नद्यांच्या काठी वस्ती करून राहू लागले. त्यांना 'आर्य' असे संबोधतात. तेव्हा या कुलातही दोन गट होतात. १) भारतीय आर्य भाषा गट आणि २) इराणी आर्य भाषा गट पैकी भारतीय आर्यभाषागटात प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन भारतीय भाषांचा समावेश होतो; तर असेच भाषागट इराणी आर्य भाषागटातही पाडले जातात. या भाषागटांचा सविस्तर आढावा आपण पुढे घेणार आहोत.

**२. बाल्टो–स्लॉविक शाखा :** या भाषागटाच्या बाल्टो आणि स्लॉविक अशा दोन उपशाखा आहेत. इंडो–युरोपिअन भाषाकुलातील हा महत्त्वाचा भाषा गट आहे. बाल्टिक समुद्राच्या आसपासच्या परिसरात बोलल्या जाणारी भाषा म्हणून 'बाल्टो' नाव या भाषेला मिळाले आहे. या शाखेत लिथुआनियन आणि लेटिश या भाषांचा समावेश आहे. लिथुआनिअन भाषेचे मिळाले आहे. या शाखेत लिथुआनियम आणि लेटिश या भाषांचा समावेश आहे. लिथुआनियन भाषेचे सोळाव्या शतकापासूनचे भाषिक नमुने उपलब्ध आहेत. या भाषेत नामाची विभक्तिरुपे वैदिक संस्कृतप्रमाणे चालतात. वैदिक संस्कृतमध्ये आढळणारा व उत्तरकालीन अभिजात संस्कृतमध्ये लोप पावलेला सुराघात या भाषेने टिकवून ठेवला आहे. परंतु या शाखेच्या प्राचीन प्रशिअन व लेटिश या भाषांत हा सुराघात आढळत नाही. तिची जागा जर्मन व लिथुआनियन या भाषांनी घेतली आहे. लेटिश भाषा व तिच्या बोली मात्र आजही बोलल्या जातात. स्लॉविक या उपशाखेचा प्राचीन नमुना नवव्या शतकातील आहे. या शाखेच्या प्राचीन अवस्थेला 'प्राचीन ख्रिस्ती स्लॉविक' किंवा 'प्राचीन बल्गेरिअन' असे नाव आहे. या शाखेच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण अशा तीन उपशाखा आहेत. पैकी पूर्व वर्गातील महत्त्वाच्या रशियन भाषेतून विविध प्रकारची साहित्यनिर्मिती झालेली आहेत. राजकारण, कला, विज्ञान अशा जीवनसन्मुख ज्ञानशाखांत या भाषेचा अग्रक्रमाने वापर करण्यात येतो. सोव्हिएत राज्याची 'राष्ट्रभाषा' होण्याचा सन्मान या भाषेला मिळाला आहे. बल्गेरिअन, झेक, पोलिश, रशियन इत्यादी भाषा या शाखेतील अर्वाचीन भाषा आहेत. बाल्टिक व स्लॉविक या उपशाखांत मोठ्या प्रमाणावर साधर्म्य आढळते.

**३. आर्मिनिअन शाखा :** या भाषेवर इराणी भाषेचा प्रभाव आहे. या भाषेत इराणी शब्द मोठ्या प्रमाणात आढळतात. इराणची राजकीय अधिसत्ता अनेक शतकापर्यंत होती. तसेच इराणच्या

सरहद्दीला लागूनच हा भाषिक पट्टा असल्याने स्वाभाविकच इराणीचा पगडा या शाखेवर पडला आहे. कॉकेशसचा दक्षिण भाग, मेसापोटेमिया व काळ्या समुद्राच्या दक्षिण भागात ही भाषा वापरली जाते. याशिवाय इजिप्त, तुर्कस्थान, रुमानिया, अमेरिकेतील संयुक्त संस्थाने व बल्गेरिया या भागातही अर्मिनिअन भाषा बोलणारे भाषिक समाज गट आहेत.

**४. आल्बेनियम शाखा :** या भाषेवर लॅटिन, ग्रीक, स्लॉविक व तुर्की भाषांचा परिणाम झालेला आहे. या भाषेचा शब्दसंग्रह लॅटिनशी मिळता जुळता आहे. एशियाटिक समुद्राच्या पूर्वेकडील पर्वतीय प्रदेशात ही भाषा बोलली जाते. या भाषेचे प्राचीन नमुने उपलब्ध नाहीत. तिचा इतिहास सर्वसाधारणत: १४ व्या शतकापासून सांगता येतो. ही भाषा प्रामुख्याने आल्बेनियात बोलली जाते.

**५. इटालिक किंवा रोमन शाखा :** मूळ लॅटिनपासून इटालिक ही भाषा निर्माण झाल्यामुळे तिला लॅटिन शाखा असेही म्हणतात. या शाखेचे ओस्कन उम्ब्रिअन आणि लॅटिन-फॅलिस्कन असे दोन गट केले जातात. पैकी लॅटिन फॅलिस्कन गटातील भाषा महत्त्वाची आहे. रुमानिया, स्पॅनिश, फ्रेंच या भाषांचा समावेश या शाखेत होतो. कॅथॉलिक ख्रिश्चन धर्मप्रसाराचे माध्यम म्हणून हीच भाषा वापरली जाते. या भाषेतून उच्च दर्जाची साहित्यनिर्मितीही झाली आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात या भाषेचा वापर होतो. या भाषेचा प्रभाव वर्तनातही दिसतो. दक्षिण अमेरिकेस आजही लॅटिन अमेरिका म्हटले जाते. ग्रीसमधील ॲटिक बोलीप्रमाणे लॉरेन्स शहरात बोलल्या जाणाऱ्या लॅटिनला महत्त्व प्राप्त झाले आहे. इटालीमधील अन्य बोली प्रचारातून नाहीशा झाल्या आहेत. लॅटिन ही ग्रांथिक भाषा असली तरी तिची बोलीही प्रचारात होती. तिला व्यावहारिक लॅटिन असे म्हणतात. या व्यावहारिक लॅटिनपासूनच इटालिअन, फ्रेंच, स्पॅनिश, पोर्तुगीज व रुमेनिअम भाषा निर्माण झाल्या.

**६. ग्रीक किंवा हेलेनिक शाखा :** या भाषागटातील भाषा ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या असल्या तरी आज फार थोडे लोक या भाषा बोलतात. ग्रीस, सायप्रस व तुर्कस्तानात तुरळकपणे ग्रीक भाषा बोलतात. ग्रीक भाषेतील प्राचीन नमुने इ.स.पूर्व १४५० ते १२०० या काळातील आहेत. मातीच्या शिक्क्यांवरील हे नमुने 'मासेनिअन ग्रीक' म्हणून ओळखले जातात. ग्रीसची प्राचीन संस्कृती व परंपरा जपणाऱ्या ग्रीस बोलीतून ग्रीक भाषेची निर्मिती झाली. या भाषेतील सामासिकता, प्रत्यय, लिंग, वचने अशा काही गोष्टी संस्कृतसारख्याच आहेत. या भाषेला प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. ही भाषा अल्बेनियाचा भाग, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, एजियन सामुद्रिक बेटे अशा काही क्षेत्रात वापरली जाते.

**७. जर्मॅनिक शाखा :** या शाखेची तीन उपशाखेत विभागणी केली जाते.

**पूर्वशाखा :** या शाखेतील सर्वात प्राचीन नमुना इ.स. चे चौथ्या शतकातील गोथिक भाषेतील आहे. गोथिक ही पूर्व शाखेतील भाषा आहे. परंतु आज तिची अर्वाचीन अवस्था उपलब्ध नाही. पश्चिम जर्मॅनिक शाखेतील जर्मनने आज गोथिकची जागा घेतली आहे.

**पश्चिम शाखा :** पश्चिम शाखेचे हाय जर्‌मॅनिक, लो जर्‌मॅनिक, व ॲग्लो फ्रिझिअन असे गट आहेत. जर्मन ही हाय जर्‌मॅनिक शाखेतील प्रमुख भाषा आहे, तर डच आणि इंग्रजी या अनुक्रमे लो जर्‌मॅनिक आणि ॲग्लो फ्रिझिअन शाखातील महत्त्वाच्या भाषा आहेत.

**उत्तर शाखा :** आइस्लॅडिक, स्वीडिश, नॉर्वेजिअन व डेनिश या भाषांचा समावेश या शाखेत होतो.

**८. केल्टिक शाखा :** या भाषेचे प्राचीन नमुने उपलब्ध नाहीत. ही शाखा इटालिक शाखेशी आपले साम्य दर्शविते. या शाखेच्या दोन उपशाखा आहेत. १) गेलिक शाखा व २) ब्रिटानिक शाखा. गेलिक शाखेत आयर्लडमधील आयरिश भाषेचा समावेश होतो. तर ब्रिटानिक शाखेत इंग्लंडच्या वेल्स भागात बोलली जाणारी वेल्शी आणि फ्रान्सच्या उत्तरेकडील ब्रिटानिआ वसाहतीतील ब्रेटन या भाषांचा समावेश होतो.

**९. तुखारी शाखा :** इसवीसनाचे सहावे व आठवे शतकात लिहिलेली बौध्दधर्मीय हस्तलिखिते ही तुखारी भाषेचे उपलब्ध प्राचीन नमुने होत. ही हस्तलिखिते मध्य आशियातील चिनी तुर्कस्तानमध्ये १९ व्या शतकाच्या अखेरीस सापडली. या भाषेच्या दोन बोली आहेत. यातील पूर्वेकडील बोलीला 'अग्री' व पश्चिमेकडील बोलीला 'कुची' म्हणतात. भारतीय व ग्रीक भाषेशी या भाषेचा संबंध होता.

**१०. हिटाइट शाखा :** या शाखेतील भाषांना ॲनटोलिअन असेही म्हणतात. या शाखेतील भाषिक नमुना इ.स.पूर्व १७०० ते १२०० मधील आहे. हिटाईट भाषेत लिहिलेल्या मातीच्या विटा विसाव्या शतकात तुर्कस्तानातील उत्खननात सापडल्या. या कुलाच्या आठ शाखा निश्चित केल्या आहेत. हिटाइट शाखेच्या इंडो-युरोपिअन भाषाकुलातील भाषांचे स्थान कोणते याबाबत अभ्यासकात दोन मतप्रवाह आहेत. संस्कृत, ग्रीक व लॅटिन भाषांप्रमाणे हिटाइट भाषा इंडो-युरोपिअन भाषेपासून निर्माण झाली आहे मानणारा एक मतप्रवाह. तर हिटाइट भाषा बोलणारे भाषिक समाजगट इंडो-युरोपिअन भाषा बोलणाऱ्या भाषिक समाजगटापासून प्रथम वेगळे झाले असावेत म्हणून हिटाइट भाषेचे स्वरूप संस्कृत ग्रीक इत्यादी भाषांपेक्षा प्राचीन आहे; असे मानणारा दुसरा मतप्रवाह या भाषेच्या संदर्भात आहे.

इंडो-युरोपिअन भाषाकुलाच्या दहा शाखाचा थोडक्यात उहापोह केला. परंतु आपणाला आर्य भारतीय भाषाकुल लक्षात घ्यावयाचे आहे. आणि या शाखेतील इंडो इरानिअन व इंडोआर्यन अर्थात आर्यभारतीय भाषाकुल विशेषत्वाने लक्षात घ्यावयाचे आहे. कारण आपल्या वर्तमान भारतीय भाषांची जन्मकथा या आर्य भारतीय भाषाकुलाशी निगडीत आहे. त्यातल्या त्यात आपली मातृभाषा, निजभाषा मराठीचे या शाखेशी असलेले नाते आपणाला तपासावयाचे आहे. तेव्हा इंडोयुरोपिअन भाषाकुलाच्या या दोन शाखांचा विचार करू या.

- **इंडो–इरानिअन शाखा : (भारतीय–इराणी शाखा)**

या शाखेला ‘आर्यशाखा’ असेही म्हटले जाते. मराठी भाषेचे ‘इंडो–युरोपिअन’’ भाषाकुलातील स्थान निश्चित करण्यासाठी इंडो–इरानिअन शाखा जाणीवपूर्वक लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण इरानिअन शाखेचे इराणी शाखा आणि आर्य भारतीय शाखा असे दोन विभाग होतात. प्राचीन आर्यभारतीय भाषा वैदिक संस्कृत आणि प्राचीन इराणी भाषा या भाषांतील साम्य लक्षात घेतल्यास या दोन भाषा बोलणारे भाषिक समाज पूर्वी इराणमध्ये एकत्र राहिले असावेत आणि एकच भाषा बोलत असावेत असे अनुमान या भाषांच्या अभ्यासाने करण्यात आले आहे. तेव्हा आपण प्रथम इराणी शाखेचा प्रथम विचार करू या.

**इराणी शाखा :** इराणी शाखेच्या प्राचीन, मध्य व अर्वाचीन अशा तीन अवस्था आहेत हे आपण इंडो–युरोपिअन भाषाकुलाची माहिती घेताना अगदी सुरुवातीला नमूद केले आहेच. ‘इराणी’ हा शब्द ‘आर्याणाम’ या शब्दाचा अपभ्रंश असल्यामुळे ही भाषा आर्यभाषाकुलातीलच भाषा ठरते. इराण प्रातांत आर्याची वस्ती असल्याचे काही अभ्यासकांचे मत आहे. प्राचीन वैदिक संस्कृत विशेषत: ऋग्वेद आणि प्राचीन इराणमधील अवेस्ता या भाषेतील साम्य लक्षात घेण्यासारखे आहे. अवेस्ताची निर्मिती इ.स.पू. सातव्या शतकातील असून या ग्रंथातील गाथांचे स्वरूप ऋग्वेदातील प्रार्थनास्तोत्रांप्रमाणे आहे. या दोन ग्रंथातील साम्य प्राचीन संस्कृत आणि प्राचीन इराणीतही दिसून येते. प्राचीन इराणीचे पूर्वेकडील बोली आणि दक्षिणेकडील बोली असे दोन पोट विभागही केले जातात. पूर्वेकडील बोलीत पारशी धर्मग्रथांची अवेस्ता भाषा येते. अवेस्तांच्या ‘गाथांची भाषा’ आणि गाथोत्तर भाषा’ अशा दोन अवस्था आहेत. वैदिक संस्कृत आणि अवेस्ता या भाषांत ध्वनिसाम्य व व्याकरणिक साम्य आहे. ‘अवेस्ता’ हा पारशी धर्मग्रंथ असून ‘अवेस्ता’ या शब्दाचा अर्थ ‘शास्त्र’ असा आहे.

पश्चिमेकडील इराणी भाषेत प्राचीन पर्शिअन भाषा येते. या भाषेतील साहित्य उपलब्ध नाही. मात्र इ. स. पूर्व चौथ्या–पाचव्या शतकातील शिलालेख उपलब्ध आहेत. अवेस्ताप्रमाणे प्राचीन पर्शिअनचे वैदिक संस्कृतशी साम्य आहे. प्राचीन पर्शिअनची मध्ययुगीन अवस्था म्हणजे पहलवी आणि अर्वाचीन अवस्था म्हणजे इराणमध्ये आज बोलली जाणारी पर्शिअन भाषा होय. अर्वाचीन पर्शिअन भाषेत विपुल साहित्यनिर्मिती झालेली असून या भाषेचे स्वरूप ‘अयोगात्मक’ आहे. अरबी शब्दांचा भरणाही या भाषेत येतो. अवेस्ताची मध्ययुगीन अवस्था उपलब्ध नाही. पूर्वेकडील अर्वाचीन भाषांचा समावेश यात होतो. याशिवाय पंजाबकडे बोलली जाणारी ‘दार्दिक’ किंवा ‘दरदीय’ भाषा ही इराणीशी संबंधित असल्याचे काही अभ्यासकांचे मत आहे. या भाषेला इंडो–इरानिअन शाखेची तिसरी उपशाखा मानावी असे काही अभ्यासकांचे मत आहे. ‘दार्दिक’ या खोवारी, वाखी उपशाखेत काश्मिरी, खोवारी, काफिरीसारख्या भारताच्या वायव्येकडे बोलल्या जाणाऱ्या भाषांचा समावेश होतो.

**आर्यभारतीय भाषाकुल शाखा :** आर्यभारतीय ही इंडो–इरानिअन गटाची दुसरी शाखा. या शाखेच्या प्राचीन, मध्य आणि अर्वाचीन अवस्था आहेत. प्राचीन अवस्थेत वैदिक संस्कृत आणि

पाणिनीउत्तरकालीन संस्कृत किंवा अभिजात संस्कृत अशा दोन भाषिक अवस्था येतात. तर मध्य अवस्थेत प्राकृत आणि अपभ्रंश समावेश होतो. आणि अर्वाचीन अवस्थेत मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती इत्यादी आज बोलल्या जाणाऱ्या भारतीय भाषांचा समावेश होतो. मराठीची पूर्वपीठिका म्हणूनच आपणाला या भाषाकुलाचा विचार करावयाचा आहे.

- **मराठीची पूर्वपीठिका**

भाषाशास्त्रवेत्यांनी भारतातल्या भाषांची आर्य, द्रविड, मुंड आणि चीन-तिबेटी या चार कुलात विभागणी करून मराठी ही आर्य कुलातली भाषा ठरविली आहे. म्हणूनच तिच्या उत्पत्तीच्या आणि घटनेचा, घडणीचा विचार करताना संस्कृत आणि प्राकृत या भाषांचा प्राधान्याने विचार केला जातो. डॉ. पां. दा. गुणे यांनी संस्कृत प्राकृतच्या बरोबरीनेच अपभ्रंश या आणखी एका दुव्याकडे अभ्यासकांचे लक्ष वेधले आणि संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, मराठी अशा मराठीच्या उपपत्तीचे सूत्र भाषाभ्यासात रुढ झाले आणि आजतागायत मराठीच्या उत्पत्तीचा विचार एकांगीपणाने होत राहिला; ही श्री. विश्वनाथ खैरे यांची तक्रार रास्त वाटते. मराठीच्या उत्पत्ती, घटना जडणघडण याचा नव्याने अभ्यास होणे गरजेचे आहे.

**आर्यभारतीय शाखा : प्राचीन अवस्था :** मराठी भाषेच्या घडणीचा विचार करत असताना आजतागायतच्या अनेक भाषाभ्यासकांनी मराठीच्या पूर्व अवस्थांचा विचार केला आहे. हा विचार 'अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ'या सिद्धांताच्या परिघातच होताना दिसतो. आर्यभारतीय शाखेतील प्राचीन भाषा म्हणजे संस्कृत. या संस्कृतचेही वैदिक संस्कृत व पाणिनी उत्तरकालीन किंवा अभिजात संस्कृत असे कालिक भेद मानले आहेत. या भेदांचाही मराठीच्या जडणघडणीत कसा वाटा आहे. ते यावरूनच लक्षात येते.

- **वैदिक संस्कृत**

वैदिक संस्कृतात चार वेद व ब्राह्मण ग्रंथ यांचा समावेश होतो. उपनिषदे आणि सूत्रे या वेदांच्या उत्तरकालीन रचनादेखील वैदिक संस्कृत या भाषिक टप्प्यावरच येतात. वैदिक संस्कृतचा प्राचीन नमुना म्हणून ऋग्वेदाचा दाखला दिला जातो. दोन ते नऊ या मंडलांतील भाषा व पहिल्या आणि दहाव्या मंडलांतील भाषा यात फरक आहे; असेही मानल जाते. वैदिक संस्कृतीची या उपलब्ध साहित्याच्या आधारे काही वैशिष्टये सांगितली गेली आहेत. ती अशी (१) 'अ', 'इ', 'उ', 'ऋ', 'ए', 'ऐ', 'ओ', 'औ' हे स्वर वैदिक संस्कृतमध्ये आढळतात तसेच (२) मुर्धन्य उच्चार, 'ट' वर्गातील वर्ण आणि 'ळ' यात आहेत. यांचे कारण इंडो-युरोपिअन भाषांत मुर्धन्य उच्चार नाहीत. प्राचीन इराणीतही ते आढळत नाहीत. हे वर्ण वैदिक संस्कृत बोलणाऱ्या समूहाचा भारतात आल्यानंतर द्राविडी भाषांशी जो संबंध आला त्यातून हे उच्चार वैदिक भाषेत आले असावेत असे एक अनुमान, गृहीत धरले आहे. (३) विशेषणे नामाप्रमाणे चालतात. (४) लिंगे तीन, वचने तीन आणि विभक्ती आठ आहेत. (५) क्रियापदांच्या रूपांत परस्मैपद आणि आत्मनेपद असा भेद आढळतो. (६) भूतकाळ दर्शविण्यासाठी भूतकाळ, तृतीय भूतकाळ आणि परोक्ष भूतकाळ अशी तीन प्रकारची रूपे

दिसतात. (७) भविष्यकाळ दर्शविण्यासाठी 'स्य' प्रत्ययी रूपे आढळतात. परंतु कालवाचक क्रियापदांची नियमित रूपे आढळत नाहीत. वैदिक संस्कृतची स्वनव्यवस्था देखील इंडो-युरोपिअन भाषेपेक्षा काही प्रमाणात वेगळी आहे. मूळ भाषेतील 'अ','इ', व 'ओ' ह्या ऱ्हस्व स्वराचे वैदिक संस्कृतमध्ये 'अ' या एकाच स्वरात विलयन होतो. मुळातील अतिऱ्हस्व 'अ' चा 'उ' होतो. 'ट' हा मुर्धन्य वर्ण नव्याने आला आहे. मूळातील तीन प्रकारचे 'क' वर्ग वैदिक संस्कृतमध्ये नाहीत. 'स' बरोबरच 'श' व 'ष' व घर्षक आढळतात. वैदिक संस्कृतच्या काळाविषयी नेमका अंदाज बांधता येत नसला तरी ही भाषा इ. स. पूर्व १५०० ते १००० या काळात बोलली जात असावी; असा तर्क सर्वच अभ्यासकांनी केला आहे. तो सर्वानीच गृहीत धरला आहे.

- **पाणिनी उत्तरकालीन अभिजात संस्कृत**

अभिजात संस्कृत ही वैदिक संस्कृतची उत्तरकालीन अवस्था मानली गेली आहे. तिच्या स्वनव्यवस्थेत फारसा फरक नाही. ऋग्वेदाचाच येथे हवाला देत प्राचीन मंडलात केवळ 'र' सापडतो. दहाव्या मंडलापासून 'र' आणि 'ल' असे दोन्ही स्वन आढळतात. ते एकाच अर्थाने वापरल्या गेलेल्या शब्दांतही दिसतात. त्यासाठी रोदित व लोहित अशा शब्दांचे उदाहरण दिले जाते. या अवस्थेत 'ल' अधिक आढळतो. मुर्धन्य उच्चार असलेले शब्द मोठया संख्येने आढळतात. स्वरमध्यस्थ 'ड' व 'ढ' वैदिक संस्कृतमधील काही शाखात 'ळ' व 'ळह' होतात. तसेच उत्तरकालीन संस्कृतमध्ये होत नाहीत. उत्तरकालीन संस्कृतात 'ऋ' व 'लृ' यांचा स्वराप्रमाणे वापर केला जातो. वैदिक संस्कृतप्रमाणे स्वराघात आहे. उत्तरकालीन संस्कृतमध्ये त्याची जागा बलाघाताने घेतली आहे. वैदिक संस्कृतप्रमाणे उत्तरकालीन संस्कृतमध्ये तीन लिंग, तीन वचन आणि आठ विभक्ती यानुसार होणारे विकार आहेत. क्रियापदे आत्मनेपदी आणि परस्मैपदी अशा दोन्ही रूपात आढळतात. धातू आणि पुरुषवाचक विकार यांच्यामध्ये कालदर्शक असे जे प्रत्यय इंडो-युरोपिअन भाषेमध्ये वापरले जात असत; त्यांच्या आधारे संस्कृतमध्ये काळ आणि दहा गण यांची निश्चिती केली गेली. काळ आणि अर्थ मिळून संस्कृतमध्ये दहा 'ल' कार आहेत. वैदिक संस्कृतमधील क्रियारुपांची जटिलता उत्तरकालीन संस्कृतमध्ये कमी झाली. याशिवाय वैदिक संस्कृतमध्ये आयात शब्दांची संख्या मर्यादित आहे. उत्तरकालीन संस्कृतात ते मोठ्या प्रमाणावर सापडतात. अभिजात संस्कृतचा कालखंड सर्वसाधारणत: इ.स.पूर्व १००० ते इ.सनाचे चौथे-पाचवे शतक मानला जातो. या काळात रामायण, महाभारत ही महाकाव्ये व कालिदास, भवभूती आदिंची काव्य, नाटके तसेच शंकराचार्य, रामानुज इत्यादींची तत्त्वज्ञानपर भाष्ये लिहिली गेली. तर पाणिनी, पतजंली या व्याकरणकरांनी उत्तरकालीन संस्कृतचे व्याकरण लिहिले. पाणिनीचा अष्टाध्यायी ग्रंथ याच काळातील. लिखीत भाषा म्हणून संस्कृतचा वापर करताना व्याकरण व्यवस्थेचे काटेकोर पालन केले गेले. परंतु बोलीला कालपरत्वे होणारे विकार होतच राहिले. यातूनच वेगवेगळया प्राकृतभाषा निर्माण झाल्या असे मानले जाते.

- **आर्यभारतीय शाखा : मध्य अवस्था**

आर्यभारतीय शाखेच्या मध्य अवस्थेत प्राकृत आणि अपभ्रंश भाषांचा विचार केला जातो. प्राकृत शब्दाने निरनिराळ्या भाषांचा म्हणजे मागधी, अर्धमागधी, माहाराष्ट्री, शौरसेनी इत्यादी भाषांचा बोध होतो. परंतु खरी प्राकृत म्हणजे एकच पाली बाकीच भेद देश भेदानेचे झालेले आहेत. एका मतानुसार संस्कृत भाषेपासून निघालेल्या भाषांपैकी संस्कृताशी विशेषत: वैदिक संस्कृताशी अत्यंत सदृश असलेली भाषा म्हणजे पाली ही होय. हिला बौद्धमागधी असे ही संबोधिले जाते. बौद्धधर्माचे मूळ ग्रंथ या भाषेत आहेत. इसवी सनाच्या पूर्वी सहाव्या शतकात बौद्ध धर्माची स्थापना झाली व त्यांनंतरच्या तीन शतकांत धम्माचा ग्रंथसंग्रह लिहिला गेला. या ठिकाणीच प्राकृत भाषेचे स्वरूप प्रथमत: पाहावयास मिळते. या कालखंडात ही लोकभाषा चांगलीच नावारूपास आलेली दिसते. अनेक भाषाभ्यासकांच्या मते ही लोकभाषा म्हणजे विद्वानांच्या संस्कृत भाषेचे सोपे स्वरूप होय. ही प्राकृत भाषा म्हणजे त्या वेळी पूर्वेकडील मगध देशापासून ते पश्चिमेकडील पंजाब आणि दक्षिणेकडील माळवा, विदर्भ इत्यादी प्रदेशापर्यंत चालणारी लोकभाषा होती. तिलाच पुढे 'पाली' असे नाव पडले. सम्राट अशोकाने इसवी सनापूर्वी तिसऱ्या शतकात आपल्या साम्राज्याच्या सीमेवर ठिकठिकाणी ज्या आज्ञा कोरून ठेवल्या त्या पाली भाषेत आहेत. एका मतानुसार पाली ही बौद्ध धम्माची स्वतंत्र भाषादेखील मानली गेली आहे. एवढेच नव्हे तर संस्कृत आणि एतदेशीय द्रविडी दोन निकटवर्ती भाषाचा अपभ्रंश स्वरूपातील जो परस्परसंबंध म्हणजे पाली भाषा होय. पाणिनीय संस्कृतपेक्षा आधीची भाषा म्हणूनही पालीचा उल्लेख केला जातो. पाली या शब्दाच्या अनेक व्युपत्ती दिल्या जातात. 'पाली; या शब्दाचा अर्थ 'ओळ' असा होतो. या दृष्टीने धम्मग्रंथातील ओळीत समाविष्ट झालेली ती पाली, राजवाडे यांच्या मतानुसार बहुजन समाजाची 'प्रकट' भाषा असा पाली या शब्दाचा अर्थ लावून प्रकट > पअड > पाली अशा व्युत्पत्ती सांगितली आहे. 'पाल' म्हणजे सुरक्षित ठेवणे याच धातूपासून धर्मानंद कोसंबी यांनी या शब्दाची व्युत्पत्ती सांगितली आहे. धर्मानंद कोसंबी यांच्या मतानुसार; ज्या भाषेत लिहिलेल्या ग्रंथांत बुद्धांचे तत्त्वज्ञान सुरक्षित आहे ती भाषा म्हणजे 'पाली'. उपलब्ध साहित्याच्या आधारे या भाषेची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतात.

१. 'ऋ' या संस्कृत अवघड स्वराऐवजी पालीमध्ये कधी 'अ' कधी 'इ' कधी 'उ' तर कधी 'री' असे सोपे स्वर वापरण्यात आले. उदाहरणार्थ ; ऋत्विज > रित्विज, वृक्ष > रुक्ष, धृत > घत, गृध > गीध

२. संस्कृतमधील संयुक्त व्यंजनापूर्वीचा दीर्घ स्वर पालीत ऱ्हस्व होतो. (काष्ठ > कठठ, देशान्तरे > देसन्तरे) संस्कृतमधील ऐ आणि औ हे उच्चार पालीत ए व ओ असे होतात. तैल > तेल, मौलि>मोली.

३. संस्कृतात शब्दाच्या शेवटी येणाऱ्या विसर्गाऐवजी पालीत ओ येतो.

४. अभिजात संस्कृतमध्ये न आढळणारा (ळ) पालीत आहे.

५. पालीत लिंगे तीन, वचने मात्र दोनच आहेत.

६. पालीने संस्कृतमधील काही शब्द स्वीकारले. परंतु काही शब्द विकार होऊन आलेले आहेत.

७. पालीची रूपव्यवस्था देखील लक्षात घेण्याजोगी आहे. केवळ उच्चार प्रक्रियेमुळे भाषेची घडण बदलते असे नाही तर एका भाषेतून दुसरी भाषा निघताना तिची घटनाही बदललेली असते. संस्कृत भाषेचे व्याकरणाच्या चौकटीत व्यवस्थापन होत असतानाच त्यात बदल करून 'पाली' आकारास येत होती. भाषेचा आत्मा म्हणजे तिची प्रत्ययप्रक्रिया त्यात बदल झाला तरच त्या भाषेचे नामकरण होण्याइतके स्थित्यंतर होते. त्या भाषेची घटना म्हणजे प्रत्यय प्रक्रियाही पालटत गेली आणि म्हणूनच 'पाली'सारखी स्वतंत्र भाषा उदयास आली.

८. संस्कृतमधील गोंधळून टाकणारे वैचित्र्यही भाषाबदलाच्या मुळाशी आहे. उदाहरणार्थ; एकवचन, द्विवचन, अनेकवचन या तीन वचनांतून पालीने द्विवचन काढून टाकले. चतुर्थीऐवजी षष्ठी व पंचमी ऐवजी तृतीया विभक्ती वापरली, संस्कृतमधील निरनिराळे काळ व अर्थ कायम ठेवले. परंतु संस्कृतमधील भेद मात्र पालीने ठेवला नाही. धातूचे सामान्यीकरण केले. संस्कृतमधील धातूंच्या दहा गणाची व्यवस्था ढिली करून सर्व धातू एकाच गणात बसविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संस्कृतातील रुपवैचित्र्य कमी झाले. सुलभीकरणाच्या प्रवृत्तीचा अवलंब केला गेला.

- **शौरसेनी, मागधी, अर्धमागधी, पैशाची, माहाराष्ट्री या प्राकृत भाषा**

इ.स. २०० ते इ.स. ६०० पर्यंतच्या कालखंडातील प्राकृत भाषा म्हणजे पैशाची, शौरसेनी, मागधी, माहाराष्ट्री व संस्कृत नाटकातून प्रकट झालेल्या भाषा. काही अभ्यासकांच्या मते माहाराष्ट्री ही कोणत्याही प्रदेशाची किंवा त्या प्रदेशातील लोकांची भाषा नसून ती केवळ काव्याची भाषा होती असे मत आहे. मनमोहन घोष, डॉ. सुनितीकुमार चतर्जी हे अभ्यासक या मताचे पुरस्कर्ते आहेत. अर्थात माहाराष्ट्री प्राकृत ही कोणत्या देशाची भाषा असा मतमतांचा गलबला असला तरी माहाराष्ट्री ही भाषा तत्कालीन सर्वच भाषांना सांधून जाणारी अशी भाषा असल्यामुळे आणि मराठीत तिचेच विशेष प्रामुख्याने दिसत असल्यामुळे मराठीच्या पूर्वपीठिकेत तिचा विचार अधिक करावा लागतो. इ.सनाच्या पाचव्या शतकात होऊन गेलेला प्राकृत व्याकरणकार 'वररुचि' आपल्या 'प्राकृतप्रकाश' या ग्रंथात माहाराष्ट्री ही प्रमुख भाषा मानून तिचे वर्णन पहिल्या नऊ प्रकरणात करतो आणि उरलेल्या शौरसेनी, मागधी व पैशाची या प्राकृतांवर एकेक प्रकरण लिहून त्यांच्या विशिष्ट लकबा तेवढ्या सांगतो. 'शेषं महाराष्ट्रीवित्' असे म्हणतो. त्यांच्यानंतर हेमचंद्र (इ.स. ५०० ते ७००) हा व्याकरणकार प्रत्येक प्राकृत शब्द संस्कृतपर्यंत नेताना कित्येक शब्दांची परंपरा संस्कृतपर्यंत नेता येत नसल्याचे प्रथम दृष्टोत्पत्तीस आणतो व अशा देशी शब्दांची निराळी नोंद करून त्याने 'देशीनाममाला'हा दुसरा कारिकाबद्ध ग्रंथ रचला. प्रत्यक्ष जिवंत भाषा ऐकून वररुचि, हेमचंद्र यांनी

आपली व्याकरणे रचली. अशा या प्राकृत भाषांचे काही विशेष आपणाला येथे समजावून घेता येतील.

उपरोक्त नमूद केलेल्या आपल्या प्राकृत भाषा संस्कृतपासून बऱ्याच दूर गेलेल्या दिसतात. मात्र या भाषा पालीला बऱ्याच जवळच्या असणे स्वाभाविक होते. त्यामुळे पाली आणि प्राकृतात झालेले समान बदल व पालीहून प्राकृतचे वेगळे विशेष येथे पाहू.

- **स्वनव्यवस्था**

'ऋ' या स्वराऐवजी पालीत अ,इ,उ हे स्वर येतात. प्राकृतातही हीच व्यवस्था कायम राहिली. ऐ व औ संस्कृतातील संयुक्त स्वरात साधेपणा आला. उदाहरणार्थ वैद्य > वेज्झ (ऐ>ए), कौमुदी > कोमुई (औ > ओ) या बदलामुळेच पालीपेक्षा संस्कृतला प्राकृत अधिक दूरची झाली. संस्कृतमधील ऱ्हस्व स्वराचा दीर्घ स्वर करणे आणि दीर्घ स्वरांचा ऱ्हस्व करणे हे प्राकृतात दिसून येते. उदाहरणार्थ; पानीय > पाणिअ, जीवति > जियई, प्रकट > पाअड. याशिवाय प्राकृतात आद्य स्वराचा विशेष करून आद्य 'अ' चा लोप झालेला दिसून येतो. उदाहरणार्थ; अरण्य > रण्ण.

**प्राकृतची रूपव्यवस्था वा व्याकरणिक वैशिष्ट्ये**

१. प्राकृत भाषांत संस्कृतप्रमाणे द्विवचन नाही. एकवचन आणि अनेकवचन ही दोनच वचने आहेत.

२. धातूंची परस्मैपदी रूपे आहेत. आत्मनेपदी रूपे, संकेतार्थ यांचा लोप झाला आहे.

३. भूतकाळ दर्शविण्यासाठी धातूसाधितांचा उपयोग अधिक केला जातो.

४. चतुर्थी आणि षष्ठी यांचे विभक्तिप्रत्तय सारखे आहेत.

५. संस्कृतसारखी क्रियापदांच्या रूपांची समृद्धी प्राकृतात नाही.

आर्यभारतीय शाखेच्या मध्य अवस्थेतील प्राकृत भाषांचा आपण येथे आढावा घेतला. इ.स.पूर्व ६०० ते इ.स. ६०० हा प्राकृत भाषांचा कालखंड, या भाषांमध्ये विपुल साहित्यनिर्मिती झाली. वररुचि आणि हेमचंद्र आणि यांनी प्राकृत भाषेचे व्याकरण रचून प्राकृतच्या लिखित स्वरूपाला स्थैर्य देण्याचा प्रयत्न केला. प्राकृतचे आर्यभारतीय भाषांत नेमके स्थान काय? याबाबतील अभ्यासकात मतभेद आहेत. वैदिक काळापासून भारतात अनेक बोली बोलल्या जात होत्या.

- **अपभ्रंश भाषा**

इ.स.पूर्व ६०० ते इ.स. ६०० हा प्राकृत भाषांचा कालखंड, प्राकृत भाषामध्ये विपुल साहित्यनिर्मिती झाली. वररुचि आणि हेमचंद्र यांनी प्राकृत भाषेचे व्याकरण रचून प्राकृतच्या लिखित स्वरुपाला स्थैर्य देण्याचा प्रयत्न केला. परंतु व्यवहारातील प्राकृत भाषा मात्र बदलतच राहिल्या. आणि इ.स. ४०० च्या आसपास प्राकृत भाषा लुप्त होऊन अपभ्रंश भाषांचा कालखंड सुरू झाला. पैशाची

अपभ्रंश, शौरसेनी अपभ्रंश, मागधी अपभ्रंश, माहाराष्ट्री अपभ्रंश बोली त्या त्या प्राकृत भाषेपासून निर्माण झाल्या.

अपभ्रंश भाषांच्या निर्मितीस आणखी एक प्रभावी कारण काही भाषाभ्यासक सांगतात; ते म्हणजे इ.स. ६०० च्या थोडे आधी प्राकृत भाषांना परकीय भाषांशी पुन्हा एकदा संघर्ष करावा लागला. पल्लव, शक, गोपाळ, आहिर इत्यादी अन्य धर्माच्या व अन्य मानववंशाच्या भिन्न भाषिक लोकांचे पंजाबमार्गे भारतात आगमन झाले व आपल्या सामर्थ्याने त्यांनी काही काल राज्यपदही भोगले व येथील आर्यांच्या व त्यातूनही अपभ्रंश भाषा जन्मास आल्या.

अपभ्रंश म्हणजे शिष्ट लोकांच्या भाषेपासून घसरलेली अभिरादी लोकांकडून बोलली जाणारी गावंढळ भाषा अशी शिष्ट प्राकृत भाषिकांची समजूत झाल्याने तिचे तेच नाव पुढे रूढ झाले. दंडीनेही आपल्या काव्यात अभिरादिंकांच्या भाषांना अपभ्रंश व संस्कृतेतर भाषांना अपभ्रंश म्हणतात असे म्हटले आहे. एकंदरीत प्राकृत भाषा भ्रष्ट होऊन जी भाषा उदयास आली तिला अपभ्रंश भाषा म्हटले जाते. डॉ. हिरालाल जैन व प्रो. याकोबी यांनी अपभ्रंश भाषेतील काही ग्रंथ प्रकाशित करून या भाषेस उजेडात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. डॉ. तगारे यांनीही या भाषांचा विशेष अभ्यास केला आहे.

मार्क डे याने ‘प्राकृत सर्वस्वा’ त अपभ्रंशांचे एकूण २७ उपभेद सांगितले आहेत. परंतु ही केवळ प्रादेशिक बोलींची गणना असावी. कारण त्यानेच पुढे हे उपभेद सोडून ब्राचड, नागर आणि उपनागर असे अपभ्रंशाचे तीन महत्वाचे भेद सांगितले. मराठीत मराठीसंबंधी ‘नागरी बोली’ असा अनेक ठिकाणी उल्लेख आला आहे. उदाहरणार्थ; तो श्रीकृष्णार्जुन संवादु। नागरी बोली विशदु । (ज्ञा. १३-१९४९) व ‘नागरी बोली स्थल वाणिजे’ (वच्छाहरण १६) यावरून मराठी भाषा अपभ्रंश ‘नागरी अपभ्रंश’ या भाषेपासून जन्मली असावी असे डॉ. वि. भि. कोलते यांना वाटते. तर डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या मतानुसार ‘‘अपभ्रंशाच्या वरील भेदत्रयापैकी अमुक एका भेदापासून अमूक भाषा निघाली असे म्हणण्यापेक्षा ही नावे सोडून देऊन महाराष्ट्रात माहाराष्ट्री प्राकृताचा जो अपभ्रंश पाचव्या शतकात रूढ झाला; त्यांचे अवशेष जर यादवकालीन मराठीत दिसले तर त्यापासून मराठी भाषा निघाली असे का म्हणू नये? असा प्रश्न करून त्यासाठी डॉ. शं. गो. तळपुळे यांनी महाराष्ट्रात येऊन तेथील अपभ्रंशात जैनांनी वाङ्मय लिहिले ते आधारास घेऊन डॉ. तुळपुळे यांनी माहाराष्ट्री-प्राकृत व यादव मराठी यांच्यातील जो दुवा जोडून दाखविला आहे तो स्वीकारणेही भाग आहे. जैन ग्रंथात सर्वसाधारणपणे १० व्या शतकातील ग्रांथिक अपभ्रंश भाषा आढळते. डॉ. तगारे हिलाच राष्ट्रकुटकालीन मराठी असे म्हणतात. अपभ्रंश ही अभिरांची भाषा होती. ही अभिरांची जात उत्तरेकडून सिंध प्रांतातून गुजराथेत व तेथून कोकणात व विदर्भात स्थायिक झाली. याच अपभ्रंशाचा सांगाडा मराठीत उतरला असा डॉ. शं. गो. तुळपुळे यांचा दावा आहे.

- **अपभ्रंशाचे काही ठळक विशेष**

प्राकृत भाषांची सुलभीकरणाची प्रवृत्ती अपभ्रंशात अधिक व्यापक प्रमाणात दिसते. याशिवाय उच्चारप्रक्रियेच्या संदर्भात अपभ्रंशाने प्राकृताचीच परंपरा चालवली. ऋ, लृ, ऐ, औ या स्वरांशिवाय इतर सर्व स्वर अपभ्रंशात आहेत. प्राकृतात शब्दाच्या अंती येणारे आ, ए व औ अपभ्रंशाने अ, इ, ऊ केले प्राकृतातील स-र-स 'ह' केला. विभक्ती आणि आख्यात रूप या बाबतीत अपभ्रंशाने पुढील टप्पा गाठला. तृतीयेचा 'इण'व षष्ठीचा 'स्स' हे दोन प्रत्यय संस्कृतपरंपरेने अपभ्रंशात आले व इतर सर्व प्रत्यय लोप पावले. आख्यातांची संख्या प्राकृतातील आख्यातांतूनही घटली. काळांपैकी वर्तमान व भविष्य यांची केवळ आख्यातरूपे उरली. अर्थापैकी आज्ञार्थ व विध्यर्थ हे दोन उरले. संयुक्त क्रियापदाचे प्रयोग अधिकाअधिक होऊ लागले. विभक्तिरूपाचे सहाय्यक शब्दांनी कारकसंबंध दाखविण्याची प्रवृत्ती रुजत गेली. अपभ्रंशाकडून देशी भाषांकडे अर्थात आधुनिक भारतीय आर्य भाषांकडे भाषांची वाटचाल सुरू झाली.

सर्वसाधारणपणे अकराव्या शतकापर्यंत अपभ्रंश भाषा टिकल्या. परंतु त्या अगोदर इ. स. च्या आठव्या शतकापासून अरबादी भिन्न वंशाच्या, भिन्न संस्कृतीच्या व भिन्न भाषेच्या लोकांनी हिंदुस्थानवर स्वाऱ्या केल्या. यात गझनीच्या महम्मदाच्या १८ स्वाऱ्या झाल्या. महंमद घोरीची स्वारी होऊन अन्य संस्कृतीचा व मानववंशाचा मोठा गट हिंदुस्थानात आला. इ.स. १२०५ पर्यत सारा उत्तर हिंदुस्थान त्यांनी व्यापला. नंतर ते दक्षिणेतही घुसले. त्यामुळे भिन्न भाषिकात आर्यभारतीय भाषा उदयास आल्या. पैकी मराठी ही एक आर्यभारतीय भाषा आहे. यादवकालीन मराठी ही सुरुवातीची अवस्था मानली तर यादव मराठीचे साम्य माहाराष्ट्री प्राकृताशी असले तरी माहाराष्ट्री प्राकृत आणि यादव मराठी यांच्यामधला अपभ्रंश हा दुवा विसरता येत नाही व आर्यभारतीय शाखेच्या अर्वाचीन अवस्थेतील अनेक भाषांपैकी मराठी ही एक भाषा आहे.

आर्यभारतीय शाखेच्या प्राचीन, मध्य आणि अर्वाचीन अवस्थांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, या तीन अवस्थांची कालिक विभागणी अचूकपणे करणे अवघड आहे. कारण अभिजात संस्कृतच्या वैभव काळातच पाली व अन्य प्राकृत बोलींची जागा अपभ्रंश बोलींनी घेतली. अर्वाचीन भाषांच्या जन्मानंतर दोन तीन शतके अपभ्रंश भाषा लिखित स्वरूपात राहिली. प्राचीन, मध्य व आणि अर्वाचीन अशा या दीर्घ कालावधीतील काही विशिष्ट कालखंडात दोन भाषिक अवस्थांचे प्रवाह समांतरपणे समाजजीवनात सिमित होत राहिले. परंतु एक गोष्ट आपण येथे लक्षात ठेवली पाहिजे की, मूळ प्रकृती संस्कृत भाषा मानल्यामुळे अशा प्रकारची भाषानिर्मितीच्या संदर्भातील विचारसूत्रे भाषा अभ्यासात विश्लेषित होत राहिली. देशीभाषा प्राकृत भाषेतून निर्माण झाल्या. प्राकृत भाषांचे संस्कृत भाषेशी बरेच साम्य असल्यामुळे प्राकृत संस्कृतातून निर्माण झाल्या. अशी मांडणी सातत्याने भाषा अभ्यासात होत आली आहे. संस्कृतातील ९५ टक्के शब्द प्राकृतात असल्यामुळे संस्कृत प्रकृती व प्राकृत विकृती असे मानण्यात आले. परंतु सिंधु लोकांच्या भाषेबद्दल लिहीत असताना प्रा. प्र. रा. देशमुख यांनी प्राकृत प्रकृती असण्याची शक्यता व्यक्त करून प्रकृती

प्राकृतपासून संस्कृत झाली असावी असा तर्क व्यक्त केला आहे. त्याच्या मते 'झेंद अवेस्त्याची भाषा किंवा पर्शियन भाषांचे सूक्ष्म अवलोकन केले असता असे आढळून येते की, प्राकृत आणि संस्कृतमध्ये ज्या प्रकारचे साम्य आहे त्याचप्रकारचे काहीसे भिन्नत्त्व प्राचीन संस्कृत आणि प्राकृत मध्ये आहे. ह्या फरकांचे ज्ञान झाले म्हणजे संस्कृत जाणणाऱ्यास प्राकृत समजणे कठीण जात नाही. ऋचांच्या व झेंद अवेस्त्याच्या भाषेत याच प्रकारचे फरक आहेत. पर्शियन भाषेचे संस्कृत आणि प्राकृतशी साम्य आहे.'' म्हणूनच संस्कृत आणि प्राकृत मध्ये मूळ धातू एकच आहेत. प्राकृत त्या दृष्टीने संस्कृतपेक्षा जास्त समृद्ध आहे. संस्कृत हाही प्राकृताचाच भाग आहे. रशियापासून भारतापर्यंत मधील सर्व देशात या दोन्ही देशात प्राकृतचे स्वरूप इतके बदलून गेले असावे की, त्याचे मूळ प्रकृतीशी साम्य दाखविणे कठीण झाले. भारताच्याही बऱ्याच भागात सामान्य भाषा प्राकृतच असावी. आर्यांच्या ऋचा करण्याच्या व प्राय: सर्व संस्कृत भाषेचाही उगम त्यातूनच झाला असावा. कारण आर्य परकीय भूमीतून आले असल्यामुळे त्यांचे उच्चार वेगळे असावेत. त्यांची यज्ञपद्धती महत्त्वाची असल्यामुळे त्यासाठी आर्यांच्या उच्चाराचे काही विवक्षित शब्द असावेत व काहीशी वेगळे बनविलेली संस्कृत भाषा ही असावी. भारतात आल्यावर त्यांच्या उच्चाराच्या अनुरोधाने व आपले स्वतंत्र वेगळे अस्तित्व दाखविण्याच्या उद्देशाने मूळ प्रकृती प्राकृतचे संस्कृतीकरण करून ऋचा रचण्यासाठी व यज्ञात उपयोगात करण्यासाठी संस्कृत भाषेत फार मोठी भर घातली असावी.

पारंपरिक विचार वर्तुळानुसार आर्यभारतीय शाखेच्या अर्वाचीन अवस्थेतील भाषांपैकी मराठी ही एक भाषा आहे. या भाषेच्या निर्मितीमागील पार्श्वभूमी लक्षात घेतली. या पार्श्वभूमीच्या आधारेच अनेक अभ्यासकांनी मराठीचा उद्गम कोणत्या प्राकृतपासून झाला आणि केव्हा झाला याविषयी मतमतांतरे व्यक्त केली आहेत. त्यातील काही ठळक मतांचा निर्देश आपणाला येथे करावयाचा आहे.

मराठीची निर्मिती इ.सनाच्या ८ व्या शतकात शंकराचार्यांनी केलेल्या वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनातून झाली, असे मत चिं. वि. वैद्य यानी १९६८ साली व्यक्त केले. तर ''दहाव्या शतकाच्या अखेरी तार्तारांनी उत्तर हिंदुस्थानवर आक्रमण केल्यामुळे इतर हिंदुस्थानात आधी वस्ती करून राहिलेले गुर्जर, परमार, चालुक्य इ. अन्यधर्मीय व अन्य भांषिक समाज स्थलांतर करून दक्षिणेकडील व पूर्वेकडील हिंदु लोकांत मिसळले. यातून नव्या भाषा उत्पन्न होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. पुढे अकराव्या शतकापासून अफगाण, अरब, तार्तार इत्यादी भिन्न निर्माण झाल्या'' असे मत डॉ. पां. दा. गुणे यांनी मराठीच्या निर्मितीच्या संदर्भात दिले आहे. उपरोक्त दोन्ही मतातून मराठी कोणत्या परिस्थितीत जन्मली हे लक्षात येते.

दोन भिन्न भाषिक समाज एकमेकांशी संपर्क साधू लागतात, पण संदेशन करू शकणारी सामाईक भाषा त्यांना येत नसते अशा वेळी त्यांच्या निजभाषांत परिवर्तन होते. या संपर्कातून नवी संकरित भाषा निर्माण होऊ शकते. पिजीन भाषाची निर्मिती याच प्रक्रियेतून होते. पिजीनमध्ये लक्ष्य भाषेतून मोठ्या प्रमाणावर शब्दसंग्रह घेतलेला असतो. व्याकरणव्यवस्था लक्ष्य भाषा व निजभाषा यांच्यातील

वैशिष्ट्ये घेऊन तयार केलेली असते व ती गुंतागुतीची नसते. स्वनांचे उच्चारण मात्र निजभाषेनुसार केले जाते. पिजीन भाषांचे क्षेत्र निजभाषेच्या तुलनेत मर्यादित असते. संपर्क साधण्याच्या गरजेतून त्यांची निर्मिती झालेली असल्यामुळे दुसरी भाषा नीटपणे बोलता येऊ लागल्यानंतर पिजीन भाषा बोलण्याची गरज भासत नाही. परंतु काही वेळा पिजीन भाषा टिकून राहतात. त्यांचा निजभाषा म्हणून स्वीकार केला जातो. साहजिकच त्यांचे कार्यक्षेत्र विस्तारते व त्यांचे स्वरूप विकसित होते. अशा विकसित भाषांना क्रिऑल भाषा म्हणतात पिजीन आणि क्रिऑल प्रक्रिया यांच्या आधारे मराठीच्या निर्मितीचा विचार साऊथवर्थ यांनी केला. त्यांच्या मते द्रविड भाषा बोलणाऱ्या समाजातील काही गटांचा महाराष्ट्री प्राकृत बोलणाऱ्या आर्यांशी संबंध आल्यानंतर महाराष्ट्री प्राकृत स्वीकारताना द्रविडांनी स्थानिक किंवा निजभाषेनुसार तिचे स्वरूप काही प्रमाणात बदलले. यातून पिजीन प्राकृत निर्माण झाली. पुढे आर्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रभावामुळे या द्राविडांनी आपल्या भाषेचा त्याग केला. पिजीन प्राकृतचा निजभाषा म्हणून स्वीकार केला. मराठी ही अशा प्रक्रियेतून तयार झालेली 'क्रिओलाईझड् प्राकृत' भाषा असावी, असे मत साऊथवर्थ यांनी मांडले.तर बीम्स, होर्न्ले, स्टेन कौनो, झुल ब्लोक यांनीही मराठीच्या निर्मितीच्या संदर्भात मांडलेली मते लक्षात घेण्याजोगी आहेत. बीम्स या अभ्यासकाला प्राकृतपासून मराठीचा जन्म झाला, असे मानणे सुसंगत वाटत नाही. तसेच माहाराष्ट्री प्राकृत आणि मराठी यांचा जनक-जन्य होर्न्ले यांनाही मान्य नाही. स्टेन कौनो यांनी मात्र मराठीच्या जननीभाषेची निश्चिती करताना ध्वनी आणि रूप या भाषेच्या अंगभूत अंगाचा विचार करून ममाहाराष्ट्रीचे जननीत्व सप्रमाण सिध्द केले आहे. झुल ब्लोक मात्र मराठीचा प्राकृताशी संबंध जोडतात. माहाराष्ट्री आणि मराठीचे नाते लक्षात घेऊन पाश्चात्त्य विचारवंतांप्रमाणे राजवाडे, गुणे यांनी मराठीची उत्पत्ती माहाराष्ट्री अपभ्रंशापासून झाल्याचे म्हटले आहे. डॉ. म. अ. करंदीकर यांना मात्र मराठी माहाराष्ट्री अपभ्रंशापासूनच झाली असे सांगितले आहे.

एकंदरीत मराठीचे जनकत्व सर्वच अभ्यासकांनी वेगवेगळया भाषांकडे दिले आहे. मराठीची जननी कोणतीही एक विशिष्ट भाषा नसून मराठी अमुक एका प्राकृत भाषेपासून उत्पन्न झालेली नसून सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश व संस्कृत यांनी आपल्यापरीने मराठीच्या जन्मास हातभार लावलेला दिसतो; ही प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांची सर्वसमावेशक भूमिका मराठीच्या उत्पत्तीविषयक रास्त वाटते. या भूमिकेचा पुनर्विचार करून मराठीच्या उद्‌भवाच्या प्रक्रिया नव्याने अभ्यासल्या पाहिजेत यात शंका नाही. परंतु मराठीच्या निर्मितीच्याच नव्हे तर एकूणच अर्वाचीन भारतीय भाषांच्या निर्मितीच्या संदर्भात होर्न्ले या भाषाभ्यासकाने जो अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत मांडला त्या सिद्धांताचा विचार करणे अगत्याचे आहे.

**अंतर्वर्तुळ - बहिर्वर्तुळ सिद्धांत आणि मराठी**

इंडो-युरोपिअन भाषाकुलातील आर्यभारतीय भाषांची आपण थोडक्यात ओळख करून घेतली. याच कुलातील मराठी भाषेचा जन्म कसा झाला हे सांगणारे जे अनेक सिद्धांत अथवा मतप्रवाह आहेत. त्यापैकीच अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ हा एक सिद्धांत होय. या सिद्धांताप्रमाणे पश्चिम हिंदी ही

अंतर्वर्तुळातील भाषा आहे. तर लोंढी, सिंधी, गुजरात, मराठी, ओरिया, बिहारी, बंगाली व आसामी या बहिर्वर्तुळातील भाषा आहेत असे मानले जाते.

अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत होर्न्ले या भाषाशास्त्रज्ञाने Comparative Grammer of the Gondian Language : 1880 या ग्रंथात मांडला. होर्न्ले यांनी आर्यांच्या भाषेचे विशेष लक्षात घेण्यापूर्वी त्यांच्या वस्तीस्थांनाचा विचार या ग्रंथात मांडला. हा सिद्धांत आर्यांच्या द्विरागमन सिद्धांतावर आधारलेला आहे. या सिद्धांतानुसार होर्न्ले यांच्या मते आर्य भारतात दोन टोळ्यांनी आले. पहिल्यांदा आलेली आर्यांनी पहिल्यांदा आलेल्या आर्यांना हुसकावून लावले. ते पूर्व-पश्चिम, दक्षिण-उत्तर या चारही दिशांना पांगल्यामुळे दुसऱ्या टोळीने येऊन गंगेच्या दुआबात स्थिरावलेल्या आर्यांच्या वसाहतीभोवती त्यांचे एक कडे झाले. यालाच होर्न्ले यांनी बाहेरचे वर्तुळ असे म्हटले. या बहिर्वर्तुळ आर्यांच्या बोलीपासून म्हणजे 'मागधी बोली' पासून लोंढी, सिंधी, मराठी, ओरिया, बिहारी, बंगाली व आसामी या वर्तमान भारतीय भाषा उत्क्रांत झाल्या तसेच बहिर्वर्तुळाच्या आत नंतर येऊन स्थिरावलेल्या आर्यांच्या वसाहतीत होर्न्ले, यांनी 'अंतर्वर्तुळ' असे म्हटले. या वर्तुळातील आर्यांच्या बोलीपासूनच म्हणजेच पश्चिमेच्या 'शौरसेनी बोली' पासून पश्चिम हिंदी ही भाषा उत्क्रांत झाली असे मत होर्न्ले यांचा हा सिद्धांत सांगतो.

होर्न्लेचा हा सिद्धांत मुख्यत: भाषिक वैशिष्ट्यावर अधिष्ठित असलेला सिद्धांत आहे. यालाच 'द्विरागमन सिद्धांत' किंवा 'पाचार सिद्धांत' असेही म्हणतात. आधी आलेल्या आर्यांच्या प्रदेशात नंतर आलेल्या आर्यांची भाषा पाचरीसारखी घुसली; म्हणून या सिद्धांताला 'पाचरसिद्धांत' असे म्हटले गेले. होर्न्ले यांच्या मते प्रागैतिहासिक काळात उत्तर भारत दोन बोली भाषांत विभागला होता. एक पश्चिमेकडील 'शौरसनी' बोलीचा तर दुसरा पूर्वेकडील 'मागधी' बोलीचा. एवढेच नव्हे तर प्रागैतिहासिक काळापूर्वी सारा उत्तर भारत मागधी बोलीनेच व्यापलेला होता. अर्थात होर्न्ले यांच्या या मतात बरेच तथ्य आहे. कारण आर्यांची दुसरी टोळी येऊन गंगेच्या दुआबात स्थिर होण्याआधी जे आर्य या ठिकाणी होते.त्यांच्यात 'मागधी' बोलीने सर्वसाधारणपणे उत्तर हिंदुस्थान व्यापलेला दिसतो. शौरसेनेची लाट नंतर पाचरीसारखी घुसली.

होर्न्ले यांच्या या सिद्धांताला रिस्लो व रामप्रसाद चंदा या मानववंशशास्त्रज्ञानांही पाठिंबा दिला. तर ग्रिअर्सन यांना होर्न्ले यांचा हा सिद्धांत मान्य नसला तरी आर्यभारतीय भाषांची 'अंतर्बहिर्वर्तुळा'त केलेली भाषांची वर्गवार मात्र मान्य आहे. त्यांनी अंतर्वर्तुळ आणि बहिर्वर्तुळ या दोहोतील भाषांशी साम्य दर्शविणारा 'अंतर्बहिर्वर्तुळ' असा तिसरा गट कल्पिला व या गटात पंजाबी, गुजराती, राजस्थानी आणि पूर्व हिंदी भाषांचा समावेश केला. डॉ. सुनितीकुमार चतर्जी यांनी 'अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांताला विरोध केला आहे. होर्न्ले आणि ग्रिअर्सन यांनी दिलेली भाषिक कारणे चतर्जी यांना पुरेशी वाटत नाहीत. तसेच चंदा यांची मानववंशशास्त्रीय कारणेही त्यांना पटत नाहीत. त्यांनी The origin and Development of the Bengali Language, Introduction या ग्रंथात वेगळ्याच उपपत्तीचे सूचन केले आहे. त्यांच्या विचारानुसार आर्य लोक हिंदुस्थानात अनेक टोळ्यांनी आले. केवळ दोन

टोळ्यांनी आले असे नाही. त्यांतील काही टोळ्या परस्परांशी साधर्म्य दाखविणाऱ्या होत्या. त्यांच्या मते मूळ भारत-इराणी (आर्य) भाषा मानली तर १) इराणी बोलभाषा, २) दार्दिक बोलभाषा व ३) आर्य-भारतीय बोलभाषा या तिच्या उपशाखा होतात. या उपशाखापैकी तिसरी 'आर्यभारतीय बोलभाषा' ची उपशाखा म्हणजे भारतात आलेल्या आर्यांच्या निरनिराळया बोलभाषा होय. या अनेक बोलभाषा पैकी सर्वसाधारणपणे एका बोलभाषेला प्रमाण मानून त्या बोलभाषेत आर्यांच्या 'ऋग्वेदां'ची रचना झाली. वेदांत आढळणारी प्रमाणभाषा व पश्चिम हिंदुस्थानात म्हणजेच पंजाब प्रांतात स्थायिक झालेल्या वैदिक आर्यांची भाषा होय. या शिवाय डॉ. सुनितीकुमार यांच्या मते 'ऋग्वेदात समाविष्ट झालेल्या वैदिक बोलीप्रमाणे त्याकाळी इतरही वैदिक बोली असाव्यात असे ऋग्वेदातील भाषिक पुराव्यावरून सिद्ध होते. अर्थात या सर्व बोली एकाच भाषेच्या बोलभाषा असल्यामुळे त्यांच्यात बरेच साम्य दिसते. अशा साम्यामुळेच नंतर उत्क्रांत झालेल्या प्राकृत भाषा आणि त्यानंतरच्या वर्तमान आर्यभारतीय भाषा यांच्यातही साम्य दिसून येते. असे प्रतिपादन त्यांनी केले आहे. डॉ. चतर्जींना अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांतानुसार केलेली. प्राकृत भाषांची वर्गवारी चुकीची वाटते. त्यांच्या मतानुसार काश्मिरी, लोढी, सिंधी, बिहारी, बंगाली, आसामी व ओरिया या काही वायव्येकडील व काही पूर्वेकडील भाषांतली साम्ये केवळ त्याच भाषापुरती मर्यादित नाहीत, तर होर्न्ले मानतात त्या अंतर्वर्तुळाशी साम्य दर्शवितात. त्याचप्रमाणे बहिर्वर्तुळातील भाषा गृहीत धरल्या तरी त्यांच्यातील वैधर्म्ये दिसून येतात. हे चतर्जींनी साधार दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. चतर्जी आर्यभारतीय भाषांची वर्गवारी करताना मध्यदेशीय प्राकृतातून निर्माण झालेल्या भाषांचा एक गट; आणि प्राच्य प्राकृतातून निर्माण झालेल्या भाषांचा दुसरा गट अशी प्राकृत भाषांची वर्गवारी करतात व मराठीला दक्षिणेकडील पण बहिर्वर्तुळातील एक भाषा न मानता मध्यदेशीय प्राकृतोत्पन्न-अंतर्वर्तुळातील भाषांपैकी एक भाषा मानतात. भौगोलिक स्थान आणि भाषिक वैशिष्ट्ये यांच्याआधारे भाषांचे वर्गीकरण करण्याचा हा प्रयत्न या सिद्धांतात दिसतो.

## २.४ समारोप

भाषाकुल आणि मराठी भाषा या घटकात आपण भाषाकुल संकल्पना कशी अस्तित्वात आली, भाषिक वर्गीकरणाचे तत्त्व, तसेच भाषांचे वर्गीकरण आणि जगातील प्रमुख भाषाकुले यांचा उहापोह केला. इंडो-युरोपिअन भाषाकुल व त्यातील आर्यभारतीय भाषाकुलांचा विस्ताराने आढावा घेतला. तसेच अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांतही लक्षात घेतला.

भाषेची सर्व रूपे, तिचे विविध आविष्कार म्हणजेच जगातील बोलल्या जाणाऱ्या विविध भाषा या भाषाविज्ञानाच्या कक्षेत येतात. भाषेत अनेक प्रकारची विविधता आहे. यामुळेच भाषेचे वर्गीकरण निरनिराळ्या प्रकारे करता येते हेही आपण लक्षात घेतले. ऐतिहासिक भाषाविज्ञान या ज्ञानशाखेच्या विकास-विस्ताराची त्यातील 'परिवर्तन' आणि 'भाषाकुल' संकल्पनांची तात्त्विक बाजू समजावून घेत घेत जगातील भाषांचे वर्गीकरण करण्यासाठी या संकल्पना कशा उपयोजिल्या गेल्या हेही पाहिले.

तसेच आर्य भाषाकुलातील आपली निजभाषा मराठीची उत्पत्ती कशी झाली त्या संदर्भातील विविध अभ्यासकांची मतेही लक्षात घेतली.

भाषाविज्ञान हे एक विशाल असे अभ्यासक्षेत्र आहे. 'भाषा' ही या ज्ञानक्षेत्रांची अध्ययन सामग्री आहे. या सामग्रीची खोलात जाऊन विचार करणे आणि बहुभाषिक भारताच्या भाषिक समाजगटाच्या वर्तन-व्यवहाराचा उलगडा करणे अजूनही बाकी आहे. तेव्हा अशा प्रकारच्या अध्ययनाचे सखोल असे मंथन करून वर्तमान भारतीय भाषांच्या निर्मितीची 'भाषाकुल' संकल्पनेच्या आधारे विचार करणे किती महत्त्वाचे आहे हे आपण वेगवेगळ्या मुद्याचा विचार करून लक्षात घेतले आहे. हा अभ्यास घटक आपल्या पुढील ज्ञानसाधनेला नक्कीच उपयुक्त ठरणार आहे.

## २.५ सरावासाठी प्रश्नात्तरे

**योग्य पर्याय निवडा.**

१. १७६७ मध्ये लॅटिन भाषेशी संस्कृतचे साम्य कोणत्या मिशनऱ्याने स्पष्ट केले?
(कुर्डो/ग्रिम/रास्क)

२. कोणत्या 'कुला' च्या संशोधनामुळेच 'भाषाकुल' संकल्पना अस्तित्वात आली?
(इंडो-युरोपिअन/युरोपिअन /अमेरिकन)

३. चार वेद कोणत्या संस्कृतमध्ये येतात?
(वैदिक/अभिजात/उत्तरकालीन)

४. पाणिनीच्या ग्रंथाचे नाव काय?
(अष्टाध्यायी/महाभारत/गीतगोविंद)

**उत्तरे :** १. कुर्डो २. इंडो-युरोपिअन ३. वैदिक ४. अष्टाध्यायी

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दक्षिण भारतात बोलल्या जाणाऱ्या द्राविडी कुलातील भाषा कोणत्या?

२. सोव्हिएत राज्याची राष्ट्रभाषा होण्याचा मान कोणत्या भाषेला मिळाला आहे?

३. प्राकृत भाषांची नावे लिहा.

४. कोणत्या भाषेला बौद्धमागधी असे संबोधले जाते?

**उत्तरे :** १. तामिळ, तेलुगू, कानडी, मल्याळम या द्राविडी कुळातील भाषा आहेत.

२. सोव्हिएत राज्याची राष्ट्रभाषा होण्याचा मान स्लॉविक भाषेला मिळाला आहे.

३. पाली, मागधी, अर्धमागधी, पैशाची, शौरसेनी व माहाराष्ट्री.

४. 'पाली' या भाषेला बौद्धमागधी असे संबोधिले जाते.

## २.६ सरावासाठी प्रश्न

### लघुत्तरी प्रश्न

१. भाषाकुल संकल्पना कशी अस्तित्वात आली ते सांगा.

२. जगातील प्रमुख भाषाकुलांचा थोडक्यात आढावा घ्या.

### दीर्घोत्तरी प्रश्न

१. संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश आणि वर्तमान भारतीय भाषा हे सूत्र उलगडून दाखवा.

२. आर्यभारतीय भाषाकुलाचा आढावा घेऊन मराठीची स्थाननिश्चिती करा.

३. अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत आणि वैद्य-गुणे वाद समजावून द्या.

## २.७ अधिक वाचन

१. मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र : गोसावी-वैद्य

२. मराठी भाषा: उद्गम आणि विकास : कृ. पां. कुलकर्णी

३. मराठी भाषेची घटना: रा. भि. जोशी

४. भाषाविचार आणि मराठी भाषा: गं. ब. ग्रामोपाध्ये

५. सिंधु संस्कृती, ऋग्वेद व हिंदु संस्कृती : प्र. रा. देशमुख

## २.८ उपक्रम

१. 'भाषाकुल' संकल्पनेच्या आधारे भारतात बोलल्या जाणाऱ्या भाषाकुलाचा आढावा घेऊन त्यांचा वंशवृक्ष बनवा

२. मराठी भाषा आणि तिच्या बोलींचा वंशवृक्ष मांडा.

❑❑❑

## सत्र २ : घटक ३

### (विभाग ३ Module III)

# मराठी : प्रमाणभाषा आणि बोली

## ३.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला;

- प्रमाणभाषा म्हणजे काय ते कळेल.
- बोलीभाषा निर्मितीची कारणे समजतील.
- वऱ्हाडी, कोकणी, अहिराणी या बोली भाषांचा परिचय होईल.

## ३.२ प्रास्ताविक

प्रमाणभाषा आणि बोली यांचा जवळचा संबंध आहे. बोलीतूनच प्रमाणभाषा निर्माण होत असते. काही वेळा अनेक बोली एकत्र येऊन प्रमाणभाषा बनते. भाषानिर्मिती व भाषाविकास हा अनादी कालापासून चालत आलेला प्रवास आहे. हावभाव, शब्द, क्रियापदे, वाक्ये अशा क्रमाने भाषेचा विकास होत गेला. या घटकात आपण प्रमाणभाषा आणि बोली यांचे सहसंबंध पाहणार आहोत. तसेच काही बोलींचा परिचय करून घेऊ.

## ३.३ विषय विवेचन

भाषा ही सतत परिवर्तन होत असलेली सामाजिक संस्था आहे. खरंतर सर्वच सामाजिक संस्था परिवर्तनशील असतात. स्थळ आणि काळानुसार समाजजीवन सतत बदलत राहते. जीवनाच्या गरजेनुसार मग सामाजिक संस्थांही बदलत असतात. भाषा ही समाजजीवनाशी अतूटपणे जोडलेली असते. एखाद्या वेळेस इतर सामाजिक संस्था नामशेष होतील. परंतु जोपर्यंत या भूतलावर मनुष्य हा समाजशील प्राणी जिवंत आहे; तोपर्यंत भाषांचे अस्तित्व अबाधित राहणार आहे. भाषा हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. किंबहुना माणसाच्या आणि माणसामाणसांनी बनलेल्या समाजाच्या हितासाठी, नव्हे तर एकूणच मानवी अस्तित्वासाठी भाषा ही अत्यावश्यक अशी गोष्ट आहे.

भाषा ही चिवट संस्था असली तरी तिच्यात सहज-परिवर्तनाची क्षमता आहे. याचे कारण म्हणजे इतर पशू, पक्षी, प्राणी यांच्या भाषेप्रमाणे मानवी भाषा ही केवळ ध्वनींची बनलेली नाही. ती ध्वनींनी सूचित होणाऱ्या संकेतानी बनलेली आहे. भाषेच्या या दुहेरी व्यवस्थेमुळे दोन गोष्टी साध्य झालेल्या आहेत. पहिले म्हणजे आवश्यक ते परिवर्तन घडण्याची क्षमता तिच्या ठायी निर्माण झालेली आहे. भाषेच्या दुहेरी व्यवस्थेमुळे माणूस ज्यांची गरज संपलेली आहे असे भाषिक संकेत पुसून टाकू

शकतो; आणि नवनव्या गरजांसाठी पाहिजे तेवढे नवे भाषिक संकेत निर्माण करू शकतो. भाषेतील मूलभूत लवचिकपणा व परिवर्तनाची प्रवृत्ती यामुळे भिन्नभिन्न प्रदेशात, भिन्न-भिन्न काळात प्रमाणभाषेच्या अनेक बोली निर्माण होतात. दर बारा कोसावर भाषा बदलत राहते असे म्हणतात, ते याच आधारावर होय. थोडक्यात, भाषा ही विकसनशील असल्यामुळे ती सतत विकास पावत असते. भाषेच्या या अंगभूत वैशिष्ट्यांमुळे भाषेमध्ये बोली निर्माण होतात.

### ३.३.१ बोलीनिर्मितीची कारणे

बोलींच्या निर्मितीपाठीमागे आंतरिक, ऐतिहासिक, भौगोलिक, राजकीय, सामाजिक, व्यावसायिक, आर्थिक इत्यादी अनेक घटक कारणीभूत ठरत असतात. बोलींची निर्मिती कशी आणि का होते; यासंदर्भातील विवेचन आपणाला खालीलप्रमाणे सांगता येईल.

**१. अंतर्गत व्यवस्था**

एकाच समाजातील लोक आतल्या आत भिन्न-भिन्न गट करून राहतात. काही कारणांमुळे प्रत्येक गटातल्या लोकांची स्वतःच्या गटापुरती अशी विशिष्ट भाषा तयार होत असते. ही भाषा संपूर्ण समाज वापरत असलेल्या सर्वसाधारण भाषेशी म्हणजेच प्रमाणभाषेशी काही बाबतीत भिन्नता राखून असते. समाजातील गटांची बोली कधी व कशा निर्माण होतात, यासंदर्भात सुप्रसिद्ध भाषातज्ज्ञ डॉ. ना. गो. कालेलकरांचे मत विचारात घेणे अत्यंत संयक्तिक ठरेल. त्यांच्या मते, ''... समाजाच्या सर्वच व्यक्ती सदोदित एकत्र येऊन आपले व्यवहार करत नाहीत. काही व्यवहार एखाद्या विशिष्ट वर्गापुरते मर्यादित असतात; कारण समाजरचनेचा तो एक आवश्यक असा भाग आहे. अशा वर्गातल्या लोकांच्या भाषेचे स्वरूप आणि हिची पातळी सामान्य भाषेपेक्षा वेगळी होते. अशा रीतीने भिन्न असणारी पण सामान्य भाषेहून दूर असलेली एक बोली असते.'' म्हणजेच समाजरचनेच्या किंवा सामाजिक व्यवहारांच्या गरजेतून एकभाषिक समाजाच्या आतच विविध गट तयार होणे, हे बोलींच्या निर्मितीचे एक महत्त्वाचे कारण आहे.

सध्याच्या जगात स्पर्धा, महत्त्वाकांक्षा, तडजोड, सामंजस्य या मानवी गुणामुळे सर्वच भाषा ह्या संकरित होऊ लागलेल्या आहेत. याशिवाय गटातील, जाती-जातींतील, समूहातील, समाजसंस्थेतील लोकांच्या आवडीनिवडी, उच्चारप्रक्रिया, सुलभीकरण, संकेतव्यवस्था, अंतर्गत-बहिर्गत इत्यादी कारणांमुळेही भाषा सतत बदलत असतात. काळानुपरत्वे भाषेमध्ये परिवर्तन होत असले तरी हे परिवर्तन भाषा ज्या ज्या भागात किंवा प्रदेशात बोलली जाते, त्या सर्व ठिकाणी सारख्याच स्वरूपात होत नसते. काळाच्या ओघात एकाच भाषेची भिन्न-भिन्न रूपे विकसित होत जातात. ही रूपे पुन्हा एकमेकांपासून दुर्बोध वाटावीत इतकी दूर गेलेली नसतात. ही रूपे वापरणारे लोकगट आपापसात व्यवहार करू शकत असतात. त्यासाठी ते मूळ भाषेच्या कोणत्या तरी एका वर्तमानकालीन रूपाचाच वापर करत असतात. यातूनच भाषेच्या ऐतिहासिक विकासक्रमांमध्ये बोली जन्म पावतात, असे मत काही भाषावैज्ञानिकांनी सांगितलेले आहे.

## २. परकीय आक्रमणे आणि प्रचंड रोगराई

राज्यलालसेमुळे किंवा अन्य प्रकारच्या फायद्यांसाठी एखादा समाज दुसऱ्या प्रदेशावर आक्रमण करून त्याच ठिकाणी होतो. काहीवेळा प्रचंड रोगराई, भीषण दुष्काळ, तीव्र भूकंप यामुळेही एखादा एकभाषिक समाज दुसऱ्या ठिकाणी जाऊन राहू लागतो. त्यामुळे दुसऱ्या ठिकाणी जाऊन राहिलेला समाज भौगोलिकदृष्ट्या विस्कळित होत असतो. एकच भाषा बोलणाऱ्या त्या समाजाच्या विविध ठिकाणी स्थलांतर झालेल्या गटामध्ये सततचे आदानप्रदान राहत नाही. आपापसांतील दळणवळण कमी झाल्याने त्यांची भाषा वेगवेगळी होऊन मग बोलींची निर्मिती झाल्याचे आपणाला दिसून येईल.

## ३. राजकीय व सांस्कृतिक परिणामांमुळे भाषाभेदांना निमंत्रण

राजकीय व सांस्कृतिक परिणामांमुळे भाषाभेदांना निमंत्रण मिळू शकते. परभाषेचा स्वीकार, राजकीय दास्य, व्यावहारिक कारण, अस्तित्वाचा प्रश्न अशा एखाद्या कारणाने समाज आपल्या स्वतःच्या भाषेचा त्याग करतो आणि दुसरी भाषा स्वीकारतो. परंतु अशा रीतीने परभाषेचा स्वीकार केल्यावरही स्वभाषेतील काही सवयी, काही लकबा, काही उच्चारविशेष, काही व्याकरण-विशेष तसेच टिकून राहतात. त्यामुळे जी परभाषा या समाजाने स्वीकारलेली असते. तिचेच रूप बदलून नवे रूप तयार होते. म्हणजे त्या परभाषेची एक नवी बोली तयार होते.

## ४. भौगोलिक परिस्थिती

भौगोलिक परिस्थिती हे बोलीनिर्मितीचे महत्त्वाचे कारण आहे. भौगोलिकदृष्ट्या प्रांतांचे स्वरूप वेगवेगळे असते. त्यानुसार समुद्रसपाटी, घाटमाथा, जंगली, डोंगरी असे भाग पडतात. त्यातूनच मध्यवर्ती स्थानापासून अन्य व्यक्तिसमूहाचे संबंध दुरावले जातात. तेव्हा उच्चारप्रक्रियेत फरक पडून वेगळे भाषिक रूप तयार होते.

## ५. सीमाक्षेत्रे

भाषांची निश्चित अशी आखीवरेखीव सीमाक्षेत्रे नसतात, हे खरे आहे. तरीही एक भाषा बोलणाऱ्यांचा प्रदेश संपून दुसरी वेगळीच भाषा बोलणाऱ्यांचा प्रदेश सुरू झाला आहे, असे दर्शविणारी सीमाक्षेत्रे असतातच. अशा सीमाभागातील लोकांचा शेजार-भाषा बोलणाऱ्या लोकांशी हरतऱ्हेने संबंध येत असतो. त्याचा परिणाम त्यांच्या भाषेवर होताना दिसतो. सीमा भागातील लोकांच्या भाषेवर शेजार-भाषेचा परिणाम होऊन तिचे एक वेगळेच रूप तयार झालेले असते. यातून सीमावर्ती बोलींचा जन्म होतो. जेथे जेथे दोन वेगळ्या भाषांच्या सरहद्दी एकमेकांना भिडलेल्या असतात तेथे तेथे सीमावर्ती बोली अपरिहार्यपणे निर्माण होतात.

## ६. जातिव्यवस्था

हिंदुस्थानात जातिसंस्थांचे अस्तित्व हे प्राचीन काळापासून आहे. प्रत्येक जातीने घालून दिलेले वागणुकीचे नियम आजमितीसही अनेकविध ठिकाणी काटेकोरपणे पाळले जातात. जातीनुसार

आचारविचार ठेवण्याच्या जीवनशैलीमुळे जातीनुसार गट तयार होतात. आणि त्या त्या जातीची भाषाही तयार होते. दोन जाती एकमेकांमध्ये व्यवहार करताना प्रमाणभाषेचा वापर करतात. पण जातभाईंमध्ये मात्र जातीचीच भाषा वापरतात. त्यामुळे जातिसंस्था हे निदान हिंदुस्थानपुरते तरी बोलींच्या निर्मितीचे एक महत्त्वाचे कारण मानले जाते.

**७. व्यवसायभिन्नता**

व्यवसायभिन्नता हे बोलींच्या निर्मितीचे एक महत्त्वाचे कारण आहे. एकच व्यवसाय करणारे लोक, मग ते स्थलपरत्वे कोठेही असोत, एकत्र येऊन व्यवसाय-व्यवहार करत असतात. त्यांच्या व्यावसायिक गरजेमुळे त्यांच्यापुरती त्यांची एक एरव्हीच्या सामान्य भाषेपेक्षा व्यवसायनिष्ठ बोली जन्म पावत असते.

**८. प्रभावक्षेत्रे**

समाजामध्ये काही प्रभावक्षेत्रे असतात. राजकीय हालचाली आणि आर्थिक हालचाली यामुळे अशी क्षेत्रे निर्माण होतात. याउलट समाजात काही दबलेले गटही असतात. राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक प्रभावक्षेत्रांच्या अधिपत्याखाली हे गट निमूटपणे वावरत असतात. प्रभाव गट (दबावगट) आणि दुर्बल गट (दास्यगट) यांच्या स्वतंत्र बोलींची यातून निर्मिती होत असते. मुख्य म्हणजे हे गट एकमेकांच्या संपर्कात असतात, पण आपापल्या बोलींमध्ये भिन्नता राखून असतात. उदाहरणार्थ; एकाच कुटुंबाकडे वर्षानुवर्षे काम करणारे, खुद्द कुटुंब राहते त्याच घरात किंवा वाड्यात राहणारे नोकर व मोलकरीण मोलकरी हे धनीलोकांपेक्षा वेगळी भाषा बोलत असतात. धनी लोक त्यांची किंवा ते धनी लोकांची भाषा जराही वापरताना आढळत नाहीत, इतके हे सामाजिक-आर्थिक अंतर प्रभावी असते.

**९. लिंगभेद**

काही भाषावैज्ञानिकांच्या मते, लिंगभेदामुळे भाषाभेद निर्माण होतात. स्त्रिया पुरुषांपेक्षा काही प्रमाणात वेगळी अशी भाषा बोलताना आढळतात. पुरुषांपेक्षा स्त्रियांची अनुभवक्षेत्रे पूर्णतः वेगवेगळी असतात. त्यातही पुन्हा स्त्रियांवर समाजाची व कुटुंबाची काही बंधने असतात. पुन्हा स्त्रियांनी काय बोलावे अन् बोलू नये, काय पहावे अन् पाहू नये इत्यादी संबंधाने प्रत्येक समाजात काही संकेत असतात. त्याच्याच जोडीला स्त्रियांच्या अंगी निसर्गतःच लज्जा, वात्सल्य, प्रेम अतिरिक्त करुणा अशाही काही भावना असतात. या साऱ्या गोष्टींचा परिणाम स्त्रियांच्या भाषावापरावर होऊन त्यातूनच त्यांची स्वतंत्र बोलीभाषा तयार होते. स्त्रियाप्रमाणे वृद्धांच्या आणि बालकांच्याही स्वतंत्र बोली अस्तित्वात आलेल्या आहेत. वय, लिंगभेद आणि घटनापरत्वे बोलींमध्ये सतत फरक पडत असतो.

## ३.३.२ पिजिन आणि क्रिऑल भाषा संकल्पना

पिजिन आणि क्रिऑल भाषा या भाषासंपर्काशी तसेच त्यातून निर्माण होणाऱ्या संकरित वा मिश्र भाषिक प्रकारांशी निगडित असलेल्या संकल्पना आहेत. व्यापार उदिमाच्या निमित्ताने विदेशी व्यापारी, मळेवाले, कारखानदार यांनी जगभर-विशेषतः ॲटलांटिक, पॅसिफिक आणि हिंदी महासागरांच्या किनारपट्टीवर-आपल्या वसाहती स्थापन केल्या. युरोपचे औद्योगिकीकरण सुरू झाल्यावर तेथील लोकांनी कच्चा मालासाठी आशिया व आफ्रिका खंडांमध्ये वसाहती वसविल्या होत्या. उद्योग व्यवसायासाठी अन्य भूप्रदेशातून आणलेले गुलाम तसेच स्थानिक मजूर यांचा वसाहतकारांशी भाषिक संपर्क येऊ लागल्यानंतरच्या या संपर्कप्रक्रियेत जी भाषिक देवघेव झाली त्यातून त्या त्या ठिकाणी नवीन संकरित स्वरूपाच्या व्यवहारोपयोगी भाषा जन्माला आल्या. अशाच भाषिक संपर्क प्रक्रियेतून 'पिजिन' आणि 'क्रिऑल' भाषा जन्माला आलेल्या आहेत.

### अ) पिजिन भाषा (Pidgin Language)

पिजिन भाषेला संपर्कभाषा किंवा वाणिज्यभाषा असेही संबोधले जाते. भिन्न भाषा बोलणारे समाज एकमेकांशी संपर्क साधू लागले की त्यातून भाषांच्या मिश्रणाची, संकराची शक्यता निर्माण होते. एकमेकांची भाषा समजत नाही परंतु व्यवहार तर करायचा आहे, अशी परिस्थिती असेल तर शारीरिक हालचाली, हावभाव, खुणा, वेगवेगळे आवाज इत्यादी भाषाबाह्य मार्गांनी संदेशन करण्याचा प्रयत्न होतो. भाषाबाह्य मार्गाबरोबरच स्वतःला येणारी भाषाच काहीशा वेगळ्या प्रकारे वापरून समोरच्या माणसाशी संवाद साधण्याचा प्रयत्न होतो व त्यातूनच 'पिजिन' किंवा 'संकरित' भाषा निर्माण होतात.

नैसर्गिक भाषांच्या तुलनेने त्यांचा शब्दनिधी फारच मर्यादित असतो. तसेच तिच्यातील व्याकरणाची व्यवस्थाही खूपच मर्यादित असते. बहुतेक पिजिन भाषांमध्ये लिंग, वचन, विभक्ती इत्यादी व्याकरणाचे घटक अस्तित्वात नसतात. बहुतेक पिजिन भाषा या व्यापार-उदिमाच्या निमित्ताने भिन्न भाषिकांचा जो संपर्क होतो, त्यातून निर्माण झालेल्या आहेत. पिजिन भाषांचे कार्यक्षेत्रही मर्यादित अशा स्वरूपाचे असते. पिजिन भाषा ही कोणत्याही समाजाची वा व्यक्तीची 'निजभाषा' वा 'मातृभाषा' असत नाही. पिजिन ही खऱ्या अर्थाने भाषाच नव्हे असे मात्र म्हणता येणार नाही, कारण निश्चित नियमांनी बांधलेली ही एक व्यवस्था असते. थोडक्यात, 'पिजिन' ही व्यामिश्रता नसलेली मर्यादित अशा स्वरूपाची (Reduced, Marginal) भाषा असते.

एका भाषेच्या व्याकरणव्यवस्थेचे अत्यंत सुलभीकृत, मर्यादित, आकुंचित असे स्वरूप आणि दुसऱ्या भाषेतील शब्द यांच्या एकत्र येण्यातून पिजिन भाषा तयार होतात. अर्थात ही प्रक्रिया नकळतच घडते, संदेशनाच्या तीव्र गरजेमुळे घडावीच लागते. स्थैर्य व टिकाऊपणा यांचा विचार केला तर पिजिन भाषा फारश्या टिकत नाहीत, असे दिसून आलेले आहे. व्यापार किंवा तत्सम व्यवहारांसाठी आवश्यक असणाऱ्या संदेशनापुरते या भाषांचे कार्य मर्यादित असते; ही गरज संपली की बहुधा या भाषाही संपतात.

पिजिन भाषांची निर्मिती एकमेकांची भाषा न जाणणाऱ्या समूहांच्या संपर्काच्या गरजेतून निर्माण होते. किमान दोन आर्थिक-सामाजिक गटातील भाषकांचा संपर्क ही पिजिन भाषेची प्रारंभावस्था असते. या दोन गटांपैकी एक उच्चस्तरीय, आर्थिकदृष्ट्या सबळ असलेल्या वसाहतकारांचा असतो. या वसाहतकारांची एकच एक भाषा असते. संपर्क काळातील ती प्रतिष्ठित भाषा (Superstrate Language) मानली जाते. दुसरा गट हा कनिष्ठ वर्गीयांचा, मजुरांचा, दबलेल्यांचा गट असतो. एकच एक भाषा नसलेल्या या कनिष्ठ गटांची म्हणजेच तळागाळातल्या या श्रमिकांची भाषाही अप्रतिष्ठित (Substrate Language) मानली जाते. ह्या दोन भिन्न आर्थिक-सामाजिक गटांचा व्यापारी कारणांनी संपर्क निर्माण होतो, तेव्हा या संपर्कप्रक्रियेत पुढील गोष्टी महत्त्वाच्या ठरतात.

१. वरिष्ठ वर्गीयांच्या संपर्कात (अर्थात भाषिक संपर्कात) कनिष्ठ वर्गीयांना सहजासहजी प्रवेश मिळत नाही. परंतु आर्थिक हितसंबंधामुळे कनिष्ठ वर्गीय गटातील लोक हे वरिष्ठ वर्गीय गटातील लोकांची भाषा मिळेल तशी आत्मसात करण्याचा प्रयत्न करत असतात. वरिष्ठ वर्गीय गटातील लोकांच्या भाषेची मांडणी, तिची व्याकरणव्यवस्था कनिष्ठ वर्गीयांना माहित नसते. त्यामुळे वरिष्ठ वर्गीय भाषेचे कनिष्ठ वर्गीय भाषेकडून सुलभीकरण होत असते. म्हणजेच उच्चस्तरीय भाषेचे अपभ्रष्ट स्वरूप प्रचलित होऊ लागते. लक्ष्य भाषेचा (Target Language) वाक्यरचनाबंध आणि शब्दसंग्रह यांच्या ऱ्हासाची प्रक्रिया येथे सुरू होते. लक्ष्य भाषा बोलणाऱ्या भाषिक समाजापेक्षा आपण वेगळे आहोत अशी भाषा शिकणाऱ्यांची समजूत असते, तेव्हा संपर्क भाषानिर्मिती होत असते.

२. वरिष्ठ वर्गीयांच्या भाषिक संपर्कात आल्यानंतर आर्थिक-सामाजिक न्यूनगंडांमुळे कनिष्ठ वर्गीयांच्या बोलींची गळचेपी होण्यास आरंभ होऊ लागतो. त्यामुळे स्थानिक भाषा परभाषेचा शब्दसंग्रह व वाक्यरचनाबंध अंशतः स्वीकारू लागते. अशा देवाणघेवाणीतून नवसंकरित पिजिन भाषा जन्माला येत असतात.

३. केवळ वाणिज्य व्यवहारासाठी निर्माण झालेली पिजिन भाषा ही उपयोजनमूलक भाषा असल्यामुळे ती कोणाचीही मातृभाषा असू शकत नाही. पिजिन भाषांची निर्मिती ही केवळ व्यापारी हेतू पूर्ण होण्यापुरतीच मर्यादित असल्यामुळे भावनिक आविष्कार, अस्मिता प्रदर्शन, अमूर्त संकल्पनांची मूर्त मांडणी करणे इत्यादी करिता ही भाषा उपयुक्त ठरत नाही.

४. काहीवेळा स्थलांतरण प्रक्रियेत एखादा समूह अथवा टोळी दुसऱ्या भाषिक प्रदेशात स्थायिक झाल्यास दोन भाषिकांमधील संपर्क प्रक्रियेतून पिजिन भाषा निर्माण होतात.

उदाहरणार्थ; भारतात अलेक्झांडरच्या सैन्यातून पळून गेलेली सैनिकांची एक टोळी काश्मिरातील 'कुपवार' या खेड्याच्या परिसरात स्थायिक झाल्यामुळे त्यांची ग्रीक मातृभाषा आणि स्थानिक काश्मिरी भाषा यांच्या संकरातून 'कुपवारपिजिन' भाषा निर्माण झालेली असल्याचे आपणाला दिसून येईल.

५. मर्यादित शब्दसंग्रह, मर्यादित वाक्यरचनापद्धती आणि किमान शैली वैशिष्ट्ये ही पिजिन भाषेची वैशिष्ट्ये आहेत. किंबहुना प्राथमिक अवस्थेत नवसंकरित पिजिन भाषेचा शब्दसंग्रह ५० ते ३०० शब्दांइतका मर्यादित असतो.

६. पिजिन भाषा स्थिर होण्यापूर्वी उच्चस्तरीय भाषिक गटाची भाषा (वसाहतकाराची भाषा), निम्नस्तरीय भाषिकांची भाषा (स्थानिक भाषा) आणि परस्परसंवादासाठी निर्माण होत राहणारी नवसंकरित भाषा (पिजिन भाषा) अशा किमान तीन भाषांमध्ये भाषिक व्यवहार होत असतो.

| अ.क्र. | पिजिन भाषा | अधिष्ठान भाषा | क्षेत्रमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | बझार मलाय | मलाय | मलेशिया आणि सिंगापूर |
| २. | नागा-पिजिन | आसामी | नागालँड |
| ३. | सेसेल्वा | फ्रेंच (हिंदी) | हिंदी महासागरावरील बेटे. १९८७ च्या नोंदीनुसार ७६,६०० लोक ही भाषा बोलतात. |
| ४. | श्रीलंकन | सिंहली | श्रीलंकेतील काही शहरात बोलली जाते. १९८६ च्या नोंदीनुसार ५०,००० भाषिक. |
| ५. | इंडो-पोर्तुगीज | पोर्तुगीज | श्रीलंका. १९७१ च्या नोंदीनुसार २२५० भाषिक |
| ६. | कोरलाई पोर्तुगीज | पोर्तुगीज | मुंबई व गोव्याची किनारपट्टी |
| ७. | मॉरिसियन | फ्रेंच | मॉरिशस. १९८९ च्या नोंदीनुसार ६ लाखांहून अधिक भाषिक |
| ८. | निओ-मेलनिझिअल | इंग्रजी | ऑस्ट्रेलियन न्यू गिनी आणि त्याच्या जवळील दक्षिण समुद्रातील बेटे |
| ९. | बटलर इंग्लिश | इंग्रजी | कलकत्ता |

पिजिन भाषा फारशा टिकत नाहीत. गरज संपली की भाषा संपली असा काहीसा प्रकार पिजिनच्या संदर्भात घडू शकतो.

**ब) क्रिओल भाषा (Creole Language)**

क्रिओल भाषा हा पिजिनच्याच विकासाचा पुढचा टप्पा होय. पिजिन भाषेचे कार्यक्षेत्र हळूहळू विस्तारत जाऊन केवळ व्यापारी-उदिमाच्या संदर्भापुरती मर्यादित न राहता ती एका संबंध पिढीची

आणि त्यानंतर संबंध समाजाची निजभाषा किंवा मातृभाषा बनण्याची प्रक्रिया सुरू होते. अशा तऱ्हेने मर्यादित स्वरूपाच्या पिजिनमधून पूर्णाकारी स्वरूप मिळू लागलेल्या भाषेस 'क्रिऑल' असे म्हणतात. उदाहरणार्थ; दुसऱ्या महायुद्धानंतर निओ-मेलनीझिअन ही पिजिन भाषा हळूहळू क्रिऑलचे स्वरूप धारण करू लागली आहे.

थोडक्यात, विस्तृत पिजिन भाषारूपाला 'क्रिऑल भाषा' असे म्हणतात. पिजिन ही कोणाचीही मातृभाषा नसते; परंतु 'क्रिऑल' ही किमान एका पिढीची मातृभाषा असते. वेस्ट इंडिज बेटांपैकी जमैका येथे बोलली जाणारी 'जमैका (जमैकन टॉक) ही भाषा 'क्रिऑल'चे उत्तम उदाहरण आहे. वेस्ट इंडिज बेटावर सुमारे ३०० वर्षे ब्रिटिशांची सत्ता होती. १९६२ साली हे बेट स्वतंत्र होऊन ब्रिटिश राष्ट्रकुलात सामील झाले. इंग्रजांनी आफ्रिकन प्रदेशांमधून विशेषतः घानामधून-जे आफ्रिकन-निग्रो गुलाम आणले त्यांच्या आफ्रिकन बोलींचा इंग्लिश भाषेशी संकर होऊन प्रथम एक पिजिन भाषा निर्माण झाली. इंग्रज व तेथील आफ्रिकन निग्रोंमधील संपर्क सतत चालूच राहिला आणि काही काळानंतर ही पिजिन भाषा एका सबंध पिढीची निजभाषा बनली, म्हणजेच तिला क्रिऑलचे स्वरूप प्राप्त झाले. या भाषेचे कार्यक्षेत्र जसजसे विस्तारत गेले तसतशी तिच्यातील अंतर्गत विविधताही वाढू लागली. आपल्या सर्व गरजांसाठी हीच भाषा समाज वापरू लागला की परिपूर्ण भाषेचा दर्जा ती लवकरच गाठत राहते. कालांतराने साहित्यनिर्मितीसारख्या व्यवहारासाठी ती सक्षम बनते. शब्दसंग्रह व व्याकरणिक व्यवस्था या दृष्टीने तिच्यातील संकुचितपणा, अपुरेपणा नाहीसा होतो. अन्य भाषांच्या बरोबरीचे स्थान तिला प्राप्त होते. मात्र सर्व पिजिन भाषा या क्रिऑल भाषेचा टप्पा गाठतात असे नव्हे. उदाहरणार्थ; ब्रिटिश आमदानीत भारतीय नोकराचाकरांनी घडवलेली 'बटलर इंग्लिश' नंतरच्या काळात उपयोग संपल्याने नष्ट झालेली आहे.

परंतु 'पिजिन' व 'क्रिऑल' भाषा अशी नावे या भाषांना भाषावैज्ञानिकांनी दिलेली आहेत. प्रत्यक्षात त्या त्या समूहांनी आपल्या भाषांना दिलेली नावे वेगवेगळी आहेत. उदाहरणार्थ; हवाई बेटातील क्रिऑल इंग्लिशला 'पिजिन' असे नाव आहे. आफ्रिकन अमेरिकन किऑलला 'एबॉनिक्स' अशीही संज्ञा आहे. जमैका, मलेशिया, कॅरेबियन बेटे, वेस्ट इंडिज अशा अनेक क्रिऑल भाषा प्रचारात आहेत.

**पिजिनकडून क्रिऑलकडे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वसाहतकारांची भाषा | + | स्थानिक भाषा | → | पिजिन भाषा |
| आर्यन् संस्कृत | + | द्रविड भाषा | → | प्राकृत भाषा |
| स्थानिक निवड | + | पिजिन प्राकृत | → | क्रिऑल मराठी |

वरील आकृतीवरून आपणाला असे लक्षात येईल की, पिजिन भाषेकडून क्रिऑलकडे जाताना स्थानिक भाषेचा प्रभाव असू शकतो.

'पिजिन' व 'क्रिऑल' भाषांच्या निर्मितीच्या संदर्भात तीन प्रकारचे सिद्धांत मांडण्यात आलेले आहेत. ते म्हणजे; १. बाल-भाषा सिद्धांत, २. बहुभाषिक निर्मितीचा सिद्धांत, ३. एकभाषिक निर्मितीचा सिद्धांत. या तिन्ही सिद्धांताबद्दल थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे;

१. **बाल-भाषा सिद्धांत** (Baby Talk Theory)

स्वतःची भाषा शिकताना लहान मूल जशी काहीशी बोबडी, शब्दनिधीच्या व व्याकरणाच्या दृष्टीने मर्यादित अशी 'चिमखडी' भाषा वापरते. तसाच काहीसा प्रकार मोठ्यांच्या बाबतीतही वेगळी भाषा बोलणाऱ्यांशी संपर्क साधताना होऊ शकतो. पिजिन भाषा निर्मितिप्रक्रियेतील भिन्न भाषकांचा संज्ञापन व्यवहार हा लहान मूल मोठ्यांशी व मोठी माणसे लहान मुलांशी ज्याप्रकारे बोलतात तसा असतो. शब्दसंग्रह व व्याकरणाच्या मर्यादित ज्ञानामुळे ह्या संज्ञापन व्यवहाराचे स्वरूप 'चिमखडी' भाषेसारखे असते. म्हणून या सिद्धांताला 'बालभाषा सिद्धांत' असे म्हणतात.

युरोपिअन लोक हे व्यापार आणि साम्राज्यविस्ताराच्या हेतूने जगभर फिरू लागल्यानंतर त्यांना भाषिक अडचण जाणविल्यानंतर स्वतःची भाषा समोरच्या माणसाला येत नाही असे दिसल्यावर लहान मुलांशी जसे बोलावे तसा स्वतःच्या भाषेचा उपयोग त्यांनी केला असणे शक्य आहे. ऐकणाऱ्यांनी याच शाखेचे अनुकरण करता करता एक 'पिजिन' भाषा तयार होणे अशक्य नाही. याच 'पिजिन' भाषेची वाढ होत होत पूर्णाकारी अशी 'क्रिऑल' भाषाही यातूनच तयार झाल्याची शक्यता आहे.

२. **बहुभाषिक निर्मितीचा सिद्धांत** (Polygenesis Theory)

काही भाषातज्ज्ञांच्या मते, पिजिन व क्रिऑल भाषा म्हणजे अनेक भाषांच्या मिश्रणातून तयार झालेली भाषिक प्रयोगव्यवस्था होय. समाजभाषाविज्ञानात या भाषामिश्रणाच्या प्रक्रियेला 'बहुभाषिक निर्मितीचा सिद्धांत' असे संबोधले जाते. दोन किंवा त्यापेक्षा अधिक भाषांचा वेगवेगळ्या पातळ्यावर संकरातून या भाषांची प्रयोगव्यवस्था निर्माण झालेली असते. संकर होत असलेल्या दोन भाषांपैकी एक मूळभाषा आणि दुसरी स्थानिक भाषा असतात. सुरुवातीला या भाषिक संकराला सामाजिक दर्जा नसतो, पण हळूहळू या भाषांना स्थैर्य प्राप्त होऊन त्यातूनच 'क्रिऑल' भाषा निर्माण होतात.

उदाहरणार्थ; युरोपिअन राष्ट्रांनी आपले साम्राज्य वाढविण्याचे प्रयत्न सुरू केल्यानंतर इंग्रजी व विशेषतः पोर्तुगीज या 'मूळ' भाषा व या वसाहतींवरील स्थानिक भाषा यांचा संकर होऊन पिजिन भाषा निर्माण झालेल्या आहेत. चीन, दक्षिण आफ्रिका, न्युझीलंड, ऑस्ट्रेलिया इत्यादी ठिकाणी, विशेषतः किनारपट्टीजवळ, इंग्रजीवर आधारलेल्या पिजिन भाषा आढळतात.

३. **एकभाषिक निर्मितीचा सिद्धांत** (Monogenesis Theory)

काही भाषाशास्त्रज्ञांच्या मते, युरोपिअन भाषांमधून ज्या-ज्या पिजिन भाषा निर्माण झाल्या आहेत. त्या सर्वांच्या मगे एक सामान्य अशी पूर्वज भाषा असली पाहिजे. कारण इंग्रजी, फ्रेंच व पोर्तुगीज या तीन युरोपिअन भाषांमधून निर्माण झालेल्या 'पिजिन' भाषांमध्ये खूपच साम्य आढळून आलेले आहे.


थोडक्यात, भाषावैज्ञानिक हे पिजिन आणि क्रिऑल या भाषा-निर्मितीमागे एक सामान्य अशी पूर्वजभाषा असली पाहिजे. पिजिन निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये या युरोपियन भाषा एकाच प्रकारच्या पद्धती वापरत असाव्यात. म्हणूनच त्याला 'एकभाषिक निर्मिती सिद्धांत' असे म्हटले जाते.

डॉ. वसंत खोकलेंनी मराठी ही क्रिऑल भाषा आहे असे मत मांडलेले आहे. त्यांच्या मतानुसार आर्य व द्रविड यांच्यातील व्यापारी संबंधातून आधी महाराष्ट्री ही वाणिज्य भाषा (पिजिन) उदयाला आलेली आहे. आणि कालांतराने ती इथल्या लोकांची मातृभाषा 'क्रिऑल' बनलेली आहे. मराठी ही अशीच 'क्रिओलाईझड्' झालेली भाषा आहे; असा निष्कर्ष पुराव्यांच्या आधारे साउथवर्थ् या भाषाभ्यासकांनी काढलेला आहे.

**३.३.३ मराठीच्या बोली : वऱ्हाडी**

महाराष्ट्र राज्याच्या उत्तरेस व ईशान्य सीमेपर्यंत पसरलेला विदर्भाचा फार मोठा भूभाग वऱ्हाडी बोलीचा आहे. बुलढाणा, वर्धा, अमरावती, वणी, चांदा, भंडारा, वाशिम, अकोला या शहरांच्या भोवती पसरलेल्या प्रदेशात वऱ्हाडी भाषा बोलली जाते. वऱ्हाड आणि मध्य प्रांतांच्या दक्षिण भागात बोलल्या जाणाऱ्या या बोलीचे क्षेत्र विस्तीर्ण असून ती मराठीहून बरीच वेगळी आहे. या बोलीचे प्रांत, जाती व धंद्यावरून उपप्रकार पडले असले तरी साधारणपणे १. घाटावरची वऱ्हाडी, २. घाटाखालची वऱ्हाडी असे तिचे दोन मुख्य प्रकार पडतात.

वऱ्हाडी बोलीचे जात, प्रांत आणि धंद्यानुसार केले जाणारे पोटभेद खालील तक्त्यानुसार




क्षेत्र व इतिहास हे वऱ्हाडी बोलीचे खास वैशिष्ट्य आहे. पूर्वेकडे अचलपूर, बैतुल, छिंदवाडा, शिवणी, बालाघाटचा दक्षिण भाग, उत्तरेकडे तापी नदीपर्यंत भंडारा, चंद्रपूरचा वायव्य भाग, यवतमाळ, वाशिम ह्या प्रदेशाला वेढून बुलढाण्यापर्यंत व नागपुरी बोलीला हिच्याअंतर्गत मानले तर भंडारा-नागपूरपर्यंतचा जवळजवळ संपूर्ण विदर्भ 'वऱ्हाडी' बोलीचा भाग ठरतो. हिंदीच्या लकबी, शब्द हे वऱ्हाडीत पोहचलेले आहेत. या वऱ्हाडीच्या विस्तारक्षेत्रात ही बोली बोलणारे जवळजवळ एक कोटी लोक आहेत. काही अभ्यासकांच्या मते, मराठीचे फार पुराणकालचे अवशेष हे वऱ्हाडी बोलीमध्ये आढळतात.

## १. वऱ्हाडी उच्चारप्रक्रिया

वऱ्हाडी बोलीची उच्चारप्रक्रिया प्रमाण मराठीच्या उच्चारप्रक्रियेपेक्षा वेगळेपणा दर्शविते.

### अ) स्वरासंदर्भात

१. अंत्यदीर्घस्वरांचा ऱ्हस्व उच्चार होतो.

उदाहरणार्थ - मी-मि, माझी-माहि, विंचू-वींचू

२. पुणेरी मराठीत 'ए'मध्ये वा अन्त्य स्वर असेल, तिथे वऱ्हाडी 'अ' दिसतो.

उदाहरणार्थ - नसेल-नसलं, लिहिणे-लिवनं

३. 'इ' 'व' बद्दल वऱ्हाडीत 'ए' 'य' हा वर्ण येतो.

उदाहरणार्थ - दिले-देल्ल, नेले-नेल्ल, वेळ-येळ, पाहिजे-पायजे

४. अ, अवि बद्दल 'ओ' हा स्वर उच्चारला जातो.

उदाहरणार्थ - घराजवळ > घराजोळ, हालवित > हालोत

५. आद्य अ चा आ होतो. उदाहरणार्थ - लहाना-लायन्या, बंडी-बांडी

६. आद्य अ चा इ, ई होणे. उदाहरणार्थ - बंडल-बिंडल, क्षणभर-खिनभर

७. आद्य अ चा ए होणे. उदाहरणार्थ - चपटा-चेपटा, यमदुत-येमदुत

८. आद्य आ चा अ होणे. उदाहरणार्थ - आखाडा-अखाडा, आंगण-अंगण

९. आद्य उ चा ओ होणे. उदाहरणार्थ - भुंडा-भोंडी, झुंड-झोंड

१०. आद्य 'ए' चा 'ये' होणे. उदाहरणार्थ - एकटी-येकटी, वेणी-येणी

११. 'ऐ' चे 'अय' होणे. उदाहरणार्थ - नैन-नयन, ऐपत-अयपत

१२. 'ओ' चे 'अ' होणे. उदाहरणार्थ - बोलावणे-बलावणे, ओहाळ-वघळ

१३. 'ओ' चे 'उ' होणे. उदाहरणार्थ - जोंधळा-जुंधळा, मोगलाई-मुगलाई

१४. 'ओ' चे 'व' होणे. उदाहरणार्थ - ओल-वल, ओढ-वढ

१५. ऋ चा अ, इ, ई, उ, इर, उर होणे.

| | |
|---|---|
| ऋ चा अ | कृपण > कंजूष |
| | तृण > तन |
| ऋ चा इ, ई | श्रृंगार > शिनगार |
| | ऋत > रीत |

| | |
|---|---|
| ऋ चा उ | मुष्टी > मूठ |
| | पृष्ठ > पुठ्ठा |
| ऋ चा इर | कृष्ण > किरसन |
| | मृग > मिरग |
| ऋ चा उर | घृति > घुरत |

१६. अनुस्वार येणे : नग्न-नंगा, कणस-कंन्स

१७. अनुस्वारलोप : दंत-दात, पंख-पाख

१८. आद्यस्वरागम : स्पोक-इस्पोक, विक्री-इकरी

१९. स्वरभक्ती : गर्म-गरम, मंत्र-मंतार, यंत्र-यंतार

२०. मध्यस्वरलोप : जहागिरदार-जागिरदार, दहा-धा, बादशहा-बादशा

**ब) उच्चारप्रक्रिया व्यंजने**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | महाप्राणागम : | वक्त - वखत | |
| | | तट - थडी | |
| | | तो - थो | |
| २. | महाप्राणलोप : | ओढाळ - वडाय | |
| | | सख्खा - सगा | |
| | | आथरणे - हातरणे | |
| | | निऱ्हा - न्यारा | |
| | | उड्या - उळ्या | |
| ३. | घोषीकरण : | क - ग : | वाक - बाग |
| | | | सकळ - सगर |
| | | | शकुन - सगुन |
| | | ख - ग : | खडीसाखर - गडीसाखर |
| | | | सख्खा - सग्गा |
| | | च - ज : | खजांची - खजांजी |
| | | ट - ड : | शकट - शगट |
| | | ठ - ढ : | तिठ - तेढ |

४. अघोषीकरण : ग – क : गोबरी – कोबरी

ज – च : आजचा – आच्चा

ज – द : नजर – नदार

द – ट : बादली – बालटी

ब – प : गायब – गायप

५. मुर्धन्यीकरण : तिलक – टिक्का

६. दन्त्यतालव्य : ढोसणे – झोकणे

७. ओष्ठ : पिंप – टिपाड

८. मुर्धन्य : ण – न : आण – आन

९. दन्ततालव्य उष्मे : च – श : चिमणा – शिमना

च – स : खिचडी – खिसळी

छ – श : छाया – शाव

छ – स : छपरी – सपरी

१०. अन्य वेधक व्यंजन प्रक्रिया :

न – ल : जन्म – जलम

म – व : आमंत्रण – आवतन

र – ल : रबर – लब्बर

व – ब : व्यापार – बेपार

व – य : वेसन – येसन

व – इ : विपदा – इपदा

ज्ञ – ग : ज्ञानी – ग्यानी

११. उष्म्यांच्या प्रक्रिया :

१. ष – ख : पाषणे – पोखणे

ष – ठ : पृष्ठ – पुठ्ठ

ष – श : मनीषा – मनशा

२. श – स : येशू – येसू

३. स – छ : पसीना – पछिना

४. स – श : सीधा – शिदा

५. ह – य : शहाणा – शायना

६. ळ – य : ढंगळमंडळ – ढंगयमंगय

१२. व्यंजनलोप : १. समव्यंजन लोप - खसखस > खाकस

२. अन्यप्रक्रिया -

इतर - तं

त्यावेळी - तई

१३. व्यंजनव्यत्यास : नणंद - नंदय

**वऱ्हाडीची व्याकरणप्रक्रिया**

वऱ्हाडीची व्याकरणप्रक्रिया स्थूलमानाने प्रमाण मराठी प्रमाणेच आहे. त्यामुळे वऱ्हाडी कळण्यास प्रमाण मराठी बोलणाऱ्यांना अवघड जात नाही. परंतु काही बाबतीत व्याकरणिक प्रक्रियेमध्ये वऱ्हाडीने आपला वेगळेपणा जोपासलेला आहे. वऱ्हाडीची विभक्तीव्यवस्था प्रमाण मराठी सारखीच आहे.

**१. नामविभक्ती :**

अ) अन्त्य स्वराचा उच्चार आखूड करण्यामुळे वऱ्हाडीत नपुंसकलिंगी एकवचनी जे रूप होते (उदाहरणार्थ - ते पोरगे, ते कारटे) ते बऱ्याच ठिकाणी 'अ' कारान्त होते. (उदाहरणार्थ - ते पोरगं, ते कारटं)

ब) द्वितीया - चतुर्थीच्या 'ला' ऐवजी 'ले' हा प्रत्यय वऱ्हाडीत सापडतो. उदाहरणार्थ - मले, तुले, त्याहिले, कोणाले. हेच क्रियापदाच्या प्रत्ययाबाबतीतही घडते. उदाहरणार्थ - मराले, कराले, धातुसाधितातील ही लकब सुसंगतीचे असेही एक उदाहरण आहे.

क) तृतीयेचा 'शीन्' हा प्रत्यय केवळ वैशिष्ट्यपूर्ण मानला पाहिजे.

उदाहरणार्थ - सगळ्याशी - साऱ्याशीन

माझ्याशी - माह्याशीन

ड) सामान्यरूपाच्या अनेकवचनात 'इ' किंवा 'ही' चिकटताना दिसतो.

उदाहरणार्थ - लोकाईले, बायकाहीले

**२. सर्वनामविभक्ती :**

१. दर्शक सर्वनामांतील स्त्रीलिंगी ही, जी, ती यांची रूपे जुन्या मराठीप्रमाणे हे, जे, ते अशी होतात.

२. थो शंकऱ्या, थो गाय, थे ढोर, थे पोट्टे अशी तृतीय पुरूषवाचक सर्वनामे लिंग, वचनानुसार आढळून येतात.

३. प्रथम व द्वितीय पुरूषी सर्वनामांची विभक्तीरूपे द्वितीया-चतुर्थी एकवचन, अनेकवचन मले, तुले, आमाले, तुमाले असे होतात.

४. 'काहून' 'काव्हून' 'काम्हून' अशी प्रश्नार्थक सर्वनामांची रूपे सापडतात.

३. **आख्यात प्रत्यय**

अ) **वर्तमानकाळ**

१. प्रथमपुरूष क्रियापदरूप लिंगभेदानुसार न बदलणे.

उदाहरणार्थ - स्त्रीही जाताना 'मी जातोजी' असे म्हणते.

२. द्वितीय व तृतीय पुरूषी एकवचनी तसेच तृतीय पुरूषी अनेकवचनी रूपे लिंगभेदानुसार न बदलता सारखीच राहतात.

उदाहरणार्थ - तू करत्ये, तो करत्ये, ते करत्ये.

३. रीतिवर्तमानकाळ भूतकाळाप्रमाणे साधला जातो.

उदाहरणार्थ - म्या म्हणो, आम्ही निजो.

ब) **भूतकाळ**

१. वऱ्हाडीत द्वितीयपुरूषी व तृतीयपुरूषी भूतकाळाची रूपे सारखीच राहतात. प्रमाण मराठीत ती तशी नाहीत.

उदाहरणार्थ - तू गेल्ता, तुम्ही गेल्ते

तो गेल्ता, ते गेल्ते

अपूर्ण भूतकाळी रूपाकडे पाहिले तर ते प्रमाण मराठीच्या 'गेले होतास' असल्या प्रयोगाचे ते संक्षेप रूप असल्याचे दिसेल.

२. वऱ्हाडी भूतकाळात एकवचनी 'न' व अनेकवचनी 'नि' हा अधिकचा प्रत्यय आढळतो.

उदाहरणार्थ - तिनं ओढलंन, दाजीनं पुसलनि

क) **भविष्यकाळ**

'कर' या धातूची रूपे पुढीलप्रमाणे होताना दिसतात.

| | |
|---|---|
| मी करीन | आमी करू |
| तू करसीन | तुमी करसान |
| तो करीन | ते करतीन |

ड) **आज्ञार्थ**

१. आज्ञार्थी द्वितीयपुरूषी एकवचनी प्रत्यय 'य' हा आहे. उदाहरणार्थ - राहय, खाय

२. आज्ञार्थी भविष्यकाळासाठी 'जो' प्रत्यय वापरला जातो. त्यात बव्हंशी विनविण्याचा प्रकारही दिसून येतो. उदाहरणार्थ - देजो, पाह्यजो, खाजो, निजजो इत्यादी.

**इ) अकरणरूप**

अकरणरूप साधताना खाइना, राहिना ही प्रमाणभाषेतील रूपे वऱ्हाडीत खायेना, राह्येना अशी आढळून येतात.

**ई) ल्यबन्त**

वैदिक संस्कृतात 'गृहीषती' 'नेषणि' असे क्रियापद रूपातील परसर्ग सापडतात.

**वऱ्हाडीचा शब्दसंग्रह**

वऱ्हाडीत प्रमाण मराठीतले काही शब्द जसेच्या तसे सापडतात. उदाहरणार्थ – झोप, उंदीर, जीव, लाल इत्यादी तर काहींच्या उच्चारणात थोडा फरक दिसतो. उदाहरणार्थ – डोया, दीस, गावकऱ्ही. वऱ्हाडीचा स्वतःचा असा स्वतंत्र शब्दसंग्रह आहे. त्यातील काही शब्द अतिशय नाविण्यपूर्ण आहेत. उदाहरणार्थ – अखरपक, हाडपक (पूर्वज पंधरवडा), चंची (खास पान सुपारीची पिशवी), कंथ (नवरा), धिरड (खास पदार्थ), खटारा (गाडी)

वऱ्हाडीत हिंदीमधील शब्दही खूप मोठ्या प्रमाणात आढळतात. उदाहरणार्थ – गाभन (बाळंतीण), नड्‌डा (गळा), नेक (इनामदार), गल्ती (चूक), गवार (गावंढळ) इत्यादी. तसेच काही इंग्रजी शब्दांचा अपभ्रंश झालेलेही शब्द वऱ्हाडीमध्ये आढळतात. उदाहरणार्थ – फस्क्लास, टैक्टर, सेनेमा, फटफटी, दालमिल, पिस्तुल, गारमेन्ट, पार्लिमेंट, असेंब्ली, टेन्सन, फ्यूज इत्यादी.

**कोकणी**

मुंबई, मुंबईची उपनगरे, ठाणे, सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी, गोवा व त्याच्या दक्षिणेकडील भाग या समुद्र किनारपट्टीला 'कोकण' असे म्हटले जाते. कोकणपट्टी जी सह्याद्रीच्या पश्चिमेस अरबी समुद्रापर्यंत दमणपासून गोवा–कोचीनपर्यंत पसरलेली आहे, या भागात बोलल्या जाणाऱ्या मराठीला 'कोकणी बोली' असे म्हणतात. कोकणी ही मराठीच्या संदर्भातील वादग्रस्त बोली होय. कोकणी ही मराठीची बोली आहे की स्वतंत्र भाषा आहे, वाद होता. या वादास राजकारणाची पार्श्वभूमी आहे, तसेच त्याला स्थानिक अस्मितेची किनारही लाभलेली आहे. मराठीच्या भाषिकांना तिचे सहजपणे आकलन होत नाही. ग्रिअर्सनने मात्र कोकणी ही मराठीचीच बोली ठरविली आहे. त्यांच्या भाषिक पाहणीनुसार ३० हून अधिक बोली कोकणी अंतर्गत आणल्या आहेत.

साधारणतः कोकणीचे उत्तर कोकणी, मध्य कोकणी व दक्षिण कोकणी असे तीन प्रकार पाडण्यात आलेले आहेत. कोकणीच्या या तीन मुख्य प्रकारांचे अनेक उपप्रकार केले जातात. हे उपप्रकार प्रांतपरत्वे, जातिपरत्वे, संस्कृतीपरत्वे पडलेले आहेत. गोमंतकी कोकणी ही आज गोव्याची प्रमाणभाषा बनलेली आहे. काही अभ्यासकांच्या मते, कोकणी ही मराठीची बोली नसून कोकणी ही स्वतंत्र भाषा आहे. सन १९४२ साली डॉ. सु. म. कत्रेंचा 'फॉर्मेशन ऑफ कोकणी' हा ग्रंथ, सन १९४९ च्या शणै गोंयबाब आणि वा. र. वालावलीकर यांच्या 'कोकणीची व्याकरणी बांदावळ' या

दोन्ही ग्रंथातून कोकणी ही स्वतंत्र भाषा असल्याचे स्पष्ट केलेले आहे. परंतु प्रा. अ. का. प्रियोळकर व डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांनी या शतकाच्या सातव्या दशकात या मतांचे खंडन करून कोकणी ही मराठीची बोलीभाषा आहे, असे स्पष्टपणे सांगितलेले आहे.

सन १९५० साली गोव्यावर पोर्तुगीजांनी आक्रमण केल्यामुळे गोव्याच्या समाजजीवनावर व संस्कृतीवर त्याचा फार मोठा परिणाम झालेला आहे. जेत्या पोर्तुगीजांच्या भाषेचा तेथील मूळ भाषेवर संस्कार होऊन तिच्यात अनेक पोर्तुगीज शब्द घुसडले गेलेले आहेत. कालांतराने कोकणी ही आपल्या मूळ भाषेपासून इतकी दूर गेली की मराठी भाषिकाला ती सहजगत्या समजणे कठीण बनलेले आहे. दक्षिण कोकणातील कोकणी बोली दळणवळणाच्या अभावी पोर्तुगीजांच्या व मध्यवर्ती भाषेशी संबंध न आल्याने अलिप्तच राहिलेली आहे. प्रमाण मराठीपेक्षा प्राचीन मराठीचे अवशेष तिच्यात अधिक दिसतात.

**कोकणीची उच्चारप्रक्रिया**

कोकणी बोलीची उच्चारप्रक्रिया अर्थात ध्वनिरचना मराठीला अत्यंत जवळची आहे. नासिक्य उच्चार हा कोकणीचा ऐकताक्षणीच जाणवणारा ठळक व खास विशेष आहे. त्याची उदाहरणे कारवारच्या सारस्वत ब्राह्मणांच्या उच्चारात आढळतात. शब्दांच्या अंती असलेले 'अ' कारादी स्वरांचे उच्चार पूर्ण केले जातात. कोकणीमध्ये अ, एव, ओ स्वरांच्या बंदिस्त, आखूड व लांब उच्चारामुळे अर्थभेद घडून येतात.

| | |
|---|---|
| १. बॉबळ (बकुळ) | बॉबडळ - बकुळ फूल |
| पेर (पेरू) | पेऽर - पेरू फळ |
| बोर | बोऽर - बोरफळ |

२. वचन वा संख्याभेदामध्येही हा प्रकार बऱ्याच ठिकाणी दिसून येतो.

| | |
|---|---|
| वड = अनेक वड | वऽऽड (एकच वड) |
| फात्तर = अनेक दगड | फात्तऽर (एकच दगड) |

स्वनिमिक उच्चार अर्थभेदक करणे हा प्रकार कोकणीचे खास वैशिष्ट्य मानले जाते. परंतु प्रमाण मराठीला हा प्रकार नवा नाही.

**कोकणी उच्चारप्रक्रियेचे विशेष**

| | |
|---|---|
| १. अ - आ | : अकांत - आकांत |
| अ - उ | : पण - पुण |
| अ - ओ | : फडा - फोडा |
| | सर्प - सोरोप |

| | |
|---|---|
| उ – ओ | : पुराणे – पोराणे |
| अन्य उ – अ | : परंतु – परंत |
| | वस्तु – वस्त |
| आद्य ओ – व | : आहोळ – वहाळ |
| | आळख – वळख |
| आद्य वि – इ | : विकणे – इकणे |
| आद्य ऋ – इ | : गृहस्थ – गिरेस्त |
| आद्य ऋ – ई | : ऋण – रीण |
| आद्य ऋ – उ | : वृक्ष – रुख |
| २. स्वरभक्ती : | सर्प – सोरोप |
| | धरित्री – धर्तरि |
| ३. मध्यस्वरलोप : | दहा – धा |
| | फलाहार – फळार |
| | भगिनी – भैण |
| | भाऊ – भौ |
| ४. मध्यव्यंजनलोप : | दिवस – दीस |
| | भूमी – भुई |
| ५. महाप्राणागम : | आरसा – हारसो |
| | उंदीर – हुंदीर |
| ६. महाप्राणलोप : | आषाढ – आशाड |
| | घर – गेर |
| | शहाणा – शाणा |
| | तऱ्हा – तरा |
| ७. महाप्राणव्यत्यास : | पुढे – फुडे |
| | ओठी – होठी |
| | बाहेर – भायर |
| | पत्थर – फाथर |
| ८. घोषीकरण : | तीट – तीड |
| | वैशाख – वैशाग |

| | |
|---|---|
| ९. अघोषीकरण : | मंडप - मांटव |
| | अजब - अजाप |
| १०. मुर्धन्यीकरण-न-ण् : | अनुभव - अणभाव |
| | शाला - साळा |
| ११. दन्त्यतालव्य > तालव्य : | नजर - नदर |
| | चोंच - तोंच |
| १२. मुर्धन्य तालव्य: ड-द : | डुक्कर - दुकर |
| | डोळे - दोळे |
| ण - न : | आणि - आनी |
| | आपण - आपून |
| व - प : | सरस्वती - सरस्पती |
| १३. उष्म्यांच्या प्रक्रिया : | |
| श - स : | क्लेश - किलेस |
| | प्रश्न - प्रस्न |
| ष - ख : | तोव - तोख (प्राचीनरूप) |
| ष - श : | विशेष - विशेश |
| | आषाढ - आशाड |
| ष - स : | द्वेष - द्वेस |
| | भाषा - भास |
| 'ष' चा लोप : | ग्रीष्म - ग्रीम |
| स - श : | असे - अशे |
| | पैसे - पैशे |
| १४. जोडाक्षर प्रक्रिया- च्छ-स: | वांच्या - वान्सा |
| 'र' लोप : | गीष्म - गीम |
| त्र - त : | रात्र - रात |
| आद्य 'व्य'तील 'य'चा लोप : | व्यापारी - वेपारी |
| | व्याघ्र - वाग |
| आद्य 'स' चा लोप : | स्थल - थल |
| | स्थिर - थीर |

| | |
|---|---|
| द्वित्वागम : | फक्त - फक्कत |
| | मत - मत्त |
| द्वित्वलोप : | हट्ट - हट |
| | घट्ट - घट |

**कोकणीची व्याकरणिक व्यवस्था**

कोकणीची व्याकरणव्यवस्था ही बऱ्याच बाबतीत प्रमाण मराठीपेक्षा भिन्न-भिन्न अशा स्वरूपाची आहे.

**१. लिंग-वचन विचार**

कोकणीतील नामाचा लिंग विचार हा मराठीप्रमाणेच आहे. कोकणीमधील पुल्लिंगी नामे व स्त्रीलिंगी नामे ही व्यंजनान्त व आ-ई-ऊ-ऐ-ओ-कारान्त, नपुंसकलिंगी व्यंजनांत व आ-ई-उं-एं-कारान्त दिसतात. कोकणीच्या लिंग-वचन प्रक्रियेतील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे;

i) वयात येण्यापूर्वीच्या वा निम्नवर्गीय स्त्रियांची नामे नपुंसकलिंगी घेतात.

उदाहरणार्थ - चेडू (मुलगी), मंजुळे.

ii) मानवेत्तर प्राण्यातील लिंगभेद स्पष्ट करताना 'दादलो' 'बायली' हे शब्द उपयोजिले जातात.

उदाहरणार्थ - दादले दुकर, बाइले घोडो

iii) ओकारान्त 'घोडो' चे स्त्रीलिंग रूप मात्र 'घोडी' असेच होते.

नामाचे अनेकवचन व होणारी सामान्यरूपे मराठीशी मिळती-जुळती आहेत. मराठीतील 'आ' प्रत्ययाऐवजी कोकणात 'ओ' येतो व नपुंसकलिंगी अनेकवचनी 'अं' या प्रत्ययाऐवजी 'आं' येतो.

उदाहरणार्थ;

i) 'घोडो', 'रेडो' सारख्या ओकरान्त नामाचे अनेकवचन मराठीप्रमाणे घोडे, रेडे असेच होते.

ii) स्त्रीलिंगी नामाचे अनेकवचन 'ओ'कारान्त होते. बईल-बायलो, दासी-दास्यो

iii) नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन 'आं' कारान्त होते.

उदाहरणार्थ - नाव-नावां, पैशे-पैशां

२. **सर्वनाम**

कोकणीतील सर्वनामांची रूपे खालीलप्रमाणे असून सामान्यरूपे कंसात दिलेली आहेत.

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमपुरूषी : | हावं (मा-) | आमिं (आम-) |
| द्वितीयपुरूषी : | तूं (तु-) | तुमिं (तुम-) |
| तृतीयपुरूषी : | तो (ता-) | ते |
| | ती (ति-) | त्या (तां) |
| | ते (ता-) | ती |
| संबंधी सर्वनाम | जो (जा-) | जे |
| | जी (जि-) | ज्या (जां-) |
| | जे (जा-) | जी |
| प्रश्नवाचक सर्वनाम : | कोण, कोणि | कोण |
| | (कोणा-) | (कोणां-) |
| आत्मवाचक सर्वनाम : | आपण | आपण |
| | (आपणा-) | (आपणां-) |

३. **नामविभक्ती प्रत्यय**

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | मूळ रूप + O | विकार |
| द्वितीया-चतुर्थी | क, का | क, कां |
| तृतीया | न, ए, शीं | नीं, ईं, शीं |
| पंचमी | ऊन, थान, च्यान | ऊन, थान |
| | ज्येन, आक्, थावन | च्यान, आक |
| षष्ठी | चो, ची, चे, च्यो | चो, चीं, चे |
| | चीं, ज्यो, जीं, जे | च्ये, च्यो, चीं |
| | जे, ज्यो, जीं | |
| सप्तमी | आ, इ, न्त, र | आ, इ, न्त |
| | चेर, ग्वेर | नि, र, चेर, विर |
| संबोधन | सामान्यरूप | ना, नू |

कोकणीचा द्वितीया-चतुर्थीचा 'का' हा प्रत्यय मराठीपासून वेगळा असा दिसतो. मराठीतील 'ए' (तृतीया) हा प्रत्यय सर्वनामांच्या 'हावें', 'तुवें' अशा रूपात आढळतो. षष्ठी मराठीशी जुळती व विशेषणरूप वापरता येईल अशीच आहे. विशेषनामे व त्याच्या जागी येणारी सर्वनामे यांना कोकणीत 'गेलो' असा असा वेगळा प्रत्यय दिसून येतो. मराठीतील 'ला' प्रत्ययाशी त्याचे साधर्म्य असून त्याची उपपत्ती प्राकृतातील 'केर' या प्रत्ययापासून लावता येते.

**क्रियापद**

कोकणीमधील क्रियापदाचे प्रत्यय खालीलप्रमाणे आहेत.

अ) वर्तमानकाळ

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथम पुरूषी | आँ | आति |
| द्वितीय पुरूषी | आसि | आति |
| तृतीय पुरूषी | आ | आति |

ब) भूतकाळ

| | | |
|---|---|---|
| प्रथम पुरूषी | लो-ली-लें | ली |
| द्वितीय पुरूषी | लो-ली-लें | लो-ली |
| तृतीय पुरूषी | ला-ली-लें | ले-ल्या-लीं |

क) भविष्यकाळ

| | | |
|---|---|---|
| प्रथम पुरूषी | ईन | उ |
| द्वितीय पुरूषी | शी | शात |
| तृतीय पुरूषी | ईत | तीत |

कोकणीचा शब्दसंग्रह

कोकणीचा शब्दसंग्रह तिचे एकाचवेळी प्रमाण मराठीशी साम्य आणि वैधर्म्य सांगणारा आहे. सहायु (साहाय्य), विचारू (विचार), तुम्मि (तुम्ही), आम्मि (आम्ही), बा (बाप) असे अनेक शब्द कोकणी-मराठी जवळीकता दाखवणारे आहेत. तर गेर (घर), उशार (हुशार), बोरें (बरे), कुडका (तुकडा), जनेल (खिडकी), जुबे (बेट), आयदान (भांडे), भांगर (सोने), भिरे (पक्षी थवा), पसरो (दुकान), लुडबो (बोबडा), शीत (भात), परब (सण), पुडवे (धोतर), पेटवणे (पाठवणे), फोडणिशी (खुलासा), माळी (माडी), चेडो (मुलगा), खिस्त (हप्ता), गचि (मान), गजाल (गोष्ट), चिक (लहान), तुतयो (हातोडा), धेंक (भय), दूडू (पैसे), चोंबो (समुदाय), उल्लोपी (वक्ता), कुड

(राहण्याची खोली), केस्ताव (भांडण), जळार (डास), डोणि (होडी), दवरणे (ठेवणे), निमाणे (शेवटचे), निसण (शिडी), पटी (वही), मेर (मर्यादा), वरैत (नवरा) इत्यादी. प्रा. अ. का. प्रियोळकरांनी जुने यादवकालीन शब्द तसेच पोर्तुगीज शब्द कोकणीत सापडत असल्याचे सोदाहरण स्पष्ट केलेले आहे.

कोकणीचे रूप हे असे आगळेवेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठीच्या इतर बोलींपेक्षा कोकणीचे हे लक्षणीय रूप ग्रिअर्सनच्याही मनावर चांगलेच ठसले होते. हे मराठीच्या पोटभाषांचे पूरक भाषिक दृष्टीने कमी महत्त्वाचे आहेत. पोटभाषा अशी खरोखर एकच ती म्हणजे कोकणी होय.

अनेक विद्वान आणि गोमंतकाच्या अभिमानी लोकांची कोकणी ही स्वतंत्र भाषा आहे. डॉ. कत्रे यांनीही आपल्या प्रबंधात कोकणी ही स्वतंत्र भाषा मानलेली आहे. परंतु ध्वनिरचना, शब्दसिद्धी इत्यादी दृष्टीने कोकणी मराठीला जवळची आहे हे डॉ. कत्रे मान्य करतात.

डॉ. कालेलकरांच्या मते, कोकणीची ध्वनिरचना ही मराठीच्या ध्वनिरचनेपेक्षा फारशी वेगळी नाही. ध्वनिविचाराप्रमाणे कोकणीचा शब्दसंग्रह-विचार हाही इतर कोणत्याही आर्यभारतीय भाषेपेक्षा मराठीलाच अधिकच जवळचा आहे. रूपविचाराच्या बाबतीतदेखील ती मराठीलाच जवळची आहे. आकलनतत्त्वानुसार कोकणी ही मराठी भाषिकांच्या दृष्टीने वेगळी भाषा मानावी लागते. मात्र सांस्कृतिक कसोटीवर जे कोकणी लोक मराठीचा उपयोग करतात, त्यांची बोली ही मराठीची उपभाषा मानावी लागते.

**अहिराणी**

अहिराणी ही वऱ्हाडी बोलीच्या वळणावर जाणारी बोलीभाषा आहे. या खानदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीला खानदेशी असेही म्हणतात. अहीर-आभीर लोकांची ही भाषा असल्यामुळे तिला अहिराणी असे म्हटले जात असले तरी आज तिचे क्षेत्र विशिष्ट जातींपुरते मर्यादित झालेले आहे. साधारणपणे ह्या भाषेचे क्षेत्र पूर्व व पश्चिम खानदेश हे जिल्हे, दक्षिणेकडे नाशिक जिल्ह्याच्या उत्तर सीमेपर्यंत, बुलढाणा, बऱ्हाणपूरपर्यंत असे डोंगराळ पसरलेले आहे. खानदेशाबाहेर नाशिक, नेमाड आणि बुलढाण्यापर्यंतच्या भागात तिचा वापर होतो. धुळे जिल्हा हा अहिराणीचे प्रमुख केंद्र मानले जाते. मात्र केंद्रापासून दूर दूर जाताना अहिराणीच्या स्वरूपातही बदल होत जाताना दिसतो. तापी, नर्मदा व सातपुडा पर्वताच्या भागामध्ये भिल्ल, गोंड, कातकरी, वारली इत्यादी लोकांच्या बोलण्यात ही भाषा येते.

डोंगराळ भाग व बोलीपुरतीच मर्यादित असल्यामुळे वीस वीस कोसांवर बदलावी इतके पोटभेद अहिराणी बोलीमध्ये सामावू शकतात, असे प्रा. कृ. पां. कुलकर्णींचे मत आहे. पावरी, भिल्ल, लाडशिवकी या हिच्या उपभाषा आहेत. गुजराथीचा अहिराणीवरील प्रभाव पाहून डॉ. ग्रिअर्सनने तिला गुजराथीची पोटभाषा म्हटलेले आहे. मात्र अहिराणी भाषिकांची भावना, संस्कृती, मराठीतील

वाङ्मयाबद्दल त्यांना वाटणारे प्रेम व शिक्षणाची भाषा म्हणून त्यांच्याकडून होणारा मराठीचा वापर विचारात घेता अहिराणीला मराठीची बोलीच म्हणावे लागेल.

**अहिराणीची उच्चारप्रक्रिया**

अहिराणीची उच्चारप्रक्रिया ही प्रमाण मराठीशी बऱ्याच प्रमाणात साधर्म्य दर्शविते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आद्यबदल | | |
| | आद्य अ – आ | | अद्य – आध |
| | आद्य अ – ओ | | वय – वोय |
| | आद्य अऊ – ओ | | अमूप – मोप |
| | आद्य अय – ए | | तर, तय – ते |
| | आद्य आ – अ | : | आभाळ – अभाय |
| | आद्य इअ – ए | : | विवर – विहिर – इहर – हयेर |
| | आद्य उ – ओ | : | मुहूर्त – मोतूर |
| | आद्य ऊ – उ | : | शुन्य – सुन |
| | आद्य ए – य | : | एक – यक |
| | आद्य एअ – इ | : | शेवया – सिया |
| | आद्य ओ – व | : | ओतणे – वतणे |
| | मध्य अ – ए | : | राक्षस – राकेस |
| २. | अनुस्वरागम | | रक्त – रंधत |
| | | | नाद – नांद |
| ३. | अनुस्वारलोप | | खंत – खत |
| | | | भिंत – भीत |
| ४. | स्वरभक्ती | | पर्वत – परबत |
| | | | आश्चर्य – आचरय |
| ५. | मध्यस्वरलोप | | चोरटा – चोट्टा |
| | | | पोरटा – पोट्टा |
| ६. | महाप्राणागम | | रक्त – रंघत |
| | | | अद्य, आता – आध |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. महाप्राणलोप | मुहूर्त - मोतूर | | |
| ८. महाप्राणव्यत्यास | उष्ट्र - हूट | | |
| ९. घोषीकरण | क - ग | : | एक - येग |
| | ख - ग | : | सख्खा - सग्गा |
| | च - ज | : | तशीच - तशीज |
| | ठ - ढ | : | मठी - मढी |
| | फ - ब | : | फरशी - बरशी |
| १०. मुर्धन्यीकरण | त - ढ | : | अत्र - अठे |
| | | | माती - माठी |
| | ध - ढ | : | मधु - मढु |
| ११. मुर्धन्यदन्त्य | ण - न | : | आण - आन |
| | | | मरण - मरन |
| १२. दन्त्य दचा आगम | | | सर्व - सव्दर |
| १३. अन्त्य य चा लोप | | | शुन्य - सुन |
| १४. मध्य | र - ट | : | चोरिटा - चोट्टा |
| | | | पोरटा - पोट्टा |
| १५. आद्य | र - ल | : | रडणे - लडणे |
| | | | रोड - लोड |
| १६. मध्यस्थानी | र - ल | : | पारडे - पालडे |
| | | | परट - पलट |
| १७. 'ळ' चा लोप | | | केळी –केई |
| | | | मंडळी - मंडुई |
| १८. द्वित्तीकरण | | | पत्थर - पत्तर |
| १९. वर्णव्यत्यास | | | सर्व - सद्वर |

**अहिराणीची व्याकरणिक प्रक्रिया**

अहिराणीची व्याकरणिक रचना प्रमाण मराठीप्रमाणेच आहे.

१. **लिंगभेद :** स्त्रीलिंगीसाठी 'ईल-ईन' हे प्रत्यय् अहिराणीमध्ये वापरले जातात. उदाहरणार्थ; देशपांडीन, भांडारकरीन (अपवाद : अंडोर-अंडेर (मुलगा-मुलगी))

२. **वचनभेद :** अ - ए : अंडोर - अंडोरे शिवाय मूळ शब्दातील 'अ' लांबवून अनेकवचन साधण्याची पद्धत आहे. आकारान्त शब्दाचे अनेकवचन अ-कारान्त, आ-कारान्त किंवा एकारान्त होते. उदाहरणार्थ; घोड-घोडे. इकारान्त व उकारान्त शब्दांचे अनेकवचन मराठीप्रमाणेच होते. उदाहरणार्थ - कुदी-कुद्या, रावनी - रावन्या, गडू - गडवे.

३. **विभक्ती :** विभक्तीरूपे करताना सामान्यरूप जवळजवळ न होणे, हा खानदेशीचा विशेष भाग; काहीवेळा मात्र सामान्यरूपात 'स' असा आगम होतो. उदाहरणार्थ - झाडास्नावऱ्हे (झाडावर), दारास्ना. अहिराणीत प्रमाणमराठीप्रमाणे तीन लिंगे आणि दोन वचने आहेत. या बोलीत विभक्ती प्रत्यय लागता नामाचे सामान्यरूप मात्र होत नाही. अहिराणीमध्ये विभक्तीचे प्रत्यय दोन्ही वचनात एकच आहेत. फक्त अनेकवचनी नामास प्रत्यय लागण्यापूर्वी अनेकवचन दर्शक 'स' हा प्रत्यय लागतो. अहिराणीतील सर्वनामाची विभक्तीरूपे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. अहिराणीत तिन्ही पुरुषांत क्रियापदाचे एकच रूप चालते. तसेच कर्त्याच्या लिंगाचा क्रियापदावर परिणाम होत नाही. अहिराणीमध्ये तिन्ही लिंग रूपे सारखीच राहतात. अहिराणीत धातूचे मूळ रूप वापरून भूतकाळ दर्शविला जातो. कित्येकदा भूतकाळ करण्यासाठी धातूला 'नु' 'नुत' 'नो' 'नात्' हे प्रत्ययही लावले जातात.

अहिराणीत विभक्तीचे प्रत्यय पुढीलप्रमाणे आहेत.

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | - | - |
| द्वितीया | ले | सले, हले |
| तृतीया | न्ही, नी, कडतीन, कड, नाकन, वरी | सन्ही-सना, सकडतीन, सकड, सनाकन, सवरी |
| चतुर्थी | ले से | सले, सकरी, ससे |
| पंचमी | तिन, थिन, पान | सहिन, सथिन, सपान |
| षष्ठी | न्ह, न्ही, न, नी | सन्ह, सन्ही, सन, सनी |
| सप्तमी | म, मा, मझार | सम, समा, समझार |
| संबोधन | ओ | ओ |

## ४. सर्वनाम व विभक्तीप्रत्यय

**प्रथम पुरूष**

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | मी | आम्हू |
| द्वितीय, चतुर्थी | मले, माले | आम्हले |
| तृतीया | मावरी | आम्ही, आम्हना |
| पंचमी | मनपान, मानाथी | आम्हन-पान-थीन |
| | | मनाथी (ती) न |
| षष्ठी | म्हन, ना, नी | आम्हना-नी |
| सप्तमी | मनमां, मनामां | आम्हनांमा |

**द्वितीय पुरूष**

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | तू | तुम्हू |
| द्वितीया, चतुर्थी | तूले | तुम्हले |
| तृतीया | तु, तवरी | तुम्ही, तुम्हू |
| | तुवरी | तुम्हनी, तुम्ही |
| पंचमी | तुनपान | तुमनाथीन |
| | तुमपान | तुतुथीन |
| षष्ठी | - | - |
| सप्तमी | तुमां | तुमनामां |

तृतीय पुरूषी तो, ती, ते ह्यांना हे वरचेच प्रत्यय लागतात. हा, ही, हे, जो, जी, जे, कोन इत्यादी सर्वनामे तशीच चालतात. षष्ठी न-न्ह व सप्तमीच्या म-मा या प्रत्ययांवर गुजराथीचीच छाप स्पष्टपणे झळकत राहते.

## ५. आख्यात विभक्ती

अहिराणीमध्ये कर्त्याच्या लिंगाप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलत नसून ते वचनाप्रमाणे बदलते.

**'कर' ची रूपे**

**वर्तमानकाळ**

| **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|
| मी करस | आम्हू करतस |
| तू करस | तुम्हू करतस |
| तो, ती, ते करस | त्या करतस |

**भूतकाळ**

| **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|
| मी के | आम्हू के |
| तू के | तुम्हू के |
| त्यानी, तिनी के | त्यासनी के |

**भविष्यकाळ**

| **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|
| मी करसु | आम्हू करसून |
| तू करशी | तुम्हू करशात - शाल |
| तो, ती, ते करी | त्या करशीन - तील |

**अहिराणीचा शब्दसंग्रह**

अहिराणी ही जरी आर्योद्‌भव भाषा असली, तरी तिच्यात तत्सम शब्दांचा वापर फार कमी होतो. कारण अहिराणीचे रूप बोलभाषिक आहे. लेखनाची परंपरा तिला अगदी अलिकडच्या काळात प्राप्त झालेली आहे. सुप्रसिद्ध कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची काव्यरचना अहिराणीत आहे. ब्राह्मण, दिन, वैभव, अधिक, सुंदर, नदी, धर्म, दान असे तत्सम शब्द अहिराणीत आढळतात. उलट अर्धतत्सम शब्द आणि तद्‌भव शब्द यांचे अहिराणीत बरेच मोठे प्रमाण आहे. उदाहरणार्थ - गाई, घर, शेत, परसाद, पिर्ती इत्यादी. प्रमाणमराठीत फार्सी, अरबी, पोर्तुगीज किंवा इंग्रजीतून रूढ झालेले शब्द अहिराणीत जसेच्या तसे आलेले दिसतात. उदाहरणार्थ; जागा, तारीक, पगार, खमीस, तिकीट, मोहर, बालिस्टर इत्यादी. अहिराणीमध्ये गुजराती शब्द व लकबीही आढळतात. 'छे' सारखे सहाय्यकारी किंवा 'अठे-हठे' सारखे अव्ययेही गुजरातीतून अहिराणीत आलेली आहेत. तरीही अहिराणीचा स्वतःचा नाविण्यपूर्ण असा शब्दसंग्रह आहे. प्रमाण मराठी बोलणाऱ्यांना हे शब्द पूर्ण परिचयाशिवाय समजणार नाहीत इतके वेगळे आहेत. उदाहरणार्थ; डिकरा (मुलगा), आंडोर

(मुलगा), आंडेर (मुलगा), गावडी (गाय), झांब (मुर्च्छा), ढोरकी (गुराखी), फडी (केरसुणी), बंगई (झोपाळा), चष्मा (घराचा खण), कुडी (उडी), चिडी (चिमणी), लवलव (पटकन), विटणे (आंबणे), झापड (पहाट), दुस्सर (जोखड), पारख (अर्धा दिवस), वगार (रेडी), शेरी (गल्ली), मांघयली (सावत्र), पायसागर (पाऊलवाटा), उखलणे (उचलणे), फोत्र (साल) इत्यादी अहिराणीतील शब्दसंग्रह स्वतंत्र अशा स्वरूपाचा आहे.

अहिराणी ही गुजरातीची बोली की मराठीची असा एक वाद आहे. अहिराणी बोलीवर गुजराती भाषेचा झालेला परिणाम लक्षात घेऊन ग्रिअर्सनने अहिराणीस गुजरातीच्या बोलीसमुहांपैकी एक बोली ठरविले आहे. ग्रिअर्सनच्या मते, अहिराणी या बोलीचा मराठीत समावेश करणे उचित नाही. अनेक सर्ग-प्रत्यय मराठीशी एकरूप होणारे असले, तरी सदर बोलीचे आंतरिक रूप गुजराथी आणि राजस्थानींशी मिळतेजुळते आहे. अहिराणीचा गाभा महाराष्ट्रीपेक्षा शौरसेनीला जवळ आहे.

स्वनिम, व्याकरण आणि शब्दसंग्रह याबाबत अहिराणी मराठीशी बऱ्याच प्रमाणात वेगळेपण दाखवत असल्यामुळे अहिराणी मराठीच्या बोलीसमूहातून वगळण्याकडे सुरुवातीला कल होता. परंतु पुरेशा अभ्यासाशिवाय प्रमाण मराठी बोलणाऱ्यांना अहिराणीचे आकलन होत नाही, हेही तितकेच खरे आहे. अहिराणी बोलीचे मराठीशी असलेले नाते तोडता येत नाही. अहिराणी व कोकणीबद्दल निर्माण झालेल्या वादावर तोडगा काढण्यासाठी सन १९३५ मध्ये ना. गो. चाफेकर, प्रा. कृ. पां. कुलकर्णी, वि. ह. निजसुरे आणि चिं. ग. कर्वे या तज्ज्ञांची एक समिती नेमली होती. प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांनी 'अहिराणी-कोकणी' भाषांची चिकित्सा केलेली आहे.

१. अहिराणीतील गुजराथी उच्चार कानावर ठसण्यासारखा असा आढळून येत नाही.

२. अहिराणीतील मराठी-गुजराती शब्दांचे प्रमाण १००:४१ असे आहे.

३. अहिराणीतील रूपप्रक्रियेतील नामविभक्ती व आख्यातविभक्ती या दोन प्रधान बाबीत मराठीचे वर्चस्व आहे.

४. षष्ठी वगळता अहिराणीतील सर्व विभक्ती मराठीप्रमाणेच आहेत.

५. अहिराणीच्या स्वनिम प्रक्रियेवर मराठीचाच प्रभाव दिसतो.

६. अहिराणीमधील वाक्प्रचार मराठी वळणाचेच आहेत.

७. आख्यातविभक्तीत वर्तमान, भविष्य, आज्ञार्थ, अकरणरूप हे सर्व मराठीत दिसतात. तर ल्यबन्तरूप गुजराथी परंतु रूपांचे धातू मराठी दिसतात.

## ३.४ समारोप

प्रमाणभाषा आणि बोली यांचा अन्योय संबंध आहे. बोलीतूनच प्रमाणभाषेची निर्मिती होत असते. एखादी बोली जेव्हा स्थिर होऊन मोठ्या समूहाकडून बोलली जाते त्यावेळी प्रमाणभाषेची निर्मिती होते. त्यामुळे प्रमाणभाषा शुद्ध आणि बोली भाषा अशुद्ध असे भाषाविज्ञान मानत नाही.

काहीवेळा बोलीचे क्षेत्र खूप छोटे असते. व्यवसाय, बाजार, मंदिर याठिकाणी बोलली जाणारी भाषा काहीएक प्रमाणात टिकतेच असे नाही. अशा न टिकणाऱ्या भाषेला मृतभाषा असेही म्हणतात. कलकत्ता येथे निर्माण झालेली 'बटलर इंग्लिश' ब्रिटीश भारतातून निघून गेल्यावर नष्ट झाली. अहिराणी, कोकणी, वऱ्हाडी या मराठीच्या बोली असल्या तरी त्यांच्यावर प्रादेशिक छाप आहे, असे लक्षात येते.

## ३.५ स्वयंअध्ययन प्रश्न

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांच्यातील साम्यभेद लिहा.

२. बोलीभाषा निर्मितीची कारणे सविस्तर व उदाहरणांसह लिहा.

३. पिजिन आणि क्रिऑल या संकल्पना समजावून सांगा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. वऱ्हाडी भाषेचे विशेष लिहा.

२. अहिराणी बोली आणि मराठीभाषा यातील साम्य-भेद लिहा.

३. कोकणी ही मराठीची बोली की स्वतंत्र भाषा ते सकारण लिहा.

## ३.६ उपक्रम

१. कारखाना वगैरे उद्योगक्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या शब्दांची व वाक्प्रचाराची यादी तयार करा.

२. बँक आणि शेअर मार्केट येथे बोलल्या जाणाऱ्या शब्दांची वर्गवारी करा.

## ३.७ अधिक वाचन

१. भाषा : इतिहास व भूगोल : ना. गो. कालेलकर

२. झाडी बोली : हरिश्चंद्र थोरात

३. मराठी भाषा उद्गम आणि विकास : कृ. पां. कुलकर्णी

❑❑❑

**सत्र २ : घटक ४**

**(विभाग ४ Module IV)**

# (अ) मराठीवरील अन्य भाषांचा परिणाम

## ४.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचे वाचन केल्यानंतर आपणास;

- भाषिक संक्रमण म्हणजे काय ते समजेल.
- भाषिक आदानप्रदानाचे स्वरूप समजेल.
- भाषिक आदानप्रदानाची कारणे लक्षात येतील
- मराठी भाषेवरील द्राविडी (कन्नड, तेलगू व तामिळ) भाषांचा प्रभाव लक्षात येईल.
- मराठीवरील संस्कृत, फार्सी, इंग्रजी आणि हिंदी या भाषांचा प्रभाव समजून घेता येईल.

## ४.२ प्रास्ताविक

कोणतीही भाषा एकजिनसी राहू शकत नाही. प्राचीन भारतात आर्यांच्या आगमनानंतर संस्कृत भाषा आली. त्यापूर्वी येथील देशी भाषा वापरात होत्या. संस्कृत आणि येथील देशी भाषा यांचाही एकमेकांवर परिणाम झाला. मात्र आधुनिक आर्यभारतीय भाषा संस्कृतपासून निर्माण झालेल्या आहेत. द्राविडी भाषा गटातील कन्नड, तेलगू, तामिळ, मल्याळम् या भाषांवरही आपणास संस्कृतचा प्रभाव जाणवतो. भारतात या बहुभाषिक समाजाने केलेली भाषिक देवाणघेवाण महत्त्वाची आहे. भारतात बहुसांस्कृतिकता सुद्धा आहे. प्राचीन भारतीय काळापासून दुसऱ्या महायुद्धापर्यंत विविध युद्धे भारतीय भूमीवर झालेली आहेत. विविध वंशाचे लोक येथे राहतात. विविध धर्म-जाती, रीतिरिवाज येथे आहेत. कर्मकांड व वैज्ञानिक प्रगतीपर्यंतचे सर्व टप्पे भारतीय जनतेने पाहिलेले आहेत. त्यामुळे याचा परिणाम भाषेवरही घडत असतो. साहजिकच मराठीची प्रकृती संमिश्र आहे. पेशवाईनंतर येथे इंग्रज आले. त्यामुळेही विचार ते वाङ्मय सर्वच प्रांतात देवाणघेवाण सुरू झाली. साहजिकच कोणतीही भाषा तिच्या मूळ स्वरूपात राहत नाही. भाषिक संक्रमणाची ही प्रक्रिया सतत चालू असते.

## ४.३ विषय विवेचन

परकीय आक्रमण, राज्यक्रांती, वैचारिक क्रांती, दुष्काळ, भूकंप, पूर, युद्धे इत्यादी अनेक कारणांनी समाजजीवन ढवळून निघत असते. त्याचा परिणाम भाषेवर घडत असतो. लोकांचे भाषिक

व्यवहार बदलत राहतात. भाषेच्या व भाषावापराच्या कक्षा रुंदावत राहतात. त्यामुळे आपण भाषिक संक्रमण, आदान-प्रदानाचे स्वरूप व त्याची कारणे समजावून घेऊ.

### ■ भाषिक संक्रमण

आपल्या प्राथमिक गरजा अनेक असतात. भाषा ही सुद्धा एक गरज आहे. माणसाजवळ केवळ ८०० शब्दांचा संग्रह असला तरी त्याची अडचण होणार नाही. अर्थात हे आठशे शब्द प्राथमिक व मूलभूत स्वरूपाचे असावेत. मात्र समाजाच्या वाटचालीत अनेक घडामोडी घडत असतात. माणसांचे व्यवहार व गरजा वाढत जातात. राजकारण, धर्म, शिक्षण, शास्त्र, कला, उद्योग, समाजकारण अशा विविध क्षेत्रात प्रगती होत आहे. विज्ञानाचे शोध आहेतच मात्र दुष्काळ, आपत्ती, युद्धे याही गोष्टी आहेत. भिन्न भिन्न संस्कृतींचा संस्कार घडत असतो. वेगवेगळ्या जाती-धर्माचे लोक एकत्र येत असतात. मनुष्य दूरवरच्या सफरी करीत असतो. वास्तु, शिल्प, चित्र, नृत्य अशा कलांत प्रगती साधत असतो. वाङ्मय आणि शास्त्र यांच्यातील प्रगतीही महत्त्वाची ठरते. रोटीबेटी व्यवहार घडतात. भाषिक व्यवहारांचे वर्तुळ वाढत जाते. या साऱ्यामुळे घडणारी प्रक्रिया ही भाषिक संक्रमणाची असते. डॉ. प्र. न. जोशी यांच्या 'सुबोध भाषाशास्त्र' (१९९८) ग्रंथात या संक्रमणाबाबत मांडलेले मत येथे आपणास विचारार्थ घेता येईल. ''आज प्रगत मानवी समाजाची अवस्था अशी झाली आहे की, लहानशा कुटुंबातही विपुल अशा शब्दांचा वापर करणे अगत्याचे बनले आहे. योग्य, समर्पक अर्थच्छटा व्यक्त करणारे शब्द जवळ असतील तर पतिपत्नींची नाती दृढ होणार आहेत. अनेक कौटुंबिक प्रश्नांची चर्चा त्यांना करता येणार आहे. बाजारात, स्टेशनवर, मोठ्या दुकानांत, मोठ्या कारखान्यात फेरफटका मारून आलेली मुलेही रोज नवीन शब्द घेऊन येतील अशी आजची परिस्थिती आहे. आईबापांबरोबर सकाळची न्यहारी घेताना दैनिक वृत्तपत्रांत आलेल्या व्हेटो, रिमांड, सेशनकमिट, चार्ज, कर्फ्यु, पोलिंग सेंटर, पार्लमेंट, एअरपोर्ट इत्यादी शब्दांची चर्चा मुलांच्याबरोबर त्यांना समजेल अशी आईबापांना करावी लागते. राजकारणातील वादविवाद, परराष्ट्रीय धोरण, उद्योगपतींचा नफा-तोटा, जागतिक युद्ध, सांस्कृतिक शिष्टमंडळ, आंतरराष्ट्रीय हितसंबंध, वर्णकलह, वाङ्मयातील अपप्रवृत्ती इत्यादींचे चर्चात्मक कार्यक्रम घरोघरी स्वयंपाकघरातील टेबलाभोवती आज होत असल्याने तुटपुंज्या शब्दांनी कसे भागणार ? घरातील रेडिओवरून स्फुटनिक, रॉकेट, सॅटेलेट, अपोलो, बॉंब, एअररेड, यूनो, रिसर्च, ॲवॉर्ड इत्यादी नवे शब्द जगातील सर्वच भाषा आत्मसात करताना दिसत आहेत. आपल्याकडील हरताळ, सरकार, बंद, सत्याग्रह, योग, महाराज, निर्वाण, लाठी इत्यादी शब्दांचा प्रसारही जगातील विविध भाषांतून होत आहे. जी गोष्ट घराची, कुटुंबाची तीच बाहेरच्या जगाचीही आहे. कारखान्यात, व्यापारी मंडळांत, उद्योगधंद्यांत, शिक्षण संस्थांत विविध अंगांनी विकास होत असताना नित्यनव्या शब्दांचे आगमन होत आहे. जुन्या शब्दांना नवा उजाळा प्राप्त होत आहे.'' (पृष्ठक्रमांक १५०-१५१)

■ **भाषिक आदानप्रदानाचे स्वरूप व कारणे**

भाषिक संक्रमण म्हणजे काय ते आपण पाहिले. आपल्या लक्षात आले असेल की, भाषिक संक्रमणाच्या प्रक्रियेतच भाषिक आदानप्रदानाची कारणे लपलेली आहेत. आपल्या भाषेतील चायपाव, मिसळ, योगा, निर्वाण, जय हो असे शब्द ऑक्सफर्डच्या इंग्रजी शब्दकोशात गेले आहेत; तर व्हलगर, डँबिस, पोलीस, यूनो, सेंटर, पार्लमेंट, रॉकेट, बॉम्ब असे शब्द आपल्या शब्दकोशात आले आहेत. यासाठी विविध कारणे असतात. या देवाणघेवाणीला आपण भाषिक आदानप्रदान म्हणतो. भाषा परिवर्तनशील असते. भाषेच्या ध्वनी, शब्द, वाक्य, अर्थ अशा सर्वच पातळ्यांवर परिवर्तन घडत असते. आपण परभाषेतील शब्द घेत असताना आपल्या भाषेतील उच्चाराप्रमाणे त्यात बदल करीत असतो. ज्याप्रमाणे इंग्रजांनी मुंबईचे बॉम्बे केले तसाच हा प्रकार असतो.

भाषिक आदानप्रदानाची अनेक कारणे संभवतात. मराठी भाषिक प्रदेशाला लागून कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात, गोवा यांच्या सीमा आहेत. त्यामुळे मराठीचा कन्नड, गुजराती, हिंदी, तेलुगू अशा भाषांशी संबंध येतो. त्यामुळे या भाषांच्या देवाणघेवाणीवर परस्परांचा परिणाम होत असतो. अशा काही कारणांची चर्चा डॉ. श्रीरंग संगोराम यांनी केलेली आहे. आधुनिक भाषाविज्ञान (संरचनावादी, सामान्य आणि सामाजिक) या डॉ. कल्याण काळे आणि डॉ.अंजली सोमण संपादित ग्रंथात (१९९९) 'मराठीवरील अन्य भाषांचा प्रभाव' हा डॉ. श्रीरंग संगोराम यांचा लेख आहे. त्या लेखातील कारणांची मांडणी पुढीलप्रमाणे आपणास करता येईल. (पृष्ठक्रमांक ३०१ ते ३०५ पाहा)

१. तीर्थयात्रेकरिता भारतभर यात्रा करण्याच्या भारतीयांच्या प्रवृत्तीतून इतर भाषांचा संपर्क मराठीबरोबर आलेला आहे. त्यामुळे विशेषत: उत्तरभारतीय हिंदी शब्द मराठीत आलेले आहेत.

२. मनोरंजनाच्या साधनांतून हिंदीचा संपर्क मराठी प्रदेशाबरोबर नित्य येत आहे. हिंदी ही राष्ट्रभाषा असल्यानेही तिचा सहवास मराठीला कायमचा आहे.

३. वैज्ञानिक प्रगती, नवे शोध, वैज्ञानिक घटना-उपकरणे या करिता नवशब्दांची निर्मिती होत आहे. एकतऱ्हेची शास्त्रीय परिभाषा मराठीत रूढ होताना दिसते.

४. भाषिक आदानप्रदान हे राजकीय, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक कारणामुळेही होते. ७ वे ते ११ वे शतक महाराष्ट्रावर बादामी, चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याणी या उत्तर कर्नाटकातील वंशांची सत्ता होती. कावेरी, गोदावरी या नदीच्या प्रदेशात त्या काळी कन्नड भाषा प्रभावी होती. ज्वारीची भाकरी व पुरणाची पोळी कर्नाटकीय खाद्यपदार्थ आहेत.

५. मराठीवर फार्सी भाषेचा व त्यानंतर इंग्रजी भाषेचा जो परिणाम झाला त्यामागे ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. लढाया व आक्रमणे व त्यानंतर स्थिर झालेली राजसत्ता यामुळे १४ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत मराठीवर राजकीय कारणाने फार्सीचा प्रभाव राहिलेला दिसतो;

तर व्यापारी म्हणून येऊन राज्यकर्ते बनलेले इंग्रज भारतात दीडशे वर्षे होते. त्यांच्या इंग्रजी भाषेचा प्रभाव भारतातील समस्त भाषांवर झालेला आढळतो. गोव्याला पोर्तुगीज सत्ता होती. तेथील कोकणी भाषेत पोर्तुगीज शब्द आलेले आढळतात.

६. मराठीत काही शब्द प्रत्यक्ष आले तर काही अप्रत्यक्ष आलेले आहेत. उदाहरणार्थ, मराठीत अनेक फार्सी शब्द आले आहेत. त्यातील अनामत, दगा, इनाम यासारखे बरेच शब्द अरबी भाषेतील आहेत. याचा अर्थ मराठीवर अरबीचा परिणाम आहे असा होत नाही. हे शब्द प्रथम अरबी भाषेत आले व नंतर ते मराठीत आले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

७. राजकीय स्थित्यंतरे, धर्मसत्तेचे प्राबल्य या कारणांनीही भाषिक आदानप्रदान होत असते. महाराष्ट्रात सम्राट अशोक (पाली भाषा), यादव राजे (मराठी भाषा), बहामनी वंशाची सत्ता (फारसी भाषा), शिवकाळ (संस्कृत-मराठीचा गौरव), इंग्रजकाळ (इंग्रजी भाषा) अशा अनेक सत्ता आल्याने त्या त्या काळात त्या त्या भाषेचा प्रभाव जनमानसावर असलेला दिसतो.

साहजिकच कोणतीही भाषा एकजिनसी असत नाही. परकीय आक्रमणे, राज्यक्रांती, दुष्काळ, भूकंप, महापूर, रोगराई, वैचारिक व धर्मक्रांती इत्यादी अनेक कारणांनी वाङ्मयापासून ते रीतिरिवाजापर्यंत परिवर्तन घडत असते. भौतिक व वैज्ञानिक प्रगती अत्यंत वेगाने होत असते. कारण तेथे फायदा, नफा-तोटा यांचा विचार होतो. अशी प्रगती झाली तरी समाज चटकन जुन्या सवयी, विचार, परंपरा यांना सोडत नाही. त्यामुळे समाजातील वैचारिक, सामाजिक आणि धार्मिक ही तीन क्षेत्रे मंदगतीने बदलत राहतात. मात्र प्रागतिकतेमुळे नव्या सामाजिक व सांस्कृतिक परंपरा समृद्ध होतात हे खरे आहे. या सर्वांचा परिणाम भाषेवर घडून येतो. म्हणूनच समाजाची गती व भाषिक विकासाची गती यात समानता हवी. परिवर्तनाच्या या गतीमध्ये,रेट्यामध्ये भाषा परके शब्द स्वीकारते, परभाषिक शब्दांचे भाषांतर करते वा त्यांना नवे रूप देते, तर कधी पूर्ण नवे शब्दही तयार करते. अशा भाषेचा शब्दसंग्रह प्रत्यही नवे रूप धारण करून समृद्ध होत असतो. आपण या प्रकरणाचे शीर्षक मराठीवरील अन्य भाषांचा प्रभाव असे दिलेले असले तरी हा प्रभाव पाहता-पाहता आपण नकळत मराठी भाषेचा शब्दसंग्रहही न्याहाळत असतो.

### ४.३.१ द्राविडी भाषांचा प्रभाव

मराठी आर्यभारतीय भाषागटात येणारी भाषा आहे. या गटात मराठी, बंगाली, आसामी, हिंदी, गुजराती, पंजाबी, उडिया, सिंधी, नेपाळी, लाहदा अशा भाषा येतात. आर्यभारतीय म्हणजेच आर्य कुळातील लोकांच्या भाषा होय. भारतात द्रविड लोक भारताच्या दक्षिणेला वस्ती करून होते. द्रविड व आर्य यांचाही इ.स. पूर्व २००० वर्षापासून सांस्कृतिक व भाषिक संबंध आलेला आहे. द्राविडी

भाषाकुलात तामिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळम् अशा चार महत्त्वाच्या भाषा आहेत. आता आपण अशा द्राविडी भाषांचा मराठीवर कोणता प्रभाव पडला हे पाहू या.

### ■ कन्नड भाषेचा प्रभाव

कानडी अथवा कन्नड ही भाषा द्राविडी भाषाकुलातील भाषा आहे. शं. बा. जोशी यांनी 'मऱ्हाटी संस्कृती : काही समस्या' (१९५२) आणि रंगनाथ लोकापुर यांनी 'ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेवर कन्नडचा प्रभाव' (१९९४) या ग्रंथात मराठीतील कन्नडच्या आदानाचा विचार केला आहे. प्राचीन काळात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र येथील राजवटी जवळजवळ सारख्याच असल्याने कन्नड, तेलगू, तामिळ आणि मराठी भाषांत भाषिक आदानप्रदान घडलेले दिसते. मराठीचा जन्म होण्यापूर्वी कानडी भाषा व वाङ्मय यांचा बराच विकास झालेला दिसतो. कानडी भाषा दुसऱ्या शतकापासून असावी. यादवकालीन पंडित कानडीचे अभ्यासक होते. शातवाहन राजे (आंध्र), गांग राजे (म्हैसूर), होयसळ (हळेबीड), कृष्णदेव व महादेव यादवराजे (देवगिरी) कन्नडप्रेमी होते. अमोघ वर्ष या कन्नड कवीने, 'कानडी भाषा कावेरीपासून गोदावरीपर्यंतच्या प्रदेशात बोलली जात होती.' असे म्हटले आहे. वारकरी संप्रदायाची आराध्य देवता विठ्ठल होय. विठ्ठलाची मूर्ती भानुदासांनी विजयनगरहून पंढरपुरात आणली; म्हणूनच ज्ञानेश्वरांनी, 'कानडा हा विठ्ठलु कर्नाटकु' असे म्हटले आहे. 'तीर्थ कानडे, देव कानडे। क्षेत्र कानडे पंढरीये। विठ्ठल कानडे भक्त हे कानडे। पुंडलिके उघडे केले।' असे एकनाथांचे उद्गार आहेत. 'मराठी भाषेचे मूळ' या विश्वनाथ खैरे यांच्या पुस्तकात (१९७९) या संपर्काचे साधार विवेचन आहे. शहाजीराजे, व्यंकोजी, राजाराम यांनी तंजावर, बंगलोर, जिंजी, म्हैसूर येथे जहागिरी केल्या होत्या.

भीड, अडकित्ता, कायरस, सूर, मुरकुंडी, केळवणे, टका, बोणे, बरड, दगडगुंडा, भैरवगुंडा, गुढी, बोडी, लवलव, चीरकुट, अडदर (भय), आरोगण, आळ, उंडी, उळीग (सेवा), ओगर (जेवण), हडप, बरडी, गुंडी, पोकळ, बिढार, काडी, तूक, पहूडणे, कोंदण, मुद्दल, बाप, तूप, दाटी, कैवार, सोगा, पागोटे, कडबू, पछडी, उंडगा, चोळणा, वोवरी असे अनेक शब्द कन्नडमधून मराठीत आले आहेत. तुम, गड्डा, ओटा, बाबू, परडी, मुकटा असे कन्नड शब्द सीमाप्रदेशात आजही वापरात आहेत. कक्कल, जिजाऊ, विठोबा, बसवण्णा, जयप्पा, व्यंकोजी ही विशेषनामे कन्नड आहेत. मशी (शाई), बोणे (नैवेद्य), भांगार (सोने) हे कन्नड शब्द जुने आहेत. अव्वा, अप्पा, अक्का, अण्णा, ताई, आत्ते, काका, मामा, आजा इत्यादी नातेदर्शक शब्द कन्नड आहेत. बोट, पोट, गाल, गळा, टाळू, बगल इत्यादी अवयवदर्शक शब्द कन्नडउद्‌भव आहेत. बंडी, टोपी, लंगोटी, चोळणा, कांबळे, रजई, चिंधी, गादी हे वस्त्रप्रकार; उडीद, मूग, मटकी, अननस, कलिंगड, कोहळा, पडवळ, गाजर, चिंच, कोथिंबीर, खोबरे इत्यादी फळे व धान्यप्रकार; ओगराळे, झारा, गाडगे, तांब्या, ताम्हण, पेला,

हंडा अशी भांडी; कडबू, कणीक, भाकरी, शेवया, उप्पीट असे पदार्थ; चिमटा, तागडी, विळी, दाभण, पेटी, नथ, बांगडी, बाळी, खिडकी, गच्ची अशा वस्तू असे अनेक शब्द कन्नड आहेत.

कवाड घालणे, गंगेत घोडे नहाणे, गाढवाचा नांगर फिरणे असे वाक्‌प्रचार मूळचे कानडी आहेत. डॉ. बिशप काल्डवेल (१८१४ ते १८९१) यांच्या मते मराठीतील वरि (पर्यंत, तोवर) हे शब्दयोगी अव्यय कानडीतील 'वरम' पासून आले असावे. सहिते, वाचूनि, पासूनि, सवे, वीण ही शब्दयोगी अव्यये जरी संस्कृतोद्‌भव असली तरी ती वापरण्याची प्रवृत्ती मात्र कानडी आहे. 'हे' दर्शक सर्वनाम 'इवरू' वरून आले असावे.

## ■ तेलगू–तामिळ भाषांचा प्रभाव

द्राविडी भाषागटात कानडीबरोबरच तेलगू, तामिळ या भाषा येतात. मल्याळम् ही द्राविडी गटातीलच भाषा मानतात. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र यांच्यातील सांस्कृतिक व भाषिक देवाणघेवाण प्राचीन आहे. दक्षिणेकडील पांड्य व आर्य यांचा संपर्क तिसऱ्या शतकातच आला होता. त्यामुळे मराठी भाषा व द्राविडी भाषा यांचा संबंध आठशे वर्षाहून अधिक जुना आहे. तामिळ भाषेसंबंधी श्री. विश्वनाथ खैरे यांनी विशेष अभ्यास केला आहे. त्यांनी संमत म्हणजे **संस्कृत–मराठी–तमीळ** अभेदाचे सूत्र ठेवून द्रविड महाराष्ट्र, मराठी भाषेचे मूळ, अडगुलं मडगुलं (वाडवडलांच्या बोलीचालींचा मऱ्हाटी मागोवा) या तीन पुस्तकातून अनेक मराठी शब्दांचे स्वनसाम्य तामिळ शब्दांशी शोधण्याचा प्रयत्न केला आहे. तिरुपती, विठोबा, खंडोबा, तुळजापूरची भवानी ही दैवते आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र या तिन्ही प्रदेशात पूजास्थानी आहेत. द्राविडी भाषांचा मराठीवरील प्रभाव आपणास पुढील निरीक्षणातून व्यक्त करता येतो. ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, ळ् हे मूर्धन्य उच्चार तसेच च्, छ्, ज्, झ् असे दंत्यतालव्य उच्चार (वर्ण) मराठीने द्राविडी भाषांतून घेतलेले आहते. डॉ. काल्डवेलच्या मते यादवमराठीतील 'उ' काराचे प्राबल्य हा द्राविडी संपर्काचा परिणाम आहे. वर्तमानकाळीन आर्यभारतीय भाषांत सादशब्द (Echo-words) साधण्याची लकब द्राविडी भाषेपासून आली. मराठीमध्ये अनेक द्राविडी शब्द आल्याने, आर्य + द्राविडी असे काही सामासिक शब्द मराठीने निर्माण केले. मराठी आणि तामिळी भाषेतील स्वरभक्तीमध्ये साम्य आढळते. एकूण सीमाप्रदेशामधील लगतच्या शेजारभाषा म्हणून कानडी, तेलगू, तामिळ या द्राविडी भाषांचा संपर्क व संस्कार मराठीवर होणे अपरिहार्य असले तरी केवळ काही शब्दांचा स्वीकार आणि काही उच्चार या पलिकडे द्राविडी भाषांचा मराठी भाषेवर फारसा प्रभाव पडलेला नाही. तेलुगू भाषा नवव्या शतकात उदयास आली. इ.स. १३०० मध्ये तेलुगू भाषेत 'पंडिताराध्य चरित्र' या नावाचा ग्रंथ लिहिलेला आढळतो. या ग्रंथात काही मराठी गाणी आहेत. यावरून यादवकालीन मराठी व तेलगूचा संपर्क असावा, असे वाटते. नाल, टाळे, तूप, गदारोळ, जाडी, शिकेकाई, मुंड, येकवंकी, बुरी (लोणी काढल्यावर तळचा करपट भाग), अनारसा, गजगा (सागरगोटे) ताळा इत्यादी शब्द तेलगू भाषेतून मराठीत आले आहेत. एकंदरीत तेलुगू भाषेचा

दृश्य परिणाम काही शब्दआदानाच्या पलिकडे गेलेला नाही. महाराष्ट्र शब्दकोशावरून पंचवीस शब्द तामिळीतून मराठीत आल्याचे दिसतात. बहुतेक शब्दांचा उपयोग प्रादेशिक स्वरूपाचा आहे. मलय, टेंगूळ, मांजरपाट, सार, चाटी, अलिकडे, ऐल (तामिळ अयल-नजीकची जागा), हळहळ, इश्श, अय्या, वानर असे शब्द तामीळमधून मराठीत आले. औत म्हणजे जोडाची गाडी हा शेतातील शब्द तामीळ 'उत्ति' पासून आला असावा. मराठी भाषिकांचा संबंध तंजावरमुळे इ.स. १६३४ पासून अधिक्याने येऊ लागला. मात्र केवळ काही शब्द मराठीने तामिळ भाषेपासून स्वीकारलेले दिसतात. कानडी भाषेचाच अधिक प्रभाव मराठीवर आहे, हे स्पष्ट होते.

### ४.३.२ संस्कृत भाषेचा प्रभाव

संस्कृत आणि मराठी यांचा अतूट संबंध आहे. मराठीतील धर्म व तत्त्वज्ञानाच्या चर्चेला वेद, उपनिषदे, गीता, रामायण, महाभारत, भागवत इत्यादी संस्कृत ग्रंथांचा आधार आहे. धर्म, संस्कती, तत्त्वज्ञान, विद्या, ज्ञान यांची भाषा म्हणजे संस्कृत असे समीकरण आजही मराठी माणसाच्या मनात आहे. कुमारिलभट्ट, शंकराचार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य अशा आचार्यांनी संस्कृतमधून वैदिक धर्मसंस्कृतीचा प्रसार केला. कालिदास, भारवी, माघ, श्रीहर्ष, बाण, बिल्हण, भर्तृहरी इत्यादी कवींनी संस्कृतमधून नाटक-काव्य लिहिले. विदर्भातील दामोधर, भंडारा जिल्ह्यातील कवी व नाटककार भवभूती तसेच दंडी, राजशेखर, भास्कराचार्य, महेश्वर, हेमाडपंडित, लक्ष्मीधर, त्रिविक्रम यासारखे कवी आणि ग्रंथकार संस्कृतमधून लिहित होते. पुढे शिव व पेशवे काळात वामन, रघुनाथ, नागेश, विठ्ठल, मोरोपंत यांच्या मराठी रचनेवर संस्कृतचा दाट प्रभाव दिसतो. फार्सी शब्दांऐवजी संस्कृत शब्द असणारा 'राज्यव्यवहारकोश' शिवरायांनी याच काळात निर्माण करून घेतला. अमात्य रघुनाथ हणमंते याने तो निर्माण केला.

आजही मराठीत शेकडा सत्तर टक्के शब्द संस्कृतच्या परंपरेतील आहेत. देव, धर्म, संस्कृती, परंपरा, तत्त्वज्ञान, साहित्य, आचार, व्रते या सहसा न बदलणाऱ्या बाबतीत मराठी भाषा संस्कृतनिष्ठ आहे. राजा, देव, दर्शन, मंदिर, मेघ, पृथ्वी, आकाश, चंद्र, तारा, सूर्य, ब्राह्मण, पूजा, निर्माल्य, उपचार, उपकार, दीप, पुष्प, पत्र, गंध, अभिषेक, मंत्र, घंटा, कलश, मूर्ती, आसन, तीर्थ, प्रसाद, कथा, कीर्तन, आख्यान, पूर्वरंग, नमन, तिथी, श्राद्ध, होम, हवन, पिंड, क्षेत्र, पिता, तर्पण, भोजन, बली, आहुती असे शेकडो तत्सम शब्द मराठीत आहेत. अशा शब्दांची टक्केवारी ४६.०८% आहे. घर, हात, तण, पान, माकड, कमळ, कळशी, छत्री, कान, पोथी, तोंड, पाय, ताक असे शब्द संस्कृत शब्दांपासून निर्माण झालेले तद्भव आहेत. या शब्दांची संख्याही मराठीत ४९.२३% आहे. अजापुत्रं बलिं द्यात्, अतिपरिचयातवज्ञा, अति सर्वत्र वर्जयेत्, अव्यापारेषु व्यापार, भवति न भवति, येनकेन प्रकारेण, पुनश्च हरी:ॐ, शुभस्य शीघ्रम, प्रथमग्रासे मक्षिकापात: यासारखे शेकडो वाक्‌प्रचार आणि रामचंद्र, कृष्णा, यशोदा, सुभद्रा, भीम, अरविंद, पद्मावती, रवींद्र, लक्ष्मण, भरत, वासुदेव,

नारायण, शकुंतला अशी विशेषनामे संस्कृत आहेत. भिस्तरवार, भगुल, वंगाळ यासारख्या ग्रामीण शब्दांची मूळ रूपे संस्कृत आहेत. स्वर-व्यंजनांची मांडणी व वर्गवारी, संधी, समास, उपसर्ग, प्रत्यय, ङ्, ञ ही अनुनासिके, तृतीयान्त एकवचनी भावे प्रयोग या गोष्टी मराठीत संस्कृतमधून आल्या आहेत.

संस्कृत-प्राकृत-मराठी ही साखळी सोपी वाटत असली तरी भाषाविज्ञान त्यास मान्यता देत नाही. संस्कृतपासून प्राकृत भाषा असे साधे सोपे समीकरण नाही. असे असले तरी मराठी व संस्कृतचा अतूट संबंध आहे. कारण यादवकालानंतर मराठीत जे वैभवशाली वाङ्मय निर्माण झाले त्यास संस्कृतची मोठी पार्श्वभूमी असल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या प्राचीन परंपरेतील ताम्रपट आणि शिलालेख यांची भाषा संस्कृतप्रचुर असल्याचे जाणवते. संस्कृतची एक मोठी परंपरा देशात होती.

### ४.३.३ फार्सी भाषेचा प्रभाव

इ. स. १३१८ मध्ये यादवसत्तेचा पाडाव झाला. मुस्लिम राज्य, धर्म आणि भाषा यांचा शिरकाव महाराष्ट्रात झाला. बहामनी काळात व नंतरच्या पाच शाहींच्या काळात फार्सी-अरबी भाषांचा प्रभाव वाढला. अरबी, फार्सी, तुर्की या भाषांना शिमी भाषा अशीही संज्ञा आहे. राज्यकारभारात आलेली फार्सी ही भाषा मराठा सरदार, सामान्य लोक या क्रमाने समाजात पसरत गेली. चौदाव्या शतकातील संतकवी सेना न्हावीच्या काव्यात ''आम्ही वारीक वारीक। करू हजामत बारीक।' या कवितेत हजामत, आयना असे फार्सी शब्द आले. फार्सीचा हा प्रभाव अव्वल इंग्रजी कालखंडापर्यंत राहिला.

यादव राजवटीपूर्वी इसवी सनाच्या पाचव्या शतकापासूनच भारतीयांचा इराणी लोकांशी संबंध आला. व्यापार हे त्याचे कारण होते. ज्ञानेश्वरीतही जहरी, सुलतान, निसाण, पोतडी असे शब्द येतात. चौदाव्या शतकातील मराठीवरील फार्सीच्या प्रभावाचे वर्णन 'महाराष्ट्र सारस्वत' ग्रंथाचे कर्ते वि. ल. भावे यांनी पुढील शब्दांत केले आहे. 'अर्जदाराच्या फिर्यादी काजीपुढे जाऊन त्याचा फैसला किंवा इन्साफ होऊ लागला. पत्र गेले व कागद आले. अधिकाऱ्याचे मोकदम झाले, आणि त्यांना मिळणाऱ्या वार्षिक वेतनाऐवजी सलिना मुशाहिरा मिळण्याचा सिलसिला पडला!' या वाक्यात बहुतेक शब्द फार्सी आहेत, हे लक्षात यावे. एकनाथांचे 'अर्जदस्त' प्रकरण फार्सीमिश्रित आहे. मोरोपंतासारख्या संस्कृतप्रचुर भाषा वापरणाऱ्या कवीच्या लेखनातही फार्सी-अरबी शब्द आढळतात, हे विशेष आहे.

यादवकाळात आढळणारा फार्सीचा प्रभाव शिवकाळातील काही वर्षे सोडली तर पेशवाई अखेर होता. वि. का. राजवाडे यांनी मराठीतील ऐतिहासिक पत्रांची भाषिक छाननी करून मराठीतील फार्सीचे प्रमाण दाखवून दिले आहे, ते असे इ.स. १६२८ : १४%, १६७७ : ६२%, १७२७ ९३%. यावर उपाय म्हणून शिवरायांनी 'राज्यव्यवहारकोश' तयार करून घेतला. अमात्य रघुनाथ हणमंते यांनी तो तयार केला. फार्सी शब्दांच्या ठिकाणी संस्कृत व मराठी शब्द यावेत असा त्यांचा

हेतू होता. या कोशात सुमारे १६०० शब्दांचे पर्याय दिले आहेत. पुढील काही उदाहरणे मराठी-यावनी शब्द अशा क्रमाने आहेत. राजपुत्र-शाहजादा, पंडित-काजी, भट-मुल्ला, अग्निचूर्ण-दारू, दुर्ग-किल्ला इत्यादी. मात्र हा प्रयत्न फारसा फलद्रुप न होता मराठीतील फार्सीचे प्रमाण वाढतच गेले. अर्वाचीन काळात माधव ज्यूलियन आणि स्वा. सावरकर यांनीही भाषाशुद्धीचे प्रयत्न केले. त्यांनाही फारसे यश आले नाही. कारण भाषा ही एक सामाजिक संस्था असते. ती एका व्यक्तीच्या आदेशाने, प्रयत्नाने बदलू शकत नाही.

'पेशवे दप्तरातील मराठी भाषेचे स्वरूप' या गं. ब. ग्रामोपाध्ये आणि 'मराठी बखरीतील फार्सीचे स्वरूप' या डॉ. यू. म. पठाण यांच्या ग्रंथातून आपणास फार्सी-मराठी संबंध तपासून पाहता येतात. फार्सीतील अनेक शब्द मराठीत स्थिर झाले. उच्चार, वाक्प्रचार, शब्दसिद्धी यावरही फार्सीचा प्रभाव जाणवतो. त्या प्रभावाचे काही विशेष पुढीलप्रमाणे मांडता येतील. फार्सीमुळे मराठीत अन्त्य /अ/ चा तोकडा उच्चार रूढ झाला. उदाहरणार्थ, डुल्लत, दुल्लभ. मराठीतील कंठ्य उच्चार संस्कृतमधील कंठ्य उच्चाराप्रमाणेच आहेत, पण काफर, तनखा इत्यादी शब्दांच्या उच्चारामुळे /क/, /ख/ यांचा घशातून उच्चारलेला विशिष्ट कंठ्य उच्चार आला. प्राकृतात लोप पावलेली व्यंजनान्त उच्चारपद्धती पुन्हा रूढ झाली. उदाहरणार्थ, किंचित. उपान्त्य /आ चे /अ/ मध्ये रूपांतर होते. जसे, रजाई-रजई. शब्दाच्या प्रारंभी असणाऱ्या /आ/ पुढे जोडाक्षर वा दीर्घाक्षर आल्यास त्याचा /अ/ बनतो. जसे, आब्रु-अब्रु, चालाख-चलाख. /आ/ नंतर ऱ्हस्व अक्षरापूर्वी /इ/ आल्यास तिचा /अ/ बनतो. जसे, आशिक-आशक. /ई/ नंतर दीर्घाक्षर आल्यास त्याचे /इ/ होते. जसे, ईमा-इमान, कबीला-कबिला. /उ/ नंतर /ह/ आल्यास त्याचा /ओ/ होतो. जसे, तुहमत-तोहमत, मुहर्रम-मोहरम. स्वरभक्तीची उदाहरणे : कद्र - कदर, नर्म-नरम. काही शब्दांत मुळातील द्वित्व नाहीसे होते. उदाहरणार्थ कव्वाली-कवाली, ताल्लुक-तालुका; या उलट काही शब्दांत नव्याने द्वित्व येते. उदाहरणार्थ; अक्ल-अक्कल, अस्ल-अस्सल. वर्णविपर्ययाची उदाहरणे : अमानत-अनामत, कुप्ल-कुलूप. /ज/ चे विविध उच्चार फार्सीत आहेत. त्यामुळे मराठीत दन्त्यतालव्य उच्चारावर परिणाम झाला. जाल, जे, ज्वार, जो या चार उच्चाराचाच हा दन्त्यतालव्य प्रभाव होय. फार्सीची ही उच्चारप्रक्रिया पाहिल्यावर आपण त्याची प्रत्ययप्रक्रिया आणि काही व्याकरणिक विशेष पाहू. 'आन' अथवा 'आनि' प्रत्यय लागून अनेकवचन सिद्ध झाले. जसे, कारकुनानी, खोतानी, देशमुखान इत्यादी. 'रा' या फार्सी प्रत्ययावरून मराठी द्वितीया विभक्तीचा 'ला' प्रत्यय आला असावा, असे मत वि. का. राजवाडे मांडतात. दर, बे, सवाई, नजीक, अखेर, खेरीज, तहत, तर्फे इत्यादी फार्सी शब्दयोगी अव्यये मराठीत आली. फार्सी धातूपासून क्रियापदे आली. जसे; नवाझ-नावाजणे, गुझर-गुजरणे; तसेच फार्सी नामापासून क्रियापदे आली. जसे; नक्कल-नकलणे, आझ्मा-आजमावणे. फार्सी नाम अथवा कृदंत यापुढे क्रियापदाचे रूप वापरून संयुक्त क्रियापद तयार करण्याची लकब फार्सीतून

आली. जसे; दिलासा देणे, गुम झाले, मुजरा देणे इत्यादी. सबब, व, अगर, की, लेकीन अशी उभयान्वयी अव्यये; वाहन, शाबास, खासी, अफसोस, खबर्दार अशी उद्गारवाचक अव्यये; हजर, अव्वल, निम्मे, हमेशा, फक्त, राजरोस अशी विशेषणे व क्रियाविशेषणे मराठीत आली. विशेष्यानंतर विशेषण वापरण्याची लकब मराठीत फार्सीतून आली आहे. उदाहरणार्थ; घोडा अरबी, माणसे चार, माहे जून.

शब्दसिद्धीतून फार्सी शब्द मराठीत आल्याचे दिसतात. ई, गिरी, बाद, नामा, खाना, शीर, दान, दाणी, स्तान, की, वान, गी, बंदी, वंत असे विविध प्रत्यय मराठीत येऊन त्यापासून अनुक्रमे शीतलाई, शिपाईगिरी, हैदराबाद, तहनामा, जनानखाना, कायदेशीर, दीपदान, फुलदाणी, हिंदुस्तान, जामिनकी, दयावान, पोटगी, जमावबंदी, गरजवंत असे विविध शब्द सिद्ध झाले. फार्सी शब्दांच्या अर्थस्पष्टतेसाठी मराठी शब्द जोडण्याची लकब निर्माण झाली. उदाहरणार्थ; कागदपत्र, दंगामस्ती, मेवामिठाई, शेतजमीन, अक्कलबुद्धी इत्यादी. सामासिक शब्दांत फार्सी शब्दांचा वापर सुरू झाला. उदाहरणार्थ; फार्सी+फार्सी : अर्जदस्त, जनानखाना, पाकिस्तान; फार्सी + मराठी : कागदपत्र, अक्कलबुद्धी; फार्सी + संस्कृत : बंदीजन, वस्तादगुरू. फार्सीच्या धर्तीवर मराठी वाक्यरचना, प्रयोग घडू लगले. उदाहरणार्थ; याद दाष्तन-याद राखणे, कूद खाना-उडी खाणे, कसम खुर्दन-शपथ खाणे इत्यादी. अनेक फार्सी वाक्प्रचाराचा स्वीकार मराठीने केला. उदाहरणार्थ; दौलतजादा करणे, नजराणा देणे, मुल्लखगिरीस जाणे, हजेरी घेणे, शाबासकी देणे, डेरा देणे, शह देणे, खलबत करणे, नगारा करणे इत्यादी. जानराव, सुलतान, बाजीराव, शहाजी अशी विशेषनामे आणि सौदागर, सराफ, फडणीस अशी आडनावे फार्सीमुळे मराठीत रूढ झाली. संपूर्ण नाव लिहिण्याची प्रथा फार्सीतून मराठीत आली. तसेच विशेषनामाच्या शेवटी बहुमानदर्शक 'जी' हा प्रत्यय आला. जसे; कृष्णाजी बिन (म्हणजे बाप) अंबाजी घोरपडे.

मराठी भाषेत शेकडो शब्द फार्सीतून आले आहेत. आजही त्यांचे मराठीतील प्रमाण २.९६% आहे. बाब, मिळकत, दानत, सरकार, इनाम, तारीख, खबर, वजीर, पेशा, मुशाहिरा, रास, जमीन, तसबीर, फौज, बारगीर, शिलेदार, पागा, लष्कर, स्वार, गोलंदाज, जीन, तोफ, समेशर, तंबू, लगाम, जंजीरा, खंदक, बुरूज, चौथरा, किल्ला, जीना, दिवाणखाना, गच्ची, झगा, झबले, विजार, तुमान, पगडी, मखमल, चादर, रजई, खुर्ची, मेज, पलंग, पानदान, अगरबत्ती, अंगूर, खसखस, पिस्ता, बदाम, अफू, डफ, ढोल, तबला, दिलरुबा, नगारा, नौबत, शहनाई, जलसा, मैफल, दौत, शाई, कलम, लखोटा असे विपुल शब्द फार्सीतून मराठीत आले आहेत. बहामनी काळातील मराठीवर फार्सीचा प्रभाव पाहता वि. का. राजवाडे यांनी, 'भ्रष्टपणाची कमाल झाली' असे म्हटले आहे. मात्र मराठीने हे आक्रमण यशस्वीरित्या पचविले आहे. काही शब्द व कत्तलची रात्र, मोगलाई, अल्लाघरची गाय, दर्या मे खसखस, बापसे बेटा सवाई, बुड्ढी घोडी लाल लगाम, मिय्या मूठभर दाढी

हातभर, बचेंगे तो और भी लढेंगे, मुर्गी मारी बच्चे दानादान असे अनेक वाक्प्रयोग व म्हणी मराठीत आज रूढ झाल्या आहेत. जिल्हा, तालुका, कसबा, पेठ, मौजे, शहर, सुभा ही प्रदेश-विभागाची नामे फार्सी आहेत. तसेच मराठीमध्ये खावंद (स्वामी), आर्जव (हेतू), खुशामत (मुद्दाम केलेली स्तुती), जबरदस्त (वर आहे हात ज्याचा असा), दिलगीर (असंतुष्ट), सुमार (गणना), हरामखोर (निषिद्ध खाणारा) असे काही फार्सी विशिष्ट शब्द सांगता येतील.

फार्सी, अरबी, तुर्की, हिब्रू या भाषा ॲफ्रो ओशियायी या भौगोलिक नावाने अथवा हेमिटो-सेमिटिक या भाषाकुलाच्या नावाने ओळखल्या जातात. फार्सी भाषेचा मराठीवरील प्रभाव आपण पाहिला. अरबी भाषेतून पुढील शब्द मराठीत आले. इमारत, गनीम, जवाहीर, जिन्नस, तगादा, देखील (दाखिल-समाविष्ट), फकीर, मामला, सदर (मुख्य मंदिर), हुजूर, हुद्दा इत्यादी. तुर्की शब्द : एल्गार, खोत (गावचा अधिकारी).

### ४.३.४ इंग्रजी भाषेचा प्रभाव

इंडो-युरोपिअन भाषाकुलात इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, डच, झेक, रशियन, फ्रिजिअन, लॅटिन, ग्रीक, पोर्तुगीज, संस्कृत, मराठी अशा अनेक  भाषा समाविष्ट होतात. पैकी आपण येथे इंग्रजी भाषेचा मराठीवरील प्रभाव पाहणार आहोत. इ.स. १६०८ मध्ये पहिला इंग्रजी कप्तान हॉकिन्स भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरला. प्रथम व्यापार, नंतर मिशनरी कार्य नंतर राज्यकर्ते या क्रमाने इंग्रजांनी १८१८ मध्ये पेशवाई बुडवून स्वत:चे राज्य सुरू केले. आजअखेर चारशे वर्षे इंग्रजीचा मराठी भाषेशी संपर्क आहे. इंग्रजी ही विश्वभाषा आहे. इंग्रज आणि भारतीय यांच्यातील जेते-जित संबंध, इंग्रजी शिक्षणाची सोय, ज्ञानप्रसार, दळणवळणाच्या सोयी, नवनवीन वैज्ञानिक व औद्योगिक शोध, मुद्रणकलेची क्रांती या साऱ्यामुळे इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढतच गेला. आज इंग्रजी ही विश्वभाषा बनलेली आहे. संगणक-आंतरजालसारख्या आजच्या आधुनिक युगात आपले इंग्रजीशिवाय चालत नाही.

इ.स. १८१९ मध्ये माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन मुंबई इलाख्याचा पहिला गव्हर्नर झाला. तो उदारमतवादी असल्याने त्याने सर्वप्रथम सार्वत्रिक शिक्षणाचा उपक्रम हाती घेतला. त्याने मुंबईला १८२१ मध्ये Bombay Native Education Society ची स्थापना करून देशी भाषांना उत्तेजन दिले. १८४७ ते १८७६ पर्यंत 'भाषांतरपरीक्षक' (Oriental translator) या पदावर असणाऱ्या मेजर कँडीचे कार्य मराठी-इंग्रजी भाषेसंदर्भात उल्लेखनीय आहे. १८५१ मध्ये स्थापन झालेल्या 'दक्षिणा प्राइझ कमिटी' चा मार्गदर्शक तोच होता. १८४७ मध्ये त्याने आपला 'मराठी-इंग्रजी कोश' पूर्ण केला. १८५० मध्ये त्याने 'विरामचिन्हांची परिभाषा' ही पुस्तिका प्रसिद्ध केली. मराठीत इंग्रजीच्या अनुकरणाने विरामचिन्हे प्रचलित झाली होती. मेजर कँडी याने; वृथा संस्कृतप्रचुरता वा फार्सीमयता

असू नये, बोलीतील शब्दप्रयोग सहसा योजू नयेत, पर्यायी लेखनरूपे (Spellings) शक्यतो टाळावीत, लेखनपद्धतीत एकरुपता असावी इत्यादी बाबींबाबत आग्रह धरला. त्याने परशुरामशास्त्री गोडबोले, कृष्णशास्त्री चिपळूणकर इत्यादी मंडळींच्या साहाय्याने मराठी गद्याला प्रमाणरूप देण्याचा प्रयत्न केला. एल्फिन्स्टनच्या सहकार्याने १८२१ साली स्थापन झालेल्या पुणे पाठशाळेत संस्कृत, मराठी, इंग्रजी भाषा शिकविल्या जाऊ लागल्या. त्यामुळे कँडी आणि मंडळींनी मराठीतील कोकणी, फार्सी रूपे, प्रघात टाळून मराठीला प्रमाणरूप देण्यास सुरूवात केली. हे रूप अर्थातच खास पुणेरी होते. मेजर कँडीने मराठीला दिलेल्या प्रमाणरूपाची काही उदाहरणे : करित्ये, जात्ये, येत्ये (करिती, जाती, येती), गेल्ये, बसल्ये, न्हाल्ये (गेले, बसले न्हाले), बादशहाने तिला राणी केली (केले), तुम्ही पोथी वाचलीस (वाचली), ऐकोन, म्हणोन (ऐकून, म्हणून), इने, इजला, इला, याणें, याचा (हिने, हिजला, हिला, यांना, याला), दुसरे दिवशी (दुसऱ्या दिवशी) ही सर्व व्याकरणिक रूपे कँडीने बदलली. कंसातील रूपे ही प्रमाण, शुद्ध आहेत. इंग्रजीत 't' आणि 'd' यांचे लिप्यंतर /ट्/ आणि /ड्/ असे केले जाईल. त्याऐवजी /त्/ आणि /द्/ करावे असे कँडीचे म्हणणे होते. जसे इंग्लंद, स्कातलंद, लंदन. कँडीने मराठीच्या प्रमाणरूपाच्या जागृतीबद्दल निर्माण केलेली जाणीव बरीच फलदायी झाली, असे दिसते. बाबा पदमनजी यांच्या १८५७ च्या 'यमुनापर्यटन' कदंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीत (इ.स. १८८२) पुढील सुधारणा झाल्या. १. /स/ चे /श/ : असी - अशी, जरासी-जराशी; २. ऱ्हस्वदीर्घ : पूत्रफळ-पुत्रफळ, मुहुर्त- मुहूर्त, परिक्षा-परीक्षा; ३. आद्य /आ/ चा /अ/ : आगाध - अगाध, माहाराज, महाराज, रांडकी - रंडकी; ४. 'वा' कृदन्त : व्हायाचे - व्हावयाचे, शोधायास - शोधावयास इत्यादी.

या काळात दर्पण, प्रभाकर, निबंधमाला इत्यादी नियतकालिकांतून तत्कालीन मराठी भाषेचे रूप प्रत्ययास येते. निबंधमालाकर्ते विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी 'मराठी' भाषेचा मी शिवाजी आहे; कारण आपण इंग्रजी भाषेच्या वाघिणीचे दूध प्यालेले आहोत, असे इंग्रजीतून जाहीर केले. एकंदरीत या काळात 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' अशी मराठी भाषेची अवस्था झाली. या काळातील मराठी भाषेचा अभ्यास मराठी गद्याचा इंग्रजी अवतार (प्रा. द. वा. पोतदार), मराठी गद्याची पूर्वपीठिका (प्रा. गं. बा. सरदार), आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती (कृ. भि. कुलकर्णी) या ग्रंथातून प्रत्ययास येऊ शकेल. इंग्रजीच्या संपर्कामुळे मराठीच्या वर्णमालेत /अॅ/, /ऑ/ या दोन स्वरांची भर पडली. त्यांच्या डोक्यावरील अर्धचंद्राची खूण स्वरचिन्ह म्हणून स्वीकृत झाली आहे. जसे; बॅट, कॉट, कॉलेज, जॉनसन, जॉर्ज, रॉय, कॅप्टन इत्यादी. /ट/, /ठ/, /ड/, /ढ/ हे उच्चार मृदू होतात. उदाहरणार्थ, लंडन-लंदन, सॉक्रेटिस-साक्रेतिस; आद्यस्थानी /अ/ चा /आ/ होणे. जसे, आल्प, आपराध, आगोचर, आगदी, आगाध इत्यादी त्यांच्या उलट आद्यस्थानी /आ/ चा /ए/ होणे : बावीस-बेवीस. या काळात वृथा अनस्वार योजण्याची सररास प्रवृत्ती दिसून येते. आद्य

अनुस्वार : ऊंस, कंवटी, केंस, पिंवळा इत्यादी. मध्य अनुस्वार : ऐकींव, कोरींव, कदांचित् इत्यादी. अन्त्य अनुस्वार : उपयोगीं, तरीं, दरमहां, मुलानां; स्वनभक्तीची काही उदाहरणे : कपतान, पेनशन, करनाटक; इस्कूल (आद्य स्वनागम), अहमदाबाद, विध्वा (मध्यस्वनालोप) असे बदल दिसतात. अन्त्य व्यंजनाचा उच्चार इंग्रजीप्रमाणे करण्याची लकब आली. अशी, अशा यांची रूपे असी, अस्या होऊ लागली. /श/ चे /स/ होण्याची ही प्रक्रिया पेशवेकालात आलेली दिसते. आणखी काही उदाहरणे; कैदासीण, नसिबाला, अससील, होसील इत्यादी. मराठीच्या विभक्ती व्यवस्थेवरही इंग्रजी भाषेचा प्रभाव पडलेला आहे. जेणेंकरून, कष्टेंकरून, म्यां, त्वां, त्याणें इत्यादी तृतीयेची रूपे तत्कालीन मराठीत होती. चतुर्थीमध्ये 'ला' ऐवजी 'स' प्रत्ययाचे प्राबल्य आढळते. उदाहरणार्थ; नजरेस, साताऱ्यास, मुलीस इत्यादी. पंचमी विभक्तीच्या 'ऊन' प्रत्ययाऐवजी 'ओन' हा प्रत्यय आला. जसे, होतोन; शब्दयोगी अव्ययांचे लेखन सुटे होऊ लागले. उदाहणार्थ; त्या प्रमाणे, दरडी मागे, नामा पुढे इत्यादी. दंत्यौष्ठ /फ/ जो फार्सीतून येऊ शकला नव्हता तो इंग्रजीमुळे मराठीत आला. जसे; फादर, फूल, फाऽऽर.

संयुक्त व संमिश्र वाक्यरचना, अप्रत्यक्ष निवेदनाची पद्धती, नवीन शब्दरूपे इत्यादी गोष्टी इंग्रजीतून मराठीत आल्या. त्यांचा आपण विचार करू. आभार व शिष्टाचारदर्शक शब्द मराठीत आले. जसे, good night (शुभरजनी), good morning (शुभप्रभात), Thank you (आभारी आहे). She Says that she is still young यासारखी अप्रत्यक्ष निवेदनाची (Indirect Speech) वाक्ये मराठीत आली. इंग्रजीच्या परिणामामुळे साधलेली काही वाक्ये वा वाक्यांश पुढीलप्रमाणे : त्यांहून मी फार अधिक आहे. (I am better than them), तो तुला कान देईल. (to give ear to), तुम्हांस व्हावी अशी वस्तू त्याजपाशी असती तर (If he had thing you should have), रे माझ्या लाडक्या मुला... (O, my dear boy), माझे चांगले ताई (My Dear Sister). काही वेळा अनुकरण, चुकीचे भाषांतर, रूपांतर यामुळे मराठीत इंग्रजी वाक्यरचनेची सरमिसळ होते अथवा तसा प्रभाव दिसतो. मराठी वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शनवरील मराठी बातम्यांमध्ये हा प्रकार आढळतो. असे काही वाक्यांश : अल्प भेट (Short visit), उत्सुक असणे (is eager to), समाजवादामध्ये माझा विश्वास नाही. (believe in चे अनुकरण होते. खरे तर मराठीत 'समाजवादावर' असा प्रयोग हवा.), प्रमुख व इतर यामध्ये (in between), अपघाताने तो मला भेटला. (accidentally), खुली चर्चा (open discussion), दुष्ट चक्र (Viscous Circle). नेहमीचे काही संवाद इंग्रजीमुळे प्रभावी बनले आहेत. उदाहरणार्थ : मी आपणासाठी काय करू शकतो ? (What can I do for you ?), माफ करा हं (Excuse me please), जरा एक मिनिट (One minute please), माझ्यापरीने उत्तम पातळीवर प्रयत्न करीन (I will try at my best level), आपण जाऊ शकता (you can go), तुम्हाला त्रास होत

नसल्यास (If you don't mind), प्रश्न असा आहे.... (the question is), क्षमा करा (Sorry), चालता हो (get out), विनंती करतो (I beg), मार्गावर (on line), फोन करा (Call me).

मराठेशाहीच्या काळात इंग्रजी नामांना मराठी पेहराव चढविला गेला. उदाहरणार्थ इष्टुर (स्टअर्ट), तानसेन (थॉमसन), इंद्रसेन (अँडरसेन), दाक्तर (डॉक्टर), जडज (जज्ज), पैज (प्राइस), हायकोडत (हायकोर्ट), टैम (टाईम), मिंट (मिनिट), पेटरूल (पेट्रोल), टरक (ट्रक) इत्यादी. इस्पितळ, कंपू, कंत्राट, किटली, गटार, टाकी, तबेला, पलटण, डँबीस (Damned beast), फलाट, मड्डम, रूळ, सुनीत (सॉनेट), सोजीर (सोल्जर) असे काही तद्‌भव शब्द इंग्रजीतून आलेले आढळतात.

नवीन येणाऱ्या संकल्पना पर्यायी शब्द वापरून लोकांपर्यंत पोचविण्याचे कार्य तत्कालातील नियतकालिकांनी व नवशिक्षितांनी केलेले दिसते. उदाहरणार्थ, संकर जाती इंग्रज लोक (अँग्लो इंडियन), न्यूजपेपरसाठी वर्तमानपत्र अशी शब्दयोजना बाळशास्त्री जांभेकरांनी केली. कृष्णशास्त्री भाटवडेकरांनी रेल्वे तिकीटांसाठी 'तिकीट' शब्दास पर्याय म्हणून 'चकत्या' शब्द वापरला. महात्मा फुले यांनी 'टाईल्स' साठी 'खापऱ्या' शब्द वापरला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी Mistress साठी 'मोलकरीण बायको' हा पर्याय वापरला. त्यानी Indian चे भाषांतर 'हिंदू' असे केले; (हिंदू महासागर). बाबा पदमनजी Rainbow साठी 'इंद्रधनुष्य' शब्द न वापरता 'मेघधनुष्य' शब्द वापरतात. आगरकर 'बाष्परथ' शब्द रेल्वेसाठी वापरतात. तर कधी 'चर्चात जाऊन प्रेअर करणे' अशी धेडगुजरी वाक्यरचना करतात. अशा या इंग्रजी अवताराने मूळ मराठीची अवस्था फारच बिकट झाली होती. महर्षी वि. रा. शिंदे यांनी 'मराठी भाषेद्वारा ब्राह्मधर्माचा प्रचार' या लेखात मराठी भाषेवरील ज्ञानोबा-तुकोबा यांचे ऋण व्यक्त करून, 'चिपळूणकरांनी आणि आगरकरांनी तिचा (मराठी भाषेचा) गळाच चेपला !' असे उद्‌गार काढले आहेत. हे उद्‌गार सार्थ वाटावेत अशी स्थिती तत्कालात होती.

इंग्रजी शब्दांचे मराठी रूपांतर अथवा भाषांतरही मजेशीर आहे, असे दिसते. उदाहरणार्थ, लाल फीत (रेड टेपिझम), तांबडा कंदील (रेड सिग्नल), काळा बाजार (ब्लॅक मार्केट), नगरसेना (होमगार्ड), तारतंत्री (वायरमन), बलीवर्दयंत्र (बुलडोझर), प्रसविका (मिडवाइफ), पाणक्या (वॉटरबॉय), ज्ञाप (मेमो), निविदा (टेंडर), अनुज्ञप्ती (लायसेन्स), बाष्पक (बॉयलर) इत्यादी अनेक शब्द मराठीचे वळण बिघडवतात. भाषांतर करताना कित्येकदा चुका होतात. इंग्रजी संख्यामापनाची पद्धत हजार, लक्ष, दशलक्ष, अब्ज अशी आहे, तर भारतीय पद्धत हजार, लक्ष, कोटी, अब्ज अशी आहे. त्यामुळे Million चे दशलक्ष हे भाषांतर चुकीचे आहे. कारण ten million चे दहा दहालक्ष होईल. इंग्रजी शाळेत जाणारा मुलगा मी आँटीकडे गेलो होतो, असे म्हणतो. इंग्रजीत आईची किंवा बापाची बहीण तसेच आई किंवा बाप यांच्या भावाची बायको यांना समान दर्जादर्शक aunt असा शब्द येतो. त्यामुळे हा मुलगा नेमका कोणाकडे गेला होता, हे कळत नाही. त्यापेक्षा I had gone to my Mavshi असे म्हटले तरी बिघडणार नाही. तसेच रिपोर्ट करणे, थॅंक्स देणे, गुडबाय करणे,

इंजेक्शन टोचणे, ब्रेक लावणे, बेस्ट असणे, गायडन्स घेणे, रिझल्ट लावणे, व्हल्गर असणे, नॉशिया येणे अशी संयुक्त क्रियापदे (इंग्रजी + मराठी) मराठी भाषेतील भ्रष्टता दाखवितात.

सर्वात शेवटचा इंग्रजी भाषेचा प्रभाव म्हणजे मराठीत आलेले इंग्रजी शब्द होय. आजही अंदाजे १.७३% इंग्रजी शब्द मराठीत आहेत. उदाहरणार्थ, मिसेस अथवा फॅमिली (बायको, पत्नी म्हणण्याची लाज वाटते म्हणून), मिस्टर (नवरा, पती), सिस्टर, ब्रदर, ममी-मम्मी, डॅडी-डॅड, किचनरूम, मास्टर बेडरूम, एड्स व सिडको (लघुरूपे), टेलिफोन, डिलिव्हरी (मालाची असते तसेच पत्नीला मूल होण्याची असते), पीरियड (महाविद्यालयातील व एखाद्याच्या जीवनातीलही), रेशन, कोटा, गार्ड, गॅप, व्हेटो, रिमांड, पत्र नव्हे स्मार्ट मित्र, महाराष्ट्र टाईम्स, मोबाईल, सेल (फोन), कॉल, एसएमएस, लेटर, वाईफ इत्यादी. पॅकबंद, दाढीकट हे अर्धवट इंग्रजी शब्द विशेषच !

## ■ इतर युरोपिअन भाषा

पंधराव्या शतकाच्या आरंभी पोर्तुगीज लोक भारतात आले. १९७० पर्यंत त्यांची गोमंतकावर सत्ता होती. दक्षिण कोकणीवर पोर्तुगीज भाषेचा प्रभाव असला तरी मराठीची वर्णप्रक्रिया व प्रत्ययप्रक्रिया यांच्यावर फारसा परिणाम झाला नाही. पुष्कळ पोर्तुगीज शब्द मराठीत आले. उदाहरणार्थ; काजू, काडतूस, काजे, फालतू, फीत, घमेले, लवाद, नाताळ, पगार, पाव, पेरू, टिकाव, कंपू, पुरावा, खण, सोडत, बिजागरी, अननस, अलमारा, रत्तल, बशी, बटाटा, बिस्कूट, बूच, साबण, भोपळा, तंबाखू, वरांडा, मेस्त्री, लिलाव, खमीस, चावी, कोबी, इस्त्री, मेज, पिंप, आचार (लोणचे), हापुस, बादली, पोपयी, परात, बंब, जुगार, तुरुंग, कर्नल, पाद्री इत्यादी.

सतराव्या शतकापासून फ्रेंच लोकांचा संपर्क आला. निजामशाही, पेशवे, शिंदे यांच्या दरबारात त्यांचा संबंध होता. तोफखाना, कवाईत, दारूगोळा यावर फ्रेंचांची देखरेख असे. फ्रेंच भाषेतील काही शब्द पुढीलप्रमाणे : फिरंगी (फ्रेंच माणसास उद्देशून), फरांसीस (फ्रेंच), आलतर (पहुडण्याची खुर्ची), कडाबीन (रुंद तोंडाची आखूड बंदूक), कूपन, फरगत, फरसबी (French Beans), बाक (Bench), वलंदेज, फाणूस, कंदील, इत्यादी. किंडरगार्टन हा शिशुशाळेसाठी येणारा शब्द जर्मन भाषेतील आहे. हिटलरशाही, नाझी, ब्लिट्स असे काहीच शब्द जर्मन आहेत. डच (डॅनिश) भाषेचे अवशेष इस्पिक, इस्पिड या दोनच शब्दांत उरलेले आहेत. टोमॅटो, चॉकोलेट हे दोन शब्द मेक्सिकन भाषेतील आहेत. हाराकिरी, रिक्शा हे दोन शब्द जपानी आहेत. चिनी भाषेतील जाकुजा, पेकोसुशांग ही चहाची नावे मराठीत आली आहेत. चिनी, जपानी या दोन भाषा मंगोलियन भाषांपैकी आहेत. चिनी व जपानी-कोरियन भाषा परिवार असेही दोन गट मानतात.

मराठीमध्ये असणारे हिब्रु शब्द यहुदी किंवा इस्त्रायल लोकांच्या भाषेतील आहेत. जेरूसलेमकडील धार्मिक छळामुळे या लोकांना देशत्याग करावा लागला. त्यांनी मलबार, कुलाबा

येथे वसती केली असावी. इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून त्यांचा महाराष्ट्रीयांशी संपर्क आला आहे. मात्र इतक्या दीर्घ कालावधीत इस्त्रायल, मिसर, यहुदी, रूथ, सबथ, दावीद, नोहा, अब्राहम इतकेच शब्द मराठीत आले. हिब्रू ही भाषा ॲफ्रो ऐशियायी भाषाकुलात (हेमिटो-सेमिटिक) येते. हिब्रू भाषेप्रमाणेच आग्नेय आशियातील ऑस्ट्रिक ही भाषा प्राचीन भाषा आहे. या भाषेतील काही शब्द मराठीत आले आहेत. ऊस, तांबूल, बाण, कापूस, कापड, बाल, केळ, कर्दळ, मातंग, मोर, मकर, नांगर, इंगळ, आल्ले, उंट, उंदीर, कचरा, कपाळ, कुरंग, खाकरा, गोचीड, चिचुंद्री, चिमणी, छिनाल, छोटा, टांग, ढांग, डावा, डुक्कर, पलिता, पाकोळी, मच्छर, सकळ इत्यादी शब्दांवर ऑस्ट्रिक भाषेची छाप आहे. फावडे, उशी, खिचडी, पडदणी, काणा हे शब्दही याच परंपरेतील आहे. पाली ही प्राकृत भाषा प्राचीन भाषाच म्हणावी लागेल. पाली भाषेतून मराठीत अडीच, अठरा, चौदा, छत्तीस, छप्पन, पंधरा, पन्नास, बारा हे संख्यावाचक शब्द आले आहेत. तसेच जळू, घोणस, घोरपड, छावा, मांजर, साप, ससा, सुणे, डोणी, आसू, नणंद, पाहुणा, सासू, सून, वादळ, न्हावी, अंबील, खीर, गूळ, आपसूक, अकटोविकट, उकिडवा, पक्का, धिम्मा, कूड, खिळा इत्यादी शब्द पाली आहेत. मात्र पाली भाषा संस्कृत भाषेपासून उद्‌भवली असल्याने यातील बऱ्याच शब्दांचे मूळ संस्कृत भाषेत आहे. उत्तरेकडील ब्रज (नंद) भाषेतील मुळु (पाच), उदाणू (तीन), अंगुळु (दहा) असे शब्द मराठीत आले. विसोबा खेचर यांच्या 'मूळ वदनाचा उदाणू नेत्राचा। अंगुळ हस्ताचा स्वामी माझा' या अभंगात हा उल्लेख येतो.

## ४.३.५ हिंदीचा प्रभाव

मराठी, हिंदी आणि गुजराती या संस्कृतपासून उत्पन्न झालेल्या आर्यभारतीय भाषा आहेत. हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचे स्थान मिळाले. पूर्वी हिंदी भाषिकांचा नागपूर शासनाशी संपर्क आल्याने नागपुरी मराठीवर हिंदीचा प्रभाव आहे. 'मराठी आणि दक्खिनी हिंदी' या प्रबंधात देवीसिंग चौहान यांनी दिक्खिनी हिंदीचा मराठीवरील प्रभाव दर्शविला आहे. नामदेवांच्या काळापासून हिंदीचा मराठीशी संबंध आहे. बहुतेक मराठी संतांनी हिंदीतूनही रचना केल्या आहेत. हिंदीचा परिणाम स्वन व उच्चार या बाबतीत फारसा नाही. काही शब्द व काही व्याकरणिक वैशिष्ट्ये हिंदीतून आलेली आहेत. नागपुरी मराठीतील चादर, चटणी या शब्दातील तालव्य उच्चार हिंदीतून आले आहेत. हिंदी भाषेवर फार्सी भाषेचा प्रभाव आहेच. त्यामुळे हौस, जिन्नस, फजिती या सारखे हिंदीतील काही शब्द फार्सी आहेत. हिंदीतील काही शब्द मराठीत आले ते असे : संपन्न (साजरा), धन्यवाद (आभार), योगदान (सहभाग), घेराव, ठप्प, 'जी' हा आदरार्थी निपात, श्रीमती, सबकुछ (सर्वकाही), कक्ष, भाई, भैय्या, स्वर्गीय, पहाड, चुस्त, बैठक, खो-खो (खोना - हरवणेवरून), यातायात, कारवाई, प्रबंध, आयोग, चुनाव, सूत्र, दुपट्टा, चुनडी, रस्सी, वाहिनी इत्यादी. हिंदीच्या संपर्काने दम खाणे, नजर लागणे, धोका देणे, तंग करणे, होड बांधणे असे वाक्‌प्रचार मराठीत आले. देवीसिंग चौहान यांच्या

मते खेळतमाशा, चीजवस्तू, पांढरासफेद, मगनमस्त, वेळवखत असे मराठी + हिंदी शब्द निर्माण झाले. मात्र यातील बहुतेक शब्दांचे श्रेय फार्सीला जाईल. याच प्रमाणे हजीर तो वजीर, चुकला फकीर मशिदीत, एक नूर आदमी तो दर नूर कपडा, चोर तो चोर वर शिरजोर या सारख्या हिंदी फार्सी मिश्रित म्हणीत मराठी सहजगत्या मिसळली आहे. खून चढणे (खून सवार होना), गळ्याचा घोट घेणे (गला घोंटना), बाता मारणे, उल्लू का पठ्ठा या सारखे वाक्प्रचार स्पष्ट आहेत. याच बरोबर मराठीने हिंदीतून धीरे, भले, क्या बात है, बस बस, आज्ञा दीजिए, स्वीकार, निर्माण असे काही शब्द वाक्यरचनेतून स्वीकारले आहेत. नागपुरी मराठीतील देऊन चुक्, घेऊन चुक्, येऊन ऱ्हायलो, करून ऱ्हायलो, नाही हाए अशी शब्दरूपे हिंदीच्या संपर्कामुळे आली असावीत. संस्कृतमधून घेतल्या जाणाऱ्या शब्दाचा अर्थ प्रत्येक आर्यभाषेत थोडाफार वेगळा आहे. अर्थदृष्ट्या हा फरक मराठी आणि हिंदीमध्येही जाणवतो. ना. गो. कालेलकर यांनी तो पुढील उदाहरणांनी दाखविला आहे. सूचना (माहिती), शिक्षा (शिक्षण), रक्षा (रक्षण), त्रिभुज (त्रिकोण), चतुर्भुज (चौकोन), निर्वाचन (निवडणूक), मनोनीत (निवडलेला), सतर्क (जागरूक), परिवार (कुटुंब), अनुरोध (विनंती), गर्व (अभिमान), निंदा (निषेध), आपत्ती (आक्षेप), संवाददाता (बातमीदार), दर्शक (प्रेक्षक) इत्यादी शब्दांत आपणास मराठी व हिंदीमधील अर्थदृष्ट्या फरक जाणवतो. तार आयी, पुलिस आयी असे लिंगभेदाचे चमत्कार हिंदीच्या संपर्काने मराठीत आले. आलू के पराठे, गाजर का हलवा यांचा मजा औरच।

मराठी भुट्टोचोर हा शब्द हिंदीतील भुट्ट = कणिस या शब्दापासून आला आहे. त्याचप्रमाणे मराठी-हिंदी संबंध पुढील काही शब्दात पाहा. यंव-यूं, पाटील-पटेल (शेतीचा पट्टा ज्याच्या मार्फत दिला जातो तो), हो (समंतिदर्शक अव्यय), व्याही-ब्याह, पंत-पंडत, खुर्दा-खुदरा, हुंबरीतुंबरी-तुंभी, रिकामटेकडा-तिकमहेगडा अशा शब्दजोडीतील दुसरा शब्द हिंदी आहे. हिंदी भाषेतील हे शब्द मराठीत कसे आले हे तर्काने जाणणे फारसे कठीण नाही. काशी, गंगोत्री, बदरीनारायण, प्रयाग, गया, ओंकारेश्वर, महाकाळ इत्यादी धर्मक्षेत्रे उत्तर भारतात आहेत. तेथे जाण्याचा प्रघात भातरात खूप प्राचीन काळापासून आहे. पुढेही स्वराज्याच्या काळात महाराष्ट्रीय योद्धांनी अनेकदा उत्तरेत स्वाऱ्या केल्या. त्यामुळे मराठी शिपाई व यात्रेकरू या दोहोंनी परत येताना हिंदी शब्दांची आयात केलेली दिसते.

## ४.४ शब्दार्थ व टिपा

**भाषाकुल :** अनेक भाषांचा परिचय करून घ्यावयाचा असतो; तेव्हा त्यांचे वर्गीकरण करून प्रत्येक वर्गाच्या भाषिक वैशिष्ट्यांची समानता पाहून त्यांचे गट केले जातात. अशा भाषिक गटांना भाषाकुल म्हणतात. भारतात इंडोयुरोपीयन, द्राविडी, ऑस्ट्रोएशियाई, तिबेटीब्रह्मी अशा चार भाषाकुळातील भाषा आहेत.

**आर्यभारतीय भाषा :** या गटात मराठी, बंगाली, आसामी, हिंदी, गुजराती, पंजाबी, उडिया, लाहन्दा, सिंधी नेपाळी अशा सुमारे सत्तर भाषा येतात. इंडोयुरोपीअन भाषाकुलांची भारतात विकसित झालेली आर्यभारतीय ही उपशाखा आहे.

**द्राविडी भाषा :** या गटात एकूण २५ भाषा आहेत. त्यापैकी तामिळ, तेलगू, कन्नड, मल्याळम या चार प्रमुख भाषा भारतात अनुक्रमे तामिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक व केरळ या चार राज्यात आहेत.

**भाषिक कालखंड :** मराठी भाषेत यादवकाळ, बहामनी काळ, शिवकाळ, पेशवेकाळ, इंग्रज काळ, आधुनिक काळ असे भाषिक कालखंड मानले जातात. साधारणत: या कालखंडांची विभागणी पुढीलप्रमाणे आहे. यादवकाळ : ११ ते १३ वे शतक, बहामनी काळ : १४ ते १६ वे शतक, शिवकाळ : १७ वे शतक, पेशवेकाळ : १८ वे शतक, इंग्रजकाळ : १९ ते २० व्या शतकाचा पूर्वार्ध आणि आधुनिक काळ २० व २१ वे शतक . या काळानुसार, राजवटीनुसार मराठीची भाषिक रूपे बदललेली दिसतात.

## ४.५ समारोप

विद्यार्थी मित्रांनो 'मराठीवरील अन्य भाषांचा प्रभाव' या घटकात आपण भाषिक संक्रमण म्हणजे काय ते पाहिले तसेच भाषिक आदानप्रदानाचे स्वरूप व कारणे तपासली. मराठी भाषेला एक हजार वर्षांची परंपरा आहे. गेल्या हजार वर्षात मराठी भाषेत अनेक संक्रमणे घडलेली आहेत. यादव, बहामनी, शिव, पेशवे, इंग्रज अशा राजवटी मराठीने पाहिलेल्या आहेत; या राजवटीची युद्धे, परंपरा, जात व धर्मातील रीतिरिवाज व कर्मकांड या गोष्टी पचविलेल्या आहेत. मराठी भाषेतील या संक्रमणामुळे आज मराठी भाषा समृध्द आहे. मराठीवर अशा अनेक भाषांचा प्रभाव व ऋण आहे. त्या सर्व प्रभावांची चर्चा आपण या प्रकरणात केलेली आहे. आजमितीला मराठीवर सर्वाधिक प्रमाणात इंग्रजी भाषेचा प्रभाव असल्याचे जाणवते. इतर भाषांचे शब्दऋण आहेच. मराठीवरील भाषांच्या प्रभावांचा अभ्यास वि. का. राजवाडे, शं. बा. जोशी, गं. ब. ग्रामोपाध्ये, रंगनाथ लोकापुर, डॉ. श्रीरंग संगोराम, विश्वनाथ खैरे, डॉ. यू. म. पठाण, डॉ. देवीसिंग चौहान यांनी केलेला आहे. गतिमान जीवनामुळे आता जग एकत्र येत आहे. त्यामुळे अगोदरच बहुभाषिक व सांस्कृतिक असलेल्या भारतासारख्या देशातील लोकांना एकापेक्षा अनेक भाषांचा परिचय होतो आहे. भारतीय लोकांना एक राज्यभाषा, एक राष्ट्रभाषा, एक परभाषा आणि शेजारभाषा अशा किमान दोन ते चारपाच भाषांचा परिचय असतो. त्यामुळे भारतीय भाषिकांच्या व्यवहारात भाषिक आदानप्रदान भरपूर प्रमाणात होते.

## ४.६ सरावासाठी प्रश्न

**योग्य पर्याय निवडा.**

१. कन्नड ही भाषा कोणत्या भाषाकुलातील आहे ?
(द्राविडी / आर्यभारतीय / तिबेटी)

२. 'व्यंकोजी' विशेषनाम कोणत्या भाषेतून मराठीत आले ?
(कन्नड / फारसी / तेलुगू)

३. संस्कृत-मराठी-तामिळ अभेदाचे सूत्र कोणी मांडले ?
(विश्वनाथ खैरे / वि. का. राजवाडे / वा. ल. कुलकर्णी)

४. 'पंडिताराध्यचरित्र' हा ग्रंथ कोणत्या भाषेतील आहे ?
(तामिळ / तेलुगू / कन्नड)

**उत्तरे :** १. द्राविडी, २. कन्नड, ३. विश्वनाथ खैरे, ४. तेलुगू.

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दोन फार्सी वाक्प्रचार सांगा.

२. 'राज्यव्यवहारकोश' या ग्रंथाचा कर्ता कोण आहे ?

३. डॉ. कॉल्डवेलचे यादवकालीन मराठीतील 'उ' काराबाबतचे मत लिहा.

४. तृतीयान्त एकवचनी भावेप्रयोग मराठीत कोणत्या भाषेतून आला आहे ?

**उत्तरे** १. दौलत जादा करणे, नजराणा देणे.

२. अमात्य रघुनाथ हणमंते

३. डॉ. कॉल्डवेलच्या मते यादवकालीन मराठीतील 'उ' काराचे प्राबल्य हा द्राविडी संपर्काचा परिणाम आहे.

४. तृतीयान्त एकवचनी भावे प्रयोग मराठीत संस्कृत भाषेतून आला आहे.

**लघुत्तरी प्रश्न**

१. मराठी भाषेवरील संस्कृत भाषेचा प्रभाव सोदाहरण लिहा.

२. मराठी आणि कन्नड या भाषांचा अनुबंध स्पष्ट करा.

३. मराठीवरील तेलुगू-तामिळ भाषांचा प्रभाव सांगा.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. मराठी भाषेवरील फारसी भाषेचा प्रभाव सोदाहरण लिहा.

२. मराठी भाषेवरील इंग्रजी भाषेचा प्रभाव सोदाहरण स्पष्ट करा.

३. भाषिक आदानप्रदानाचे स्वरूप व कारणे लिहा.

## ४.७ अधिक वाचन

१. मऱ्हाटी संस्कृती : काही समस्या : डॉ. शं. बा. जोशी (१९५२)

२. द्राविड महाराष्ट्र : विश्वनाथ खैरे

३. मराठी बखरीतील फार्सीचे स्वरूप : डॉ. यू. म. पठाण

४. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार : द. वा. पोतदार

५. सुबोध भाषाशास्त्र : डॉ. प्र. न. जोशी (१९९८)

६. मराठी भाषेचे मूळ : विश्वनाथ खैरे (१९७९)

७. मराठी भाषेची घटना : रा. भि. जोशी (१९२३)

८. फार्सी–मराठी कोश : माधव पटवर्धन (१९२५)

८. भाषाविज्ञान आणि मराठी भाषा : डॉ. अनिल गवळी (२००९)

## ४.८ उपक्रम

वर्तमान मराठी भाषेत तसेच दैनिकात सातत्याने वापरात येणारे इंग्रजी शब्द एकत्रित करा. उदाहरणार्थ 'दोन्ही पक्षांनी फिल्डिंग लावली होती.' या वाक्यातील 'फिल्डिंग' हा शब्द.

❑❑❑

## सत्र २ : घटक ४

### (विभाग ४ Module IV)

## (ब) मराठी व्याकरण

### ४.१ उद्दिष्टे

विद्यार्थिमित्रांनो, या घटकाचे अध्ययन केल्यानंतर;

१. मराठीतील प्रयोगव्यवस्था जाणून घेता येईल.

२. मराठीतील विभक्तिविचार समजून घेता येईल.

३. विभक्तिविषयक विविध वादांविषयी आपल्या ज्ञानात भर पडेल.

४. व्याकरणविषयक आपली आवड निर्माण होईल.

### ४.२ प्रास्ताविक

मराठी व्याकरण म्हणजे मराठी भाषेच्या रचनेचा अभ्यास होय. त्यावरून मराठी भाषेच्या रचनेच्या विविधतेची कल्पना आपणास येते. बहुतेक करून मराठीच्या व्याकरणाचा विचार करताना संस्कृतमधील व्याकरणाचा आधार घेतलेला दिसतो. मराठीत दादोबापासून आजच्या व्याकरणकारांपर्यंत एक मोठी परंपरा दिसून येते. या परंपरेत व्याकरणातील विविधतेचा खूप विचार झाला आहे. त्याप्रमाणे व्याकरणकारांत मतभिन्नताही खूप आढळते. हे लक्षात घेऊन आपणास या प्रकरणात प्रयोगव्यवस्था व विभक्तिव्यवस्था यांचा प्रामुख्याने विचार करावयाचा आहे.

शब्दांना लागणाऱ्या प्रत्ययांना अर्थ नसला तरी वाक्याचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी प्रत्यय महत्त्वाचे ठरतात. उदा.- (रामाने रावणास मारले.) राम, रावण, मारणे या तीन शब्दांतून अर्थाचा उलगडा होत नाही. या तीन शब्दांतून कर्ता, कर्म, क्रिया कोणत्या काळात घडली? कोणी घडविली? याचा बोध होण्यासाठी त्या शब्दांना जोडल्या गेलेल्या ने, स, ले या प्रत्ययांनी केले आहे. नाम व सर्वनाम या शब्दांना लिंग, वचन व विभक्ती असे तीन विकार होतात. त्यात विभक्ती हा महत्त्वाचा विकार आहे. नाम व सर्वनाम हे वाक्यात येतात तेव्हा त्यांचा वाक्यातील इतर शब्दांशी अर्थदृष्ट्या व रचनादृष्ट्या संबंध येतो. हा संबंध दाखविण्यासाठी त्या शब्दांना काही विशिष्ट प्रत्यय लागतात. असे प्रत्यय लागून त्या शब्दाचे जे रूप तयार होते त्यास विभक्ती म्हणतात. या विभक्तिव्यवस्थेचा विचार करताना व्याख्या, स्वरूप यांची चिकित्सा करण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत.

## ४.३ विषय विवेचन

वाक्यातील क्रियापद हा महत्त्वाचा घटक आहे. क्रियापदाच्या मूळ रूपाला धातू असे म्हटले जाते. मूळ धातूला लिंग, वचन, पुरूष, काळ व अर्थ यांचे प्रत्यय लागून क्रियापद तयार होत असते. यातील लिंग, वचन व पुरूष यांचे प्रत्यक्षात प्रत्यय नसले तर वाक्यातील कर्ता किंवा कर्म यांच्या लिंग, वचन व पुरूषाप्रमाणे क्रियापदाचे रूप बनत असते. यालाच सर्वसाधारणपणे प्रयोग असे म्हटले जाते. प्रयोगविचारात कर्ता, कर्म व क्रियापद यांना महत्त्वाचे स्थान असते. यासाठी आपण यांचे अर्थ समजावून घेऊया.

**१. मराठीची प्रयोगव्यवस्था**

क्रिया निर्माण करणारा तो कर्ता. कर्ता म्हणजे निर्माता. हा कर्ता नाम, सर्वनाम, विशेषण, धातुसाधित अशा कोणत्याही शब्दजातीतील असू शकतो. क्रिया ज्याच्या बाबतीत संभवते, क्रिया ज्याच्या संदर्भात येते, तो कर्ता असतो. परंतु काही वेळा कर्त्याशिवायही वाक्य असू शकते. उदा. मळमळ होते, उजेड होतो. धातूला कर्ता असतो तसे कर्मही असते. परंतु प्रत्येक धातूस कर्म असेलच असेही नसते. काही धातू सकर्मक व काही धातू अकर्मक असतात.

**प्रयोगाचे प्रकार**

वाक्यातील कर्ता व कर्म यांचा क्रियापदाशी संबंध असतो.त्याच प्रमाणे त्यांचा क्रियापदावर अधिकारही असतो. कर्ता किंवा कर्म यांच्या लिंगवचन-पुरुषानुसार क्रियापदाचे रूप बदलत असते अशा प्रवृत्तीला प्रयोग म्हणतात. प्रयोगाचे मुख्य प्रकार तीन आहेत.

१. कर्त्याच्या लिंग, वचन व पुरुषाप्रमाणे क्रियापदाचे रूप बनते. याला कर्तरी प्रयोग असे म्हणतात. उदा.- तो जातो, ती जाते, ते जातात.

२. कर्माच्या लिंग,वचन व पुरुषाप्रमाणे क्रियापदाचे रूप बनते. याला कर्मणी प्रयोग असे म्हणतात. उदा.-त्याने पत्र लिहिले, त्याने निबंध लिहिला, त्याने कादंबरी लिहिली.

३. काही वेळा कर्ता किंवा कर्म यांच्या लिंग, वचन व पुरुषाप्रमाणे क्रियापदाचे रूप न बनता ते स्वतंत्ररित्या बनते, याला भावे प्रयोग म्हणतात. उदा.-रामाने रावणास मारले, लोकांनी सरकारला निवडले.

या तीन मुख्य प्रयोगाशिवाय मो. के. दामले यांनी आणखी एक प्रकार मानला आहे, तो म्हणजे संकीर्ण प्रयोग. या प्रयोगाची उदाहरणे मराठी भाषेत सापडतात. उदा.-तू त्याला न्यायचे होतेस.

## १. कर्तरी प्रयोग

ज्या वाक्यातील क्रियापदाचे रूप कर्त्याच्या लिंग, वचन व पुरूषाप्रमाणे बनलेले असते त्या वाक्यप्रयोगास कर्तरी प्रयोग असे म्हणतात. उदा.-राम जातो, सीता जाते, लोक जातात.

**विशेष :**

१. या प्रयोगामध्ये कर्त्याला अर्थदृष्टीने महत्त्व असते.

२. या प्रयोगात सकर्मक व अकर्मक अशी दोन्ही प्रकारची रचना होऊ शकते.

३. कर्तरी प्रयोगात क्रियापदाचे रूप कर्त्यांच्या लिंग, वचन व पुरुषाप्रमाणे बदलत असते.

४. या प्रयोगात कर्ता हा नेहमी प्रथमा विभक्तीत असतो. विभक्तीचे प्रत्यय लागत नाहीत.

कर्तरी प्रयोगात कर्म असेल तर ते प्रथमा, द्वितीया विभक्तीत असते. उदा. संपत पत्र लिहितो. कर्तरी प्रयोगाचे दोन प्रकार मानले जातात. असे दोन प्रकार मानावेत की न मानावेत याबद्दल व्याकरणकारांमध्ये मतभेद आहेत. केवळ कर्तरी प्रयोगाच्या विशिष्ट रचनेमुळे असे प्रकार घडतात.

सकर्मक कर्तरी प्रयोग : ज्या कर्तरी प्रयोगात कर्म असते, त्यास सकर्मक कर्तरी प्रयोग असे म्हणतात. उदा.-ती पत्र लिहिते, विद्यार्थी अभ्यास करतो.

अकर्मक कर्तरी प्रयोग : ज्या कर्तरी प्रयोगात कर्म असत नाही, त्यास अकर्मक कर्तरीप्रयोग असे म्हणतात. उदा.-तो पडला, मी जातो.

## २. कर्मणी प्रयोग

ज्या वाक्यातील क्रियापदाचे रूप त्या वाक्यातील कर्माच्या लिंग, वचन व पुरुषाप्रमाणे बनलेले असते, त्या वाक्यप्रयोगास कर्मणी प्रयोग असे म्हणतात. उदा.-त्याने पत्र लिहिले, सविताने चित्रे पाहिली.

या प्रयोगाचे विशेष पुढीलप्रमाणे;

१. या कर्मणी प्रयोगात कर्म हे पद महत्त्वाचे असते. ते नेहमी प्रथमेत असून क्रियापदाच्या रूपावर अधिकार गाजविते.

२. कर्म अर्थदृष्टीने महत्त्वाचे असते. पण मराठीत काहीवेळा अर्थदृष्टीने महत्त्व असत नाही.

**कर्मणी प्रयोगाचे प्रकार**

कर्मणी प्रयोगाचे मो.के.दामले यांनी मुख्य दोन प्रकार मानले आहेत. ते म्हणजे-

अ) प्रधानकर्तृक कर्मणी ब) गौणकर्तृक कर्मणी.

गौणकर्तृक कर्मणीचे पुन्हा चार उपप्रकार मानले आहेत.

| | |
|---|---|
| १. पुराण कर्मणी | २. नवीन कर्मणी |
| ३. समापन कर्मणी | ४. शक्य कर्मणी |

**अ) प्रधानकर्तृक कर्मणी**

ज्या कर्मणी प्रयोगातील कर्त्यास अर्थाच्या दृष्टीने प्राधान्य असते, त्यास प्रधानकर्तृक कर्मणी असे म्हणतात. कर्मणी प्रयोगात कर्मास महत्त्व असावयास हवे परंतु कधी कधी एखाद्या वाक्यप्रयोगात कर्त्यास महत्त्व येते. उदा. त्याने काम केले, त्याने पत्र लिहिले या वाक्यात कर्माऐवजी कर्त्यास महत्त्व आहे. अशा वाक्यप्रयोगास प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोग असे म्हणतात. या प्रयोगाचे आणखी काही विशेष सांगता येतात;

१. कर्त्यास बहुदा तृतीया विभक्तीचा प्रत्यय लागलेला असतो. काही वेळा चतुर्थीचा प्रत्यय दिसतो.

२. कर्म हे प्रथमेत असते.

३. क्रियापद हे कर्माच्या लिंगवचनानुसार बनलेले असते. उदा.- त्याने पत्र लिहिले, त्याने पत्र लिहावे. त्याला ही सवय सोडावी लागली.

उदा.- रामाने काम केले. Rama did the work इंग्रजीतील पर्यायी वाक्य हे Passive Voice चे न होता Active Voice मध्येच राहते. याचा अर्थ या रचनेत कर्त्याला महत्त्व आहे. हे लक्षात घेऊन दामले यांनी त्याला प्रधानकर्तृक असे नाव दिले.

**ब) गौणकर्तृक कर्मणी**

हा प्रकार कर्मणी प्रयोगाचा अत्यंत महत्त्वाचा आहे. या वाक्यरचनेमध्ये कर्म हे अर्थदृष्टीने महत्त्वाचे पद आहे. ते क्रियापदावर अधिकार गाजविते. या प्रयोगाचे वेगवेगळे चार विभाग करता येतात.

१. पुराण कर्मणी

पुराण कर्मणी प्रयोग हा मूळ संस्कृत कर्मणी प्रयोगापासून आला आहे. परंतु असा प्रयोग जुन्या मराठी काव्यात आढळतो. गद्यात फारसा दिसून येत नाही. आजच्या मराठीत आढळत नाही.

उदा.- त्वा काय कर्म करिजे लघु लेकराने. अथवा नळें इंद्रासीं असें बोलिजिलें

२. नवीन कर्मणी : या प्रयोगाचे विशेष पुढीलप्रमाणे;

१. हा प्रयोग इंग्रजीतून मराठीत आल्यामुळे त्यास नवीन कर्मणी प्रयोग म्हणतात. इंग्रजीत Passive Voice चा उपयोग करून जे वाक्य तयार होते त्याचे मराठीत भाषांतर करताना असे रूप रूढ झाले आहे. उदा.- इंग्रजीत- Thief was caught by the police मराठीत- शिपायाकडून चोर पकडण्यात आला.

२. या नवीन कर्मणी प्रयोगात कर्त्यास तृतीयेचा विभक्तिप्रत्यय न लागता 'कडून' हे शब्दयोगी अव्यय लागते.

३. कर्म हे प्रथमेत असते.

४. या प्रयोगात क्रियापदाची रूपे भूतकाळात असतात. उदा.- शिपायाकडून चोर धरला जातो.

५. नवीन कर्मणी प्रयोगातील वाक्यरचना संयुक्त क्रियापदाने साधलेली असते.

३. शक्य कर्मणी : विशेष;

१. या प्रयोगातील क्रियापदाचा अर्थ क्रिया करण्याची शक्यता, सामर्थ्य, इच्छा, अपेक्षा असा असतो.

२. कर्त्यास तृतीया किंवा चतुर्थी विभक्तीचे प्रत्यय लागतात.

३. कर्म हे प्रथमेत असते.

४. क्रियापदाची रूपे ही शक्य धातूची असतात. मुख्य धातूस व, अव, अवव हे प्रत्यय लागलेले असतात. उदा.- त्याला काम करवते, त्याच्याने एवढी रक्कम देववणार नाही.

सबनीस या प्रकारच्या रचनेला अकर्मक कर्तरी मानतात. त्यांच्या मते कर्ता कधीही चतुर्थीत येत नसतो. पण कर्म हे पद कर्ता ठरते.

४. समापन कर्मणी

त्याचे पत्र लिहून झाले.

या वाक्यामध्ये कर्ता षष्ठी विभक्तीमध्ये असतो व क्रियापद संयुक्त असते. तसेच व्याकरणातील रचनेचा अर्थाशी फारसा संबंध येत नसला, तरी क्रिया होण्यास काही अवधी लागतो किंवा जी क्रिया करण्यासाठी कमी-अधिक वेळ घेतो, अशा क्रियांचा निर्देश करताना समापन कर्मणीची योजना केलेली असते. काही विशेष;

१. सर्व प्रकारच्या कर्मणीच्या या प्रकारच्या वाक्यरचनांमध्ये कर्म हे नेहमी प्रथमेत असते. कर्ता मात्र वेगवेगळ्या विभक्तीमध्ये येतो.

२. या प्रयोगातील क्रियापदाचा अर्थ क्रियासमाप्ती असा असतो.

३. हा प्रयोग सर्व आख्यातात होतो.

एकंदर पुढीलप्रमाणे सात वाक्यरचनांचा विचार कर्मणी प्रयोगामध्ये होऊ शकतो.

१. रामाने काम केले.-प्रधानकर्तृक कर्मणी

२. त्याला हा रुमाल सोडावा लागतो.-प्रधानकर्तृक कर्मणी

३. नळें इंद्रासीं असें बोलिजेलें.-जुना कर्मणी गौणकर्तृक

४. शिपायाकडून चोर पकडला जातो.- नवीन कर्मणी गौणकर्तृक

५. शिपायाकडून चार पकडण्यात येतो.-नवीन कर्मणी गौणकर्तृक

६. त्याच्याने काम करवते.-शक्य कर्मणी गौणकर्तृक

७. त्याचे पत्र लिहून झाले.-समापन कर्मणी गौणकर्तृक

**३. भावे प्रयोग**

ज्या वाक्यातील क्रियापदाचे रूप कर्ता किंवा कर्म यांच्या लिंगवचनाप्रमाणे न होता ते स्वतंत्र राहते अशा वाक्यरचनेस भावे प्रयोग असे म्हणतात. या प्रयोगात क्रियापद नेहमी तृतीय पुरूषी नपुंसकलिंगी एकवचनी असते. दामले यांच्या मते, ज्या वाक्यातील क्रियापद कर्तृगामी व कर्मगामीही नसते म्हणजे ते कर्ता किंवा कर्म यांपैकी कोणाच्याच पुरुषलिंगवचनाप्रमाणे बदलत नाही तर नेहमी तृतीय पुरुषी नपुंसकलिंगी व एकवचनी असते, त्या वाक्यात भावे प्रयोग आहे असे म्हणतात.

भावे प्रयोगाची वैशिष्ट्ये

१. भावे प्रयोगात क्रियापदाचे रूप कर्ता किंवा कर्म यांच्या लिंगवचन पुरुषाप्रमाणे बनलेले नसते.

२. भावे प्रयोगात क्रियापदाचे रूप स्वतंत्ररीत्या म्हणजे तृतीय पुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी बनलेले असते.

३. क्रियापदाचे रूप बहुधा भूतकाळी किंवा विध्यार्थी असते.

भावे प्रयोगात कोणतेही पद प्रथमेत नसते. म्हणजे रचनादृष्टीने कोणतेही पद महत्त्वाचे नसते. पण कधी कधी अर्थदृष्टीने वाक्यामध्ये कर्तृपद महत्त्वाचे असते. या सर्व दृष्टीने भावे प्रयोगाचे तीन उपप्रकार होऊ शकतात. १) प्रधानकर्तृक भावे २) गौणकर्तृक भावे ३) अकर्तृक भावे

१) प्रधानकर्तृक भावे

१. या प्रयोगात एकही पद प्रथमेत नसते.

२. अर्थदृष्टीने कर्त्याला महत्त्व देणारा हा प्रयोग आहे.

३. अशा प्रयोगात कर्मास द्वितीया किंवा चतुर्थीचा प्रत्यय लागलेला असतो.

४. हा प्रयोग सकर्मक किंवा अकर्मक या दोन्ही प्रकारात असतो.

उदा.- रामाने रावणास मारले. (सकर्मक)

रामाने रावणास मारावे. (सकर्मक)

त्याने जावे. (अकर्मक)

ब) गौणकर्तृक भावे

१. पुराण भावे

१. हा प्रयोग जुन्या मराठी भाषेत आढळतो व तो संस्कृतमधून आला आहे.

२. या वाक्यात कर्म असू शकत नाही.

३. कर्तृपद तृतीयेमध्ये असते.

४. क्रियापदाच्या रूपामध्ये 'ज' हा जुना प्रत्यय येतो.

उदा.- पुण्यात्मकें पापें स्वर्गा जाईजे.

२. नवीन भावे

१. दामले यांनी या प्रयोगाचा कर्तृकर्मभावे असा उल्लेख केला आहे.

२. या वाक्यात तृतीयान्त शब्दयोगी अव्यय लागलेले असते.

३. कर्मपद द्वितीयेत असते.

४. क्रियापद कोणत्याही पदावर अवलंबून नसते.

उदा.-त्याला कधी पकडण्यात येईल, याचा नेम नाही

त्याला कधी पकडले जाईल, याचा नेम नाही.

३. शक्य भावे

१. या प्रयोगामध्ये कर्ता हा द्वितीया विभक्तीत असतो.

२. या प्रयोगात कर्मपद नसते.

३. क्रियापदाचा अर्थ क्रिया करण्याची इच्छा, अपेक्षा, शक्यता, सामर्थ्य असा असतो.

४. मूळ धातूस व, अव, अवव हे प्रत्यय लावून शक्य क्रियापदाची रुपे साधलेली असतात.

उदा.- त्याला जाववते किंवा त्याच्याने जाववते.

४. समापन भावे

१. या प्रयोगात कर्ता षष्ठी विभक्तीत असतो.

२. कर्म असू शकत नाही.

३. क्रियापद संयुक्त असते व क्रियासमाप्ती असा क्रियापदाचा अर्थ असतो.

उदा.-त्याचे लिहून झाले.

रामाचे रावणास मारून झाले.

क) अकर्तृक भावे

१. या प्रयोगात कर्त्यास प्राधान्य नसते. काही वेळा वाक्यात कर्ताच नसतो. उदा.-त्याला घरी यायला सांजावले.

२. कर्ता असेल तर तो चतुर्थी विभक्तीत असतो.

३. ही वाक्ये नेहमी अकर्मक असतात.

४. अकर्तृक धातू मराठी भाषेत संख्येने कमी आहेत.

उदा.-इतक्यात सांजावले किंवा उजाडले.

## ४. संकीर्ण प्रयोग

कर्तरी, कर्मणी व भावे हे जे मुख्य तीन प्रयोग आहेत त्यांतील कोणत्यातरी दोन प्रयोगांचा संकर होऊन होणाऱ्या प्रयोगास संकीर्ण प्रयोग असे म्हणतात. अशी मो. के. दामले यांनी व्याख्या करून हा एक प्रयोगाचा नवीन प्रकार मानला आहे. वाक्यरचनांच्या लक्षणांची एकमेकांमध्ये भेसळ होऊन नवीन वाक्यरचना मराठीत रूढ झालेली दिसून येते. काही व्याकरणकारांनी अशा रचनेस अशुद्ध म्हटले आहे. परंतु दामलेसारख्या व्याकरणकारांनी अशा रचना अशुद्ध न समजता संकीर्ण प्रयोग म्हणून त्यांचा समावेश करता येईल, असे म्हटले आहे. ज्या कर्ता-कर्म-क्रियापद यांच्या विशिष्ट प्रकारच्या नियमानुसार प्रयोगाची उभारणी झाली आहे, तशा प्रकारचे निश्चित नियम संकीर्ण प्रयोगात नसतात.

१. कर्तृकर्म संकर

तू मला पुस्तक दिलेस. त्याने काम केलेन्.

या वाक्यामध्ये कर्ता तृतीयेत आहे. कर्म प्रथमेमध्ये आहे. क्रियापद कर्मावर अवलंबून असल्याने प्रामुख्याने हा प्रयोग कर्मणी होणे भाग आहे. परंतु दिलेस, केलेन् या क्रियापदाच्या रूपामधील स, न् हे प्रत्यय कर्मामुळे आलेले नसून ते कर्तृपदाचे द्योतक आहेत. कर्ता बदलला तर हे प्रत्यय बदलतील, म्हणजे या वाक्यरचनांमध्ये कर्ता-कर्म या दोन्ही पदांवर क्रियापद अवलंबून असल्याने, याला कर्तृकर्म संकर प्रयोग असे म्हटले जाते.

२. कर्मभावे संकर

आईने मुलीला निजविली.

या वाक्यात कर्मणी आणि भावे या दोन प्रयोगांचा संकर आहे.

आईने मुलगी निजविली.-कर्मणी

आईने मुलीला निजविले.-भावे

या दोन्ही प्रकारची वाक्यरचना न करता कर्ता कर्म भावे प्रयोगानुसार व क्रियापदाचे रूप मात्र कर्मणी प्रयोगाला जुळेल, अशा प्रकारचे योजून ही नवीन प्रकारची रचना मराठीत केली जाते. म्हणून अशा रचनेस कर्मभावे संकर असे नाव मिळाले आहे.

३. कर्तृभावे संकर

तू त्यास न्यायचे होतेस.

या वाक्यामध्ये १) तू त्यास न्यायचे होतेस. (सकर्मक कर्मरी) व २) तू त्यास न्यायचे होते. (सकर्मक भावे) अशा दोन्ही प्रयोगांचा संकर आहे. द्वितीया पुरुषी कर्तृपद हे अनेकदा कर्मणी व भावे या प्रयोगांमध्ये प्रभावी ठरते, असे दिसून येते.

४. कर्तृकर्मभावे संकर

त्याने आपल्या मुलीला कालच सासरी पाठविलीन्.

हे वाक्य म्हणजे १) त्याने आपली मुलगी कालच सासरी पाठविली.-कर्मणी प्रयोग २) त्याने आपल्या मुलीला कालच सासरी पाठविले.-भावे प्रयोग, या दोन्हींचे मिश्रण होऊन त्याने मुलीला कालच सासरी पाठविली असा कर्मभावे संकर तयार झाला. त्यामध्ये कर्त्याच्या क्रियापदावर

होणाऱ्या परिणामामुळे क्रियापदाच्या रुपाला न् हे अक्षर जोडले गेले. म्हणून या वाक्यात तिन्ही प्रयोगांचा संकर दिसून येतो. अशा वाक्याला कर्तृकर्मभावे संकर असे नाव दिले आहे.

## २. मराठीची विभक्तिव्यवस्था

व्याकरणकारांमध्ये विभक्तिविषयी काही मूलभूत मतभेद आहेत. त्यातून अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यादृष्टीने आपण नंतर चर्चा करणारच आहोत. प्रारंभी विभक्ती म्हणजे काय ते समजावून घेऊन स्वरूप पाहण्याचा प्रयत्न करूया.

### विभक्ती : व्याख्या

विभक्ती हा शब्द वि + भज म्हणजे विभाग करणे या अर्थाने वापरला जातो. वि + भज या धातूला 'ति' हा नामसाधक प्रत्यय लागू विभक्ती हा शब्द बनला आहे. नाम व सर्वनाम यांना प्रत्यय लागून त्यांचे जे रूप तयार होते, म्हणजेच मूळ शब्दाला लागलेल्या प्रत्ययाच्या व्यवस्थेस विभक्ती असे म्हटले जाते. व्याकरणकारांनी पुढीलप्रमाणे व्याख्या केलेल्या आहेत.

१. **दादोबा पांडुरंग :** नामाचा व क्रियेचा जो संबंध तो कारकसंबंध आणि हा संबंध सुचविणारे जे प्रत्यय, तदन्त, जे शब्द , त्यांस विभक्ती असे म्हणतात.

२. **गोडबोले शास्त्री :** क्रियेशी आणि क्रियावाचक शब्दांशी नामाचा जो संबंध त्यास कारक म्हणतात आणि तो संबंध दाखविणाऱ्या प्रत्ययांस विभक्तिप्रत्यय म्हणतात. नामास विभक्तिप्रत्यय जोडून जी रूपे तयार होतात त्यांस विभक्ती किंवा विभक्त्यन्त असे म्हणतात.

३. **रा. भि. जोशी :** वाक्यात प्रातिपदिकाचा क्रियापदाशी किंवा क्वचित इतर शब्दांशी जो संबंध असतो त्यास कारक म्हणतात. आणि तो संबंध दाखविण्यासाठी नामाचे जे रूप तयार करतात त्यास विभक्ती असे म्हणतात.

४. **मो. के. दामले :** नामास व सर्वनामास जे विकार झाल्याने त्यांच्या वाक्यातील इतर शब्दांशी असलेला संबंध समजतो त्या विकारांच्या भिन्नभिन्न जातीस विभक्ती असे म्हणतात.

वरील व्याख्या कारक (अर्थ) व प्रत्यय यांना स्वतंत्रपणे महत्त्व देऊन व्याख्या केलेल्या येतात. परंतु या दोहोंना महत्त्व असल्याने सर्वसमावेशक व्याख्या असणे योग्य ठरते. या दृष्टीने पुढील व्याख्या अर्थपूर्ण ठरतात.

१. **ग. ह. केळकर :** नामे आणि सर्वनामे यांचे वाक्यातील इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांच्या योगाने दाखविले जातात त्या विकारांना विभक्ती असे म्हणतात.

२. **अरविंद मंगरूळकर :** नामाचा अथवा सर्वनामाचा वाक्यातील अन्य पदाशी संबंध जोडणारी उपाधी म्हणजे विभक्ती होय.

इतर शब्दांशी व इतर पदांशी संबंध दाखविणाऱ्या विकारांना विभक्ती असे म्हटले आहे. विभक्तीचे प्रमुख गुणधर्म व्यक्त होतील, अशा व्याख्या असल्यामुळे त्या अर्थपूर्ण ठरतात.

**विभक्तीचे स्वरूप**

संस्कृतप्रमाणे मराठीत आठ विभक्ती मानल्या आहेत. प्रत्येक विभक्तीचे एकवचनाचे व अनेकवचनाचे वेगवेगळे प्रत्यय आहेत. त्याचबरोबर प्रत्येक विभक्तीने कोणता तरी अर्थ म्हणजे संबंध दाखविलेला असतो. या सर्वांचा विचार करून पुढीलप्रमाणे विभक्तीचे प्रत्यय आणि अर्थ मांडता येतील.

| **विभक्तीचे नाव** | **एकवचनी प्रत्यय** | **अनेकवचनी प्रत्यय** | **अर्थ** |
|---|---|---|---|
| प्रथमा | प्रत्यय नाही | प्रत्यय नाही | कर्ता |
| द्वितीया | स, ला, ते | स, ला, ना, ते | कर्म |
| तृतीया | ने, ए, ई, शी | नी, ही, ई, शी | करण |
| चतुर्थी | स, ला, ते | स, ला, ना, ते | संप्रदान |
| पंचमी | ऊन, हून | ऊन, हून | अपादान |
| षष्ठी | चा, ची, चे | चे, च्या, ची | संबंध |
| सप्तमी | त, ई, आ | त, ई, आ | अधिकरण |
| संबोधन | प्रत्यय नाही | नो | हाका मारणे |

प्रत्येक विभक्तीने कोणता ना कोणता अर्थ दर्शविलेला असतो. त्याची पुढीलप्रमाणे उदाहरणे देता येतील.

१. तो अभ्यास करतो.–कर्ता (क्रियेचा कर्ता)

२. रामाने रावणास मारले.–कर्म (क्रियेचे कर्म)

३. रामान बाणाने राक्षसांना मारले.–करण (क्रियेचे साधन)

४. राजाने ब्राह्मणाला दान दिले.–संप्रदान (क्रियेचा उद्देश)

५. रामाहून गोविंदा मोठा आहे.–अपादान (क्रियेचा आरंभ, वियोग)

६. तुझे काम सांग.–संबंध

७. तो संध्याकाळी घरी असतो.–अधिकरण (क्रियेचे स्थळ, काळ)

**विभक्तीची चिकित्सा**

विभक्तीच्या संदर्भात मराठी व्याकरणामध्ये अधिक वाद निर्माण झालेले दिसून येतात. विभक्ती प्रत्ययावरून मानाव्यात की कारकावरून मानाव्यात? विभक्तीची नावे कोणती असावीत? विभक्ती संख्या किती असावी? रूढ व प्रचलित विभक्तिव्यवस्थेपेक्षा वेगळी व्यवस्था करून विभक्तीचा विचार करणे शक्य आहे काय? ही व्यवस्था विभक्तीला न्याय देऊ शकेल काय? अशा प्रश्नांची चर्चा केली जाते. या ठिकाणी प्रथम विभक्तीवार विचार आपण करूया.

**प्रथमा**

१. प्रथमा विभक्तीला प्रत्यय नाहीत. नामाचे किंवा सर्वनामाचे मूळ रूप हेच प्रथमेचे रूप आहे. परंतु एकवचनी व अनेकवचनी रूपांत फरक होतो. उदा.-फूल-फुले

२. प्रथमा ही कर्त्याची विभक्ती मानली जाते.

३. प्रथमेला प्रत्यय नाहीत आणि विभक्ती प्रत्ययावर अवलंबून असते. हे तत्त्व लक्षात घेता प्रथमा विभक्ती मानू नये, असे म. पां. सबनीसांनी म्हटले आहे. प्रत्यय नाही व सामान्यरूप नाही तेथे विभक्तिविकार झाला असे म्हणताच येत नाही. परंतु अनेक व्याकरणकारांनी प्रथमेचे अपवादात्मक रूप मान्य करून तिचा पुरस्कार केला आहे.

४. विभक्तिविचारात केवळ प्रत्ययांनाच महत्त्व नसून अर्थानाही आहे. कर्ता हा महत्त्वाचा घटक असल्यामुळे प्रथमा विभक्ती मानणे योग्य ठरते.

**द्वितीया व चतुर्थी**

मराठीत या दोन्ही विभक्ती वादग्रस्त विभक्ती आहेत. कारण या दोन्ही विभक्तींचे स, ला, ते - स, ला, ना, ते हे प्रत्यय समान आहेत. याविषयी तीन मतप्रवाह व्याकरणात दिसून येतात.

१. द्वितीया गाळावी व चतुर्थी मानावी.

२. चतुर्थी गाळावी व द्वितीया मानावी.

३. द्वितीया व चतुर्थी दोन्ही विभक्ती मानाव्यात.

द्वितीया व चतुर्थी या विभक्तीपैकी एक विभक्ती गाळायची, असे ठरविले तर द्वितीया गाळावी, असे मत चिपळूणकर व दामले या दोघांनी मांडले आहे. त्याची कारणे पुढीलप्रमाणे-

१. मराठीतील द्वितीयेचे प्रत्यय हे संस्कृत द्वितीयेच्या प्रत्ययावरून झालेले नाहीत.

२. कर्मार्थापेक्षा संप्रदानार्थाची व्यापकता अधिक असते.

३. स, ला, ना इत्यादी प्रत्ययांचा कर्मार्थापेक्षा संप्रदानार्थी उपयोग अधिक होतो.

४. अन्य प्रत्ययापासून साधलेला एकही कमार्थी प्रत्यय मराठीत नाही.

५. द्वितीयेचे कर्मसूचकत्त्वाचे कार्य, मराठीत अंशत: चतुर्थीच्या प्रत्ययांनी होते आणि काही प्रमाणात प्रथमेच्या प्रत्ययांने होते. (म्हणूनच अप्रत्ययी द्वितीया व सप्रत्ययी द्वितीया असे दोन विभाग जोशीसारख्या काही व्याकरणकारांनी मानले.) म्हणजे प्रथमेमध्ये लोप पावण्याचा द्वितीयेचा स्वभाव संस्कृतमध्येही व्यक्त होतो.

६. जसे कर्ता, हे प्रथमा, तृतीया व चतुर्थी यांचे कारक समजतात, तसेच कर्म हे प्रथमा व चतुर्थी यांचे कारक समजावे.

मो. के. दामले यांचे हे मुद्दे म. पां. सबनीस व ग. मो. पाटील यांना मान्य नाहीत त्यांनी पुढीलप्रमाणे प्रतिवाद केला आहे.

१. व्युत्पत्तीचा आधार एका विशिष्ट मर्यादेपर्यंत योग्य असतो. आज कोणते प्रत्यय कोणत्या प्रकारचे कार्य करतात, त्यांचा अर्थ काय हे पाहणे महत्त्वाचे होय. म्हणून व्युत्पत्तीच्या आधारे चतुर्थीचा पुरस्कार करणे योग्य नाही.

२. व्युत्पत्तीचा आधार घ्यायचा तर त्यात एक विसंगती जाणवते. प्राकृतात चतुर्थीचा लोप झाला असेल आणि तिचे कार्य षष्ठीने होत असेल तर चतुर्थीचा पुरस्कार कोणत्या आधारे योग्य ठरता? प्राकृतात चतुर्थीचा लोप झाला असेल तर प्राकृतापासूनच निर्माण झालेल्या मराठीत चतुर्थी मानणे कितपत शास्त्रीय ठरेल?

३. द्वितीयेचे कर्मार्थी रूप हे प्रथमेसारखे प्रत्ययविरहीत असते हे खरे परंतु प्रत्यय नसलेल्या प्रथमेला दामले मानतात, मग प्रत्यय नसलेल्या द्वितीयेला का मानू नये? आणि कर्त्याच्या खालोखाल कर्माला महत्त्व असताना त्याला स्वतंत्र विभक्ती मानन्यात अडचण काय? केवळ प्रत्ययाच्या आधारे द्वितीयेला विरोध करण्यात अर्थ नाही. संस्कृत, हिंदी इत्यादी भाषांमध्ये कर्मकारकास प्रत्यय नसतानाही द्वितीया विभक्ती मानली आहे, मग मराठीत विरोध का?

४. म. पां. सबनीसांनी दामले यांच्या द्वितीया विरोधावर आक्षेप घेतला आहे. त्यांच्या मते, त्यांनी व्युत्पत्तीस फाजील महत्त्व दिले आहे. द्वितीयेचे अप्रत्ययी रूप प्रथमेत अंतर्धान पावले असे म्हणण्यापेक्षा प्रथमाच द्वितीयेत अंतर्धान पावली असे का म्हणू नये? प्रथमेला स्वतंत्र प्रत्यय नाहीत शिवाय तेथे शब्दांचे सामान्यरूप होत नाही, म्हणून गाळावयाची झाली तर प्रथमा गाळावी व चतुर्थीसकट द्वितीया ठेवावी.

५. वाक्यात कर्म महत्त्वाचे असल्याने कर्माची विभक्ती-प्रत्ययसहित असो वा प्रत्ययविरहित- म्हणून द्वितीया मानणे योग्य. चतुर्थीचे कार्यही-संप्रदानाचे कार्य द्वितीया करते असे का म्हणू नये? प्रा. मंगरूळकरांच्या मते कर्त्याच्या खालोखाल कर्माचे महत्त्व असल्याने त्यांच्या विभक्तीही क्रमाने जवळजवळ असाव्या हे ओघाने येते. कर्म हा अर्थ व्यक्त करण्याचा मान द्वितीयेचाच आहे.

६. मराठीतील द्वितीयेचे प्रत्यय जसे संस्कृत द्वितीयेच्या प्रत्ययावरून आलेले नाहीत तसे चतुर्थीचे प्रत्ययही संस्कृतच्या प्रत्ययावरून आलेले नाहीत. संस्कृतच्या व्युत्पत्तीचा आधार द्वितीया व चतुर्थी या विभक्तींना घेता येत नाही.

चतुर्थी मानू नये म्हणणाऱ्या व्याकरणकारांनी खालील मुद्दे मांडले आहेत;

१. डॉ. ग. मो. पाटील व प्रा. अरविंद मंगरूळकर यांनी चतुर्थीला विरोध करून द्वितीया मानावी असे मत मांडले आहे.

२. डॉ. पाटील यांच्या मते मराठी गद्य भाषेत स, ना हे प्रत्यय कर्मार्थीपेक्षा संप्रदानार्थीच विशेष प्रचारात आहेत, याला प्रमाण काय? प्राकृतात लोप पावलेली चतुर्थी मराठीत आली कुठून आणि कशी निर्माण झाली? त्या लुप्त चतुर्थीचे कार्य अंशत: द्वितीयेने का होऊ नये? संस्कृतातील चतुर्थीच्या प्रत्ययापासून आलेला विभक्तिप्रत्यय मराठीत कोठे आहे? द्वितीया वगळून (कारण नसताना) एकदम चतुर्थीकडे धाव घेणे यात गौरव फार होतो. मराठीत संप्रदानार्थीपेक्षा कर्मार्थीच धातू अधिक संख्येने आहेत. द्विकर्मक धातू मराठीत असणे यात गैर काहीच नाही. यासाठी द्वितीय ठेवून चतुर्थी गाळावी असे माझे स्पष्ट मत आहे. प्राकृतभाषा चतुर्थीशिवाय वापरात होती, मग मराठीचे चतुर्थीशिवाय अडून का राहावे?

३. प्रा. मंगरूळकरांच्या मते, कर्म हा अर्थ व्यक्त करण्याचा मान द्वितीयेचाच आहे. तर चिपळूणकरांच्या मते, मराठीचे मूलभूत जी बालभाषा .. त्या भाषेत चतुर्थी विभक्ती मुळीच नाही. असे म्हणून पुढे त्यांनी सप्रत्यय द्वितीया संस्कृतप्रमाणे नसल्याने, द्वितीया कर्माशिवाय दुसरा अर्थ व्यक्त करीत नाही; परंतु चतुर्थी संज्ञा ती कर्मरूप विशेष अर्थास लागू करणे शक्य असल्याने, कर्मरूप विशेष अर्थाची संज्ञा जी द्वितीया ती व्यापक अर्थास लागू करणे चांगले असा युक्तिवाद करून त्यांनी चतुर्थीला विरोध केला आहे.

द्वितीया व चतुर्थी या दोन्ही विभक्ती मानाव्यात म्हणणारा एक वर्ग आहे. त्यांच्या मते-

१. या दोन्ही विभक्तीचे प्रत्यय समान असले तरी त्यांचा अर्थ व कार्ये भिन्न आहेत. द्वितीया ही कर्मकारक आहे व चतुर्थी ही संप्रदानकारक आहे. म्हणून या दोन्ही विभक्ती वेगळ्या व स्वतंत्र मानाव्यात.

२. दादोबा पांडुरंग, रा. भि. गुंजीकर, म. पां. सबनीस यांनी अर्थाला व कार्याला प्राधान्य देऊन या दोन्ही विभक्ती मानल्या आहेत. त्यांच्या मते स, ला, ते इत्यादी प्रत्यय कर्मार्थी येतील तेव्हा द्वितीया व संप्रदानार्थी येतील तेव्हा चतुर्थी मानावी.

३. ग. ह. केळकरांनीही दोन्ही विभक्तीचा पुरस्कार करताना म्हटले आहे, कर्मासारखे महत्त्वाचे कारक त्याल पूर्वीच्या व्याकरणकारांनी एक वेगळी विभक्ती दिली तर ती काढून घेण्यात काय अर्थ? कर्मकारक हे स्वतंत्र व एक महत्त्वाचे कारक आहे.

४. प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांनीही द्वितीया व चतुर्थी या दोन्ही विभक्ती मानाव्यात असे म्हटले आहे. वाक्यात एखादा शब्द कार्य काय करतो, त्याचा कारकार्थ काय हे पाहूनच त्याची विभक्ती ठरवावी. त्यांनी सप्रत्ययी द्वितीया व अप्रत्ययी द्वितीया आणि चतुर्थी अशा दोन्ही विभक्ती मानल्या आहेत.

५. वि. का. राजवाडे यांनी व्युत्पत्तीचा आधार घेऊन या दोन्ही विभक्तीच्या प्रत्ययांची व्युत्पत्ती भिन्न असल्याने त्यांना एक न मानता भिन्न मानाव्यात असे म्हटले आहे.

या सर्व मतांचा विचार करता आपणास असे म्हणता येईल की, केवळ प्रत्ययांवरून विभक्ती मानणे योग्य नसल्याने अर्थाचे सहाय्य घ्यावे लागते. त्या दृष्टीने द्वितीया व चतुर्थी विभक्तींचे प्रत्यय जरी समान असले तरी त्या प्रत्ययांचे अर्थ व कार्य भिन्न असल्याने दोन्ही विभक्ती स्वतंत्र मानाव्यात.

**तृतीया विभक्ती**

तृतीया विभक्तीबद्दल मतभेद नाहीत. त्यामुळे तृतीयेचे एकवचनी ने, ए, ई, शी व अनेकवचनी नी, ही, ई, शी असे प्रत्यय मानावेत. क्रियेचे साधन या अर्थाने या विभक्तीस करणकारक असे नाव दिले आहे.

**पंचमी विभक्ती**

पंचमी ही देखील मराठीतील वादग्रस्त विभक्ती आहे. तिचे दोन्ही वचनी प्रत्यय ऊन, हून असे आहेत. इतर विभक्तींचे प्रत्यय एकाक्षरी असताना केवळ पंचमीचेच द्विअक्षरी कसे काय, असा प्रश्न उपस्थित केला जातो. शिवाय त्यांचे स्वरूप शब्दयोगी अव्ययासारखे दिसून येते. उदा.- वर-वरून, जवळ-जवळून. मंगळूरकर आणि पाटील यांनी ही विभक्ती मानू नये, असे म्हटले आहे. त्यांची कारणे पुढीलप्रमाणे;

१. पंचमीचा **ऊन** हा प्रत्यय नामाप्रमाणे अव्ययालाही लागतो. उदा.-बाहेरून-बाहेर (अव्यय) + ऊन, घरून-घर (नाम) + ऊन. या दोन्ही ठिकाणी ऊन या प्रत्ययाचा अर्थ एकच आहे. म्हणून अव्यये मानावीत.

२. हा प्रत्यय एकवचनामध्येच येतो आणि फक्त काही नामानाच लागतो.

३. हा प्रत्यय सर्वनामाला लागण्यापूर्वी त्या सर्वनामाचे षष्ठीचे सामान्यरूप होते. ही विविधता इतर प्रत्ययांमध्ये दिसत नाही.

४. 'ऊन' हा प्रत्यय स्थलवाचक क्रियाविशेषणांनाही लागतो. उदा.-येथे-येथून

या विभक्तीचे स्वरूप इतर विभक्तीपेक्षा वेगळे असल्यामुळे ती मानू नये. पाटील यांनी तिच्या प्रत्ययांना विभक्तिप्रत्यय न मानता अनुयोगी अव्यये म्हणावे असे म्हटले आहे. लीला गोविलकर यांच्या मते, रूढी व परंपरा या दृष्टीने ही विभक्ती वगळणे व्यवहार्य नाही. आणखी काही व्याकरणकारांनी ही विभक्ती मानली आहे.

**षष्ठी विभक्ती**

षष्ठी ही मराठीतील अत्यंत वादग्रस्त विभक्ती आहे. षष्ठीचे प्रत्यय कारकार्थदर्शक नाहीत. त्यामुळे विभक्तीमध्ये स्थान न देता विशेषण समजावे, असे अनेक व्याकरणकारांनी सांगितले आहे. षष्ठीला विरोध करणाऱ्यांत चिपळूणकर, सबनीस, डॉ. पाटील व मंगळूरकर आघाडीवर आहेत. षष्ठी ही विभक्ती मानू नये कारण;

अ) श्री. कृष्णशास्त्री चिपळूणकर

१. विभक्तिप्रत्ययास लिंग, वचन, विभक्ती, सामान्यरूप हे विकार संस्कृतात वगैरे होत नाहीत व मराठीत षष्ठीखेरीज दुसऱ्या प्रत्ययांस ते होत नाहीत. षष्ठीचा प्रत्यय जो 'चा' त्यास मात्र ते विकार होतात. यावरून त्या प्रत्ययास विभक्तिप्रत्यय मानण्यापेक्षा तद्धित प्रत्यय मानणे हे विशेष शोभते.

२. ऐतिहासिक रीतीने पाहताही संस्कृतातील षष्ठीच्या प्रत्ययांतून मराठीतील षष्ठीचे प्रत्यय उत्पन्न होत नाहीत. ते संस्कृतातील तद्धित प्रत्यय 'ईय' पासून उत्पन्न झाले असावेत. रामीय रामिज्य रामाचा; अशी त्यांनी व्युत्पत्ती दिली आहे.

३. षष्ठीस कारकसंबंध नाही म्हणून तिची गणना विभक्तीमध्ये करू नये हे मत प्रथमतः चिपळूणकर व गोडबोले यांनी मांडले.

या मतांना विरोध करून दामले यांनी षष्ठीचे विभक्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. तर दामल्यांच्या मतांना प्रा. मंगरूळकर यांनी विरोध करून षष्ठीने विभक्तित्व नाकारले आहे. त्यांच्या मतांचा परामर्श घेणे उचित ठरेल.

ब) श्री. मो. के. दामले यांच्या मते;

१. षष्ठीस कारक नसल्यामुळे कारकद्वारा केलेले विभक्तीचे लक्षण तिजला लागत नाही. म्हणून ती विभक्ती नव्हे. या मुद्द्यात अर्थ नाही. कारकाद्वारा विभक्तीचे लक्षण मानणे चुकीचे होय.

२. 'चा' हा प्रत्यय संस्कृत विभक्तिप्रत्यय 'स्य' वरून आलेला आहे. म्हणून षष्ठीच्या प्रत्ययास विभक्तिप्रत्ययांमध्ये स्थान द्यावे.

३. षष्ठीच्या प्रत्ययांच्या ठायी विभक्तीचे गुणधर्म आहेतच. शिवाय विशेषणाचेही गुणधर्म त्यामध्ये आणखी असले म्हणून काय झाले? षष्ठीचे अंगी विशेषणत्व असणे ही गोष्ट तर विभक्तित्वाचे आड येऊ शकत नाही. तिच्या ठायी विभक्तीचे सर्व धर्म असल्यामुळे विशेषणापेक्षा विभक्ती हेच नाव अधिक योग्य आहे.

४. षष्ठीचे प्रत्यय हे चरमप्रत्यय नाहीत, षष्ठीच्या प्रत्ययांनंतरही नामाला पुढे प्रत्यय लागतात तसे इतर विभक्तिप्रत्ययांच्या बाबतीत घडत नाही, म्हणून षष्ठी ही विभक्ती नाही. या आक्षेपांना उत्तर देताना त्यांनी म्हटले आहे, सप्तमीचे प्रत्यय लागल्यावरही पुढे दुसरे प्रत्यय लागतात, उदा.-अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे. सप्तमीला विभक्तीतून काढायला कोणीचे तयार होणार नाही म्हणून षष्ठीला या कारणासाठी विभक्तीतून काढू नये.

५. स्थलवाचक व कालवाचक अव्ययांना षष्ठीचे प्रत्यय लागून विशेषणे तयार होतात, उदा.- येथे-येथचा, आज-आजचा. म्हणून या प्रत्ययांना विभक्तिप्रत्यय मानू नये हे दामले यांना मान्य नाही. ते म्हणतात, चा प्रत्ययाप्रमाणे ला प्रत्यय या प्रकारच्या अव्ययांना लागून विशेषणे निर्माण होतात. उदा.-येथला-तेथला. पण या प्रत्ययाला कोणी विभक्तिप्रत्यय समजत नाहीत. ते भिन्न मानले आहेत.

६. तद्धित प्रत्ययांनी नामाचे सामान्यरूप होत नाही. षष्ठीचे प्रत्यय लागण्यापूर्वी नामाचे बहुधा सामान्यरूप होते. तसेच कोणत्याही तद्धित प्रत्ययाने वचनाचा बोध होत नाही. परंतु घराचा, घरांचा या प्रत्ययात शब्दापासून वचनाचा बोध होतो.

७. प्रत्येक विशेषणापासून कोणते तरी आवश्यक नाम साधले जाते, उदा.-सुंदर, सौंदर्य. जर चा प्रत्यायाला विशेषणाचा प्रत्यय मानले तर हाताचा, घरचा या शब्दांपासून कोणती भाववाचक नामे साधली जातात?

८. षष्ठी प्रत्यय लागलेला शब्द विशेषणासारखा असला तरी खऱ्या अर्थाने तो शब्द विशेषण नाही.

उदा.–**पांढऱ्या** घराचे दार

९. षष्ठी ही विभक्ती मानली नाही तर केळफूल, देवघर ह्यासारख्या सामासिक शब्दाचा विग्रह कसा करणार?

क) प्रा. अरविंद मंगळूरकर

दामले यांनी मांडलेल्या या मतांचे प्रा. मंगरूळकर यांनी खंडन करून षष्ठी ही विभक्ती मानू नये असे म्हटले आहे. त्यांची मते पुढीलप्रमाणे–

१. षष्ठी विभक्ती आणि अन्य विभक्ती यांच्या स्वरूपात जो फरक आहे त्याचा निर्वाह कसा करणार? कोणत्या संबंधाने करणार? आणि सर्व विभक्तीना एका सूत्रात कसे गोवणार?

२. स्य > त्य > च्च > चा ही भांडारकरांनी सुचविलेली उत्पत्ती निरूपयोगी व गैरलागू आहे. ज्या भाषेचे व्याकरण रचावयाचे त्याच भाषेतील स्थिती पाहिली पाहिजे.

३. षष्ठीचे प्रत्यय हे चरमप्रत्यय नाहीत व चरमप्रत्ययत्व ही काही विभक्तीची एकमेव कसोटी नाही.

४. येथचा, तेथचा या विशेषणांतील चा प्रत्यय आणि षष्ठीचा चा प्रत्यय भिन्न आहेत, हे मत त्यांना मान्य नाही. उलट चा आदि प्रत्यय तद्धित प्रत्यय आहेत हे सिद्ध होते.

५. षष्ठीच्या प्रत्ययाचे स्वरूप इतर विभक्तिप्रत्ययापेक्षा वेगळे आहे. षष्ठीचा अपवाद वगळता मराठीने विभक्तीच्या स्वरुपाच्या ठिकाणी काही एकविधता सांभाळलेली आहे. ती बिघडणार असेल तर दुसरी व्यवस्था शोधणे योग्य आहे.

६. षष्ठी प्रत्ययांनी साधलेल्या षष्ठी तत्पुरूष समासाचे काय करायचे यावर ते म्हणतात, अशा प्रकारच्या कर्मधारय समासाचा एक वेगळा गण समजावा.

७. षष्ठीच्या ठिकाणी विशेषणाचे गुणधर्म आहेत म्हणून विभक्तिप्रत्ययाचे सर्वसाधारण स्वरूप रेखीव ठेवण्यासाठी षष्ठीचे प्रत्यय हे शेषप्रत्ययांच्या समूहात घालावेत.

८. षष्ठी प्रत्ययान्त शब्दापासून भाववाचक नामे होत नसल्याने त्यांना विशेषण म्हणता येणार नाही, हे दामलेंचे मत मान्य करून षष्ठ्यन्त रूपांचा स्वतंत्र गट करून साधित विशेषण गटात त्यांना घालावे, असे सुचविले आहे.

९. दामले यांनी म्हटले आहे,की जेव्हा विशेषणापुढे सविभक्तिक शब्द येतो, तेव्हा त्या विशेषणाचे सामान्यरूप होते. काळा घोडा, काळ्या घोड्याने, पण विशेषणाच्या पुढे विशेषण आल्याने कोणत्याही विशेषणाचे सामान्यरूप होत नाही. पांढऱ्या हे सामान्यरूप

निश्चितपणे घराचे या पदामुळे झालेले आहे. फिक्या हिरव्या रंगाची साडी या वाक्यांशामध्ये फिक्या हे सामान्यरूप हिरव्या या विशेषणामुळे झाले आहे.

१०. विशेषणांचा नामाप्रमाणे उपयोग होतो, परंतु चा प्रत्ययान्त नामांचा असा नामाप्रमाणे उपयोग होतोसे वाटत नाही या दामलेंच्या आक्षेपावर म्हणतात, घरच्यांना लाथा, दारच्यांचे लाड, घरचीचं ते मिठवणी-बाहेरचीचं ते मिठ्ठापाणी अशा प्रकारची पुष्कळशी उदाहरणे मराठीत आहेत.

वरील षष्ठीबद्दलची मते लक्षात घेता षष्ठी विभक्ती मानणे गुंतागुतीचे आहे, असे जाणवल्याशिवाय राहात नाही. षष्ठीला प्रत्यक्ष कारकार्थ नसले तरी ती कारकार्थ व्यक्त करीत असते, याकडे कोणी फारसे लक्ष दिले नाही. मराठीने विभक्तीची नावे व संपूर्ण विभक्तिव्यवस्था संस्कृतवरून स्वीकारली असली तरी तिच्यात काही मूलभूत बदल घडत गेले. ते बदल मराठीचे वेगळेपण स्पष्ट करणारे असल्याने त्यांचा वेगळ्या पद्धतीने विचार करावा लागतो, असे गोविलकर यांनी म्हटले आहे.

**सप्तमी विभक्ती**

मंगळूरकर व पाटील यांनी ही विभक्ती मानायला विरोध केला आहे, त्याची कारणे पुढीलप्रमाणे;

१. सप्तमीचे आ, ई हे दोन्ही प्रत्यय आज जवळ जवळ वापरातून गेले आहेत. म्हणून सप्तमीचा विचार करताना फक्त त या एकाच प्रत्ययाचा विचार करणे आवश्यक आहे.

हा 'त' प्रत्ययही चरमप्रत्यय नाही. म्हणजे त्या प्रत्ययाला दुसरे प्रत्यय लागू शकतात. उदा.- त्यातला. म्हणून षष्ठीप्रमाणे सप्तमीही विभक्तीतून काढावी.

२. 'त' प्रत्ययांनी साधलेल्या रुपांच्या जागी तशाच अर्थाच्या क्रियाविशेषण अव्ययांची प्रतिस्थापना होऊ शकते.

परंतु सप्तमी विभक्ती मानणे आवश्यक आहे. त व ई हे अधिकरणार्थी प्रत्यय भाषेत योजले जातात, उदा.-घरात, घरी

**संबोधन विभक्ती**

संबोधन ही देखील वादग्रस्त विभक्ती आहे. संबोधनास एकवचनी प्रत्यय नाही, परंतु एकवचनी रूपाचे सामान्यरूप आढळते. उदा.-देव-देवा, राम-रामा. अनेकवचनामध्ये तो प्रत्यय येतो, उदा.- देवांनो, मुलांनो. दामले यांनी परंपरा व प्रत्ययत्व या कारणाने विभक्ती मानली आहे. प्रा. मंगळूरकरांनी संबोधन विभक्ती मानावी असे म्हटले आहे, त्याची कारणे पुढीलप्रमाणे-

१. संबोधनास ०, आ, या, ई, ए हे एकवचनाचे व नो हे अनेकवचनाचा प्रत्यय आहे.

२. ते चरमप्रत्यय आहेत.

३. विभक्तीवाचून संबोधनाचा कोणत्या गटात समावेश करणार?

४. संबोधनाला स्वतंत्र प्रत्यय आहेत. त्यांना पुढे विकृती होत नाही. त्याचे प्रत्यय नामांना लागतात.

कारकवाद्यांच्या मते संबोधनास कारक नसल्याने ती विभक्ती मानू नये. डॉ. ग. मो. पाटील यानी संबोधनास विरोध करताना म्हटले आहे;

१. संस्कृतमध्ये संबोधनास प्रत्यय नाहीत व कारकार्थही नाहीत; म्हणून तिला स्वतंत्र विभक्ती मानलेली नाही.

२. वाक्यातील कोणत्याही पदाशी संबोधनाचा कोणताही संबंध नसतो. वाक्यातील संबोधन काढून टाकले तरी अर्थबोध होण्याच्या दृष्टीने काहीही अडत नाही.

३. सर्वनामाला संबोधन कधीच लागू पडत नाही.

४. संबोधनाच्या बरोबर अरे, ए इत्यादी केवलप्रयोगी अव्यये येतात.

संबोधन विभक्ती मानण्यातही अडचणी खूपच आहेत. ही विभक्ती न मानता केवलप्रयोगी अव्ययातील एक प्रकार मानण्यास काय हरकत आहे? सगळ्याच विभक्तींचा एकत्रित विचार करण्याची गरज संबोधनामुळे अधिक स्पष्ट झालेली आहे.

**विभक्तिसंख्या**

मराठीत विभक्तींची संख्या आठ मानली जाते. पण याबद्दल एकवाक्यता नाही. शाळेत शिकविताना सामान्यत: आठ विभक्ती मानल्या जातात. ही परंपरा संस्कृतवरून आलेली आहे. गुंजीकरांनी म्हटले आहे, की वास्तविक मराठीमध्ये आठ विभक्ती मानण्यास खरोखरी कोणताही आधार नाही. केवळ संस्कृतची परंपरा म्हणून आठ विभक्ती मानल्या गेल्या आहेत. दादोबा यांनीही आठ विभक्ती मानल्या आहेत.

कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी कारकार्थास महत्त्व देऊन षष्ठी व संबोधन या विभक्ती गाळल्या व समान प्रत्ययामुळे द्वितीया गाळून चतुर्थी मानली आणि मराठीत पाच विभक्ती मानाव्या असा निर्णय दिला. रा. भि. जोशी यांनीही कारकावरून षष्ठी व गाळून उरलेल्या सहा विभक्ती मानल्या. मात्र त्यांना प्रथमा, द्वितीया न म्हणता त्यांनी कर्तृकारक, कर्मकारक अशी नावे दिली आहेत.

मो. के. दामले हे प्रत्ययवादी असल्याने त्यांना समानप्रत्ययांमुळे द्वितीया वगळून उरलेल्या सात विभक्ती मानल्या. म. पां. सबनीस यांनी प्रत्यय नसल्यामुळे प्रथमा व कारक नसल्याने षष्ठी या

विभक्ती गाळल्या आणि उरलेल्या सात विभक्ती मानल्या. तर अर्वाचीन व्याकरणकारांनी ही संख्या आणखी कमी केली. डॉ. ग. मो. पाटील यांनी चरमप्रत्ययत्वाच्या आधारे प्रथमा, द्वितीया व तृतीया या तीनच विभक्ती मानल्या. प्रा. अरविंद मंगरूळकरांनी प्रथमा, द्वितीया, तृतीया व संबोधन या चारच विभक्ती मानल्या.

डॉ. लीला गोविलकरांनी म्हटले आहे, मराठीतील एक षष्ठीचा व संबोधनाचा अपवाद वगळल्यास इतर सर्व विभक्ती मानणे व्यवहाराला धरून आहे. म्हणजे मराठीत प्रथमा, द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी व सप्तमी या सहा विभक्ती मानावयास हरकत नाही. प्रत्ययवादी व अर्थवादी या दोघांच्या दृष्टीने सहा विभक्तिसंख्या मानणे योग्य ठरते.

**विभक्ती प्रत्ययांवरून मानाव्यात की अर्थावरून?**

विभक्ती प्रत्ययांवरून मानाव्यात की अर्थावरून हा एक महत्त्वाचा वाद आहे. यावरून विभक्तीकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोण दिसून येतात. विभक्ती या प्रत्ययांवरून मानाव्यात म्हणणाऱ्या व्याकरणकारांची मते अशी;

१. मूळ संस्कृत भाषेत प्रत्ययांवरून विभक्ती मानल्या आहेत आणि मराठीतील विभक्ती संस्कृतमधून आल्याने मराठीतही प्रत्ययांवरून विभक्ती मानाव्यात.

२. वाक्यात शब्दांची जी रूपे होतात, ती प्रत्यय लागल्याने तयार होतात. विभक्ती हा विकार आहे. विभक्तिविचार हा शब्दविचार आहे, वाक्यविचार नव्हे. म्हणून वाक्यातील अर्थाच्या संबंधात विचार करणे योग्य वाटत नाही.

३. कारकव्यवस्था सदोष आहे. त्यामुळे केवळ कारकावरून विभक्ती मानणे योग्य नाही.

४. नाम, सर्वनाम या शब्दांचा नेहमी क्रियापदाशी संबंध असतो असे नाही. तो इतर शब्दांशीही असतो. उदा.–मनाने मोकळा, आमचा मुलगा

५. विभक्तीमध्ये अर्थ महत्त्वाचा आहे. पण तो प्रत्ययाशिवाय व्यक्त होऊ शकत नाही. म्हणून प्रत्यय महत्त्वाचे आहेत. अर्थ हा गौण आहे.

६. प्रत्यय भिन्न भिन्न असले तरी एकच अर्थ स्पष्ट करणारे प्रत्यय एका जातीचे समजून समान अर्थाच्या प्रत्ययांचा एकेक गट करून त्यांची वर्गवारी केली आहे. त्यांनाच प्रथमा, द्वितीया अशी नावे दिली आहेत. ती योग्य आहेत आणि रूढ झाली आहेत.

७. षष्ठी विभक्तीच्या ठिकाणी विभक्तीचे गुण असल्यामुळे ती विभक्ती मानावी. कारक नाहीत म्हणून नाकारू नये.

८. एकच विभक्ती भिन्न भिन्न अर्थाने येते हीही अपूर्णावस्था आहे. परंतु त्यामुळे फारसे बिघडत नाही. फक्त तिचा उपयोग कोणत्या अर्थाने होतो हे लक्षात घ्यावे.

या उलट अर्थावरून विभक्ती मानावी म्हणणाऱ्या व्याकरणकारांची मते अशी-

१. व्युत्पत्तीचा आधार घेणे योग्य नाही. कारण मराठीचे विभक्तिप्रत्यय संस्कृतवरून आलेले नाहीत. तर ते संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश या मार्गाने आलेले आहेत. संस्कृतपेक्षा मराठीच्या विभक्तीचे स्वरूप निराळे आहे. म्हणून परंपरेचा आधार घेणे योग्य नाही.

२. विभक्तीमध्ये प्रत्ययांपेक्षा अर्थास महत्त्व आहे. प्रथम अर्थ व त्यानंतर प्रत्यय म्हणून अर्थ महत्त्वाचा आहे.

३. कारक महत्त्वाचे आहेत, त्यामुळे कारकावरून विभक्ती मानावी. मराठी कारक सहा आहेत. त्यामुळे विभक्तीसुद्धा सहाच मानाव्यात. प्रथमा, द्वितीया अशी क्रमवाचक नावे योग्य नाहीत. तर कारकावरून कर्तृकारक, कर्मकारक, करणकारक अशी नावे देणे योग्य ठरते.

४. विभक्तिप्रत्यय लागणाऱ्या शब्दांचा परस्परांशी संबंध नसून तो क्रियापदाशी असतो. हाच कारकसंबंध होय.

५. प्रत्ययावरून विभक्ती मानण्यात अनेक अडचणी आहेत. प्रथमेला प्रत्यय नाहीत. द्वितीया व चतुर्थीचे प्रत्यय समान आहेत. त्यामुळे विभक्ती ठरविताना अर्थाचे सहाय्य घ्यावे लागते.

६. प्रत्यय हे बाह्यरूप आहे तर अर्थ हा आत्मा आहे.

७. एकच प्रत्यय भिन्न भिन्न अर्थ व्यक्त करतात. अशा वेळीही अर्थाचेच सहाय्य घ्यावे लागते.

विभक्ती प्रत्ययावरून मानाव्यात की अर्थावरून मानाव्यात, या बद्दल हा वाद आहे. या संदर्भात म. पां. सबनीसांनी मांडलेली भूमिका योग्य ठरते. ते म्हणतात, विभक्ती हा विकार आहे. तो विकार नामाचा क्रियापदाशी असलेला संबंध दर्शविण्यासाठी होतो म्हणून कारकांनाही महत्त्व आहे. पण विकाररूपे प्रत्ययांच्या द्वारे होतात व विभक्तिप्रकारही प्रत्ययामुळे होतात. त्यामुळे विभक्ती ठरविताना प्रत्यय व अर्थ या दोहोंचे सहाय्य घ्यावे लागते. त्यामुळे दोहोंनाही महत्त्व आहे.

## ४.४ शब्दार्थ व टीपा

**कर्ता :** क्रियापदाने निर्देश केलेली क्रिया करणारा आणि बहुधा वाक्यारंभी येणारा शब्द.

**कर्म :** क्रियापदातील कृतीचा ज्यावर परिणाम होतो ती वस्तू किंवा व्यक्ती दाखविणारा शब्द.

**तद्धितप्रत्यय :** जे प्रत्यय लागून नाम व सर्वनाम यांच्यापासून नवे शब्द तयार होतात त्यांना तद्धितप्रत्यय म्हणतात. उदा.-समाज-सामाजिक, पाटील-पाटीलकी

**कारक :** नाम व सर्वनाम यांचा क्रियापदाशी असणारा संबंध.

**सामान्यरूप :** नाम व सर्वनाम यांनी विभक्तिप्रत्यय लागताना त्यांच्या अंत्य अक्षरामध्ये जो बदल होतो त्याला सामान्यरूप म्हणतात. उदा.-राम-रामाला (राम चे रामा होणे)

**उपपदार्थ :** नामाचा क्रियापदाशिवाय इतर शब्दांशी असलेला संबंध.

**आख्यात :** धातूस जे प्रत्यय लागून क्रियापदे तयार होतात, त्यास आख्यात प्रत्यय असे नाव.

## ४.५ समारोप

इंग्रजी व संस्कृत प्रयोगविचार ही वाक्यरूपान्तर योजना आहे. पण मराठीत एकेरी वाक्यरचना लक्षात घेता कर्ता-कर्म-क्रियापद यांची रचना लक्षात घेऊन प्रयोग ठरत असतो. पुष्कळ व्याकरणकारांनी मराठीत कर्तरी, कर्मणी व भावे असे तीन प्रयोग मानलेले आहेत. परंतु या तीन प्रयोगाचा संकर मराठीत आढळतो. म्हणून मो. के. दामले यांनी संकीर्ण प्रयोग हा चौथा प्रयोग मानलेला आहे.

विभक्तिविचारात आपण विभक्ती आणि प्रत्यय या दोन्हींचा परिचय करून घेतला. विभक्तिविषयक खूपच वाद दिसून येतात. विभक्तीची नावे, विभक्तिसंख्या, विभक्ती प्रत्ययावरून मानावी की अर्थावरून असे ते वाद आहेत. विभक्तीचे स्वरूप लक्षात घेताना मराठी भाषेचा स्वतंत्रपणे विचार करण्याची गरज आहे. केवळ संस्कृतचा आधार घेऊन चालत नाही. वेगळ्या मराठी भाषेचे वेगळेपण तिच्या व्याकरणातून स्पष्ट करणे, पुढील काळातील अभ्यासकांसाठी आव्हान आहे.

## ४.६ सरावासाठी प्रश्न

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कर्मणी प्रयोग म्हणजे काय?

२. मो. के. दामले यांनी नवीन प्रयोग कोणता मानला आहे?

३. कोणत्या विभक्तीचे प्रत्यय समान आहेत?

४. पंचमीचा कोणता प्रत्यय स्थलवाचक क्रियाविशेषणांना लागतो?

५. मराठीतील कोणती विभक्ती अत्यंत वादग्रस्त आहे?

**उत्तरे :** १. कर्माच्या लिंग, वचन व पुरुषाप्रमाणे क्रियापदाचे रूप बनते, यास कर्मणी प्रयोग असे म्हणतात.

२. मो. के. दामले यांनी संकीर्ण प्रयोग हा नवीन प्रयोग मानला आहे.

३. द्वितीया व चतुर्थी विभक्तीचे प्रत्यय समान आहेत.

४. पंचमीचा ऊन हा प्रत्यय स्थलवाचक क्रियाविशेषणांना लागतो.

५. मराठीतील षष्ठी विभक्ती अत्यंत वादग्रस्त आहे.

**योग्य पर्याय निवडा.**

१. नळें इंद्रासीं असें बोलिजिले, हे उदाहरण कोणत्या कर्मणी प्रयोगातील आहे?
(पुराण / शक्य / नवीन)

२. 'अधिकरण' हा अर्थ कोणत्या विभक्तीचा आहे?
(द्वितीया / सप्तमी / चतुर्थी)

३. लीला गोविलकर यांनी विभक्तींची किती संख्या सांगितली आहे?
(आठ / सात / सहा)

४. विभक्तिव्यवस्था ही कोणत्या भाषेतून मराठीत आलेली दिसते?
(कन्नड / संस्कृत / इंग्रजी)

५. नाम व सर्वनाम यांचा क्रियापदाशी असणाऱ्या संबंधास कोणती संज्ञा आहे?
(कारक / आख्यात / तद्धित)

**उत्तरे :** १. पुराण, २. सप्तमी, ३. सहा, ४. संस्कृत, ५. कारक

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. मराठीतील प्रयोगव्यवस्था सोदाहरण लिहा.

२. मराठीतील चतुर्थी व षष्ठी विभक्तीचा वाद सविस्तर मांडा.

३. मराठी विभक्ती व्यवस्था देऊन तिचे विशेष सांगा.

४. प्रथमा ते सप्तमी या विभक्तीचे प्रत्यय देऊन विशेष लिहा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. विभक्ती प्रत्ययावरून मानाव्यात की अर्थावरून याविषयी व्याकरणकारांची मते लिहा.

२. द्वितीया विभक्तीबाबतची विविध मते लिहा.

३. षष्ठी विभक्तीचा वाद स्पष्ट करा.

४. प्रथमा विभक्तीला प्रत्यय नाहीत, का ते लिहा. विशेष सांगा.

## ४.७ अधिक वाचन

१. शास्त्रीय मराठी व्याकरण : मो. के. दामले

२. मराठीचे व्याकरण : डॉ. लीला गोविलकर

३. मराठी व्याकरणाची कुळकथा : अ. का. प्रियोळकर

४. मराठी व्याकरण : काही समस्या : प्रा. प्र. ना. दीक्षित

❑❑❑